बुधवार २६ ऑगस्ट '७०, ४० पैसे




या अंकापासून 'माणूस' आठवड्यातून दोनदा – बुध

# नेमेचि येतो....

स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचा दिल्लीतला बाज आता ठरून गेला आहे! लाल किल्ल्यापुढच्या शामियान्यामध्ये देशीविदेशी पाहुणे आपापल्या मानपानाप्रमाणे बसलेले असतात, समोरच्या प्रांगणात नागरिकांची अलोट गर्दी झालेली असते आणि ध्वजवंदन करून प्रधानमंत्री राष्ट्राला उद्देशून भाषण करीत असतात. उच्च ध्येयाचा पुकारा करायचा असे त्या भाषणाचे स्वरूपही ठरून गेलेले असते.

दर स्वातंत्र्यदिनाला प्रधानमंत्री नवे काय सांगणार हे खरे असले तरी पं. नेहरू आपल्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वामुळे आणि शब्दाशब्दातून जाणवणाऱ्या कळकळीमुळे श्रोत्यांच्या चित्ताला स्पर्श करीत असत. शास्त्रीजींच्या कारकीर्दीमध्ये दोन स्वातंत्र्यदिन आले. पंडितजींच्या तुलनेने शास्त्रीजी व्यक्तिमत्त्वामध्ये कितीतरी उणे असले तरी आपल्या त्या लहानशा कारकीर्दीतही 'जनसामान्यांचा नेता' अशी आपली प्रतिमा त्यांनी निर्माण केली होती. पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री यांचा वारसा सांगतच श्रीमती इंदिरा गांधी प्रधानमंत्रिपदावर आल्या. प्रधानमंत्री या नात्याने त्या देशाच्या राजकारणाला काही वेगळे वळण लावतील अशी प्रारंभी त्यांच्यासंबंधी मुळीच अपेक्षा नव्हती. त्यांना प्रधानमंत्रिपद मिळाले तेही स्वकर्तृत्वावर नव्हे. शास्त्रीजींच्या आकस्मिक निधनानंतर प्रधानमंत्रिपदाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा हे पद आपल्याला मिळाले पाहिजे अशी मोरारजी देसाई यांची दबलेली महत्त्वाकांक्षा उफाळून आली आणि त्यांचा हा बेत सिद्धीला जाऊ नये म्हणून संसदीय काँग्रेस पक्षाने त्या पदावर इंदिरा गांधी यांची निवड केली. पंडितजींची कन्या ही पुण्याईच त्यांच्या उपयोगी पडली.

प्रधानमंत्रिपदी निवड झाल्यानंतरही इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जाणवत नव्हता. गेल्या वर्षीच्या मेमध्ये राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे आकस्मिक निधन झाले आणि नव्या राष्ट्रपतीच्या निवडीचा प्रश्न उभा ठाकला. तेव्हापासून इंदिरा गांधी यांचे वेगळेच दर्शन घडू लागले. सिंडिकेट गटाच्या संजीव रेड्डी यांना राष्ट्रपतिपद मिळाले तर आपले प्रधानमंत्रिपद धोक्यात येण्याचा संभव आहे हे त्यांनी बंगलोर येथे झालेल्या काँग्रेस महासमितीच्या बैठकीच्या वेळी जाणले आणि तेव्हापासून सत्तास्पर्धेच्या राजकारणाला तेजी चढली. इतकी की त्यापायी काँग्रेस पक्षाची शकले झाली याचीही कोणी फिकीर केली नाही. तेव्हापासून 'समाजवाद' हाच इंदिरा गांधी यांनी आपला परवलीचा शब्द केला. हे सारे आज आठवण्याचे कारण म्हणजे गेल्या पधरा ऑगस्टला लाल किल्ल्यापुढल्या व्यासपीठावरून त्यांनी केलेले भाषण.

चौदा प्रमुख बँकांच्या राष्ट्रीयीकरणापासून देश समाजवादाच्या रोखाने वाटचाल करू लागला असून या राष्ट्रीयीकरणाचे फायदे आपल्याला दिसू लागले आहेत अशी ग्वाही इंदिरा गांधी यांनी या भाषणात दिलेली आहे. टाळ्या घेण्याच्या दृष्टीने शब्दांची ही आतषबाजी कितीही आकर्षक असली तरी समाजवादाच्या या फायद्याचा

पृष्ठ ६४ वर

२६ ऑगस्ट १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : बारावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार...

८ ऑगस्टच्या अंकात श्री. यशवंत पटवर्धन व श्री. विलास पतकी यानी भंडारदरा विषयी अभ्यासपूर्ण व रसाळ माहिती दिल्याबद्दल अभिनंदन. अशाचप्रकारे माहिती जर निरनिराळ्या वृत्तपत्रातून दिली तर निश्चितच सर्वसामान्य लोकात आपल्या तंत्रज्ञाविषयी आपुलकी व विश्वास निर्माण होऊन आम्हीही याबाबतीत स्वयपूर्ण आहोत याची जाणीव होईल.

१२ ऑगस्ट १९७० — रमेश गट्टाणी, मुंबई

दिनाक ८ व १५ ऑगस्टचे विशेषांक वाचून फारच समाधान वाटले. विशेषत: १५ ऑगस्टचे अकातील सु. ल. सोमण याचा 'माडवी वाहू दे पुन्हा खळाळून' हा आमच्या गोव्याच्या राजकारणावरील सद्य'स्थितीतील लेख वाचताना तर असे वाटत होते की जणू काही प्रत्यक्षत.च सर्व घडामोडी डोळ्यासमोर घडत आहेत. इतका हा लेख ज्वलत असा झाला आहे. सु. ल. सोमणाची लिखाणाची शैली काही औरच. लेखाच्या सुरुवातीपासून शेवट येईपर्यंत माणूसचा अंक बाजूला ठेवण्याची इच्छाच झाली नाही. लेख वाचताना आजूबाजूला जणु गोव्यातून तर आपण प्रवास करत नाहीना असे वाटत होते.

१५ ऑगस्ट १९७० — सुभाष दांडेकर, मुंबई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# आद्य भूमिक्रांतिकारक

अप्रिय परंतु सत्य सुंदरपणे सांगणे अवघड असते. पण विनोबानी जमीन कबजा आंदोलनाबाबत हे अवघड काम नुकतेच केलेले आहे. आपल्या नेहमीच्या अहिंसक पद्धतीने. एका मुलाखतीद्वारा त्यानी आंदोलनाला आपला नैतिक पाठिंबा दिला. एक मेखही मारून ठेवली. त्यामुळे पाठिंबा काढून घेतला असेही वाटावे.

मेख ही : आंदोलन करणाऱ्यांनी जमिनी खरोखरच बळकावून दाखवाव्यात. घेतलेल्या जमिनीचा कबजा कायम राहिला पाहिजे.

हे घडणे शक्यच नाही. आंदोलनाची आखणी ज्या पद्धतीने झाली त्यातून असे काही भरीव, कायम स्वरूपाचे यश पदरात पडण्याचा संभव नाही. प्रश्नाकडे लक्ष मात्र वेधले जाईल. जे काम विनोबा आज दहा-पंधरा वर्षे करूनच राहिला आहे. शासन काही सुधारणा घोषित करेल. पण भूमीचा भूमिहीनाकडे मोठ्या प्रमाणावर ताबा जाणे ? अशक्य.

ही मेख विनोबानी का ठोकली असावी ? त्याना आलेला वाईट अनुभव.

भूदान चळवळीची या सर्व डाव्या पक्षानी आजवर मनमुराद हेटाळणी केली. तिच्यात अनंत दोष आहेत. मान्य आहे. तरीही ती उचलणे, पुढे नेणे, आपली ताकद तिच्यामागे उभी करणे, समाजकारणाचा आणि राजकारणाचा साधा जमवून घेणे योग्य ठरले असते. स्वतःला क्रांतिकारक समजणाऱ्या डाव्या पक्षांची तर ही विशेष जबाबदारी होती. ही जबाबदारी त्यानी पार पाडली नाहीच, वर उपेक्षेचा गुन्हा केला. आज वस्तुस्थिती मात्र अशी आहे, की या उपेक्षित चळवळीने, थोडे का का होईना, प्रत्यक्षात जमीनवाटप करून दाखविलेले आहे. सर्वोदयवादी म्हणत आहेत जवळजवळ बारा लाख एकर भूमी त्यानी आजवर वाटली. मिळाली पन्नास ापण लाखाचे हजार धरू. काही हजार एकर जमीन तरी या चळ- ेनांच्या प्रत्यक्ष ताब्यात मिळाली, हे नाकारण्यात अर्थ नाही. केवळ

ठाणे जिल्ह्यात सहज, वरवर चक्कर मारली, तरी भूदानात मिळालेली जमीन कसणारे, तिच्यावर मालकी सांगणारे आदिवासी भेटतात. नवीन वाटपाचे रीतसर कागदपत्र पाहायला मिळतात. किमान काही हजार एकर जमीन श्रीमंतांकडून गरीबांकडे जिच्यामुळे गेली ती चळवळ स्वप्नाळू, भोळसट, भोंगळ आणि एक एकरही जमीन जिच्यामुळे प्रत्यक्षात अशी हस्तांतरित होणार नाही ते आंदोलन पुरोगामी, वास्तव आणि क्रांतिकारक ! दुनिया झुकती है, दुसरे काय ?

दोन चार महिन्यापूर्वी पेणहून पुण्याला येत होतो. वाटेत हेमडी हे गाव लागले. गावची सगळीच जमीन पूर्वी एका सावकाराकडे होती. अत्यत खराब जमीन. ती त्याने भूदानात देऊन पुण्य मिळविले. ही खराब जमीन गावकऱ्यांनी हळूहळू लागवडीखाली आणली. गाव सारा कातकरी. उत्पादनाचे एकही साधन हाताशी नसलेला. आज खराब प्रतीची का असेना, जमीन कसून त्यावर गुजराण करीत आहे कशीबशी. हे साधन हाताशी आले नसते तर होतेच मुंबईचे फुटपाथ आणि झोपडपट्ट्या यांच्यासाठी रिकाम्या !

विनोबा हे ओळखून आहे. आजचे कायदे, वाटपातील अडचणी आणि पळवाटा, वाटप करणाऱ्या यंत्रणेचे दोष—या सगळ्यातून हा माणूस गेलेला आहे. तरीही याने काही किमान भरीव यश मिळवून दाखविले. गावकऱ्यांना एकत्रित आणून, त्याच्या नैतिकतेला आवाहन करून. दोन पाय आणि चिंतनात गढलेले डोके एवढेच स्वतःजवळचे भांडवल. काही प्रामाणिक कार्यकर्त्यांची साथ.

या उलट कबजेवाल्यांची स्थिती. प्रचंड प्रसिद्धी, पक्षसघटना, हजारो कार्यकर्ते, अनुकूल लोकमत, सत्ताधाऱ्यांपैकीच एका गटाचे आतून प्रोत्साहन, निवडणुकीचे प्रलोभन—तरीही फलनिष्पत्ती काय ? मुठी जरूर उगारलेल्या. पण मुठीत काय ? रिकामी रिकामी.

म्हणून विनोबा म्हणतो : बेटे हो ! करून दाखवा, तर पाठिंबा. मी अहिंसेने थोडेफार केले. एकाकी होतो. तुम्ही सगळे मिळून, हिंसेने का होईना, काहीतरी करा तर खरे ! जे मजबूत असेल, टिकावू असेल.

भूमिक्रांतीच्या या आद्य प्रवर्तकाची या गदारोळात कुणालाही आठवण होऊ नये ?

— श्री. ग. मा.

# राज्यांविषयी बोलायचे झाले तर....

ब्रिटीश भारतातल्या साडे-सहाशे संस्थानामुळे जेवढा ताप ब्रिटीशांच्या होम सेक्रेटरीला होत नसेल तेवढा मनस्ताप आजच्या दिल्लीश्वरांना स्वतंत्र भारतातल्या एकोणीस राज्यामुळे होत असला पाहिजे. विशेषत: १९६७ च्या निवडणुकीनंतर सर्व राज्याचे मिळून जे चित्र उभे राहिले ते विचित्र होते. जवळ जवळ अर्धी राज्ये कांग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षाच्या हाती गेली होती आणि केंद्रस्थानी मात्र कांग्रेस पक्ष अशी स्थिती झाली. मध्यावधी निवडणुकीनंतर या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. पण १९६९ च्या कांग्रेसच्या दुफळीनंतर तर सत्ताधारी कांग्रेसची स्थिती अधिकच केविलवाणी झाली. कारण कांग्रेसचे दोन बालेकिल्ले गुजरात आणि म्हैसूर संघटना कांग्रेसकडे झुकले.

शिवाय १९६७ नंतरचे पाडापाडीचे राजकारण. 'आयाराम-गयाराम' याचा सुकाळ त्यामुळे १९५२ पासून १९६७ पर्यंतचा काळ राज्यसरकारांच्या दृष्टीने जेवढा स्थैर्याचा गेला त्यामानाने १९६७ नंतरची अस्थिरता भयास्पद आहे. अस्थिरतेचा शाप मुख्यत: पंजाब, हरयाना, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल आणि केरळ या राज्यांना लाभला आहे. १९६७ नंतर भारताचे राजकारण वेगाने वाहू लागले. घटना द्रुतगतीने घडू लागल्या राज्याची मंत्रिमंडळे क्षणाक्षणाला पडू लागली.

म्हणून राज्याराज्यातील धावत्या राजकारणाचा सम्यक आढावा मोजकेपणे घेण्याचा या स्तंभाचा प्रयत्न. देशातील बदलत्या राजकारणाचे प्रतिबिंब इथे न्याहाळायला मिळावे असा इरादा प्रत्येक राज्याचा उल्लेख आलाच पाहिजे असा आग्रह नाही. चित्र काढताना ज्या ज्या राज्यांना स्पर्श करणे आवश्यक असेल त्याच राज्याना हात लावू एखादे वेळी एखादेच राज्य उठून दिसेल. कधी सर्वत्रच थंडा मामला. पण असे क्वचितच घडण्याचा संभव.

आजच्या घडीला हिमाचल हे नवे राज्य धरून एकूण एकोणीस राज्यांपैकी नऊ राज्ये सत्ताधारी कांग्रेसच्या ताब्यात आहेत. ती म्हणजे जम्मू-काश्मीर, हरयाना, हिमाचल प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, आंध्र, आसाम, मध्य-प्रदेश आणि बिहार. पैकी बिहार मंत्रिमंडळ अगदी कोसळण्याच्या टोकावर आहे.

उरलेल्या राज्यांपैकी उत्तर प्रदेशात भारतीय क्रांतिदलाच्या चरणसिंगाचे मंत्रिमंडळ सत्ता-कांग्रेसच्या पाठिंब्यावर आहे. गेले चार महिने सत्ता-कांग्रेसचे कमलापती त्रिपाठी, चरणसिंग भाक्रादची माळ आपल्या गळ्यात घालतील या वेड्या आशेने मान खाली वाकवून उभे आहेत. भाक्रादने नव-कांग्रेसमध्ये विसर्जित

व्हावे असे कितीतरी प्रयत्न झाले. पण चरणसिंगानी अद्याप दाद दिली नाही. ते भलतेच धूर्त निघाले. निघाले म्हणजे होतेच. या निमित्ताने नवकाँग्रेसला पुन्हा ते कळले. उत्तर प्रदेश म्हणजे भारताची छोटी प्रतिमा. देशाचे तिन्ही पंतप्रधान उत्तर प्रदेशातले. उत्तर प्रदेशात कुणाचे सरकार आहे यावर केंद्राचे भवितव्य. त्यामुळे १९७२ पर्यंत चरणसिंगाचे पाय ओढण्याचे अनेक प्रयत्न होतील.

पंजाबात अकाली दलाचे सरकार आहे. गेल्याच आठवड्यात बादल सरकारला आडवे पाडण्याचे दोन प्रयत्न झाले. त्यातून ते जिवानिशी वाचले. त्यामुळे हा मजकूर छापला जाईपर्यंत ते खुर्चीवर असतीलच की नाही याची शाश्वती नाही.

गुजरातेतल्या हितेन्द्र देसाईंच्या जुन्या काँग्रेसच्या सरकारला सुरुंग लावण्याचे स्वतंत्र पक्षाचे प्रयत्न वाया गेले. उलट या प्रकरणामुळे स्वतंत्र पक्षालाच तडे गेले. म्हैसूरचे जुन्या काँग्रेसचे सरकार सॉलीड आहे

बंगाल आणि केरळात राष्ट्रपतीची राजवट चालू आहे. केरळात मध्यावधी निवडणुकासाठी अच्युत मेनन याच्या उजव्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाने राजीनामा दिलेला आहे. स्वातंत्र्यानंतर केरळात तेरा मंत्रिमंडळे आली! सर्व पक्षांची मध्यावधी निवडणुकासाठी जोरात तयारी चालू आहे. पण उजव्या कम्युनिस्टांना आत्मविश्वास आहे. निवडणुकाचे घोडामैदान दूर नाही. १७ सप्टेंबरचा दिवस ठरला आहे. लढत आहे उजवे आणि डावे कम्युनिस्ट यांच्यात.

बंगालच्या नक्षलवाद्यांनी हातबाँब फोडून आणि राष्ट्रध्वज जाळून परवाचा स्वातंत्र्य-दिन साजरा केला. बंगाल विधानसभा अखेर तीस जुलैला बरखास्त झाली. तिथेही आता मध्यावधी निवडणुका होतील. तेव्हा काय होईल हे काही सांगता येत नाही. कारण बंगाल हे सध्या अतिशय असुरक्षित राज्य होऊन बसले आहे. मार्क्सिस्ट कम्युनिटानी अधिकारावर असताना नक्षलवाद्यांकडे दुर्लक्ष केले होते. आता तेच नक्षलवादी मार्क्सिस्टांची डोकी कापू लागले आहेत.

जुन्या काँग्रेसची दोन राज्ये सोडून दिली तर विरोधी पक्षीयांचे सर्वांत स्थिर सरकार म्हणजे तामीळनाडू मधील द्रविड मुन्नेत्र कळहम्‌चे. ओरिसाचे स्वतंत्रप्रणीत सरकारही तसे स्थिरच आहे. आंध्रमधील नवकाँग्रेस सरकारला तेलंगणवाद्यांची आणि नलक्षवाद्यांचीही कीड लागली आहे. पण सरकारला सध्या धोका नाही. मेघालयाला पोटात घेणारे नवकाँग्रेसचे आसाम राजकीय दृष्ट्या अद्याप स्थिर असले तरी १९७२ चे भविष्य नीट दिसत नाही. नागालँडचे सरकार नवकाँग्रेसशी जुळवून घेणारे. इंग्रजी ही सरकारी भाषा म्हणून स्वीकारणारे नागालँड हे एकमेव राज्य.

राज्यांचे हे चित्र कदाचित पुढच्या आठवड्यापर्यंत कायमही राहील. पण कुणी सांगावे, दोन-तीन मंत्रिमंडळे दरम्यानच्या काळात गडगडतीलही (आजच्या राजकारणात असेच गोलमाल बोलण्याची पद्धती आहे. राजकीय भविष्य वर्तविणे धोक्याचे झाले आहे.)

— अरुण गोसावी

# कात्रणे । कात्रणे

## जोकर

स्वतंत्र पक्षाचे एक 'बहु सरस' पुढारी श्री. पिलू मोदी यानी मद्रास येथे बोलताना एक नवीन पिलू सोडले. त्यांचे म्हणणे—

"मध्यवर्ती सरकार हा एक चोपन पानी पत्त्यांचा जोड आहे. यात दोन 'जोकर' आहेत. इंदिरा गांधी हवी ती पाने टाकून डाव करतात त्याचे हे कारण आहे."

आज इतके दिवस झाले तरी विरोधी पक्षाची रमी लागत नाही. निजलिंगप्पा काँग्रेस,-स्वतंत्र-जनसंघ, जनसंघ-संसोपा-गप्पा कांग्रेस, संसोपा-डांगी कम्युनिस्ट-प्रसोपा, गप्पा कांग्रेस-संसोपा-नंबुद्रि कम्युनिस्ट, यातले काहीच जमत नाही: याचा अर्थ विरोधी पक्षात जोकर नाहीत असा नाही. हवे तेवढे आहेत. मिस्टर पिलू—' इंदिराबाईंचे जोकर देखील तुमच्या जोकर लोकांपेक्षा जरा बरे आहेत!' □

## एक सूचना

लोकसभेत हरिजन उद्धाराची नेहमी घनघोर चर्चा चालू असते. एका चर्चेत त्यागी यांनी समाजकल्याण उपमंत्री सौ. फुलरेणू गुहा यांना अशी सूचना केली—

"केंद्र सरकार आपल्या मंत्र्यांना घरात हरिजन स्वैपाकी नेमावे असा आदेश देईल काय?"

काय हो हा प्रश्न! सौ. फुलरेणू संतापाने लाल झाल्या. त्यांच्या तोंडातून शब्द फुटेना म्हणून त्यांनी लेखी जबाब दिला—

"असले काही करण्याचा आमचा विचार नाही."

काही गोष्टी 'शिजवण्याकरता' इंदिराबाईंनी हरिजनमंडळी नेमलेली आहेतच. मुस्लीम लीगच्या लुंगीत शिरून जगजीवनराम हे नुकतेच धामाधूम होऊन—बाहेर आले. त्यांनी लगेच जाहीर केले—" मुस्लीम लीग ही 'जनसंघापेक्षा खूपच, म्हणजे खूपच चागली आहे!" जनसंघ बदनामीचा कट शिजवण्याकरताच हा हरिजन स्वैपाकी बाईंनी नेमलेला आहे, हे कसे श्री. त्यागी याना समजत नाही! असली भलती सलती सूचना करून श्री. त्यागी हे हरिजन बंधूची टिंगल तर करीत नाहीत? जगूबाबूचे सोडा, बहुसंख्य हरिजन बंधूच्या अंगावर आज पुरेसे वस्त्र नाही, आणि पोटात पुरेसे अन्न नाही, त्याना बोलावून केंद्र सरकारने असे का विचारायचे—

" तुम्हाला पुरणपोळी करता येते का ? पुलाव बिर्याणी जमते की नाही ?"

मिस्टर त्यागी–" तुम्हाला पुनः मत्री व्हायचे आहे की नाही ? मग असले मंत्र्यांना पेचात टाकणारे प्रश्न एकदम बंद करा बुवा !" ¤

## सर्व्हे

सुशिक्षित स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या. सख्या दिवसेदिवस वाढत चालली. अर्थात त्यांचा 'सर्व्हे' करण्याचा उद्योग कुणीतरी केलाच पाहिजे. 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस' आणि 'दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्क' या सस्थांनी नुकताच या स्त्रियांचा 'सर्व्हे' केला. काही गमतीदार निष्कर्ष यातून निघाले आहेत.

१: विवाहीत स्त्रिया, या अर्धवेळेच्या–पार्ट टाईम–नोकऱ्या पसंत करतात, हा गैरसमज आहे. त्या पूर्ण वेळ बाहेर राहणेच पसंत करतात !

२: ७० टक्के आजोबा-आजी, या सुनांना व मुलीना नोकरी करायला मदत करतात.

३: नोकरी करणाऱ्या स्त्रिया या मुलांची आबाळ करतात असा जो समज होता तो पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. (नवऱ्याची आबाळ करतात किंवा नाही हे मुळी तपासण्यातच आले नाही !)

सर्वात आश्चर्यजनक माहिती बाहेर आली ती म्हणजे नोकरी करणाऱ्या स्त्रियांपैकी फक्त ५ टक्के स्त्रियांनी 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेज'मार्फत नोकरी मिळवल्याचे आढळून आले. ९५ टक्के या केवळ स्त्रीदाक्षिण्यामुळे नोकरीत शिरल्या आहेत. समस्त पुरुष वर्गाचा यापेक्षा मोठा गौरव तो कोणता ?

नोकरी करणाऱ्या स्त्रियांत ६५% हिंदू, व उरलेल्या पस्तीस टक्क्यापैकी २०% कॅथालिक, ५% शीख,...असले तरी मुसलमान स्त्रिया मात्र जवळ जवळ नाहीत ! मुसलमान भगिनीना या क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी मुसलमान बधू का आग्रह धरीत नाहीत बुवा ? मुस्लीम लीगचे महंमद कोया, फक्रुमियाँ, रझाकार युनूस सलीम यांनी ही गोष्ट मनावर घ्यावी. सोयिस्करपणे डोक्यावर 'बुरखा' घेणे काही चागले नाही.

– सेना महाराज



# येथे नांदतात श्रमर्षी

## दिवाकर आगाशे

---

३१ मे १९६९ : सरनाईकचे पत्र आले. एम्. डी. ने शाळेसाठी केलेला अर्ज नामजूर केला गेला. त्यासंबंधी प्रयत्न करावा.

२० जुलै १९६९ : जयसिंगराव यांनी खटपट करून परवानगी मिळविली. अपील यशस्वी झाले परंतु भडगाव बुद्रुक ऐवजी खुर्दसाठी परवानगी मिळाली.

१९ नोव्हेंबर १९६९ : सरनाईक याची पुणे कॅम्पमध्ये भेट झाली. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत भडगाव येथे श्रमशिबिर घेऊन शाळेची इमारत बांधावी असे ठरले. सर्व व्यवस्था नीट होईल अशी खात्री सरनाईकानी दिली.

२३ डिसेंबर १९६९ : लीना व गुनवर याना कोल्हापूरला घ्यावयास येतो असे सरनाईकाचे पत्र आले. या परदेशी पाहुण्यांच्या हस्ते कोनशीला समारंभ करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. याशिवाय कुडाळ येथे या परदेशी पाहुण्यांचा सत्कार समारंभ निश्चित केला आहे व त्याच्या आमत्रण पत्रिकाही रवाना केल्या आहेत.

२ जानेवारी १९७० : राधानगरीकडील रस्ता अतिशय खराब आहे. त्या रस्त्याची जाणीव सरनाईकानी द्यावयास हवी होती. परंतु त्याना काय दोष देणार? मोटारची माहिती असणाराच हे समजू शकतो. मोठ्या मुश्कीलीने प्रवास झाला. चॅनेल पत्र्याची असल्याने सडून गेली होती. रतलामला केलेले वेल्डिग ठीक असले तरी त्या वेल्डिगच्या बाजूला दीड, पावणेदोन फूट पत्रा चिरला गेला. डावे समोरचे चाक वर लोटले गेले. वाईट रस्ता सुरक्षित पार पडला. परंतु फोड्यानंतर चेंबरला दगड लागले. नशीबाने ऑईल गळू लागताच लक्षात आले. डोक्यावर भयंकर ताण होता. गुनवरचा मऊ साबण व कपड्याची चिंधी एकत्र कुटून पडलेल्या चिरेवर दाबून बसविली व जाड चिंधीने लेप पक्का बाधून ठेवला. ऑईल गळणे बद झाले पण मोटार बिबवण्याला पोचेपर्यंत जिवात जीव नव्हता. तीन वाजता कुडाळला सभा आहे असे मला वाटत होते. पण सरनाईक ३॥ म्हणत बसला व शेवटी अर्धा

दिवाकर आगाशे हे नाव 'माणूस 'च्या वाचकांना अपरिचित नाही. सोमनाथच्या जंगलातून प्रथम ते ऐकू आले.
गेली कित्येक वर्षे बुलढाण्याला राहून युवकांमध्ये विधायक वृत्तीची जोपासना करण्याचे कार्य आपल्या शिक्षणसंस्थेच्या आवारात राहून ते करीत होते.
हे कार्यक्षेत्र पुढे त्यांना अपुरे वाटू लागले व अलीकडेच त्यातून ते मोकळे झालेले आहेत. सध्या महाराष्ट्रात सर्वत्र त्यांचा दौरा सुरू आहे. या वर्षाच्या मे महिन्यात दक्षिण कोकणात कसाळ येथे त्यांच्या प्रेरणेने एक श्रमशिबिर आयोजित झालेले होते. या शिबिराची एक दैनंदिनीही त्यांनी ठेवली होती. महाराष्ट्रभर विखुरलेल्या विधायक कार्यकर्त्यांना त्यातून घेण्यासारखे पुष्कळ सापडेल या विश्वासाने ती येथे एका हप्त्यातच दिली आहे.

तास उशीरा सभेला पोचलो. सभा चांगली रंगली. पाश्चिमात्य राष्ट्रातील युवकांच्या घोर समस्या गुनवरने मांडल्या. याला पायबंद घालण्यासाठी आपण काय करू शकतो व त्यासाठी प्रायोगिक प्रकल्प कुडाळला कसा घेता येईल याचे चित्र मी रंगविले परिणाम फार चांगला झाला. रात्री वेंगुर्ल्याला पोचावयास उशीर झाला. पण वेल्डिंगची सोय आहे असे कळले. तेव्हा हायसे वाटले. दिवसभर जेवण नव्हते. तेव्हा रात्री पाहुण्यांना लवकर रेस्टहाऊसवर पोचवावे व जेवणाची व्यवस्था करावी असे म्हणताच सरनाईक चिडला व स्वतःही दिवसभर जेवलेलो नाही असे त्याने म्हटले. मी गप्प बसलो.

३ जानेवारी १९७० : सकाळी वेंगुर्ल्याच्या कॉलेजमध्ये मुलांनी गडबड करण्याचा प्रयत्न केला. माझ्या भाषणात भारतीय तरुण स्वाभिमान विसरून भीक घेण्याला कसे प्रवृत्त झाले आहेत व पाश्चिमात्यांचे अधानुकरण करण्यात कसे भूषण मानतात, यावर बेरहम हल्ला चढवला. त्याचा परिणाम चागला झाला. कार्यक्रमानतर गडबड करणाऱ्या युवकांचा गट मुद्दाम येऊन भेटला व योग्य मार्गदर्शनाचा अभाव कसा आहे यासंबधी चर्चा करू लागला. विधायक काम करण्याची या गटाची इच्छा दिसली. दुपारी कसाळला जाऊन मग भडगावला गेलो. कसाळला मातीच्या भिंती न बांधता चिऱ्याच्या भिंती घ्याव्या. मूत्रापासून हिराखत करावे व भाजीपाल्याची

लागवड करावी असा कार्यक्रम विचारात घेतला गेला. मुलांनी मदत करावी असे त्यानाही आवाहन केले. पण फारसे काही घडेल असे वाटले नाही. भडगावला कार्यक्रमास दीड तास उशीर झाला. पण लोक वाट पहात होते. ढोल, तुतारी, ताशा, आपटबार याची धमाल होती. गुनवरने विद्यानगर पाटीचे अनावरण केले. सभापती दीड तास वाट पहात असलेले पाहून मला आश्चर्य वाटले. स्थानिक कार्यक्रम पत्रिका पाहिली. त्यात सभापतीना संपूर्णपणे वगळण्यात आलेले दिसले. मी कायदा हाती घेऊन कार्यक्रमपत्रिकाच बदलली व सभापतीना आशीर्वादपर भाषण देण्यास सांगितले. त्याचा इष्ट परिणाम झाला. सभापतीनी भाषणात सागितले की, ते या कार्यक्रमाला विरोध करणार होते. कारण कार्यक्रम घेणारे त्यांच्या पक्षाचे नाहीत. 'परतु आता या प्रयोगामागे असलेली कल्पना मला अतिशय आवडली आहे. कालच्या सभेतील विचार ऐकल्यावर हे काम देवाचे काम आहे असे मला वाटले. म्हणून आज पूर्वनियोजित अशा महत्त्वाच्या सभेला न जाता मी येथे दीड तास वाट पहात राहिलो.'

राजकीय पुढारी विधायक कामाकडे दुर्लक्ष करतात, राजकारण अगदी हीन दर्जाचे आहे, असा एक सूर सभेमध्ये उमटला. त्यावर बोलत असताना, राजकारण हे समाजजीवनाचे एक अविभाज्य अग आहे. राजकीय पुढारी काम करीत नाहीत याला आपणच जबाबदार आहोत. आपणच तशी परिस्थिती निर्माण करतो. तेव्हा राजकीय पुढाऱ्याना दोष न देता आपल्याबरोबर घेतले पाहिजे, असा विचार मी मांडला. त्याचा परिणाम वातावरणातील ताण कमी होण्यामध्ये झाला.

**३ एप्रिल १९७० :** कोल्हापूरला मी पोचलो. परंतु सरनाईक पोचलेच नव्हते. सरनाईकाच्या वडिलानी खूप प्रेमाने स्वागत केले. दुपारी सरनाईक आले. आम्ही शहांकडे गेलो. त्यांना घेऊन आतरभारती विद्यालय व तेथून देशभूषण विद्यालय. बरीच चर्चा झाली. अनाथ मुलाना पालक मिळविण्याची योजना नक्की करून निवेदन काढले. अनेक लोकाच्या भेटी झाल्या. कसाळचे पाटील हेडमास्तर पण आले होते. संध्याकाळी कोल्हापूरहून कसाळला जावयास निघालो. गाडी लेट झाली. त्यामुळे सरळ कुडाळला गेलो.

**५ व ६ एप्रिल १९७० :** सकाळी बिबवण्याला गेलो. तेथे सर्व लोक कामात दंग होते. शिबिराच्या खर्चासाठी सरनाईकने नाटक बसविले होते. बसण्याच्या सोयीसाठी श्रमदान चालले होते. फ्लॅट्स् रंगविले जात होते. परतु एन्. डी. एस्. इन्स्ट्रक्टर कडक इस्त्रीचे कपडे घालून उभा होता. नॅरोकटची पॅंट व निमुळत्या टोकाचे बूट घालून हातातील काठी फिरवीत इन्स्ट्रक्शन देत होता. माझे डोके भयंकर भडकले. कारण श्रमदान सोडून त्याने एका मुलाला खुर्ची आणावयास सागितले व तिच्यावर तो स्टाइलमध्ये बसून राहिला. दुपारी भडगावला गेलो. भडगावची मुले उन्हात लावून पाणी आणीत होती. खूप काम करीत होती. एम्. डी. शी चर्चा

केली. केवळ इमारत बांधकाम हे आपले ध्येय नसून इथे एक नवीन प्रयोग करावयाचा आहे, असे त्याला म्हणालो. माध्यमिक शाळेपलीकडे त्याची दृष्टी नसावी असे वाटले. केवळ मी येणार या धाकाने जानेवारीत खोदलेला पाया गेल्या दोन दिवसात भरला गेला, असे सरनाईक म्हणाले. एम. डी. काही करू शकणार नाही. व त्यामुळे आपल्याला फार त्रास होत आहे असे सरनाईक म्हणाला. मग कसाळला गेलो. तेथे उत्साह दांडगा होता. पाया खोदून झाला होता. प्लिंथ बांधावी असा पाटलांचा विचार होता. परंतु बांधकाम नंतर करता येईल. प्रथम चिरे तासून घ्या. व सर्व फोर्स त्यावर लावावा, असे मी सुचविले. फर्नांडिस नावाचा खूप म्हातारा गवंडी बरा वाटला. त्याला फर्नांडिस काका म्हणून जवळ घेतले. मोठेपणा दिला. तो फार खूष दिसला. रात्री पाटलांच्या खानावळीत फक्कड जेवण मिळाले. रात्रीच्या वेळी गाडीने मुंबईस निघालो. शहा उद्या परत जाईन म्हणाले.

२५ एप्रिल १९७० : सरनाईकचे पत्र आले. भडगावचे लोक कामास तयार नाहीत. पैशाची व्यवस्था होत नाही. म्हणून भडगावला प्रोजेक्ट व परिसवाद रद्द केल्याचे त्याने कळविले. संस्थेत खळबळ उडाली व एक प्रकारचा नर्व्हसनेस आला. पैशासाठी सहकाऱ्यांना म्हटले. गफार, ताई, शशी यानी एक एक हजार रुपये दिले. ऐनवेळी वाहनाची व्यवस्था व्हावी म्हणून खूप खटपट केली. पण यश आले नाही. संध्याकाळी स्कूटरने निघण्याचा प्रयत्न केला. पण स्कूटरनेही धोका दिला.

२७ एप्रिल १९७० : सकाळी पावणेसातच्या गाडीने बुलढाणा सोडले. प्रवास कंटाळवाणा झाला. ८॥ ला कुर्डुवाडीला आलो. उजव्या पायाला त्रास होत होता. रात्री शाळेवर जाऊन टॉर्चच्या सहाय्याने शाळेची जुनी इमारत पाहिली. रात्रीची गाडी पकडून मिरजेकडे निघालो. जाण्यापूर्वी बाबुराव व शेंडे याच्याशी शाळेतील एकूण वातावरण कसे असावे याची स्टेशनवर चर्चा झाली.

२८ एप्रिल १९७० : गाडी उशिरा पोचली. बस पकडून सागलीला गेलो. एका सायकल दुकानवर सामान ठेवून माधवनगरला गेलो. शांतिनिकेतन संस्था पाहिली. १५ लाख रुपये या संस्थेला मिळाले आहेत. कार्यकर्त्यांची भाषा डौलदार होती. परंतु फॅसीलीटीजच्या मानाने कामाला पल्ला नव्हता. दात व चणे याचा न्याय शेवटी खरा. परत आलो. कॅन्टीनमध्ये जेवलो. कोल्हापूरची गाडी पकडली. कोल्हापूरला लगेच सायकल घेऊन मुडबिद्रीकरांना शोधले. मातृसेवासंघाने ऐनवेळी पाय मागे घेतल्यामुळे तेथील कार्यकर्ते फार नाराज दिसले. मुडबिद्रीकरांची भेट झाली नाही. शहाला मागे ठेवून कसाळची गाडी पकडली. गाडीला उशीर झाला. सरनाईक नुकताच कुडाळला गेला होता. रात्री १०॥ ला शाळेवर व तेथून भरमगोडा सरांकडे पोचलो. पाटील हेडमास्तरांची भेट झाली. त्या लोकांचा उत्साह दांडगा व तयारी जोरात होती.

२९ एप्रिल १९७० : सकाळी कुडाळला जावयास निघालो. बस मिळेना. एका

टॅक्सीत जाण्याचा प्रयत्न केला. तर ड्रायव्हरने कुडाळला जाणाऱ्या एका बसमध्ये बसवून देऊन स्वतः पोबारा केला. शेवटी ११ वाजता कुडाळला पोचलो. सरनाईक बिबवण्यात आहेत असे कळल्यावरून बिबवण्याला गेलो. पण ते शाळेत नव्हते. ते कुडाळला गेल्याचे कळले. म्हणून स्टॅंडवर परत आलो. एकूण चिन्हे ठीक दिसत नव्हती. तेवढयात सरनाईकाची एक विद्यार्थिनी आली. तिने मला पूर्वी शाळेत पाहिले होते. तिने सरनाईक गावात जेवायला गेल्याचे सांगितले व एक मनुष्य बरोबर दिला. अर्धा मैल चालल्यावर त्या घरी पोचलो व आमंत्रण लावून जेवायलाही बसलो. जेवण झाल्यावर सरनाईकला घेऊन बाहेर पडलो. शिबिर बंद करता येणार नाही, ते योग्य नाही असे सांगितले. आपण स्वतः काही करू शकत नाही असे सरनाईकने सांगितले. मग कुडाळला आलो. जयसिंगांची भेट झाली. चिरेवाल्या कॉन्ट्रॅक्टरला भेटलो, त्याने चिरे टाकण्याचे कबूल केले. मग जयसिंगरावांना घेऊन भडगावला गेलो. तेथील लोकांना भेटून तयारीला लागण्यासंबंधी सांगितले. एम. डी. ची भेट झाली नाही. त्याला निरोप ठेवला. त्याला बोलावून काहीही उपयोग होणार नाही असे सरनाईक म्हणाले. सध्याकाळी कसाबसा मुक्कामावर गेलो.

३० एप्रिल १९७० : दृक्‌श्राव्य विभागाची गाडी आली. त्यातील लोकांना घेऊन भडगावला जाऊन आलो. अबोलीच्या फुलांचा सुदर हार पाहिला, कुरेशीला आवडला. त्याला साइट फार आवडली. पण कॅमेरा नादुरुस्त झाला. त्यामुळे विशेष काही करता आले नाही. जयसिंगरावांना कोल्हापूरला जावे लागले. व सरनाईक भडगावला यायला तयार नव्हता. त्यामुळे काळजी थोडी वाढली होती. परंतु संध्याकाळी कसाळला शिबिरार्थी यावयास सुरुवात झाली आणि मन उल्हसित झाले. रात्री जेवावयास गावात गेलो. दृक्‌श्राव्य विभागातील लोकांशी सख्य वाढले. रात्री झोपायला १२ वाजून गेले.

१ मे १९७० : सकाळी ४ ला उठलो. ५ ला शिबिरार्थींना उठविले. ६ ला प्रार्थना घेतली व ६॥ ला प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. वातावरण उत्साहाचे होते. पण कामाची खात्री नव्हती. बांधकाम, टेरेसींग, खोलीत भरती घालणे ही सारी कामे एकदम सुरू केली. थोडा गोंधळ होत होता. पण हलके हलके पकड धमू लागली. ८॥ वाजता नास्ता दिला. ९ वाजता काम सुरू केले. १० वाजता सभापतीच्या हस्ते औपचारिक उद्‌घाटन झाले. ७ वर्षाचा हर्षवर्धन व ८ वर्षाचा राजू हे ज्या जोशात काम करीत होते ते पाहून सभापतीच्या मनावर फार परिणाम झाला. ११ ते १२॥ पुन्हा काम झाले. स्थानिक गवंडी सहा होते. दिवसभरात त्यांनी ३७५ चिरे लावले. आमच्याबरोबरचे दोघेजण होते. त्यांनी ४५० चिरे लावले. आमच्या गवंड्यांच्या कामात दोष आहे, इमारत कच्ची बनेल, सिमेंट ज्यास्त खर्च होते अशा प्रकारच्या अनेक वार्ता स्थानिक गवंड्यांनी व्यवस्थापक मंडळापर्यंत पोचविल्या. पण पहिला दिवस तरी विचार करायला फुरसत नव्हती.

दुपारी ४ ते ७ मे काम झाले. काम बरेच उठले आहे. विश्वास वाढत आहे. रात्री शिबिरार्थींची व नंतर शिक्षकांची सभा झाली. एकूण कामाची चर्चा झाली. दिशा ठरली. रात्री झोपायला १२ वाजले.

२ मे १९७० : सकाळी ६। ला प्रार्थना झाली. ६।। ला काम सुरू झाले. ८।। ला नाश्ता. ९ ला काम सुरू झाले. १२।। ला संपले. स्थानिक गवंडी विशेष सहकार्य देत नाहीत. व्यवस्थापक मंडळाचे सदस्य आले. ४०० चिऱ्यांना १२-१२।। पोती सिमेंट लागते असे ते म्हणाले. आम्हाला १३ पोती लागली होती. तेव्हा सिमेंट जास्त लागते. हे म्हणणे खोटे ठरले. शिवाय स्थानिक गवंड्यांना ४०० चिरे बसवायला ४८ रु. लागले असते. याऐवजी १६ रुपयात हे काम झाले. यामुळे सिमेंट थोडे जास्त लागले तरी नुकसान नाही. दुपारी ४ ते ६।। काम झाले. रात्री करमणुकीचा कार्यक्रम झाला. शिबिरार्थींचा विश्वास वाढतो आहे.

३ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम झाले. स्थानिक गवंडी कामावरून दूर झाले. ते केवळ चिरे तासण्याचे काम करीत आहेत. दोन गवंड्यांच्या भरंवशावर काम झपाट्याने उठत आहे. चिऱ्याची सवय नसल्यामुळे मुलांच्या हाताला कापले जात आहे. त्रास होतो आहे. परंतु हाताला फडके बांधून मुले जोरात काम करीत आहेत. दुपारच्या काळात विश्रांती न घेता काजूची बोंडे, करवंदे व जांभळे यावर धाड घातली जात आहे. कुर्डुवाडीच्या मुली फारसे काम करू शकत नाहीत, त्यांच्या जेवणावर खर्च मात्र होतो, अशी तक्रार स्थानिक व्यवस्थापकानी केली. पैसे आम्ही भरू, परतु मुलीना या विचाराचा स्पर्श होऊ दे हे आर्ग्युमेंट उपयोगी ठरले नाही. त्या मुलींना अपमानास्पद वागविले जात आहे. पण एकूण कार्यक्रम पार पाडावयाचा असल्यास सबुरीने घेतले पाहिजे असे ठरवून मी व शहा गप्पा बसतो आहोत. पण हलके हलके शहावरही टीकेचा रोख वळत आहे. मुलींच्या कामात मात्र सुधारणा होत आहे. बुलढाण्याच्या शिबिरार्थींची इतरांशी तुलना करून दर्जा ठरविला जात आहे. पण बुलढाण्याच्या लोकांची तयारी पूर्वनियोजित आहे.

४ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम झाले. परंतु क्युरेशी कॅमेरा दुरुस्त करून परत आला. त्याला घेऊन ओरस आणि मी भडगावला जाऊन आलो. त्यात दुपारचा सारा वेळ गेला व जेवणही मिळाले नाही. ओरसचा वाडा प्रचंड आहे. १८०'×१५०' एवढ्या अवाढव्य इमारतीचा फारसा उपयोग नाही. भिंती ३।।' ते ४' रुंद आहेत. भोवताली हिरवेगार आहे. तेथे अमृत कोकम मिळाले. त्याचा रंग खूप बहारदार होता. तिथे कोकणच्या प्रचंड संपत्तीचे व सौंदर्याचे दर्शन झाले. वेगवेगळे शॉट्स घेतले. रात्री अचलपूरची १४ मुले व २ शिक्षक आले. त्यामुळे शिबिरार्थींची संख्या ९० झाली. खारेपाटणची मुले चांगले काम करतात. तेथील शिक्षक काळे पत्नींची तब्येत ठीक नसल्याने परत जाणार होते. परंतु त्यांचा पाय निघत नव्हता. खारे-पाटणचा नारायण तर आमच्यातलाच झाला आहे. कुर्डुवाडीच्या मुलींविरुद्ध टीका

तीव्र होत आहे. पण त्याच्या कामात झपाट्याने सुधारणा होत आहे.

५ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम चालले आहे. जसजशी भीतीची उंची वाढते आहे, तसतसा वेग कमी होईल असे वाटत होते. परंतु कालच्यापेक्षा आजचे काम अधिक होत आहे. मुले थकण्याऐवजी त्यांचा उत्साह वाढतो आहे. अचलपूरचे शिक्षक काम टाळून कुडाळला भटकत होते. त्याची मुलेपण कामाची टाळाटाळ करीत होती. मी त्यांच्यावर खूप तापलो.

६ मे १९७० : काम पूर्ण करण्याकरिता शिकस्त केली. पण चिरेच संपले. आज मुलांनी जिद्दीने १० तास काम केले. दुपारी गाणी म्हणत काम झाले. भिंत खूपच उंच होती. शेवटी चांदईचे (गेबल) काम होऊ शकले नाही. रात्री भडगावला जावयाचे होते. मुले तयार होऊन बसली. खारेपाटणचा नारायणही येतो म्हणाला. रात्री ११ नंतर ट्रक आला. टिकाव, फावड्यापासून सामान घेतले व १२॥ ला भडगावला पोचलो. रात्री झोपायला १॥ वाजला. ट्रकमध्ये मुले गात होती. जयसिंगराव व क्युरेशी बरोबर आले आहेत. क्युरेशी आमच्यापैकीच एक झाला आहे.

७ मे १९७० : मुलांना सकाळी ४॥ ला उठविले. चहा बनवायला उशीर झाला. सामान घेऊन साइटवर आलो. बरोबर सहा वाजले होते. परंतु स्थानिक कुणीच आले नव्हते. रात्री सामान जमविण्यात त्यांना उशीर झाला होता. ते लोक सकाळी चारला झोपले होते. पाण्याला बादल्याही नव्हत्या. आम्ही लेव्हल पाहिली. त्यात एक फुटापेक्षा जास्त फरक होता. नऊला ओव्हरसियर आले व काम होणार नाही म्हणाले. वातावरण तंग होते. मीही नर्व्हस झालो. इमारत पडेल असे त्याचे मत. त्यांच्या शकेला उत्तर देणे कठीण होते. पाया बरोबर ठोकलेला नाही हेही खरे आहे. पण इमारत झाली नाही तर यंदा शाळा भरणार नाही व ती कायम बंद पडेल असे वाटते. इमारत बाधायचा निर्णय घेतला. लेव्हल केली. ११॥ ला काम सुरू झाले. मुलानी जिद्द बाळगली आहे. चिऱ्यांच्या बांधकामाचा थोडा अनुभव आलेला आहे. त्यामुळे कामाला गती चांगली आली आहे. रात्री पेट्रोमॅक्स लावून काम झाले. आज ९६० च्यावर चिरे बसले.

८ मे १९७० : आज कामाची धमाल झाली. दिवसभरात ८१० चिरे बसले.

आजही १० तास काम झाले. खिडक्या व दरवाजे बसवून एवढे काम हा एक विक्रमच म्हटला पाहिजे. रात्री जेवण झाल्याबरोबर आवराआवर करून ट्रकने कसाळला परत आलो. येताना मुलांची मने खूप उल्हसित होती. परत आल्यावर कळले की सरनाईक आणि इतर मंडळीनी गेबलचे काम पूर्ण केले होते. एक चिरा वरून पडला. तो सरनाईकपासून ६" अंतरावर पडला. थोडक्यात बचावले. अन्यथा सर्व प्रयोगावर पाणी फिरले असते. मुलांना काम जमणार नाही, या स्थानिक मताला पुष्टी मिळाली असती. पण दैव बलवत्तर. कुर्डुवाडीच्या मुलीच्याबाबत

मात्र प्रकरण अगदीच ठिगळले. त्यावरून बोलाचाली पण झाली. यामुळे सर्व कार्यक्रमावर एक प्रकारची सावली पडत असे. पण त्याला उपाय नव्हता.

९ मे १९७० : सकाळी एक तास श्रमदान व नंतर चर्चा घ्यावयाचे ठरले. परतु साईट साफ करण्यातच खूप काम पडले. मुबईची मंडळी आली. सावत यांना भेटण्यासाठी कुडाळला गेलो. भडगावला तयारी नव्हती. इमारतीऐवजी इतर कार्यक्रम आयोजित करावयास हवा होता. टॅक्सी घेतली. मी व जयसिंगराव भडगावला गेलो. नारळाच्या खड्डयांची जागा निश्चित करून दिली. ट्रॅक्टरला कामाला लावले आणि परत कुडाळला गेलो. सावंतांना घेऊन भडगावला आलो. सर्व योजनेत त्यांनी रस घेतला. जवळजवळ दोन ते अडीच तास कार्यक्रम चालला. कोकणचा विकास व त्यातील शेतकीचे महत्त्व यावर ना. बाळासाहेब सावंत अप्रतीम बोलले. तेथून कसाळला आलो. कसाळचा कार्यक्रमही छान झाला. या परिसंवादातून शाळा समाजकेंद्र कशा बनवाव्या याची योजना आखण्यासाठी त्यानी मार्गदर्शन केले. सर्व शिबिरार्थींना वैयक्तिकरित्या भेटले. दिल्लीच्या प्रभातशोभा पंडित परिसंवादाकरता आल्या. परतु त्यांची योग्य व्यवस्था स्थानिक लोकांना करता आली नाही.

१० मे १९७० : सर्व दिवस युवक कार्यकर्त्यांच्या परस्पर सहकार्याची आवश्यकता कशी आहे, व युवक कार्यक्रमासाठी नवे तंत्र वापरणे कसे आवश्यक आहे याची सविस्तर चर्चा झाली. प्रभातशोभा पंडित फार चागल्या बोलल्या. राष्ट्र उत्थानाच्या एकूण कार्यक्रमात शिक्षकाचे अनन्य साधारण स्थान कसे आहे हे त्यानी सांगितले. प्रत्येक कार्यक्रमाला निश्चित उद्देश व तात्विक बैठक अतिशय आवश्यक आहे हे त्यानी आध्यात्मिक पार्श्वभूमीवर मांडले. वेगवेगळया सस्थांना काय कार्यक्रम घेता येईल याची चर्चा झाली. युवकांचा गट वेगळा बसला. आपल्याला काय हवे आहे यावर त्यांनी चर्चा केली. दुपारी युवक प्रगती सहयोगाच्या कार्यक्रमाची चर्चा झाली. गोव्याचे र. वि. पडित व प्रभातशोभा पंडित याना भडगावचा साइट दाखविला. तेथील प्रचड सुप्त शक्ती पाहून त्या अतिशय हरखून गेल्या. दुपारच्या वेळात विविध संस्थांनी कार्यक्रमासंबंधी आपापल्या कल्पना मांडल्या. प्रभातशोभा पंडित रात्री गेल्या. कमलताईपण त्यांचेबरोबर गेल्या.

११ मे १९७० : आज मे. साळवी येणार होते. पण आले नाहीत. त्यामुळे सर्वांचा विरस झाला. सकाळी युवक प्रगती सहयोगाच्या नवीन कार्यकारीणीची निवड झाली. शहाच्या रागावर सरनाईकने आपले नाव मागे घेतले. दुपारी समारोपाच्या कार्यक्रमाला सभापती येऊन गेले. पण कशातच राग नव्हता. शिक्षणाधिकारी चर्चेत भाग घेऊन गेले. त्यांनी अशा उपक्रमाना मनःपूर्वक सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. कोल्हापूर व सोलापूरची मडळी परत गेली. संध्याकाळी उदास

पृष्ठ ६० वर

रविंद्र पिंगे

# गोदाराणीच्या स्मृतिलहरींचे प्रकाशन

परवा मुंबईत एक देखणा प्रकाशनसोहोळा झाला. साहित्यसंघाचं पुरंदरे सभागृह श्रोत्यानी तुडुंब भरलं होतं. खरं म्हणजे अलीकडे सधमंदिरातला प्रत्येक सास्कृतिक आणि वाङ्मयीन कार्यक्रम अतिशय यशस्वी होतो. तशात, ' मौज ' प्रकाशनासारखी प्रथम श्रेणीची सस्था यजमानपद भूषविती झाली की गर्दीला सुमारच रहात नाही. कारण मराठी साहित्यात ' मौजे 'ची म्हणून एक अलग व्यक्तित्वसंपन्न अशी मुद्रा आहे. उच्चभ्रू म्हणून कुणीही कितीही कुजबूज केली, तरी तिच्या गुणवत्तेकडे डोळेझाक करता येण्यासारखी नाही. त्याचे म्हणून काही आग्रह आहेत. प्रसगी तत्कालीक आर्थिक धोका पत्करूनही इभ्रत वाढवणार लेखन शानदार थाटात प्रसिद्ध करण, हा त्यापैकी एक आग्रह. अशा ' मौज ' प्रकाशनाने श्रीमती गोदावरीबाई परुळेकर ह्यानी लिहिलेल्या ठाणे जिल्ह्यातल्या वारल्याच्या बंडाच्या हकीकतीचा प्रकाशन समारंभ म. म. दत्तोपंत पोतदाराच्या शुभहस्ते पार पाडला. आत्मचरित्रात्मक असलेल्या ह्या ग्रंथाचे नाव आहे, ' जेव्हा माणूस जागा होतो. ' मूल्य रुपये पधरा.

गोदावरीबाई ह्या भाई शामराव परुळेकराच्या सहचारिणी. कै. शामराव हे नामदार गोखल्याच्या भारत सेवक समाजाचे सर्ववेळ कार्यकर्ते. वैचारिक बैठकीने ते कट्टर मार्क्सवादी. कम्युनिस्टाचे सहप्रवासी. दलितांच्या सेवेच त्यांनी जणू असिधारा व्रतच घेतलं होतं. त्याच्या अर्पित ध्येयवादी जीवनाशी पुण्याच्या गर्भश्रीमंत गोखले वकिलाच्या घराण्यातल्या गोदावरीबाई एकरूप झाल्या. शामरावांबरोबर त्यानीही दलिताच्या सेवेचं व्रत स्वीकारलं. बेचाळीस सालच्या कारावासानंतर ह्या दांपत्याने शेतकऱ्यामध्ये काम करायचं ठरवलं. भूमी कसणारा खेडूत शेतकरी हा राजकीय दृष्टचा जागृत झाला पाहिजे आणि अशा जागृत शेतकऱ्यांची स्वत.चे हितसबंध धसाला लावण्यासाठी लढाऊ संघटना असायला हवी अशी त्याची श्रद्धा होती. महात्मा गांधींनी शेतकऱ्यांना जागृत केलं स्वातत्र्यकारणासाठी. प्रत्यक्षात मात्र भारतीय खेडूत शेतकरी हा स्वकीयाच्या हातीच गुलामीचं जिणं

जगत होता. स्वतःच्या दास्यविमोचनासाठी त्याला राजकीय पातळीवर संघटित करण्यासाठी पंचेचाळीस सालापर्यंत परुळेकर मंडळींनी शेतकऱ्यांमध्ये पायाभरणीचं काम केलं. पंचेचाळीस साली त्यानीच पुढाकार घेऊन 'महाराष्ट्र प्रांतिक किसान सभे 'च पहिलं अधिवेशन भरवलं. त्यानिमित्ताने प्रचारकार्यासाठी ठाणे जिल्ह्यातल्या तळासरी, डहाणू, जव्हार वगैरे आदिवासी रहात असलेल्या जंगली मुलूखात फिरत असताना मग्रूर जमीनदार, क्रूर बागाईतदार आणि बेमुर्वत जंगलमक्तेदार ह्यांच्या तिहेरी पिळवणुकीमुळे अमानुष जीवन जगणं भाग पडलेला वारली हा आदिवासी समाज त्याच्या दृष्टीस पडला. मग परुळेकर पतिपत्नींनी त्याची दास्यविमुक्ती हेच आपले कार्यक्षेत्र मानले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली वारल्यानी सशस्त्र गनिमी लढा दिला. त्या लढ्यातल्या काही रोमहर्षक हकीगती गोदाबाईंनी पुस्तक प्रकाशनाच्या वेळी सांगितल्या. वारल्याजवळ माणुसकी कशी उच्चकोटीची आहे, रानातले कंद खाऊन ते कसे नाइलाजाने जगत रहातात, अन्नाला त्याना कसे पद्धतशीरपणे महाग केले जाते, हे बाईंनी स्वानुभवाने सांगितले. वारल्याच्या बंडाच्या वेळी सरकारने चहूबाजूंनी सशस्त्र सैन्य पाठवले. पण जंगलवाटांची अचूक माहिती असलेल्या वारल्यानी पधरा पंधरा दिवस त्यांना निबिड रानात कसा आश्रय दिला आणि हिकमतीनी त्याचे संरक्षण कसे केले तेही त्यानी विषद केले. वारली समाजाला गनिमीकाव्याची जणू उपजच आहे. शस्त्रसज्ज फौजेलाही त्यांच्याशी मुकाबला करता आला नाही. नवलाईची गोष्ट म्हणजे पाठीला पोट लागलेलं असूनही एकाही वारल्याने फंदफितुरी केली नाही. एकही निमकहराम झाला नाही.

बासष्ट साली कॉमरेड शामराव आणि गोदावरीबाई कारावासात होते. त्यावेळी शामरावानी बाईंना लढ्याची हकीगत लिहून काढण्यास सांगितलं. पण बाईंना लेखणीचा मनस्वी कटाळा. त्यानी आळंटळं केली. मग आणखी दोन वर्षांनी शामरावांना हृदरोग जडला. त्यावेळी पतीची इच्छा पुरी न केल्याची अपराधी जाणीव बाईंना अस्वस्थ करू लागली. मग त्यानी 'कडेकपारीतील वारल्याचे जीवनदर्शन' आणि 'आमची निवासस्थाने' असे दोन लेख पुरे केले. पतिवियोगानंतर नोव्हेंबर पासष्ट ते एप्रिल सहासष्ट ह्या सहा महिन्यात त्यानी बंडाच्या ह्या हकीगती लिहून काढल्या. आणखी चार महिने संदर्भग्रंथ चाळले आणि सहासष्टच्या ऑगस्ट महिन्यात हा ग्रंथ तयार झाला. त्या म्हणतात 'आमचा आधार मिळाल्यामुळे आदिवासींतील माणुसकी जागी झाली आणि माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला हक्क आहे हे उमजून तो प्रतिकाराला कसा सज्ज झाला, किती बदलला.' हे ह्या ग्रंथावरून कळेल.

अशारीतीने ग्रंथ तर सिद्ध झाला. पण तो प्रकाशात कसा यावा? आपण सराईत लेखिका नाही ह्या न्यूनगंडामुळे ग्रंथ दोन वर्षं बासनात पडून राहिला. योगायोगाने तो श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या वाचनात आला. त्यानी भागवत बंधूंकडे शिफारस

केली. ' मौजे'ने ग्रंथ स्वीकारला. त्याप्रीत्यर्थ हा प्रकाशन सोहोळा. पोतदारांनी अध्यक्ष-पदावरून मर्मस्पर्शी भाषण केले. वेठबिगार करणाऱ्या ह्या आदिवासीची पावला-पावलाला कशी क्रूर पिळवणूक केली जाते ते त्यानी सागितले. शंभर वर्षांपूर्वी ठाणे जिल्ह्यातल्या सर्व जमिनी वारल्यांच्या मालकीच्या होत्या. नतर उपऱ्या आणि बव्हशी परधर्मी व्यापारी जमीनदारानी व्याजबट्टा करून त्या जमिनी स्वतःच्या घशात घालावयास सुरुवात केली. केवळ आठ आण्याना एक एकर जमीन बळका-विल्याची उदाहरण कागदोपत्री सिद्ध झालेली आहेत. दिवस उजाडल्यापासून रात्र-पडेपर्यंत फक्त मूठभर तादळाच्या बदल्यात ह्या सावकारांनी वारल्याना गुलामा-सारखे वागवलेले आहे. हे जंगल, ह्या अरण्यातल्या आदिवासीच्या चोरवाटा, त्यांचे गनिमीकाव्यातले चातुर्य हे दत्तोपंतांनी जवळून पाहिले आहे. सयुक्त महाराष्ट्राच्या लढचात ते एकदिलाने सामील झाले होते. त्या सर्वाचा आलेख त्यांनी आपल्या भाषणात काढला आणि सागितलं की, ' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाने आज मराठी भाषा धन्य झाली आहे ! हा ग्रथ म्हणजे वीर वारल्यांच्या महाभारताचे एक गौरव-शाली पर्वच होय ! ' ह्या भाषणात दत्तोपंत इतस्ततः रेंगाळले. बोलता बोलता ते असेही म्हणाले की जगातली सगळी गरिबी कधी काळी दूर होईल असे त्यांना अजिबात वाटत नाही आणि शिवाजीमहाज सुरतेवर चालून गेले ते ह्याच आदि-वासीच्या चोरवाटामधून आणि ह्या आदिवासीनीच त्याची सुखरूप ने-आण केली !

□

# कृतज्ञता कलावंतांच्या दुनियेतली

गुरुजनांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूनी जमवून आणलेल्या मैफिलीनी मुबईतला गेला पंधरवडा गजबजून गेला होता. जवळजवळ गेले अर्ध शतक आग्रेवाले गायक मुबईत घरदाज गायकीच वळण शिष्यांसोबत घोटवीत आले आहेत. फैयाझखासाहेबांनी आग्रेवाल्यांची शान वाढवली. जणू त्यांच्या जागत्या छायेतच इथे आग्रेवाल्यानी थोरामोठयाच्या घरी आग्रेवाल्या गायकीचे रतीब घालणे सुरू केले. त्याच घराण्याच्या उस्ताद खादीम हुसेनखांसाहेबांनी ओळीने गेली चाळीस वर्षं मुबईत विद्यादान केले. तीन तपं शेकडो शागिर्दांचे पाय खांसाहेबांच्या बाबुलनाथाच्या टेकडीपासच्या मठीकडे वळले. आपले गुरु पै. कल्लनखांसाहेब (फैय्याझखांसाहेबाचे आजोबा) ह्यांच्याकडून सल्त एक तप उग्र तपश्चर्या करून त्यानी जे आग्रा गायकीतले धन मिळवले, ते मुबईत त्यानी गुणी शागिर्दांना मुक्त हस्ताने वाटले. ख्याल, ठुमरी, लावणी आणि भजन ह्या चारही अंगात तरबेजी

दाखवणाऱ्या कै. वत्सलाबाई कुमठेकर ह्या त्यांच्याच शिष्या. सरस्वतीबाई फातरफेकर, सगुणाबाई कल्याणपूर, कृष्णा उद्यावर, नाट्यसंगीतात स्वतःचा ठसा उमटविलेल्या मिनाक्षीबाई आणि ज्योत्स्नाबाई भोळे, ह्या सगळयांनीं खादिम हुसेनांजवळ विद्या मिळवली. पं. गोविंदराव अग्नि, मोहन चिक्करमाने, श्रीपादराव नेवरेकर, हळदणकर बंधु, उद्योगपती जयानंद खिरा असा त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा आणि लौकीकवान आहे.

ह्या शिष्यांनी परवाच्या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने लक्ष्मीबागेत एक आखिव जलसा सादर केला. आग्रा घराण्याची एक एक असली चीज एकएका शिष्याने अगदी शिस्तबद्ध आटोपशीरपणाने पेश केली. समोर जाणकार रसिक आणि खुद्द गुरुवर्यांची देखरेख. त्यामुळे घराण्याच्या शिस्तीबाहेर कोण रतिभरसुद्धा वावरला नाही. नीला गडकरींनी गौड मल्हार शुद्ध स्वरुपात पेश केला. अनिता रावांचा मलुहा तालासुराला चोख होता. मोहन चिक्करमान्यांनी फैय्याझखासाहेबांच्या बंधुनी रचलेली एका अनवट रागातली खास बदिषी दमदारपणे गायिली. मुकुंद दामले ह्या बालकलावंताने मेंडोलीनवर वाजवलेला मालकंस आटोपशीर आणि सफाईदार होता. वाढते वय गायनविद्येच्या आड येत नाही हे खुद्द खांसाहेबांनी दाखवून दिले.

पं. गोविंदराव अग्नि ह्या गोमंतकातल्या कसबी गायकाच्या शिष्यांनीही गुरुवर्यांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संघमंदिरात एक सुंदर मैफिल जमवली होती. साठीकडे कूच करीत असलेले गोविंदराव हे खादिम हुसेनखांसाहेबांचे गंडाबंद शिष्य. गेली तीन तपे ते आग्रा घराण्याची गायकी स्वतः घोटवीत आहेत नि तरबेज शिष्य तयार करीत आहेत. पं. अनवर हुसेनांकडेही त्यांनी विद्या केली आहे. गोव्यातल्या कै. रघुवीर सावरकरांनी (संगीतनट प्रसाद सावकारांचे वडील) स्थापन केलेल्या "रंगबोधेच्छु" नाटकमंडळीत त्यांनी लहान वयात पदार्पण केलं. तिथे चिखलीकरबुवांकडे त्यानी ख्यालगायकीचे प्रारंभिक पलटे घोटवले. 'संशयकल्लोळ', 'मानापमान', वगैरे कंपनीच्या हातखंडा प्रयोगात ते चांगलेच चमकले. मात्र आवाज फुटल्यापासून आणि संगीत नाटकांचं वैभव अस्तंगत झाल्यापासून, ते मुंबईत आग्रा घराण्याची गायकी शिकवीत आले आहेत. अंजनीबाई लोलयेकर, प्रसाद सावकार, निर्मला गोगटे, रामदास कामत, असा त्यांचा किर्तीमंडीत शिष्यवर्ग. गेली अनेक वर्षे अग्निबुवा नाट्यसंगीताचे दिग्दर्शनही करीत आहेत. 'विषकन्या'पासून 'चमकला ध्रुवाचा तारा'पर्यंत त्यांनी नाटकांना खानदानी चालीचा वेष चढवला आहे. परवाच्या जलशामध्ये जयमाला शिलेदारांनी गुणीकंस हा अनवट राग अतिशय रंजकदारपणे पेश केला. त्यांच्या दोन मुलींनी नाट्यसंगीताची जुगलबंदी सादर केली. त्यांतल्या त्यात किर्ती शिलेदारांनी गायनातली तडफ आणि तानबाजी छान दाखवली. तसच, अंजनीबाईंच्या कन्येनेही नाट्यसंगीत रसानुकूल पेश केले.

स्वतः गोविंदरावांनी 'परज' आणि 'भंकार' ह्या दोन अप्रचलीत रागातल्या बंदिषी त्यांच्या मूळ शुद्ध स्वरुपात सादर करून श्रोतृवृंदाची तब्बेत खुष केली. आग्रा घराण्याच्या अभिजात गायकीची तीन तपं एकटक साधना करणाऱ्या ह्या गोमंतकीय कलावंताची मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात शिक्षक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल मैफिलीत सत्कारही करण्यात आला.


दादरच्या नारायणराव इंदोरकरांच्या क्लासमध्येही गुरूपौर्णिमेचा उत्सव करण्यात आला. नारायणरावाच्या शिष्यवर्गाने मैफिलीत आपली सलामी लावली. सुरेश हळदणकर ह्यांनी गायलेले 'शूरा मी वंदिले' हे नाट्यगीत आणि एक भजन हे त्यातले उल्लेखनीय कार्यक्रम.

कै. रामुभैय्या दाते हे हाडाचे रसिकाग्रणी. संगीत हा जणू त्यांचा प्राण होता. त्यांचे दोन कलावंत चिरंजीव अरूण आणि रवी हे गेली दोन वर्षे आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ गायकवादकांचे जलसे मोठ्या प्रमाणावर घडवून आणतात. यंदाच्या बड्या पाहुण्या गजलसम्राज्ञी बेगम अख्तर होत्या. त्यांनी एक ठुमरी आणि तीन गजल पेश केले. त्याना महमद अहमदनी तबल्यावर डौलदार साथ केली. तारशहनाईवर होते मधुकर गोळवलकर. ह्या जलशाचे अपयश म्हणजे पं. चिमोटे ह्यांच्या हार्मोनियमवादनाच्या वेळी श्रोत्यांनी त्यांची केलेली अनपेक्षित हुर्यो! पं. बाबूराव चिमोटे हे मोठे कसबी पेटीवादक आहेत. त्याचे वादन सतारीच्या अंगाने असते आणि सोलो कार्यक्रमात त्यांचा अगदी हातखंडा आहे. तासंतास ते श्रोत्यांना जागच्या जागी खिळवून ठेऊ शकतात. गेल्या गणेशोत्सवात ब्राह्मणसभेतला त्यांचा पेटीवादनाचा कार्यक्रम असाच रंगला होता. पण ह्या जलशात त्यांनी दाक्षिणात्य राग सरस्वती फारच ताणून वाजवला आणि सहनशक्ती संपलेल्या श्रोत्यांनी तिथल्या तिथे टाळ्या वाजवून आपली नापसंती व्यक्त केली. ह्याच जलशात अजय पोहनकर ह्या नवोदित तरुण गायकाने शुभकल्याणचा ख्याल पेश केला. अरूण दाते स्वतः एक ढंगदार गझल गायले.

कुमार गंधर्वांच्या मुंबईतल्या मैफिली म्हणजे त्यांच्या स्वरविलासावर लुब्ध असणाऱ्या रसिकांना खास मेजवानीच असते. त्याची बालगंधर्व संगीत सभेने गेल्या महिन्यात आयोजिलेली पार्ल्यातील मैफिल म्हणजे अत्यंत यशस्वी कार्यक्रमाचा एक नमुनाच म्हणावा लागेल. श्रोत्यांनी केलेल्या तोबा गर्दीमुळे गायनाला सुरुवात होतानाच दारे बंद करून घ्यावी लागली. कुमार अतिशय उत्साहाने गायले. पुढे पुढे दमत गेले. भीमपलासी आणि पुरिया धनश्री ह्या दोन भारदस्त रागाचे ख्याल श्रोत्यांना ऐकायला मिळाले. पण ह्या बैठकीचे खरे वैभव म्हणजे त्यांनी पेश केलेली बालगंधर्वांची नाट्यपदे. 'स्वयंवरा'तली 'नाथ हा माझा', आणि 'रूप बली तो नर शार्दूल साचा', 'मेनका'मधलं 'सत्य सत्य नच फोल पाला', 'अमृतसिद्धी' मधलं 'ही समज तव' आणि 'एकच प्याला'मधली कुमारांची पेटंट भैरवी

'प्रभु अजि गमला', ही सगळीच पदे बहारीची झाली. तानेतानेला कुमार रसिकांची दाद घेत पुढे पुढे सरकत होते. 'नाथ हा माझा' हे पद तर कुमार अपूर्व रंगतीने गायले. कुमारांना उमजलेल्या गंधर्वगायकीचा हा बहारदार साज कान तृप्त करीत असताना श्रोत्यांच्या मनात परत परत विचार येत होता की रूप, अभिनय आणि सूर ह्या तिन्ही अंगांची ईश्वरदत्त देणगी लाभलेल्या बालगंधर्वांनी ही पदे गाऊन पूर्वीच्या काळात आनंदाचे केवढे अफलातून साम्राज्य रंगभूमीवर नांदविले असेल! कुमारांची ही बैठक म्हणजे एका समर्थ कलावंताने तशाच एका सामर्थ्यप्रभू नृपतीच्या गर्भश्रीमंत गायकीला कृतज्ञतेने केलेली वंदनाच होती.

पं. सी. आर. व्यासांनी राजारामबुवा पराडकरांकडून गानविद्या घेतली. त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी दादरला त्यांनी मैफिल घडवून आणली. उतारवयाला लागलेले स्वतः राजारामबुवा, खुद्द सी. आर. व्यास, माणिक वर्मा, सुशिला नांजुंदिया, कुंदा वेलींग, बाळकराम, सविता कुळकर्णी वगैरे तयार कलावंतांनी मैफिलीत आपली हजेरी लावली. सलग दहा तास ही मैफिल चालली होती, आणि प्रत्येक कार्यक्रम हा स्वतंत्रपणे यशस्वी होत होता. बाळकरामांनी 'जोग' थाटात पेश केला. माणिकबाईंनी 'अहिर भैरव' आणि 'नाही मी बोलत नाथा' हे बालगंधर्वांचे पद सादर केले, कुंदा वेलींगांनी 'चंद्रकौस' गायिला. सी. आर. व्यास जोगियाचा एक अनवट प्रकार गायिले. ह्या बैठकीचा सर्वात यशस्वी भाग म्हणजे राजारामबुवा पराडकरांनी ग्वाल्हेर घराण्याच्या पेश केलेल्या 'देवगिरी बिलावल' आणि 'भैरवी' रागातल्या दोन निर्भेळ बंदिषी. ग्वाल्हेरी गायकीत तानांचे पलटे फार जोरकस असतात. उदाहरण म्हणून ओंकारनाथ ठाकूर किंवा कुमार गंधर्वांच्या ख्यालांकडे बोट दाखविता येईल. सत्तरी ओलांडलेल्या राजारामबुवांनी जोरकस तानांचे कसब म्हणजे काय त्याचे श्रोत्यांना रोकडे प्रत्यंतर आणून दिले. घरंदाज गायकीच्या मुंबईकर श्रोत्यांना गुरूपूजनाच्या ह्या सर्वत्र साजऱ्या झालेल्या मैफिली म्हणजे योगायोगाने जमून आलेली मेजवानीच वाटली. ◻





# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता

अनिल बर्वे

## एक

रोमच्या इतिहासात गुलाम म्हणून जगलेला, इजिप्तच्या इतिहासात पिरॅमिड स्‍ बांधायला वेठबिगारीवर राबलेला, भारतामध्ये अस्पृश्य म्हणून विटंबलेला मानवी इतिहासात सदैव गुलाम आणि हीन म्हणून जगलेल्या मानवी समाजाच्या खऱ्या उद्धारकर्त्या वर्गाला–प्रोलेटारीयन क्लासाला–सर्वहारा वर्गाला एकोणिसाव्या शतकात मार्क्सनें प्रतिष्ठा दिली. विसाव्या शतकात माओने त्याच्या हातात शस्त्र दिलें. क्रांतीचे ज्वलंत तत्वज्ञान दिले. आज तो सर्वहारा वर्ग आग्नेय आशियांपासून अमेरिकेपर्यंत क्रांतीच्या ज्वालेत वर्गीय समाजाची आहुती घेत निघाला आहे.

माओ–त्से–तुंग प्रणीत क्रांतीचे पहिले पाऊल क्रांतिकारकांनी नक्षलवादीमध्ये

महाराष्ट्रात नक्षलवाद्यांची धरपकड सुरू होती, त्यावेळी माणूसतर्फे अनिल बर्वे दक्षिणेकडे, आंध्रतील नक्षलवाद्यांचा मुख्य तळ समजल्या जाणाऱ्या श्रीकाकुलमकडे, निघाले होते. वरंगळहून त्यांनी एका पत्रात लिहिले -

'गेल्या सहा महिन्यात नक्षलवादी चळवळ फोफावत चालली असून घाटावरून पठारावर पसरत आहे. फार प्रचंड संख्येने C. P. M. चे कार्यकर्ते सशस्त्र लढयात उतरले आहेत. वरंगळ शहरात जागोजागी क्रांति वचने लिहिलेली दिसतात. मेडिकल कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज ही येथील महत्त्वाची केंद्रे.'

आणखी एका नंतरच्या पत्रात बर्वे यांनी कळविले.

'पोलिसांच्या अमानुष दडपशाहीने इथे लोक तोंड उघडायला तयार होत नाहीत. या सर्व भागास लष्करी छावणीचे स्वरूप आज आले आहे. केवळ मुलुग तालुक्यात २ C. R. P. च्या कंपन्या, २ आंध्र रिझर्व्ह कंपन्या. या व्यतिरिक्त स्थानिक पोलिस व सी. आय्. डी. आहेतच.

'वरंगळ -खम्मम या जिल्ह्यातून फक्त नक्षलवाद्यांची फाइटींग स्क्वाड्स असतात. परंतु श्रीकाकुलम्‌मध्ये नक्षलवाद्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष आदिवासी व शेतकरी लढतात.'

पोलिसी दहशत, वेगळी भाषा, अपरिचित मुलुख यातून कसाबसा मार्ग काढीत बर्वे यांनी आपली शोधयात्रा तरीही पुरी केली.

या शोधयात्रेचा हा वृत्तांत.

दर बुधवारच्या अंकात ही लेखमाला क्रमशः प्रसिद्ध होईल.

अर्थातच वादग्रस्त ठरणार. कारण लेखक तरुण, विषय ज्वलंत....

---

सदुसष्टच्या मेमध्ये टाकले. त्यानंतर गेले तीन वर्षे क्रांतीच्या ज्वाला सर्व प्रांतात कमी अधिक प्रमाणात भडकू लागल्या आहेत.

आंध्रच्या शेकडो चौरस मैल विभागात नक्षलवादी क्रांतिकारकांनी सशस्त्र बंडाचा झेंडा फडकावला आहे. श्रीकाकुलम–वरंगळ आणि खम्मम ही त्यांची मुख्य रणक्षेत्रे. या व्यतिरिक्त गेले दोन तीन महिने नेल्लोर–गुतुर व कृष्णा याचबरोबर इस्ट आणि वेस्ट गोदावरी जिल्ह्यातही तुरळक चकमकी झडू लागल्या आहेत. वर्षापूर्वीपर्यंत केवळ डोंगराळ भागात चालू असलेला हा लढा आता पठारावर

पसरू लागला आहे. सोबत दिलेल्या नकाशावरून नक्षलवादी क्रांतीने आंध्रचे किती मोठे क्षेत्रफळ व्यापले आहे याची व त्या प्रदेशाच्या महत्वाची कल्पना येईल. महाराष्ट्र मध्यप्रदेश–ओरिसा व आध्र यामध्ये गोदावरीचे खोरे–जंगले आणि डोंगराळ प्रदेशानी व्यापलेला हा प्रदेश गनिमी लढ्यास अनुकूल असून हा विभाग भारताचा 'येनान' करण्याचा नक्षलवाद्याचा विचार दिसून येत आहे.

नक्षलवाद्यानी व्यापलेला आणि त्याचे मुख्य तळ असलेला श्रीकाकुलम जिल्हा हा पूर्वघाटाच्या दोन रागा, मडासा, सालुर यानी वेढलेला आहे. श्रीकाकुलमचा समुद्रसपाटीचा प्रदेश व पठारी प्रदेश वगळता इतर सहा तालुक्यात जवळजवळ लालराज्यच अस्तित्वात आहे. श्रीकाकुलमला लागूनच ओरिसाची सरहद्द असून 'कोरापूट' येथे आंध्रची सरहद्द ओलाडून ओरिसात जाता येते. हा प्रदेश सुमारे आठशे चौरस मैल असून या प्रदेशात गिरिजनाच्या दोन टोळ्या 'सावरस' व 'जातवस' या राहतात. या आदिवासीची सख्या सुमारे ऐंशी हजार असून हे सर्व लोक एकदिलाने नक्षलवाद्यांच्या पाठीमागे उभे आहेत. हा सर्व प्रदेश घनदाट जगलाचा असून रस्ते जवळजवळ नाहीत. तसेच वरच्या बाजूला मध्यप्रदेश असून मध्यप्रदेशातील बस्तर व जगदाळपुर येथील गिरिजनही लाल झेंड्याखाली जमविण्याचे कार्य यशस्वी होत आहे.

श्रीकाकुलम सोडून गोदीवरीच्या खोऱ्यातही नक्षलवादी क्रांतिकारकांचे फारमोठे प्रभावी क्षेत्र आहे. मुगुर वेंकटापुरम हा चिंचोळ्यापट्टीचा तालुका शभर मैल लांब व पधरा मैल रुद असून, एका बाजूला गोदावरी व दुसऱ्या बाजूला मध्यप्रदेशचे घनदाट जंगल व डोंगरी प्रदेश याने गनिमी लढ्यास सुरक्षित झाला आहे. या तालुक्यात भद्राचलम ते कोडायकल ही एकच अर्धवट कच्ची सडक असून ती दहा ठिकाणी मोठमोठ्या नाल्यानी तुटली आहे. एकाही नाल्यावर कायमचा पूल नसल्याने पावसाळ्यात येथील दळणवळण पार तुटते. भद्राचलमपासून चेरळापर्यंतचा तीस मैलाचा भाग हा दाट लोकवस्तीचा असून पुढे अत्यत तुरळक वस्ती आहे. जगलामधील लहान लहान वाड्यातूनच ही माणसे राहतात. ही उत्तरपूर्व गोदावरीची भौगोलिक स्थिती. या भागाला अप्पर गोदावरी म्हणतात. यामध्ये भद्राचलमही समाविष्ट आहे.

पूर्वी केंद्रशासित असलेले अल्वाका संस्थान आणि इस्ट गोदावरीचे चेरळा–अल्वाका, वेंकटापुरम असे तीन भाग पाडून ते खम्मम जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. आदिलाबादच्या वर महाराष्ट्रातील चादा जंगल असून तेथील आदिवासीमध्येही नक्षलवादी कार्यकर्ते सघटना करीत आहेत. अशा रीतीने गोदावरीने तोडलेल्या आध्रच्या उत्तर भागात व महाराष्ट्र-मध्यप्रदेश-ओरिसा यांच्या सरहद्दीवर नक्षलवाद्यांनी चागलेच मूळ धरले आहे.

गोदावरीच्या दक्षिणेला वंरगळच्या मुलुग तालुक्यात व खम्ममच्या 'बोरगमपाद




तालुक्यात नक्षलवादी प्रभावी आहेत. वरंगळ ते एटूर नागारामपर्यंत डांबरी रस्ता आहे व एटूर नागाराम येथे नदीकिनारी दाट लोकवस्ती आहे परंतु ही सर्व वस्ती वाड्यांमध्ये असून दरम्यान दळणवळणाची साधने उपलब्ध नाहीत. वरंगळ व खम्मम या जिल्ह्यातून वरील प्रदेशात कोया-रेस्टा-वाडा-आरे इत्यादी टोळ्यांचे व मागासलेल्या जमातींचे लोक रहात असून सुमारे दोन लाख वस्तीच्या या प्रदेशात नक्षलवाद्यांना जनतेचा भक्कम पाठिंबा लाभला आहे. गनिमी लढ्यास अनुकूल तसेच भीषण सामाजिक विषमता व अन्याय याने राजकीय क्रांतीस परिपक्व असा हा प्रदेश नक्षलवाद्यांचा बोलकिल्ला आहे.

श्रीकाकुलम येथील आदिवासींनी या शतकाच्या सुरुवातीस विविध कारणांनी तीन बंडे केली. परंतु ब्रिटीश सरकारने ती दडपली. तेलंगणातील शेतमजुर व किसानांनी सत्तेचाळीस व अठ्ठेचाळीस या सालात क्रांतिकारक उठाव केले, परंतु पंधरा ऑगस्टच्या सत्तांतरानंतर भारतीय सत्ताधाऱ्यांनी हे उठाव अत्यंत अमानुषपणे चिरडले. परिणामी गेले अर्ध शतकभर सतत अशांत असलेला हा प्रदेश धुमसतच राहिला. आणि आज तेथे नक्षलवादी क्रांतीने चांगलाच पेट घेतला आहे. केवळ गेल्या एका वर्षात नक्षलवाद्यांनी——

श्रीकाकुलमध्ये चाळीस छापे घातले व तेवीस जमीनदार सावकार आदींचे बळी घेतले. वरंगळमध्ये अठ्ठावीस छापे व सहा बळी आणि खम्मममध्ये तीन बळी व वीस छापे; करीमनगरमध्ये तीन छापे व एक बळी नलगोंडा जिल्ह्यात दोन छापे तर गुंतर जिल्ह्यात तीन छापे व दोन बळी. विशाखापट्टणमध्ये एक छापा व एक बळी घेतला. अशा रीतीने एक वर्षाच्या अवधीत सत्त्याण्णव डाके व छत्तीस बळी घेतले गेले. सरकारी रिपोर्टप्रमाणे ऐंय्यैंशी वेळा पोलीसांशी सशस्त्र चकमकी झडून

नक्षलवाद्यांकडून सुमारे ३५० शस्त्रे जप्त करण्यात आली. आतापर्यंत सहालाख रुपये व शंभर तोळे सोने व चांदी, आणि बदुका नक्षलवाद्याच्या ' पीपल्स आर्मी 'ने पळवून नेल्या आहेत. स्थानिक जनतेच्या सहकार्याने व सहानुभूतीमुळेच हे शक्य झाले तेव्हा नक्षलवादी क्रातिचे स्वरूप ध्यानात येण्यासाठी इथल्या जनतेचे प्रश्न व त्याच्यावर झालेले अन्याय हे समजावून घेतले पाहिजेत. नक्षलवाद्यांना केवळ देशद्रोही, हिंसक, परधार्जिणे अशा सवग शिव्या देण्यात आता फारसे स्वारस्य शिल्लक राहिलेले नाही. पोलीसाचा ससेमिरा चुकवत रानोमाळ धावणारे कनु सन्याल व चारु मुझुमदार हे देशद्रोही व संसदेत भाषणे ठोकणारे, गलेलठ्ठ मानधन घेणारे व मोटारी उडविणारे पुढारी मात्र देशभक्त या भोगळ मुक्तीवादाने अर्धं पोटी जनता व जागृत तरुण यापुढे फसणार नाही. तीन वर्षापूर्वी एका खेड्यात पेटलेली ही चळवळ आज साऱ्या देशभर पसरते यातच त्या चळवळीमागे असलेली तपश्चर्या, निष्ठा व जनतेस वाटणारी त्या चळवळी विषयीची सहानभूती स्पष्ट होते.

नक्षलवादी क्रातिचा मार्ग हा चुक का बरोबर ते या देशातील जनता व या देशाचा इतिहास ठरवेल. या समाजाविषयी, इथल्या जनतेविषयी प्रेम असलेल्या बुद्धिवाद्यानी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की शेकडो ठराव–दुरुस्त्या–सभा-परिषदा-समेलने यापेक्षा प्रत्यक्ष कृती ही जास्त महत्त्वाची असते. फसलेली व अपयशी चळवळ ही सुद्धा यशस्वी चळवळीचा मुळाधार बनते.

सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न म्हणजे अविचारी आततायीपणा होईल अशी धोक्याची सूचना मार्क्सने पॅरीसच्या कामगाराना कम्युन्सच्या थोडे दिवस आधी म्हणजे १८७० च्या शरद ऋतुतच दिलेली होती. परतु जेव्हा १८७१ च्या मार्च-मध्ये पॅरीसच्या कामगारावर लढा लादला गेला, तेव्हा कामगारानी त्याचा धैर्याने स्वीकार केला. प्रत्यक्ष लढचाला तोड लागले त्या वेळेला चिन्हे प्रतिकुल दिसत असतानाही मार्क्सने या कामगार क्रातिचे उत्साहाने स्वागत केले. एखाद्या पढीक विद्वानाप्रमाणे 'हा उठाव अकाली केलेला आहे' म्हणून निषेध न करता या अपयशी क्रातीतून मिळालेल्या अनुभवांचे विश्लेषण करून त्यावरून आपल्या पुढील धोरणाचे आडाखे बाधले. आपले सिद्धान्त पडताळून पाहिले.

लोकहीतवादी, चिपळूणकर, रानडे, परांजपे, केळकर, आगरकर यांच्या तालमीत वाढलेला आमचा महाराष्ट्रीय बुद्धीवादी वर्ग आज खोटी प्रतिष्ठा, मानसन्मान व पैसा याना लालचावला असल्याने कोणत्याच चळवळीचे योग्य विश्लेषण करून समाजामध्ये मुलभूत फरक घडवून आणू शकला नाही. आमच्यातले मार्क्सवादी विचारवत हेही या ' पेशवाई बुद्धीवाद्यां 'च्या जातकुळीपैकीच असल्याने बोटे मोडणे-सवग शिव्या वहाणे यापलीकडे ते नक्षलवादी चळवळ अभ्यासु शकले नाहीत.

मोझेसपासून माओपर्यंत प्रत्येक क्रांतिकारक हा जनतेपासून स्फूर्ति मिळालेला जनतेचा नेता आहे. ज्या उंचावलेल्या अपेक्षानी जनता या नेत्याकडे पाहते त्या

अपेक्षांनी प्रेरीत होऊन हे क्रांतिकारक वाटेल ते दिव्य करावयास पुढे येतात. जनता चळवळ ही वर्तमानाच्या तिटकाऱ्यातून व भविष्यावरच्या विश्वासातून जन्माला येते, त्यातच तिचे सामर्थ्य असते व याच सामर्थ्याच्या जोरावर साम्राज्य सेनासागर व बलशाली वर्तमान ती पालथी घालते. नक्षलवादी चळवळ ही सुद्धा एक जनता चळवळ आहे. हे गेल्या तीन वर्षात सिद्ध झाले आहे. या चळवळीला जवळून पाहण्याची, प्रत्यक्ष पेटलेल्या क्षेत्रात जाऊन तेथील जनतेत मिसळण्याची इच्छा होती आणि 'माणूस'च्या सौजन्याने ती पूर्ण झाली. आणि मग,

अशाच एका कातरवेळेला—

दख्खनच्या पठारावरून गाडी धावू लागली. या ऐंशी कोटी एकराच्या विशाल खंडप्राय देशात चाळीस कोटी माणसे अर्धपोटी कशी राहतात हा प्रश्न मनाला भेडसावू लागला. प्रतिष्ठिताना या देशाचे दारिद्र्य दोनदा पहायला मिळते. एकदा बंगाली साहित्यात, दुसऱ्यादा रेल्वे प्रवासात. प्रत्येक रेल्वे स्टेशनवर लहान लहान अर्धपोटी पोरे हात पसरून अन्नासाठी भिक मागताना दिसतात—

अठरापगड जातीच्या कोशिंबीऱ्या, रायती, चटण्या, भरिते, डांगरे — पेशवाईने संस्कृतिनिष्ठांना दिलेली ही देणगी आणि कुणी कुठल्याशा दारी उष्टचा महाग अन्नाला—

'पापण्यांच्या सावलीला दुःख जमतात!'

◻

हैद्राबाद स्टेशनवरचा सायकल रिक्षावाला आपल्या रिक्षेला 'गांधीजीचा चरखा' म्हणतो. स्वतःच्या दारिद्र्याला हसणारी ही माणसं म्हणजे प्रस्थापित सत्ताधारी वर्गाला मिळालेला दिलासाच होय.

इथल्या जनता जनार्दनाशी मी खूप खूप बोलतो. मीच बोलतो, कारण त्याला बोलताच येत नाही. त्याला राजकीय जाणीवाच नाहीत. पाच वर्षातून एकदा मुखिया सांगेल त्याला किंवा पैसे देईल त्याला मतदान आणि नंतर दिवस रात्र अन्नासाठी असहाय्य तडफड!

मुसलमानाच्या हॉटेलात चहा पितो!

माझ्या परंपरागत ब्राह्मणी मनाला चहा पिताना आपण 'मुसलमानाचा' चहा प्यायल्याची 'पुरोगामी' जाणीव होणे. सर्व भारतीय पुरोगामी हे असेच दिखाउ आणि बेगडी पुरोगामी.

मला इंग्रजी येते 'द डेक्कन क्रॉनिकल वाचतो. आंध्रच्या राजधानीतून प्रसिद्ध होणारे सर्वाधिक खपाचे इंग्रजी दैनिक—त्यात ठळक बातमी—

वरंगळ डिस्ट्रीक्ट कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्री. वेंकटरेड्डी याचे भाऊ श्री.

श्रीराम रेड्डी आणि व्ही. राघवरेड्डी यांना तर्कल तालुक्यातील पर्दामपुला या खेड्यात चवदा जुलैला पहाटे तीन वाजता नक्षलवाद्यांनी ठार केले.

चारच दिवसापूर्वी आंध्रचे गृहमंत्री जे. वेंगलराव यांनी केलेल्या 'नक्षलवाद्यांचा खातमा' या घोषणेचा श्राद्धविधी चार दिवसात नक्षलवाद्यांनी पार पाडला. आज आंध्रच्या विविध विभागातून नक्षलवादी चळवळ हात पाय पसरवत आहे. जनतेची मोठी सहानुभूति व मदत नक्षलवाद्यांना मिळालेली आहे. या सहानुभूतीची कारण मीमांसा करायला आपल्याला इथल्या जनतेत मिसळायला पाहिजे. या विभागात फार मोठी संख्या आदिवासी–गिरीजनांची असून बाकी शेतमजूर-गरीब शेतकऱ्यांची आहे.

नक्षलवादी क्रांतिच्या क्षेत्रात ४ ते ५ लाखाहून अधिक वस्ती गिरीजन व आदिवासीची आहे. डोंगराळ व जंगलमय प्रदेशात राहणारे हे आदिवासी अत्यंत प्राथमिक अर्थव्यवस्थेतील जिणे जगत आहेत. सुसंस्कृत जगापासून शेकडोमैल दूर असलेले हे आदिवासी जंगल जमीन पिकवून व कंदमुळे–फळे–गवत–चिंच आदि जंगल संपत्ति विकून कसेबसे उदरभरण करीत. परंतु काही दशकांपूर्वी पठारावरून या विभागात येऊन स्थायिक झालेल्या व्यापारी–सावकारानी मध्ययुगीन कालातील अमानुष्य पद्धतींचा वापर करून लवकरच आदिवासीच्या जमिनींचा ताबा घेतला. या 'सुसंस्कृतांनी' कर्ज वाटप करून गिरिजनाना 'कर्ज गुलाम' म्हणून राबवले. दमदाटया व धमक्या देऊन आदिवासीना 'वेट्टी'वर राबवणे–म्हणजेच 'वेठबिगार' ही एक सर्वसामान्य गोष्ट होऊन बसली.

व्यापाऱ्यानी आपल्या मक्तेदारीचा फायदा घेऊन अत्यंत मातीमोल भावाने 'जंगल संपत्ति' खरेदी करावयास सुरुवात केली व तांदुळ–तेल–मीठ–मिरची-कापड या जीवनावश्यक गरजांचे भाव दामदुपटीने वाढवून आदिवासींचे दुहेरी शोषण सुरू केले. आदिवासीच्या जमिनीचा कब्जा घेण्यासाठी त्याच्या गरजेच्या काळात त्यांना कागदोपत्री गुतवून, जबर चक्रवाढ व्याजाने त्यांना कर्ज देऊन, लवकरच त्या कर्जाच्या रकमा चौपट पाचपट वाढवून कर्जापोटी जमिनीचा कब्जा आरंभला व व्याजापोटी आदिवासीना वेठबिगारविट राबवायला सुरुवात केली.

ब्रिटिश सरकारने १९१७ साली केलेल्या कायद्याप्रमाणे टोळीवाल्यांच्या जमिनी बिगर टोळीवाल्यांना खास सरकारी हुकूमाशिवाय विकत घेता येत नाही. हा कायदा ब्रिटिशांनी २–३ आदिवासी बंडे झाल्यावर केला. तेव्हा सावकारांनी जमिनी 'नजर गहाण' ठेवून घेऊन पुन्हा व्याज वसुली चालूच ठेवली व कायदा धाब्यावर बसल्याने हे जंगलचे राजे–गुलाम व भूमिहीन शेत मजुर बनले.

दरम्यान भारत सरकारने जगलविभाग 'कॉंट्रक्ट' पद्धतीने घ्यावयास सुरुवात केली व आदिवासीचा हा तोंडचा घास 'जगल ठेकेदारांनी' काढून घेतला. सिजनमध्ये 'बिडी लव्हिडा'च्या तोडणीला चार आणे दिवसावर आदिवासी राबू लागले.

धनुष्यबाण घेऊन हिंडणाऱ्या या लढाऊ आदिवासींमध्ये कम्युनिस्टांनी जागृती घडवून संघटन सुरू केले. आदिवासीच्या प्रचंड बळकट संघटना उभ्या राहिल्या. त्याचे मजुरीचे दर वाढवून मिळण्यासाठी व त्याचे शोषण थांबण्यासाठी त्यांनी चळवळ आरंभली. भडकलेल्या जमिनदारानी–व्यापाऱ्यानी–सावकारांनी गुंडाचे सहाय्याने कार्यकर्त्यांचे खून पाडावयास सुरुवात केले. ५४–६४ या दहा वर्षात ४० प्रमुख कार्यकर्त्यांचे खून पडले. सभा उधळणे, गुडेम्स, वाडचा जाळणे–खोटचा केसेसमध्ये आदिवासीना गुंतवणे–स्त्रियांवर बलात्कार करणे असे रानटी प्रकार सुरू झाले. आंध्र सरकारचे पोलीस, जमिनदार–सावकार–व्यापारी याच्या या 'पवित्रकार्यात' यथाशक्ती सहभागी होऊ लागले. या सर्व हीन व माणुसकीला लाजवणाऱ्या घटनांविरुद्ध डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलीटब्युरोने आवाज उठवण्यास सुरुवात केली. ३ मे ६८ व २५ जुलै ६८ ला महामंत्र्याना पाठवलेल्या पत्रात सर्व घटनांच्या तारीखवार व नावनिशावार माहित्या देण्यात आल्या. परंतु त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले–परिणामी हा सर्व विभाग सशस्त्र बडाने पेटून उठला.

राज्याच्या प्रचंड विभागात हा गोंधळ चालला असताना आंध्र सरकार डोळ्यावर कातडे पांघरुन का बसले? अर्थात याचे कारण त्याचे वर्गीय स्वरूप होय. आंध्र सरकारच्या २९ मंत्र्यांपैकी कुणाचीही १००० एकराखाली जमीन नाही. जमीनदारांचे हे मंत्रीमंडळ सर्व कायदे व्यवस्थित धाब्यावर बसवते. या बेशरम मंत्रीमंडळात 'हरिजनांना' जिवंत जाळण्यात आले याचे जाहीररीत्या आनंदाने स्वागत करणारे–तिम्मा रेड्डीसारखे मत्री व त्याना पाघरुण घालणारे ब्रह्मानंद रेड्डीसारखे मुख्यमंत्री आहेत. या महाभागांना नक्षलवाद्यावर गोळी झाडण्याचा काडीमात्र अधिकार पोचतो काय?

जमीनदारांच्या अमानुष जुलुमांविरुद्ध तेलंगणात ४७–४८ साली कुळांनी व शेतकऱ्यांनी लाल झेंड्याखाली उठाव केला. परंतु भारतीय सत्ताधाऱ्यांचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी जमीनदाराना अभयदान देऊन अन्न मागणाऱ्या शेतकऱ्यांचे क्रूर मुडदे पाडले. साम्ययोगी विनोबांनी भूदान सुरू केले. शेवटी लोकलज्जेस्तव १९५३ मध्ये 'टेनेन्सी अॅक्ट' संमत करण्यात आला.

या कायद्याप्रमाणे भुस्वामलुला म्हणजे जमिनदाराला रक्षित खौलदाराने म्हणजे कुळाने खंडापोटी उत्पन्नाचा चौथा भाग किंवा साऱ्याची चौपट रक्कम द्यावी असे बंधन घालण्यात आले आणि या कायद्याच्या ३ (३) कलमाप्रमाणे सरकार केव्हाही खौलदारांना जमिन मालक बनवू शकण्यास समर्थ झाले. नुकसान भरपाईपोटी खंडाच्या आठपट रक्कम खौलदाराने सहा वर्षात बारा हप्त्यात घ्यावी अशी तरतूद होती. परंतु मुळातच हा कायदा केवळ तेलंगणा पुरता मर्यादित आणि ३८ (३) कलम फक्त खम्मम जिल्ह्याला लागू होते–तरीपण त्याची अंमलबजावणी कधीच झाली नाही. हा कायदा सर्व आंध्र प्रदेशाकरता लागू करावा म्हणून किसानसभा

लवकरच उग्र आंदोलन सुरू करणार आहे.

६७ मध्ये ब्रह्मानंद रेड्डी सरकार गादीवर आले व सत्ता प्राप्त होताच कुळकायद्याचे ३८ (३) कलम सर्व तेलंगणला १५ ऑगस्ट ६८ ला लागू करण्याची गोड घोषणा त्यांनी केली. परंतु आधीच्या वीस वर्षांत व नवीन मिळालेल्या वर्षाच्या अवधित जमिनदारानी गुडगिरी–दमदाटया–मारहाण आदि सर्व मार्ग हाताळून ६०% कुळांना जमिनीवरून हुसकावून लावले. राहता राहिली ३०% कुळे. त्याना तरी या कायद्याचा फायदा मिळावा–परंतु जमिनदारांनी ३८ (३) कलमाविरुद्ध हायकोर्टात अपील केले आणि सहा महिन्यापुर्वी ३८ (३) कलम रद्द ठरवले गेले. कारण. या कलमान्वये घटनेतील सपत्तीच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते.

आता सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश असलेले श्री. पिंगळ जगल मोहन रेड्डी हे त्या वेळी आंध्र हायकोर्टचे प्रमुख न्यायाधिश होते व त्यानीच ३८३ कलम रद्द ठरवले. इथे जाता जाता नमुद करणे आवश्यक आहे की प्रमुख न्यायाधीश हे स्वत: बडे जमिनदार असून त्यांची स्वत.ची पाच हजार एकर जमीन आहे.

हायकोर्टाच्या या निकालाविरुद्ध सुप्रीम कोर्टात जायचे आंध्र सरकारने ठरवले परंतु किसानसभेची अशी मागणी आहे की सुप्रिम कोर्टात जांऊन दोन-तीन वर्षे काढण्या ऐवजी विधान सभेत दुरुस्ती बील मंजुर करावे. परंतु आंध्र सरकार 'सनदशीर' मार्ग म्हणून सुप्रिम कोर्टात अपिल करणार हे निश्चीत आहे. अशा प्रकारे कुळ कायद्याचे खोबरे केल्यानंतर राहता राहिला 'सिलीग अॅक्ट.' सिलीग कायद्याप्रमाणे एका कुटुंबाला २०० एकरावर कोरडवाहू वा २७ एकरावर तादुळ जमिन ठेवता येत नाही. पण या कायद्यात 'कुटूंबाची' व्याख्या करण्याचे


# मुजऱ्याचे मानकरी

व. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन

'नजर चुकीने' राहून गेल्याने गेल्या आठ-दहा वर्षात सरकारने एक एकर जमिन-सुद्धा ताब्यात घेऊन भूमिहीनार्ना वाटली नाही.

अर्थात या सर्व खेळखडोव्यात जमिनदार आपली सत्ता गाजवतच आहेत. गोविंद पेठ येथे 'तुगतुर्कशास्त्री' या जमिनदाराची साठ हजार एकर जमिन आहे. त्याच्या या विस्तीर्ण जमिनदारीत २३ गावे मोडतात. या व्यतिरीक्त दहा-पंधरा हजार एकरवाले जमिनदार आहेतच. हजार दोन हजार एकरवाले "गरीब' जमिनदारही बरेच आहेत.

सरकारी जमिनीपैकी ९०% जमिन पट्टयानें कसावयास देत परंतु आजपर्यंत ही जमिन केवळ सरकारी मंत्री-आमदार-जमीनदार व त्याच्या होमबानाच मिळत असे. नलगोडा जिल्ह्यात 'ऑड्डागुडू' या गावात महसूल मंत्री पुरुषोत्तम रेड्डी जे स्वत: हजार एकरवाले जमिनदार आहेत त्याच्याकडे ५८० एकर व त्याच्या 'होमबा'कडे ५०० एकर जमीन गेले सात वर्ष होती. गतवर्षी किसान सभेने ती जमीन ताब्यात घेतली.

कम्युनिस्ट नेतृत्वाखालील किसान सभेचे आध्रमध्ये १,७५००० सभासद असून त्यांचे 'रइत लोकम'या नावाचे मासिकही निघते. खेद मजदूर सभेचेही २ लाख सभासद आहेत. पडीक जमिनी व जादा जमिनी ताब्यात घेण्याची मोठी मोहीम या संघटनांनी हाती घेतली आहे.

उद्योग सम्राट बिर्ला महाशयाची मद्रासमध्ये २०,००० एकर व बिहार मध्ये ३०,००० एकर जमिन असून हैद्राबाद येथे ५०० एकर जमिनीत त्यानी द्राक्षे लावली आहेत. विश्रामचा मुलगा 'मुकर्रमप्रा' याचे ताब्यातही शहरलगतची २००० एकर जमिन आहे. या सर्वांविरुद्ध किसान सभा उग्र आदोलन सुर करणार आहे.

अशा निराशाजनक व अन्याय आणि विषमतेने भरलेल्या भागात नक्षवाद्यांना पाठिंबा मिळाला नसता तरच नवल. यावर राजकीय पक्ष सरकारने काय मार्ग काढला तो पाहिल्यास त्याचे फसवे स्वरूप आणखी उघडे होईल.

(क्रमश:)

---

पुढील लेखांक : बुधवार दिनांक २ सप्टेंबर अंकात

---

# विचारवेध

समीर

## ◻ आंतरराष्ट्रीय समाजसेवा

ऑपरेशन क्रॉसरोडस् आफ्रिका नावाची एक पाश्चिमात्य संस्था अमेरिकन व कॅनडियन विद्यार्थ्यांना उन्हाळयाच्या सुटीत आफ्रिकेला पाठवीत असते. आफ्रिकन विद्यार्थ्यांचे जीवन त्यांना जवळून पाहता यावे हा या योजनेमागचा हेतु असतो. आता या संस्थेत कार्य करणाऱ्या कॅनडियन मंडळींनी कॅनडियन क्रॉस-रोडस् इंटरनॅशनल नावाची दुसरी संस्था काढली आहे. या संस्थेतर्फे कॅनडियन विद्यार्थी स्वयंसेवक आफ्रिकेला तर जातीलच, पण ते भारतातही पाठविता येतील की काय हे पाहण्यासाठी संस्थेची एक तरुण कार्यकर्ती कु. एलिझाबेथ पॅटरसन नुकतीच भारतात येऊन गेली, तेव्हा तिने या आंतरराष्ट्रीय समाजसेवी संस्थेची माहिती दिली.

क्रॉसरोडस्चे स्वयंसेवक कोठल्या प्रकारचे काम करतात ? ते ज्या देशात जातात तेथल्या विद्यार्थ्यांच्या बरोबर श्रम-शिबिरात भाग घेतात आणि शाळा, समाजकेंद्रे वगैरे बांधायला मदत करतात. ते वैद्यकीय योजना व शारीरिक शिक्षणाच्या शाळाही चालवतात. क्रॉसरोडस् सबंध आफ्रिकेत पसरत आहे. 'फक्त दक्षिण आफ्रिकेला आम्ही शिवत नाही, आणि टांझानियात श्री. नामरेरे यांना आम्ही नको आहोत.' फ्रेंच-भाषी देशात या संस्थेचे खूप स्वयंसेवक कार्य करीत असून ते सर्व फ्रेंच-भाषी कॅनडियन आहेत.

विद्यार्थी स्वयंसेवकांनी परदेशी जाण्याच्या आधी आपल्याच देशात समाजसेवेचे कार्य करू नये काय ? उत्तर : 'बहुतेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या देशात स्वयंसेवक म्हणून काम करण्यात स्वारस्य वाटत नाही. क्रॉसरोडस्च्या कार्यक्रमात ते स्वयं-सेवक म्हणून भाग घ्यायला तयार होतात याचे प्रमुख कारण म्हणजे परदेशी जाण्याची मौज त्यांना अनुभवायला मिळते.' पण असेही दिसून आले आहे की हे विद्यार्थी परत आल्यावर त्यांना स्वतःच्या देशातील सामाजिक समस्यात पूर्वीपेक्षा खूपच अधिक स्वारस्य वाटते व ते सामाजिक कार्यात अधिक भाग घेतात. त्याच-प्रमाणे क्रॉसरोडस्मुळे उत्तर अमेरिका व आफ्रिका यांच्या दरम्यान एक प्रकारचा दुवा जोडला जात आहे. उन्हाळयात जे स्वयंसेवक दीड महिन्यासाठी आफ्रिकेला

जातात ते नंतर पुन: तिकडे जाऊन अधिक दिवस राहतात. उलट त्यांचा ज्या विद्यार्थ्यांशी संबंध येतो अशा बऱ्याच आफ्रिकन विद्यार्थ्यांना कॅनडियन व अमेरिकन विश्वविद्यालयात प्रवेश मिळतो.

कॅनडियन क्रॉसरोडस् इंटरनॅशनलचे तीन स्वयसेवक सध्या भारतात आले असून ते गुंटूर विभागात पुरात नष्ट झालेली खेडी पुन: बांधायला मदत करीत आहेत. या कार्यात ते भारतीय विश्वविद्यालयातल्या विद्यार्थ्यांच्या बरोबर काम करीत आहेत.

क्रॉसरोडस् स्वयसेवकात कोठले गुण असावे लागतात ? उत्तर : जगातल्या इतर प्रदेशाबद्दल जिज्ञासा, सामाजिक जागरूकता, परकीय संस्कृतीचे रसग्रहण करण्याची क्षमता, व स्थैर्य.

## □ 'डॉक्युमेंटेशन'चे तंत्र

पश्चिम जर्मनीच्या कोलोन विश्वविद्यालयात गेली तीस वर्षे संस्कृत शिकवीत असलेले जर्मन पंडित प्रा. हेल्मुर आर्न्झ काही दिवसापूर्वी दिल्लीला येऊन गेले. संस्कृतप्रमाणेच 'डॉक्युमेंटेशन' या विषयाचे ते तज्ज्ञ असून त्यानी आपल्या वास्तव्यात या दोन्ही विषयाची चर्चा केली.

ते म्हणाले काही वर्षांपूर्वी जर्मनीत संस्कृतचे अध्ययन फारच लोकप्रिय होते, पण आता इतर भारतीय भाषांबद्दलही – विशेषत: हिंदीबद्दल – जर्मन जनतेला रुची वाटू लागली आहे. 'विज्ञान व तंत्रज्ञानावरील माहितीच्या प्रसरणासाठी एखादी आंतरराष्ट्रीय यंत्रणा तयार करण्याच्या कल्पनेचा आम्ही सध्या विचार करीत आहोत. सर्व राष्ट्रीय डॉक्युमेंटेशन केंद्राच्या मदतीने स्थापन होणारे हे आंतरराष्ट्रीय केंद्र १९८० मध्ये सुरू होईल.' ही योजना पक्की करण्यासाठी पुढील वर्षी दिल्लीला एक आंतरराष्ट्रीय बैठक होईल. 'अशा बैठकीसाठी भारतापेक्षा अधिक योग्य स्थान मिळणे शक्य नाही. डॉक्युमेंटेशनच्या क्षेत्रात भारताने चांगली प्रगती केली आहे. डॉक्युमेंटेशनचे तंत्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुरू करण्याचे श्रेय भारताला आहे. त्याचप्रमाणे डॉ. रंगनाथन् या भारतीय तज्ज्ञाने शोधून काढलेली रंगावर आधारलेली वर्गीकरण पद्धती सगळ्या जगानें स्वीकारली आहे.'

'जर्मनी या क्षेत्रात नवीन आहे. पण आता जर्मनीला डॉक्युमेंटेशनचे महत्त्व पटले आहे. कारण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शास्त्रीय तपशील इतका वाढला आहे की संशोधन करू पाहणाऱ्याला सर्व माहिती चटकन गोळा करणे अशक्य झाले आहे. पश्चिम जर्मनीत सर्व मोठ्या उद्योग-धंद्यांची स्वत:ची डॉक्युमेंटेशन व्यवस्था असते.

दर वर्षी नुसत्या रसायनशास्त्रावर सुमारे दीड लाख प्रकाशने आणि अणुशास्त्रावर ५५ भाषात ८०,००० प्रबंध छापले जातात. कार्यक्षम डॉक्युमेंटेशनसाठी सर्व देशांनी व उद्योग-धंद्यांनी परस्पराशी सहकार्य करणे आवश्यक आहे.

□ □ □



# आनंद फुले

रघुवीर जहांगीर आर्ट गॅलरीच्या बाहेर पडला तो एका धुंदीतच. कुणा नटवर मिस्त्रीच्या चित्रांचं प्रदर्शन एका दालनात भरलेलं होतं. विषय होता– 'आकाश.' प्रदर्शनातली सर्व चित्रं आकाशाच्या नानाविध भावसंगतीची होती. प्रत्येक चित्रातनं एक वेगळच भावविश्व प्रतीत होत होतं. आकाशाचे वेगवेगळे भावाविष्कार चित्रकाराच्या तरल निरीक्षण शक्तीनं टिपले होते. अगदी अशीच कल्पना रघुवीर आपल्या चित्रकलेच्या क्षेत्रात त्यावेळी उमेदवारी करणाऱ्या वर्गमित्राजवळ बोलून गेला होता. किती तरी वर्षांपूर्वी. कल्पना अशी की समुद्र, आकाश, पाऊस किंवा ऊन ह्यांच्या नानविध छटांच्या अविष्काराच्या माध्यमानं नवरसांपैकी जितक्या शक्य होतील तेवढ्या रसांची प्रतिकात्मक चित्रं रंगवायची. चित्रकारमित्र हळूहळू नवचित्रकलेच्या प्रकृतीचा होत गेला. त्याचं क्षेत्रच वेगळं झालं. सध्या स्वारीचं पॅरिसला उच्च शिक्षण चालू आहे. रघुवीर व्यवसायानं डॉक्टर झाला. सध्या नेत्र चिकित्साशास्त्रात विशेषत्व संपादन चालू होतं. फावल्या वेळात अगदी क्रमानं पंडोल–चेतना–रॅम्पार्ट–जहांगीर व शेवटी ताजला जाऊन प्रदर्शनं पाहणं मात्र सोबतीस राह्यलं. नेहमीप्रमाणं चेतना–रॅम्पार्ट आटोपल्यावर रघुवीर जहांगीरला आला. अगदी ठरल्यागत सर्वांत पहिल्यांदा टेरेस गॅलरीची चेतनची नवी निसर्गचित्रे, मग केमोल्डला नंतर खालची दालनं पाहणं झालं. नटवर मिस्त्रींची आकाशचित्रे पाहिल्यावर रघुवीरला अगदी स्वत:चीच कल्पना साकार झाल्यांचा आनंद झाला होता. त्या धुंदीतच तो

भीक तर मिळालीच पाहिजे
मूल तर रडत ठेवलच पाहिजे...

# 'आता न तूं वैरिणी!'

गॅलरीबाहेर पडला होता. आता ताजला जाणं तेवढं राह्यलं होतं. आकाशचित्रे पाह्यल्यावर रघुवीरच्या मनात चित्रकाराची गाठ घेण्याचा विचार आला होता. त्याला वाटलं की चित्रकाराला सांगावं– ' तुम्ही समुद्र, पाऊस किंवा ऊन ह्यांचीही अशीच नाना रंग छटा, नाना भाव व्यक्त करणारी चित्रे जरूर काढा.' पण दालनात संयोजकांपैकी कुणीच दिसलं नव्हतं. मनातला विचार मनातच राहयला. त्याला थांबायला वेळ नव्हता. म्हणून शेवटी रघुवीर तसाच पण एका धुंदीतच गॅलरीबाहेर पडला. त्याची पावलं अगदी नकळत त्याला ताजला नेत होती. ताजचं प्रदर्शन पाहणं संपलं की कॅफे रीगलला येऊन कोल्ड कॉफी घेणंही ठरलेलंच. आज कॅफे रीगलला महेंद्र कपूरच्या सॅली व योगी ह्या इंग्रजी ध्वनिमुद्रिका ऐकायचा विचार केव्हाच निश्चित झाला होता.

अचानक–

अचानक रघुवीरची पावलं थबकली. एका लहान मुलाच्या अगदी काळजाला जाऊन भिडणाऱ्या आवाजानं तो भानावर आला. गेट वे ऑफ इंडियाजवळच्या शिवाजीच्या पुतळ्याच्या फूटपाथवर तो होता. कोपऱ्यावर एक भिकारीण बसली होती. पुढ्यात एक लहान मूल अगदी जीवाच्या आकांतानं रडत होतं. त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली होती. रघुवीरला ते मूल रडताना पाहवत नव्हतं. रडणं ऐकवत नव्हतं. ताजला जाण्यासाठी पाऊलही उचलवत नव्हतं. जहांगीरची धुंदी

आता काही वेळापूर्वी होती का नव्हती इतपत पार ओसरली होती. त्याच्यातला नेत्रशास्त्र जाणारा डॉक्टर जागा झाला होता. मुलाच्या डोळयावरच्या पट्टीनं त्याची कर्तव्यभावना जागृत झाली होती.

रघुवीर तिथंच थांबला. ते मूल तसंच रडत होतं. येणारे जाणारे यत्किंचितही विचलित न होता आपली मार्गक्रमणा करीत होते. पैकी कुणा एकाला दखल घ्यावीशी वाटत नव्हती. जो तो स्वत:पुरतं बघत होता. रघुवीरला स्वत:चंच आश्चर्य वाटलं. त्याचीच तेवढी पावलं तिथं का खिळली होती ? तो एकटाच तेवढा का अस्वस्थ झाला होता ? बेचैन झाला होता ? क्षणभर विचार केल्यावर त्याचं त्यालाच उमजलं. त्या भिकारणीच्या मुलाच्या रडण्यानं त्याला विचलित केल नव्हतं ! डोळयांवर बांधलेल्या पट्टीनं त्याची व्यवसायनिष्ठ उत्सुकता जागविली होती. रडण्यानं लक्ष वेधल गेलं होतं एवढंच. एरवी लक्ष वेधल गेलंच असतं असं नाही. कदाचित मघाच्या चढलेल्या कलानदाच्या धुंदीत लक्ष गेलही नसतं. एव्हाना त्या धुंदीतच रघुवीर ताजला असता ?

" क्या हुआ इस बच्चे को ?"

भिकारणीला पैशाची अपेक्षा होती प्रश्नाची नव्हती. तिनं लक्षच दिलं नाही. कदाचित तिला प्रश्नही समजला नसेल अशी सभाव्यता होती.

रघुवीरनं पुन्हा विचारलं–

" इस बच्चेको क्या हुआ ?"

भिकारणीनं मान वर करून नवलाईनं त्याच्याकड पाहचलं. तस रघुवीर म्हणाला–

" बच्चेको क्या हुआ ? आँखो के उपर पट्टी क्यो ?"

" कुछ नही । कुछ नही हुआ ।" कसबस भिकारणीनं उत्तर दिलं.

" मुझे जानकारी है इसकी । मुझे बताओ. शायद इसिलिये वह रोता होगा ।"

" नहो । नही ।" असं म्हणत ती त्या मुलाला थोपटून गप्प करण्याचा प्रयत्न करू लागली. ते मूल काही केल्या रडायचं थाबत नव्हतं.

" बाई, मै डॉक्टर हूँ । इस बच्चेके आखोकी जाच करना चाहता हूँ । एक पैसाभी नही लूगा ।"

रघुवीर आता जिद्दीस पेटला होता एव्हाना चालू असलेला तमाशा पाहचला चार सहा बघेही जमले होते. पैकी कुणाला एकाला कंठ फुटला–

" फुकटके इलाज हो रहा है तो करवा क्यू नही लेती ?"

" तेरा कुछ नुकसान थोडा होगा ।"

ती भिकारीण काही केल्या रघुवीरला व बघ्यांना दाद देत नव्हती. मूल जीवाच्या आकातान रडतच होतं. त्याला गप्प करण्याचे तिचे प्रयत्न वाझोटे ठरत होते. ती भिकारीण स्वत:देखील भांबावल्यासारखी दिसत होती. रघुवीरच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. हे लोक कुठल्यातरी जंगली वनस्पतीच्या पाल्याचा रस टाकून

तात्पुरते आंधळेपण आणण्याचे अघोरी प्रयत्न करीत असतात हे केव्हातरी रघुवीरच्या वाचनात आलं होतं. त्याला शंका आली की असला तर काही प्रकार इथं नसेल ना? त्याशिवाय ही भिकारीण अशी टाळाटाळ करणार नाही.

रघुवीरनं आजूबाजूला पाह्यलं. अपोलो रूमच्या फूटपाथवर सखाराम उभा होता. तसा त्याला उत्साह आला.

एका बघ्याला तो म्हणाला– " प्लीज, कॉल दॅट पुलीस !"

तो उत्साही बघ्या सखारामच्या दिशेने धावला.

पोलीस म्हटल्यावर ती भिकारीण हादरली. तिनं पटकन् मुलाच्या डोळ्यावरच्या बांधलेल्या पट्टीच्या गाठेला हात घातला. एका क्षणात गाठ सोडून पट्टी खसकन् ओढली. तसं एकदम ते मूल रडायच थाबल.

रघुवीरचे डोळे विस्फारले. क्षणभर तर आपण काय पाहयलं ह्याचाच बोध होईना. जाणीव झाली तर स्वतःच्या डोळ्यावर–त्याहून जास्त स्वत.च्या कल्पना-शक्तीवर–विश्वासच बसेना...क्षणार्धात त्याचं सारं अंग शहारून आलं....

तेवढ्यात 'काय झालं?' म्हणत सखाराम आला.

'काय झाल?'

त्यान रघुवीरलाच विचारल. 'पहिल्यादा ह्या सर्वांना विचारा–काय पाहयलं ते! मी आहेच इथं. कुठ पळून जात नाही.'

'काय झालं?'

सखारामनं सर्वांना उद्देशून प्रश्न केला. प्रत्येक जण आपल्या परीनं सागू लागला. सांगणं झालं. त्यान सहेतुकपणं रघुवीरकड पाहयलं.

'मी तुमच्याबरोबर पोलीस चौकीला येतो.'

'बाई, चलो ठानेको!' सखारामनं फर्मान जारी केलं. भिकारीण गयावया करू लागली. बघ्यांपैकी कुणाचीच सहानुभूती तिच्याकडं नसल्यामुळं सखारामला चौकीवर नेण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नव्हता.

'बाई, चलो हमारे साथ। जो कुछ बोलनेका वह साहाबको बोलो।'

शेवटी सखाराम, त्याच्याबरोबर रघुवीर, मागून ती भिकारीण व एक दोन बघे अशी धिंडका पोलीस चोकीच्या दिशेने निघाली.

अशीच एक धिंडका एका निष्पाप दुर्दैवी जीवाची निघाली होती.

एक जीव जन्माला आला. आईबाच्या प्रेमाच्या व परिस्थितीच्या सावलीत वाढला. मोठा झाला. आईबापान आपल्या परिस्थितीप्रमाण चांगल्यातल चागलं स्थळ शोधून त्या जीवाला त्याच्या नियत घरी पाठविलं. नव्या घरात व नव्या माणसात जीव सुखावला. पहिलं वर्ष उलटल. दुसरंही उलटलं. पण घरात नव्या जीवाची चाहूल काही जाणवत नव्हती. ह्या एकाच गोष्टीनं घराच–म्हणजे घरातल्या माणसाच–अतरंग पालटलं. त्या निष्पाप जीवाला घरातली माणसं

वेगळयाच तऱ्हेनं वागवू लागली. तिला मूल होत नव्हतं हा जणू तिचाच गुन्हा होता फक्त तिचाच. घरातल्या माणसानी ह्याच समजुतीनं तिला वागवायला सुरुवात केली. जे घडत नव्हत त्याला तो जीव जबाबदार नव्हता. त्याच्या हाती करुणा भाकण्या पलिकडं काहीच नव्हतं.

सासरहून माहेरी रवानगी झाली. कायमची. सबब मूल होत नाही म्हणून. तिच्या नवऱ्यानं दुसरी बायको केली. नवा ससार माडला. पहिली टाकली. ती मेली आहे का जिवत आहे ह्याचं त्याला काहीही सोयरं-सुतक उरल नव्हत.

तिच्या घरी दोन चार जुनी पितळी–तावी भाडी होती. त्यात एक पानाचं तस्ता (पिंकदाणी) होतं. आजोबाच का पणजोबाचं होत म्हणे ते.

नवऱ्यानं टाकलेली म्हणून तिची अवस्था त्या तस्तासारखीच होऊ पाहत होती की कुणीही पिंक टाकायला धजाव. एखाद्या वेसवेहून गयोबिती. वेसवेपण परवडलं. तिच्या मनात असलं व व्यवहार पटला तर पुढची पायरी. एरवी नाही. तिला जाब विचारायची कुणाची हिंमत नाही.

दिवसाकाठी सरळ सुरवाडं जीण अधिकाधिक कठीण होऊ लागलं. नुसत पाळतीवर राहण कालच्यात जमा झाल. आपल्या परीनं प्रयत्नाना सुरुवात झाली. पैकी एकजात साऱ्याना हव होतं फक्त तिच शरीर. त्याचा भोग. कुणीही मायेचा पूत लग्न करायची बात करीत नव्हता.

अर्ध्या गोवऱ्या स्मशानांत गेलेले आईवडील तिच्या विटंबनेच्या बाबतीत असमर्थ होते. परिस्थितीनं लाचार होते. त्याना आपल्या लेकीची ही परवड पाहवत नव्हती. पण पाहण्याचा भोग जिथं ललाटीच लिहला होता तिथं त्यांचा काय पाड ? आई-वडीलाची अशी असहाय्यता तिला पाहवत नव्हती. तिला स्वतःच्या हलाखीपेक्षा त्याचच जास्त दुःख होत होतं. तशात पाठची बहिण न्हातीधुती झालेली. तिच्या लग्नाचा प्रश्न. तिच्यामुळं बहीणीच्या लग्नाची परवड होण अटळ होत.

तिच्याच वयाच्या एका शेजारणीची मावशी मुबईला होती. कोण्या गिरणीत कामाला होती. तिनं आपल्या भाचीला मुबईला बोलावल होतं. नोकरी मिळण्याची शक्यता होती. झालंच तर लग्नही जमू शकत होतं. लवकरच ती शेजारीण मुबईला जाणार होती. तिच्या मनानही विचार केला की मुबईला जायला काय हरकत आहे ? गावात राहून राहून किती दिवस राहणार ? अन् असं लाजिरवाणं जिणं जगणार ? त्यापेक्षा मुबईला नोकरीचं जमलं तर पाच-दहा रुपये गावाकडं तरी पाठविता येतील. नशिबात सुख असलच तर लग्नही होऊन जाईल. घरसंसार होईल. एवीतेवी इथं खायला काळ आणि भुईला भार होऊन राहण्यापेक्षा ते परवडल. शिवाय लहानीचं लग्न खोळबून राहणार नाही.

तिनं सखी शेजारणीला विश्वासात घेतलं. शेजारणीनं मावशीला घेतलं. मुबईचं जाण निश्चित झालं. तिच्या घरच्यांची केवळ अफाट मायेपोटी परवानगी मिळणं

शक्यच नव्हतं. केवळ तेवढयासाठी इथं गावी घरी राहण्यातनं काहीच भलं होणं शक्य नव्हतं. मन कठीण करायला हव हे तिन जाणलं. मुबईला जाणं निश्चित केल. संशयाला जागा राहू नये म्हणून व शेजारणीमार्फत कळून मुबईला गेल्यावर कुणी गावी परत घेऊन जाण्यासाठी येऊ नये म्हणून पहिल्यादा शेजारीण जाणार होती. नंतर महिनाभरानं ती जाणार होती. सार सुखाडं झाल्यावर ती स्वतःच कळविणार होती.

जसं ठरल तस घडलं. मुबईला येणं झालं. मावशीकडं राहण्याची सोय झाली. गिरणीत नोकरीची.

तिन सारं सुखाडं झाल्याच्या समाधानाचा निश्वास टाकला.

पण लवकरच तिला कळालं की आयुष्य वाटतं तेवढ सुतासारख सरळ नाही.

गाव बदलल. पण माणसं मनानी बदललेली नव्हती. ती तीच होती. जे गावात तेच इथं टाकलेली बाई म्हणजे जणू ज्याला ज्याला म्हणून इच्छा होईल त्यानं त्यान गळ टाकून बघण्याजोगी बाई. त्यात वावगं किंवा जगावेगळं असं काहीच नाही. गिरणीत-शेजारात तिला ह्याचाच प्रत्यय हरघडी येऊ लागला. तिचं एकटीचं अब्रूनिशी जीणं कठीण होऊ लागलं. गाव परवडल पण शहर नको अस वाटू लागलं. गावातल्याना नाही मनाची पण जनाची तरी थोडी लाज होती. वचक होता. इथ उघड उघड राजरोसपणं सौदे होत होते. इथ टाकलेली-बिनटाकलेली, लग्न झालेली, न झालेली असा भेदभावच मुळी नव्हता. इथल्या लग्न झालेल्या स्त्रीला स्वतःलाच स्वतःच्या अब्रूची तिच्या गावातल्या स्त्रियाना होती तशी तेवढी चाड नव्हती. मग इतराना त्याच्याविषयी नसल्यास नवल ते काय होतं? घर-धन्याशीही वागताना शरम वाटावी अशा रीतीनं — मनमोकळेपणानं इथल्या कुंकू लावणाऱ्या बायकाना वागताना, खिदळताना पाहून ती अकाक् झाली होती. तिला वाटल की आपण उगाच नसत्या मोहात पडलो. उगाच आगीतनं फुफाटयात आलो. गिरणीतल्या व शेजारातल्या वखवखणाऱ्या नजरा टाळताना तिचा जीव हैराण होऊ लागला. एखाद्या क्षणी तिला वाटायच की उगाच आपण हैराण होतोय. गिरणीत आजूबाजूला काम करणाऱ्यापैकी काही हसून खिदळून स्वतःचा स्वार्थ बघत होत्या. त्यातल्या कितीतरी लग्न झालेल्या होत्या. काहीजणी तर मुकादमला लागू होत्या. त्याची त्याना खत नव्हती. करून सवरून त्या पतिव्रताच होत्या. त्या दिमाखान मिजास करीत होत्या. तिच असं वाटणं फार तर क्षणाचच ठरायच. पुनः येरे माझ्या मागल्या.

पण एवढयावरच तिचं नशीब सुख मानायला राजी नव्हतं. तिची अजून खूप खूप परवड होणंच जणू त्याला अभिप्रेत होत !

शेवटी तिलाही नासाविलं गेलच. बापाच्या वयाच्या व स्वतःला न्हातीधुती लग्नाची पोर असलेल्या मावश्यानं एके दिवशी कावा साधला. कार्यभाग उरकून

तो राजरोसपणं नामानिराळा झाला. पण ती फसली. तिच्यातला नवा बदल मावशीच्या लक्षात येता क्षणीच तिन तिची उचलबागडी केली. तिची धिंडका घराबाहेर काढली. तिच ऐकल्याची किंवा शेण कुठं खाल्लं हे विचारण्याची तिला गरजच वाटली नाही. तिनं पापाला आपल्या घरात थारा दिला नाही. ती रस्त्यावर आली. रस्त्याची झाली. आला दिवस निभवायला शिकली. जसंजसं जग समजत गेल तसतशी जगाशी वागायला शिकत गेली. ठोकरा खाल्ल्यात ठोकरा दिल्या पापपुण्य, बरवाईट वगैरेंचा विचार केव्हाचाच विसरली होती. जमेल त्या रितीनं जगण शिकली. त्यावेळी वखवखणारे इशारे अंगावर—खरं म्हणजे अब्रूवर—शहारे, आणायचे. आता ती स्वत.च इशारे करू लागली. नवशिके गिऱ्हाईक हेरू लागली. जगानं तिचं तस्त केलं अन् त्याचा सूड म्हणून तीही जगाला तस्त मानून पचापच थुकू लागली.

त्याच निष्पाप दुर्दैवी जिवाची धिंडका आज पोलीस चौकीकडं निघाली होती.

'यू सी मिस्टर...काय बरं तुमच नाव ?...'

सुरुवात इग्रजीनं झाली पण शेवटी मातृभाषा सोईची ठरली. 'माझं नाव डॉ. रघुवीर दिक्षित...'

सात्विक सतापान नुसता फुललेला रघुवीर बोलला.

पोलीस इन्स्पेक्टरन त्याला जरा बाजूला बोलवून घेतल—'हे बघा, मिस्टर दिक्षित ! मला तुमची कर्तव्य तत्परता पाहून खूप आनद होतो आहे. आपल्या देशाला तुमच्यासारख्या तरुणाची नितान्त गरज आहे...'

रघुवीरच्या कपाळावरच्या आठ्या पाहून तो सूज्ञ इन्स्पेक्टर समजून जरा यचकला. त्यानं स्वत.ला सावरल. 'स्वत च पोट भरण्यासाठी कुणी इतका अघोरी उपाय करू शकतो हे सागूनही कुणाचा विश्वास बसणार नाही. असं काही वाचनात आलं तर एक अतवर्य कल्पना म्हणून फार तर त्या लेखकाचं कौतुक वाटेल. पण एक सत्य म्हणून कधीही पटणार नाही.

हे सार खर असल तरी आमचे हात कायद्यानं बाधलेले आहेत. भावनेपेक्षा कायद्याच्या कसोटीवर आम्हाला गोष्टी सप्रमाण सिद्ध कराव्या लागतात. ही गोष्ट कायद्याच्या चौकटीत बसविण शक्य नाही. कोर्टात जर केस सिद्ध करता आली नाही तर नसत्या कटकटी होतात. वरन डिपार्टमेंटल इन्क्वायरी होते ती वेगळीच माझ्या मते ही केस काही रेकॉर्ड होऊ नये. तसा मी त्या भिकारणीला दम भरतो. मग पुन: ती अस काही करणार नाही.

तुम्हाला त्रास झाला खरा. पण...पण आमचीही बाजू तुम्ही लक्षात घ्या...

रघुवीर पोलीस चौकीच्या बाहेर पडला तेव्हा त्याच डोक नुसतं भणभणत होतं विचारानी तसच रागानं.

'म्हणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. कायदा माणसांसाठी आहे की माणूस

कायद्यासाठी आहे ? कोणासाठी कोण ?

रघुवीरला आता त्या भिकारणीची चीड येत नव्हती. त्या पोलीस इन्स्पेक्टरची येत होती. माणुसकी विसरलेल्या कायद्याची येत होती. अन् झक मारल्याबद्दल स्वतःचीही येत होती. कुठून त्याला दुर्बुद्धी झाली होती कोण जाणे ?

पण त्या भिकारणीचं ते अंगावर शहारे आणणारं अघोरी कर्म अजूनही त्या आठवणीसरशी शहारे आणत होतं.

त्याच्यानं कल्पनाच करवेना, अजूनही त्याचा स्वतःवर–स्वतःच्या डोळयांवर–काय पाहयलं त्याच्यावर–विश्वास बसत नव्हता. विश्वास ठेवायला मन राजीच होत नव्हतं. काही केल्या होत नव्हतं.

रडणाऱ्या मुलाला पाहून दया वाटावी व भीक देण्याची इच्छा प्रबळ व्हावी म्हणून ते मूल सारखं रडतच ठेवायला पाहिजे.

ह्यासाठी त्या भिकारणीनं एक लहानसं झुरळ त्या मुलाच्या डाव्या डोळयाच्या साहजिकपणं मिटणाऱ्या पापणीवर ठेवून ते गुदमरून मरू नये म्हणून त्यावर पॉलीशच्या लहान डबीचं झाकण ठेवलं होतं व वरनं पट्टी बांधली होती. मिटल्या पापणीवर स्वतःच्या सुटकेसाठी धडपडणारं ते झुरळ त्या भिकारणीच्या हेतुपूर्तते-साठी आपसुखच सहकार्य देत होतं. म्हणून ते मूल जीवाच्या आकांतानं रडत होतं.

अन् ह्या अघोरी कर्मासाठी माणसानं तयार केलेल्या कायद्यात काहीही प्रति-बंधक तरतूद नव्हती. माणुसकीची ध्वजा मिरविणारा कायदा माणुसकीला–महन्मंगलं मातृत्वाला–लांछन ठरणाऱ्या ह्या निर्दयी कर्माला प्रतिबंध करू शकत नव्हता. मग शिक्षा करण तर दूरच राहील.

म्हणून रघुवीरला आता स्वतःचीच चीड येत होती. फक्त स्वतःचीच.






# भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा

गेली दोन हजार वर्षे परकीयांशी झालेल्या लढायात हिंदूंचा सतत पराभवच का होत आला, या मन विषण्ण करणाऱ्या पण राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने सर्वोच्च महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार श्री. ज. द. जोगळेकर यांनी आपल्या ग्रंथात केला आहे. केवळ विषयावरूनदेखील या ग्रंथाचे मोल समजण्यासारखे आहे.

लेखकाच्या मते हिंदूंनी केलेली युद्धशास्त्राची उपेक्षा हे या पराभव परंपरेचे कारण. आपला हा प्रबंध सिद्ध करण्यासाठी, अलेक्झँडर पोरसच्या झेलमच्या लढाईपासून आर्थर वेलस्ली व दौलतराव शिंदे यांच्यात १८०३ साली झालेल्या वसईच्या लढाईपर्यंतच्या, इतिहास बदलून टाकणाऱ्या ६ लढाया घेऊन, त्यांचे तपशीलवार विवेचन लेखकाने केले आहे.

या सर्व लढायांचा साचा (pattern) सामान्यतः सारखा आहे. हिंदू राजा व हिंदू सैनिक रणांगणाला वा मृत्यूला घाबरणारा नाही. 'हतो मा प्राप्स्यसी स्वर्गम्, जित्वा वा मोक्ष्यसे महीम' ही गीतेची शिकवण त्याच्या रोमरोमात भिनलेली आहे. त्यामुळे घोड्यांच्या टापांनी व शस्त्रास्त्रांच्या खणखणाटाने त्याला कधी कापरे भरत नाही. अत्यंत उत्साहाने तो रणभूमीवर प्रवेश करतो. पण विशाल युद्धयोजना मनाशी निश्चित करून त्यानुसार सैन्यदलाच्या विविध हालचाली करणे, नवनव्या व्यूहरचना, नवनवी शस्त्रास्त्रे, वाटेतील मोठ्या नद्या पार करण्याचे कसब

दि. वि. गोखले

आदी गोष्टी या तरवार बहाद्दराला अज्ञात आहेत. त्याचबरोबर या स्वाऱ्या ज्या टोळया करतात, त्यांच्या देशात कोणत्या राजकीय, सामाजिक घडामोडी चालू आहेत, त्यांची बलस्थाने नि मर्मस्थाने कोणती, या गोष्टीबद्दलही हिंदू वीराला उत्सुकता नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून शौर्याची परिसीमा गाठूनही हिंदू महावीराच्या वाटयाला सदैव स्वर्गच आला! पृथ्वीचे राज्य करायदाची तयी अर्थातच त्याच्या ऐवजी सतत त्याच्या शत्रूला लाभली. परकीयाशी पहिल्या प्रथम गाठ पडली तेव्हा त्याची शस्त्रास्त्रे, त्याचे व्यूह या गोष्टी त्याला अज्ञात असाव्यात हे एक वेळ क्षम्य मानता येईल. पण एकाच शत्रूशी पुनः पुन्हा गाठ पडूनही हजार वर्षे तो आपल्या जुन्या चुका उगाळीत रहावा, नव्या गोष्टी त्याने समजावूनच घेऊ नयेत, याला उपेक्षावृत्तीखेरीज अन्य काय नाव देणार?

## अश्वदळाचे महत्व

श्री. जोगळेकरांनी अलेक्झँडर व पोरस याच्यातील झेलमच्या लढाईचे विवेचन केले, ते २ हजार वर्षांपूर्वीच गजदळापेक्षा अश्वदळ कसे श्रेष्ठ ठरले होते, हे सांगण्यासाठी. पण याचबरोबर पोरसाला स्वत.ची व शत्रूची बलस्थाने आणि मर्मस्थाने ओळखता आली नाहीत हेही खरे. कारण, तसे असते तर अलेक्झँडरने झेलम ओलांडण्याची वाट न पाहता, पोरसानेच आपले गजदळ नदीपार नेले असते व तो शत्रूवर कोसळून पडला असता. त्याचबरोबर आपल्या धनुर्धारींना पुरुषभर उंचीची, पण अतिप्रभावी धनुष्ये टेकविण्यासाठी कडक जमीन लागते हे लक्षात घेऊन त्याने स्वतःच योग्य दिवस निवडून शत्रूवर हल्ला केला असता. पण पोरस अलेक्झँडरच्या हल्ल्याची वाट पाहत थांबला व अलेक्झँडरच्या कसलेल्या अश्वदळाने पोरसाच्या गजदळाचा धुव्वा उडविला. अश्वदळ आपल्या चपलतेमुळे गजदळावर मात करू शकते, ही गोष्ट या लढाईत निर्विवाद सिद्ध झाली. तरीही लेखकाने म्हटल्याप्रमाणे याहीनंतर अनेक शतके भारतीय राजांच्या सेनादलात गजदळाचाच वरचष्मा होता. नवीन काही शिकावयाचे नाही हा जणू हिंदूचा पणच दिसतो!

इसवी सन एक हजारापासून भारतावरील मुसलमानाच्या स्वाऱ्यांना प्रारंभ झाला. गझनीच्या महमुदाने पहिली स्वारी १००१ साली केली व त्यानंतर केलेल्या स्वाऱ्यात त्याने उत्तर व पश्चिम भारतातील सर्व हिंदू राजाना पराभूत केले. हे विजय मुसलमानांना मिळाले. याचे श्रेय त्याच्या एकसंध, शिस्तबद्ध व व्यूहरचनेत पटाईत असलेल्या अश्वदळाकडे जाते. अश्वदळामुळे सैन्याच्या हालचाली जलद होत आणि मुसलमानी सैन्य एकसंध म्हणजे एकाच नेत्याचे हुकूम मानणारे व त्याची ततोतत अंमलबजावणी करणारे असल्यामुळे, सेनापती त्याच्या विविध हालचाली करू शकत असे. याविरुद्ध हिंदूच्या घोडदळाला अरबी व तुर्की घोडदळाचे चापल्य नव्हते. त्यांच्याबरोबरचे हत्तीचे ओझे कायम होते व हिंदू सैन्य विविध राजांच्या पथकांचे मिळून झालेले असल्यामुळे त्यांच्यात सुसूत्रता फारच थोडी

होती. विविध व्यूहरचना त्यांना जवळपास अज्ञातच होत्या. अशा व्यस्त स्थितीत अलेक्झँडरप्रमाणेच मुस्लिम हल्लेखोर विजयी व्हावेत हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

पण हिंदूंना आपल्या उणीवा उमगल्या नाहीत आणि म्हणून त्यांना त्या नाहीशाही करता आल्या नाहीत. अश्वदळाचे खरे महत्त्व त्याना समजलेच नाही. अन्यथा त्यानी अरबी व खोरासनी घोडे आणविले असते व मुसलमानांचे युद्धतंत्र त्यानी आत्मसात केले असते. विविध व्यूहरचना हिंदूनी पाहिल्या होत्या व त्यांचे परिणामही त्यानी अनुभविले होते. पण नवी तत्रे शिकण्याची त्यांची इच्छाच नव्हती. हिंदूचा युद्धव्यूह ठरलेला असे. सर्व सेना एकत्र करून शत्रूवर कोसळावयाचे व संख्येच्या दाबाने त्याला लोळवायचे हाच एक व्यूह सहाशे वर्षे चालू होता. हिंदूंचा हा सेनासागर चाल करून आला की मुस्लिम घोडदळ मागे हटे व हिंदू सेनांच्या बगलांवर हल्ले चढवी. आणि हिंदूचा दम उखडला की त्याच्यावर सर्व बाजूनी कोसळून पडून त्यांचा धुव्वा उडवी. मुसलमान सेनापती राखीव सैन्य ठेवत आणि अंतिम विजय मिळविण्यासाठी क्षणिक माघार घेण्यात त्यांना कमीपणा वाटत नसे. मध्य आशियातील मुसलमान जमातीचा, युरोपातील सुधारणाशील समाजाशी संबंध आला. मुसलमानांनी धर्मवेडापायी आपल्या मनाची कवाडे बंद करून घेतलेली असल्यामुळे युरोपच्या सामाजिक व राजकीय मन्वतराचे, तेथील संस्कृतीचे वारे त्याना लागू शकले नसले, तरी नवनवी शस्त्रास्त्रे व युद्धशास्त्र यांच्याबाबत मात्र मुसलमान अत्यत जागरूक होते. युरोपात बदुका नि तोफा आल्या व मुसलमानानी ती शस्त्रविद्या आत्मसात केली.

याविरुद्ध, हिंदू मात्र, मुसलमानांचा शतकानुशतके संबध येऊनही काही शिकले नाहीत. हिंदूपाशी ना विविध व्यूहरचना होत्या, ना त्याच्यापाशी पराभव झाल्यास माघारीच्या योजना तयार असत. तरोरी (पृथ्वीराज व घोरी), कनवा (राणासंग बाबर) नि राक्षस तागडी (विजयनगरचा रामराया व दक्षिणेतील सुलतान) या तिन्ही लढायांची सुरुवात नि शेवट, त्यांच्यात सुमारे ३५० वर्षांचा काल जाऊनही सारखाच आहे. कारण सतत विकसित होणारे शास्त्र म्हणून हिंदूंनी युद्धाकडे कधी पाहिलेच नाही. शत्रूची नवनवी तत्रे नि शस्त्रे कधी अभ्यासिली नाहीत. स्वतःच्या मागास युद्धतत्रात सुधारणा केल्या नाहीत व जगात इतरत्र काय चालले आहे, याची चौकशीही केली नाही.

## न शोभणारा महापुरुष

शिवाजी हा स्थितिप्रिय हिंदू परंपरेला न शोभणारा महापुरुष. त्याने जसे गनिमी काव्याचे तंत्र बसविले, तसे आरमाराचे महत्त्वही ओळखले. अश्वदळाची महती ओळखणारा पहिला हिंदू तोच. म्हणून मराठी राज्य डोंगरी किल्ल्यांच्या आधाराने उभे असतानाही, त्याने उत्तमोत्तम अरबी घोडी आणून आपली पागा सिद्ध केली. माघार ही त्याने कधीच प्रतिष्ठेची बाब मानली नाही आणि एका लढाईवरच त्याने

आपले सर्व सैन्य व राज्य पणाला लावले नाही. शिवाजी महाराजांची ही शिकवण व मराठी अश्वदळ याच्या जोरावरच मराठ्यानी अटकेपार झेंडे लावले. मात्र, अवघा हिंदुस्थान आपल्या घोड्याच्या टापाखाली आणणाऱ्या मराठ्यानाही, रजपूत व विजयानगरच्या राजाप्रमाणेच बदुका व तोफखाना यांचे महत्त्व उमगले नाही. तसेच, नद्यांवर सेतू बाधण्याचे कसब साध्य करून घेण्याचा प्रयत्नही त्यानी केला नाही.

पानिपतच्या लढाईत याचे परिणाम मराठ्यांना भोगावे लागले. मराठे सेतू बांधू शकत असते, तर अब्दाली दिल्लीस पोहोचायच्या आधीच दत्ताजी शिंद्यांनी अंतर्वेध निर्यवन केली असती. लेखकाने म्हटल्याप्रमाणे सदाशिवराव भाऊने तोफखान्याचे महत्त्व ओळखून इब्राहिमखान गारद्यास नोकरीस ठेवले हे खरे आहे. पण अवजड तोफखाना सैन्यात आल्यावर, त्याच्याशी आपल्या हालचाली जमवून घेण्यासाठी इतर सर्व सेनापथकाना जी नवी तंत्रे शिकावी लागतात, ती गनिमी काव्याने लढण्याची सवय असलेल्या आपल्या सेनापथकाना शिकविण्याचा प्रयत्न भाऊने केल्याचे आढळत नाही. अलेक्झँडरने सिथियन टोळ्याचे लढण्याचे अभिनव तंत्र पाहिल्यावर लगेच आपल्या सेनेला त्याचे पाठ दिले. पण भाऊला, पडतूरपासून दिल्लीपर्यंतचा पल्ला गाठीपर्यंतच्या प्रदीर्घ कालातही हे काही सुचले नाही. लढाईच्या आदल्या दिवशी त्याने आपल्या सेनेला ते समजावून देण्याचा निष्फळ प्रयत्न केला. मराठ्यांची मर्मस्थाने अब्दालीने अचूक हेरली नि त्यांचे पानिपत केले.

## वसई–सर्वार्थाने विषम सामना

पानिपतच्या धक्क्यातून मराठी सैन्य सावरलेच नाही. त्यामुळे जगातल्या पंचखंडात लढाया खेळणाऱ्या व आधिभौतिक सुधारणात अग्रभागी असणाऱ्या इंग्रजांशी ते यशस्वी सामना देऊ शकतील हे शक्यच नव्हते. म्हणून वसईची लढाई हा सर्वार्थाने विषम सामना होता. या लढाईत मराठे जिंकले असते तर ते एक आश्चर्य मानले गेले असते. तरीही, लेखकाने या ग्रथात या लढाईचा अंतर्भाव केला, तो आपण आपल्या पडत्या काळातही आपल्या पारंपारिक चुकांना कसे घट्ट बिलगून होतो हे दाखविण्यासाठीच.

या ग्रंथातले एकही विधान आधाररहित नाही. प्रत्येक लढाईचा तपशील लेखकाने श्रमपूर्वक गोळा करून येथे सादर केला आहे. या सहाही लढायात जे सेनापती परस्परांशी भिडले त्याची अल्प पण मनोज्ञ व्यक्तिचित्रे लेखकाने रंगविली आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी हिंदूंनी केलेल्या चुकांची यादी दिली आहे. सर्व ग्रथ वाचून झाल्यावर पुन्हा या याद्या वाचल्या की, लेखकाने आपला प्रबंध केवढ्या भक्कम पायावर आधारला आहे याची जाणीव होते. लढायांचे आलेख वेधक आहेत. त्यामुळे वाचकाला लढायाची योग्य कल्पना येईल. लेखकाची भाषा ओघवती आहे.

२६ ऑगस्ट १९७०

श्री. जोगळेकरांना दोन सूचना कराव्याशा वाटतात. ग्रंथ काहीसा लहान झाला (१२० पाने). लढायाच्या विवेचनाच्या जोडीला त्यांनी दोन लढायादरम्यानचा भारताचा इतिहास काहीशा विस्ताराने दिला असता, तर ग्रथ मोठा होऊनही निवेदनाची रंजकता कायम राहिली असती. लेखक मधून मधून 'आता आपण पोरसच्या सैन्याचे चित्र पाहू', 'आता तुर्कांच्या सैन्याकडे वळू' असे वाक्यप्रयोग करतो. ही पद्धत आता जुनी झाली नि त्यामुळे निवेदनाच्या ओघात खंड येतो.

ग्रंथाला श्री. नानासाहेब गोरे याची मर्मग्राही प्रस्तावना लाभली आहे. लेखकाच्या प्रबधाचा त्यांनी ठासून पाठपुरावा केला आहे. ते म्हणतात की, भारतीय मन गिरविणारे किंवा नकलणारे बनले होते; त्यात सृजनशीलता राहिली नव्हती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारताच्या इतिहासातले 'सहा सोनेरी पाने' लिहिले. श्री. जोगळेकर हे सावरकरांच्याच शिष्यवर्गातले. पण त्यांनी सहा कृष्ण पृष्ठे सादर केली आहेत. मात्र यात परस्परविरोध कुठेच नाही. आपल्या हजार वर्षांच्या इतिहासात सहाच सोनेरी पाने असावीत आणि बाकी सर्व अंधार असावा, याची खंत श्री. जोगळेकरांना वाटते, म्हणून त्यांनी हा खटाटोप केला. ज्याचे स्वदेशाविषयीचे प्रेम डोळस आहे, त्याना लेखकाचे विवेचन अधिक डोळस बनवील, या श्री. गोरे यांच्या अभिप्रायाशी मी सहमत आहे.

तरुण पिढीच्या हाती हा ग्रंथ सतत दिसला पाहिजे, एवढे त्याचे मोल आहे, हे माझे मत.

**भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा : ज. व. जोगळेकर**
**सोमैय्या पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई १४ : मूल्य साडेदहा रुपये**

□ □ □

---

# शिलंगणाचं सोनं


## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

---




श्रीकांत आंबेकर

"....पृथ्वीवर सजीव सृष्टी अस्तित्वात असावी असा आमच्या शास्त्रज्ञांचा कयास आहे. अनेकांना कदाचित आश्चर्य वाटेल या मताबद्दल ! अन् साहजिकच आहे ते. कारण हीच शास्त्रज्ञ मंडळी गेल्या कैक वर्षांपासून, 'पृथ्वीवर सजीवांना पोषक अशी नैसर्गिक परिस्थिती जवळजवळ नाहीच' असं सांगत आली आहेत.

अन् त्यांचं हे मत तरी खोटं कुठं आहे ? साधं वातावरणाचंच पाहा ना–पृथ्वीवर ते आधीच कितीतरी दाट आहे. शिवाय त्यातही त्या सर्वभक्षी प्राणवायूचं प्रमाण अधिक ! नशीब आमचं चांगलं म्हणून तो नतद्रष्ट वायु आमच्या इथे दुर्मिळ आहे.

दुसरं, वातावरणाचा दाब. तो तर इतका प्रचंड आहे की, आम्ही जेव्हा पृथ्वीवर जाऊ तेव्हा पुरेशा संरक्षणाअभावी तिच्या पृष्ठभागावर उतरणे मुळी शक्यच होणार नाही. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १५–१७ किलोमीटर्स उंचीवर मात्र आम्हाला आरामात वावरता येईल. गंमत म्हणजे पृथ्वीवर ३० किलोमीटर्स उंचीवरील वातावरण आमच्या मंगळाहूनही विरळ आहे. अस व्हायच मुख्य कारण म्हणजे तिच जबरदस्त गुरुत्वाकर्षण. जबरदस्त म्हणजे केवढ आहे ? अहो, आमच्या इथला ४० पौण्डी मंगळवासी तिथ चक्क १२० पौण्डाचा राक्षसच बनून जाईल.

वातावरणाचा दाब आणि गुरुत्वाकर्षणाची ओढ लक्षात घेतली की, पृथ्वीवरील

सजीव चागले मजबूत हाडापेराचे असलेच पाहिजेत या निष्कर्षाप्रत यावेच लागते.

तिकडे अवकाश यानासाठी 'मुक्ती-वेग' Escape-velocity आहे ११ कि. मी. प्रति सेकंद. इथे मात्र प्रति सेकदास फक्त ६ किलोमीटर्स एवढाच प्रवेग अवकाशयानाला मगळाच्या गुरुत्वाकर्षणातून मुक्त करायला पुरेसा आहे.

आमचा मंगळ तसा काही फारसा मोठा ग्रह नाहीय्. त्याचा व्यास पृथ्वीच्या व्यासाच्या निम्मा आहे. आकारमान पृथ्वीच्या एक षष्ठमांशाएवढे आहे तर वस्तुमान केवळ एक नवमाश एवढेच ! असं असलं तरी, पृथ्वीचा तीन चतुर्थांश भाग पाण्याने व्यापलेला असल्याने पृथ्वीवासीयांच्या (अर्थात ते अस्तित्वात असतील तर ! ) वाट्याला आमच्याहून कमी जमीन आलेली आहे.

पृथ्वी म्हणजे मंगळाचीच मोठी केलेली प्रतिकृती आहे अस आमचे शास्त्रज्ञ सातत्याने सागत आले आहेत. पृथ्वीवरचा दिवस आमच्याहून फक्त अर्ध्या तासाने लहान आहे अन् पृथ्वीच्या अक्षाने तिच्या कक्षेशी केलेला कोन जवळजवळ मंगळाएवढाच असल्याने तिला सहाही ऋतू मजेत उपभोगता येतात. फरक एवढाच की, प्रत्येक ऋतुचा काळ मंगळाच्या निम्मा असतो. कारण पृथ्वीचे वर्ष आहे फक्त ३६५ दिवसांचे आणि मंगळाचे आहे ६८७ दिवसाचे !

आता पृथ्वीवरचं हवामान ! पृथ्वीवासीयांना त्याचा आता सराव झाला असेल म्हणा; पण एकूणच तिथली भयंकर, जाळती उष्णता (पृथ्वी सूर्यापासून मगळाच्या फक्त दोन तृतीयांशाएवढ्याच अतरावर असल्याने मंगळाहून अडीच पट अधिक उष्णता तिला सूर्यापासून मिळते), भरपूर आर्द्रता, आणि दिवसा–रात्रीच्या तपमानातील क्षुल्लक अतर लक्षात घेता ते हवामान कसं त्याना सहन होत देव जाणे !

पृथ्वीवर रात्रीच तपमान दिवसाच्या फारतर निम्याएवढ असत. तेच आमच्याकडे पहा, कसा मस्त चढउतार असतो त्याच्यात तो ! पहाटे–पहाटे, जेव्हा आमच्याकडे सारेजण मऊमऊ दुलईत पडून छान घोरासुराचं आख्यान लावून बसलेले असतात तेव्हा तपमान असत जेमतेम ५° से. हळूहळू चढत दुपारपर्यंत ते चागलं २०° से. होत. संध्याकाळी शून्य अंशापर्यंत उतरून मध्यरात्रीपर्यंत चक्क उणे पचेचाळीस अंश (–४५°) सें. होत. आहे की नाही आमची चांगली चगळ ? अर्थात या बदलत्या तपमानामुळे कस छान छान वाटत ते पृथ्वीवासीयांना कोठून कळणार ? दुर्दैवी बिचारे !

दिवसा-रात्रीचे जाऊ देत म्हटल तरी निदान दोन गोलार्धात तरी तपमानातील फरक जास्त असावा की नाही ? पण तोसुद्धा नाही. झालंय काय, आपल्या कक्षेतून फिरताना पृथ्वी सूर्यापासून किमान १४७,०००,००० किलोमीटर्स अन् कमाल १५२,०००,००० किलोमीटर्स अतरावरून जाते. म्हणजे त्यामधला फरक आहे फक्त ५,०००,००० कि. मी.चा ! त्यामुळे तिच्या दक्षिण आणि उत्तर गोलार्धातील तपमानात विशेषसा फरक पडत नाही. आमच्या मंगळावर मात्र उत्तर

गोलार्धाच्या मानाने दक्षिण गोलार्ध चांगलाच उष्ण असतो. कारण मंगळाच्या बाबतीत सूर्यापासूनच्या कमाल आणि किमान अंतरातील फरक आहे तब्बल ५०,०००,००० किलोमीटर्सचा! आता जर पृथ्वीवासीयांकडे शक्तिशाली दुर्बिणी असतील तर त्यांना हे जरूर दिसत असेल की, आमच्या उत्तर ध्रुव प्रदेशातील हिम कधीच पूर्णपणे वितळून जात नाही. मात्र दक्षिण ध्रुवीय हिम-टोपण (ice-cap) नियमितपणे अदृश्य होत असते. इथून पृथ्वीचं निरीक्षण करीत असताना तिच्या दक्षिण ध्रुवीय हिम-टोपणाच्या आकारात अशा प्रकारचा बदल झाल्याचं कधीच आढळून येत नाही.

आमच्याकडील, दूरवर पसरलेली लाल-तपकिरी मैदाने आम्हाला फार प्रिय आहेत. अगदी (Sandstorms) अन् चक्रीवादळेसुद्धा आम्हाला आवडतात. पृथ्वीवरच्या बुद्धिमान प्राण्यानी ती पाहिली असतील देखील, कदाचित, हां, बरी आठवण झाली. सागायची गोष्ट म्हणजे २३ ऑगस्ट १९५९ ला जो एक विलक्षण तेजस्वी पट्टा आमच्या ग्रहावरून गेला त्यासंबधी पृथ्वीवासीयाच्या काय कल्पना आहेत, त्याच्या शास्त्रज्ञानी कोणते निष्कर्ष काढले आहेत ते जाणून घ्यायला आम्ही फार फार उत्सुक आहोत.

पृथ्वीवासीयाच्या डोळ्याना पृथ्वीवरच्या हिरव्या, निळया, पिवळ्या छटांची सवय झालेली असणार. त्यामुळे साहजिकच आमचा ग्रह त्यांना भडक, गडद रंगाचा भासेल, दिसेल. म्हणून त्यानी आमच्या ग्रहाला कुठलंतरी दुष्ट, राक्षसी नाव दिलेलं असल तरी आम्ही समजू शकतो.

गेल्या फार वर्षांपासून आमचे शास्त्रज्ञ, 'पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व' या विषयाचा अभ्यास करीत आहेत. पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या आसपास बऱ्याच मोठ्या आकाराचे, हिरव्या रंगाचे ठिपके दिसून येतात. ते वनस्पतीच्या अस्तित्वाचे द्योतक असावेत हे सुस्पष्टच आहे. विशेष म्हणजे, पृथ्वीवरील वनस्पती, वर्णपटातील (Spectrum) 'हिरवा भाग' शोषून घेण्याऐवजी परावर्तित करीत असतात. उंच पर्वतावरील व अतिशीत प्रदेशातील वनस्पती मात्र 'हिरव्या उष्णते'चा वापर करून घेतात आणि मंगळावरील वनस्पतीप्रमाणे निळे प्रकाशकिरण परावर्तित करतात.

पृथ्वीवर प्राणी किंवा बुद्धिमान सजीवांचे अस्तित्व दर्शविणारा कोणताही प्रत्यक्ष आणि निश्चित पुरावा आमच्या हाती आलेला नाही.

पृथ्वीच्या वातावरणातून अधूनमधून तीव्र प्रकाशाचे झोत अचानकपणे उंच अवकाशात फेकले जाताना दिसून येतात. अर्थातच आमच्या शास्त्रज्ञाच्या आणि विज्ञान-कथालेखकांच्या चर्चेचा हा एक आवडता विषय बनून गेला आहे. त्यासंबंधानं कित्येक कल्पना आमच्याकडे मांडल्या गेल्या आहेत. काहीच्या मते तो क्षणिक चकचकाट विजांचा असावा. कारण पृथ्वीवरही वादळे होत असणारच. आणि आमच्याहून पृथ्वी सूर्याच्या अधिक जवळ असल्याने त्या वादळांच स्वरूप जास्त तीव्र, भयानक असणार हे नक्कीच! दुसरीही शक्यता आहे. कुणी सागावं,

पृथ्वीवरील बुद्धिमान प्राण्याच्या उपद्व्यापापासूनही ते स्रोत निर्माण होत असतील, त्याचप्रमाणे, आमच्याही वातावरणातून जे असेच प्रकाशाचे स्रोत फेकले जातात त्यामुळे पृथ्वीवरील बुद्धिमान प्राण्याचे कुतुहल वरचेवर चाळवले जात असणार हे स्पष्टच आहे.

थोडक्यात पृथ्वीवासीय अस्तित्वात असलेच तर त्यांच्यापाशीही 'मंगळावरील जीवनाच्या शक्याशक्यते'च्या विपुल कल्पना आणि अनेक सिद्धांत असतीलच असतील.......

—तर हा झाला मंगळवासीयांचा दृष्टिकोन. 'मंगळावर जीवन असेल का?' याचं उत्तर शोधताना आपल्या दृष्टिकोनातून कोणकोणती उलटसुलट मतं माडली गेली आहेत बरं?...

एक मत : मंगळाच विश्व जुनं आहे. फार फार पुरातन आहे. पृथ्वीच्याही अगोदर मंगळावर सजीव सृष्टी साकार झाली. त्यामुळे मंगळावर पृथ्वीपेक्षा अगोदर उत्क्रांती सुरू झाली. सध्या तिथले सजीव पृथ्वीवरील सजीवांच्याहून कितीतरी अधिक प्रगत पावलेले आहेत.

पृथ्वीहून लहान आणि सूर्यापासून अधिक दूर असल्यानं मंगळ त्यामानाने लवकर थंड झाला. मंगळावर जेव्हा भूकवचाची जडणघडण होत होती, तेव्हा तिथली नैसर्गिक परिस्थिती पृथ्वीसारखीच होती. ज्वालामुखीचे निरंतर उद्रेक, भीषण भूकंप, भयानक वादळे या सर्वांतून मगळालाही एकदा जावं लागलं आहे पण ते फार पूर्वी. आज जो मगळाचा लाल रंग दिसतो आहे तो त्याच्या विस्तीर्ण, सपाट वाळवटाचा रंग आहे.

जगण्याच्या धडपडीतून मगळावरही झपाट्याने उत्क्रांती होत गेली आणि त्यातूनच अधिकाधिक प्रगत पावलेले प्राणी जन्मास आले. निळ्या वनस्पतीपासून हां हा म्हणता बुद्धिवान प्राण्यापर्यंत मगळाने मजल मारलीन्. ह्या बुद्धिवान प्राण्यानी सर्वच दृष्टीनी पृथ्वीवासीयांना मागे टाकले आहे हे त्यांना शक्य झाले ते गेल्या शतकात वा त्यापूर्वी घडवून आणलेल्या प्रचंड प्रगतीमुळे!

मंगळाला दोन उपग्रह आहेत. डेमॉस (Horror) आणि फोबॉस (Feor) या नावाचे. आपल्याकडे त्याचं नामकरण भीम आणि भैरव असं केलेलं असल तरी इंग्लिश अर्थाशी जास्त जवळीक करणारी 'भीषण' आणि 'भय' ही नावे मी वापरणार आहे.

हो, तर मगळाला 'भय' आणि 'भीषण' नावाचे दोन उपग्रह आहेत. दोघांचाही शोध लागला तो १८७७ च्या सुयोग्य मंगळसमीप काळात! तस पहायला गेल तर त्यापूर्वीच्या मगळसमीप काळातही, जास्त शक्तीच्या दुर्बिणीतून अनेकानी मगळाचे वेध घेतले होते. पण मंगळाच्या या दोन बछड्यांपैकी कोणीच कधी कुणाला दिसले नाहीत. १८७७ नतर मात्र अनेकांना त्याचं दर्शन त्यामानाने कमी शक्तीच्या



मंगळाचे दोन उपग्रह
भीम व भैरव

दुर्बिणीतूनही घेता आले आहे. याचा अर्थ असा करावा का, की १८७७ पूर्वी मंगळाला मुळी भय आणि भीषण नावाचे उपग्रहच नव्हते ? असाच काहीसा अर्थ घेऊन त्यानंतर सूचित करण्यात आलं की, मंगळाचे हे दोन्ही उपग्रह नैसर्गिक नसून चक्क कृत्रिम आहेत.

या विधानाला पुष्टी देणारे कितीतरी पुरावे आणि तर्क शास्त्रज्ञांच्या हातात आहेत. आपल्या ग्रहमालिकेचा नुसता वरवर जरी अभ्यास केला तरी एक गोष्ट प्रकर्षाने नजरेत भरण्यासारखी आहे. ती म्हणजे, ग्रह जितका अधिक मोठा तितके त्याच्या वाट्याला अधिक नैसर्गिक उपग्रह आले आहेत. गुरू सर्वांचा दादा. त्याला सर्वात जास्त म्हणजे बारा उपग्रह आहेत. तर पृथ्वीहून किंचित लहान असणाऱ्या शुक्राला एकही उपग्रह नाही. या अलिखित नियमानुसार शुक्राहूनही लहान असणाऱ्या मंगळाला उपग्रह नसायलाच पाहिजेत. पण ते आहेत. एक सोडून दोन आहेत. अन् म्हणूनच ते नैसर्गिक असण्यापेक्षा कृत्रिम असण्याचा संभवच जास्त आहे.

भयच्या विचित्र 'चाली'चा नीट अभ्यास केल्यानंतर शास्त्रज्ञांना असे वाटू लागले की, हा उपग्रह आतून पोकळ असावा. ही गोष्ट नैसर्गिक उपग्रहाच्या बाबतीत सर्वस्वी अशक्य आहे. कृत्रिम उपग्रह मात्र आतून पोकळच असणार की !

या व्यतिरिक्त, अंगभूत अशा तीन वैशिष्ट्यांमुळे मंगळाची ही उपग्रह-द्वयी साऱ्या उपग्रहांमध्ये अपवाद बनून राहिली आहे. एक म्हणजे, हे दोन्ही उपग्रह मंगळाच्या विषुववृत्तीय पातळीतून फिरतात. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, त्यांच्या कक्षा मंगळाच्या विषुववृत्ताला समांतर आहेत. आणि आपल्याला ठाऊक आहेच की, कृत्रिम उपग्रह फिरत ठेवण्यासाठी नेमकी विषुववृत्तीय पातळीच सर्वाधिक सोयीची असते. दुसरं म्हणजे, त्यांच्या कक्षा मंगळाच्या भलत्याच जवळ आहेत. भय मंगळा-

पासून फक्त ९,४०० किलोमीटर्स तर भीषण २३,५०० किलोमीटर्स अंतरावर आहे. तिसरी गोष्ट म्हणजे भयाची विलक्षण गती. मगळाहून अधिक वेगाने हा मंगळाभोवती प्रदक्षिणा करतो. मगळाला स्वतःभोवती एक फेरी मारायला २४ तास ३७ मिनिटे लागतात आणि भय मात्र फक्त ७ तास ३९ मिनिटातच मंगळाभोवतीची एक प्रदक्षिणा संपवितो. त्याच्या या गतीने शास्त्रज्ञांना अनेक वर्षे कोडयात टाकलं. अखेरीस एका निश्चित निष्कर्षाप्रत येण्यात शास्त्रज्ञाना यश आलं.

त्याच्या मते भय मंगळाच्या आकाशात 'अवतरला' तो मगळाच्या एका दिवसात त्याच्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यासाठीच. आणि मग विषुववृत्ताच्या एका विशिष्ट बिंदूवर अनेक शतकापर्यंत तो आरामात तरंगत राहिला. कालातराने हा समतोल (equillibrium) ढळला आणि आपली मूळची कक्षा सोडून भय मंगळाच्या दिशेने हळूहळू खाली सरकू लागला. या काळात त्याचा प्रवेग वाढत होताच.

एवढया गोष्टी एकदा गृहीत धरल्यानंतर मग शास्त्रज्ञांनी मुळीच विलंब केला नाही. ते हिशेबास बसले. मूळच्या कक्षेतून सध्याच्या कक्षेत यायला भयला किती वर्षं लागली ते त्यांनी शोधून काढले. त्यावरून असं दिसून आलं की, भयचं वय ४०० ते ५०० दशलक्ष वर्षाहून नक्कीच जास्त नाही. हा काल मानवाच्या दृष्टीने भलताच प्रचंड असला तरी विश्वाच्या दृष्टीनं तो नगण्य मानावा इतका अल्प आहे. विशेष म्हणजे, मंगळाचं वय याहून दहा पटीनं अधिक आहे. असं असताना, मंगळाला स्वतःला उपग्रह मिळायला इतका लेट का झाला? विशेषतः पृथ्वी, गुरूसारख्या शेजाऱ्यानी उपग्रह पटकावलेले दिसत असूनही मंगळाने तिकडे इतके दुर्लक्ष का केले असावे?

छे, ही मंगळाची चूक नसावी. बहुधा मूळ कथाच काहीशी वेगळी असावी. हजारो लक्षावधी वर्षापूर्वी घडलेली. त्या काळात पृथ्वीवर चालू होतं पेलीओझोइक युग कोडयातच बोलायच तर, मानवी युगाच्या मागे सरपटणाऱ्या प्राण्याचे युग जितक्या वर्षांनी होते तितक्याच वर्षांनी पेलीओझोइक युग सरपटणाऱ्या प्राण्यांच्या युगाच्या मागे होते.

हो, तर ज्यावेळी पृथ्वीवर पेलीओझोइक युगाचा माध्यान्हकाल उलटून गेला होता त्यावेळी मगळावर एक वेगळेच नाटय चालू होते. तो आता इतका शीत नव्हता. 'शांतही' नव्हता. होता तो चांगला उबदार होता. वातावरणात आर्द्रताही भरपूर होती. अन् सारा मंगळ अतिशय बुद्धिवान प्राण्यांनी गजबजलेला होता. या प्राण्यांनी विज्ञानात एवढी आघाडी मारली होती की, कृत्रिम उपग्रहाची निर्मिती, प्रचड कालव्याची बांधणी वगैरे गोष्टी त्याच्या हातच्या मळ होऊन बसल्या होत्या.

आपल्या या उत्कर्षाच्या काळात त्यानी पृथ्वी, गुरू, शुक्र वगैरे ग्रहांना निश्चितपणे भेटी दिल्या असणारच. पैकी वसती करण्याच्या दृष्टीनी त्यांनी 'पृथ्वी' नामक ग्रहाला निरुपयोगी ठरवून टाकलें असणार. कारण 'तिथली' भयानक उष्णता



पृथ्वीवरील आद्य प्राण्यांकडून
मंगळवासियाचे स्वागत

आणि जबर गुरुत्वाकर्षण हे सहन करण्याच्या पलीकडे असणार त्यांना. कुणास ठाऊक, कदाचित, पृथ्वीवर सिल्युरियन किंवा कॅम्ब्रियन] युगात निर्माण झालेल्या भू–कवचात या मंगळवासीय पाहुण्यांच्या भेटीच्या खुणा कुठेतरी दडलेल्यासुद्धा असतील

तेव्हा लक्षावधी शतकांपूर्वी येऊन गेलेल्या पाहुण्यांच्या या कथा. त्यांचं स्वागत आपल्या प्राचीन पूर्वजांनी चांगलं केलं असेल ना ? छे, छे, म्हणजे काय प्रश्न आहे ? कल्ल्यांच्या फटाफटा आवाजात जाडजूड शेपट्यांच्या फटकाऱ्यांचा आवाज मिसळून तयार झालेल्या झकास वाद्यवृंदात आपले चित्रविचित्र आवाज मिसळून त्यांनी मंगळवासीयांसाठी स्वागत–गीत म्हटलें असेलच की ! तेवढ्या मॅनर्स आणि एटीकेटस् त्यांच्यापाशी असणारच. मग प्रश्न फक्त एवढाच उरतो की, मंगळवासीय म्हणतात त्याप्रमाणं त्यांना पृथ्वीचं वातावरण मानवणारं नव्हतं की पृथ्वीवरचं 'हे' वातावरण ?

आता मंगळवासीय कितीही प्रगत पावलेले असोत; ४०० दशलक्ष वर्षांचा काळ त्यांचं काहीही बरं वाईट व्हायला पुरेसा आहे. नाही का ? तात्पर्य, सध्या मंगळ बराच 'वृद्ध' झालाय. आणि तो अजून पूर्णत: निर्जीव झालेला नसला तरी तिथलं जीवन सावकाशपणे अदृश्य होत चाललंय !

आपल्या उत्खननवाल्यांना मंगळावर बरंच काही करता येण्यासारखं आहे, मिळविता येण्यासारखं आहे.

मंगळवासीय ४०० दशलक्ष वर्षापूर्वी पृथ्वीवर येऊन गेले असावेत' असं जे काहींचं मत आहे ते मत नसून गृहीत धरलेली एक कल्पना आहे. कारण या मताला पाठिंबा देणारा पुरावाच मुळी उपलब्ध नाही. नेमका याचाच फायदा उठवून विरोधी मतवादी म्हणतात, 'एवढासुद्धा पुरावा हाती नसताना, लक्षावधी वर्षापूर्वी अमुक घडलं अन् तमुक घडलं अशा कल्पना करून ते सिद्धांत असल्याचं मोठ्या ठसक्यात सांगणं म्हणजे हास्यास्पदच आहे. बुद्धिवान प्राण्यांची थिअरी मान्य

केल्यानंतर मग त्यांना पृथ्वीवर येण्यास अडचण पडण्याचे कारण नाही हे शंभर टक्के कबूल. पण तसा पुरावा कुठाय ? वुई वॉण्ट पुरावा. त्याशिवाय आम्हाला या थिअरीतला शब्दसुद्धा पटायचा नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे भय आणि भीषण यांना उगाचच फासलेला रहस्याचा रंग. १८७७ साली ते प्रथम दिसले; पण त्यापूर्वी जास्त शक्तीच्या दुर्बिणीतूनही ते दिसले नव्हते एवढ्याच भांडवलावर, मग ते त्यापूर्वी म्हणजे १८७७ पूर्वी नसावेतच असे तारे तोडण्यात आले. पुढे ते उपग्रह ४००–४५० दशलक्ष वर्षांपासूनच मंगळाभोवती फिरताहेत हे मान्य करायला लागल्यानंतर पाठोपाठ 'ते उपग्रह नैसर्गिक नसून मंगळावरच्या बुद्धिमान प्राण्यांनी अवकाशात सोडलेले कृत्रिम उपग्रह होत' अशी टाग मारायला ही मंडळी विसरली नाहीच. म्हणजे गंमत आहे की नाही ?

आता भय, भीषण १८७७ पूर्वी दिसले नाहीत हा दोष कुणाचा ? साधी गोष्ट आहे. एकतर हे दोन्ही उपग्रह आकाराने भलतेच लहान आहेत. दुसरं म्हणजे ते मंगळाच्या फार जवळ आहेत. तिसरं म्हणजे मंगळावरनंही सूर्यप्रकाश काही अशी परावर्तित होत असल्यानं मंगळाभोवती प्रकाशाचं तेजोवलय आहेच. तेव्हा या तेजोवलयाच्या पार्श्वभूमीवर ते दोन छोटे छोटे उपग्रह दिसू शकले नाहीत म्हणून भलभलत्या सिद्धांतांचा अट्टाहास करणे बरे आहे काय ? अन् एकदा त्यांना शोधून काढण्यात आल्यानंतर मागाहून ते कमी शक्तीच्या दुर्बिणीतूनही दिसू लागले तर त्यात आश्चर्य ते कसले ?

भयचा व्यास आहे सोळा किलोमीटर्स अन् भीषणचा आहे आठ किलोमीटर्सचा. तेव्हा नैसर्गिक उपग्रह म्हणून ते छोटे असले तरी कृत्रिम उपग्रह म्हणून भलतेच प्रचंड आहेत. सोळा सोळा आणि आठ आठ किलोमीटर्स व्यासाचे कृत्रिम उपग्रह तयार करणे म्हणजे चेष्टा वाटली की काय ? शिवाय यांना म्हणे असं 'वाटतं' की भय आतून पोकळ असावा. भले शाबास ! यांना म्हणे, बुधाच्या आणि सूर्याच्यामध्ये व्हल्कन नावाचा ग्रह असावा असंही 'वाटलं' होतच की, आहे का बेट्याचा कुठे पत्ता ? त्यातलीच गत ही, झाले !

जाऊ द्यात, सिद्धांत म्हणून फेकलेल्या कल्पना बूमरँगप्रमाणे उलटून कल्पनाच असल्याच सिद्ध होईल तेव्हा डोळे उलटतील. सध्या तर गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञसुद्धा आमच्या बाजूचे आहेत. कारण 'बुद्धिमान प्राण्यांच्या कल्पने'ला अजिबात उजाळा न देताही मंगळाच्या सर्व रहस्यांचा नीट उलगडा करता येईल, अशी त्यांना आशा वाटतेय; खात्री वाटतेय.

सुलट मत : कृत्रिम चरांच्या जाळ्यांनी सारा मंगळच मुळी व्यापून टाकलेला आहे. हा शोध लागला १८७७ मध्येच, अन् त्यानंतर ते ओळखले जात आहेत 'मंगळावरील कालवे' या नावांनी. हे कालवे म्हणजे मंगळावरील काही नद्या वगैरे नक्कीच नव्हेत. कारण तसे ते चांगले विस्तृत आहेत. इतके की त्यांना नद्या

म्हणणं हास्यास्पदच ठरावं. या कालव्याची रुंदी आहे ४८ किलोमीटर्सएवढी म्हणजे पहा ! तेव्हा नद्याऐवजी त्यांना छोटे समुद्रच म्हणायला काही हरकत नाही. मंगळाच्या ध्रुवीय प्रदेशातून निघून विषुववृत्ताकडे उतरणाऱ्या या प्रचंड कालव्यांच्या जाळ्यात मंगळ पार गुरफटून गेल्यासारखा दिसतो.

मंगळावर मुळात पाणी कमीच असल्याने त्याला तसं फार महत्त्व आहे. ध्रुवीय प्रदेशातला बर्फ वितळला की, त्यापासून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकत. त्या पाण्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठीच मंगळवासीयांनी – बुद्धिवान मंगळवासीयांनी – आपल्या तंत्रविज्ञानाच्या जोरावर हे प्रचंड कालवे बांधून काढले आहेत.

जेव्हा ध्रुवीय प्रदेशातलं हिम वितळतं तेव्हा निर्माण होणारं बहुमूल्य पाणी हे कालवे दक्षतेने गोळा करतात – अजिबात वाया जाऊ न देता ! आणि मग ते मंगळावरील वैराण प्रदेशात वाहूनही नेतात. मंगळावरचे निर्जीव, वाळवटी माळ जीवनाच्या त्या तुषारांनी खुलतात. बिया वेगानें अंकुरतात. नाजुक निळी पानं केव्हा बागडू लागतात ते तर मुळी कळतच नाही. हा हां म्हणता रोपं वाढतात. आपण जिथून हे सारं पाहू शकतो – नव्हे, अनेकांनी हे शक्तिशाली दुर्बिणीतून पाहिलेही आहे, की ज्या वेळी ध्रुवीय हिम वितळायला लागते, त्या वेळेपासून मंगळावरील काही विशिष्ट प्रदेश झपाट्याने गडद होत जातात. हे विशिष्ट प्रदेश म्हणजे कोणते माहीत आहे ? अहो, दुसरे तिसरे नव्हेत काही; ते ' कालवे ' अन् ' समुद्र ' यांनी व्यापलेले जे प्रदेश आहेत ना, तेच !

वळसे घेत घेत जाणाऱ्या कालव्यांना जिथं मोठाले फाटे फुटतात, तिथ, – त्या संगमावर काही बारीक ठिपके असल्याचं इथून दिसतं. ते ठिपके म्हणजे मंगळावरील ' प्रचंड शहरे आणि अवाढव्य औद्योगिक वसाहती ' होत.

उलट मत : काय सुरेख गप्पा मारताय राव ? कालवे काय, नील-क्रांती काय, शहर काय अन् अवाढव्य वसाहती काय – शाब्बास पठ्ठे ! पण काय हो, ही माणसं खगोल शास्त्रज्ञ कशासाठी होतात ? छानपैकी काल्पनिक – विज्ञान-कथा-लेखक तरी व्हायच होत? पुस्तकं खूप खपली असती की ? कसं ?

अहो, कसच काय अन् कसच काय ? मंगळ बिचारा मुळात तसा ' निर्जीवच. ' श्रेष्ठ प्रतीचे प्राणी तर सोडाच पण वनस्पतीसुद्धा तिथ कधी निर्माण झाल्या नाहीत. जीवनानं जर काय थोडीफार प्रगती केली असेलच तर ती निकृष्ट प्रतीच्या मॉसेस आणि लिचेन्सपुरतीच ! त्यापलीकडे उत्क्रांती मुळीच झालेली नाही.

गंमत म्हणजे, मंगळाच्या वातावरणात प्राणवायूचं प्रमाण अत्यल्प आहे अन् कर्बद्वि-प्राणिल ($CO_2$) मात्र भरपूर उपलब्ध आहे. आता आमचे ' गप्पिष्ट ' म्हणतात त्याप्रमाणे जर श्रेष्ठ दर्जाच्या वनस्पती मंगळावर असत्या तर असं झालं असतं का ? विचार करा अन् पहा, आमचंच म्हणणं पटणेबल आहे; नाही का ?




**लोवेल यांना मंगळावरील काजव्यांचे लागलेले वेड**

काही म्हणा पण ही खरी कमाल आहे 'कालवे' कल्पनेची! शू: जरा कान इकडे करा पाहू – थोडं सीक्रेट सांगायचंय जरा. हो, पण तुम्हाला लोवेल कोण माहीत आहे ना? नाही माहीत? बराय, मीच सांगतो. काय आहे, १८७७ मध्ये शियापरेली नावाच्या शास्त्रज्ञाने मंगळावरचे कालवे पहिल्यांदा शोधून काढले. लगोलग म्हणजे १८९४ मध्ये या पर्सिवेल लोवेलनी अॅरिझोना प्रांतातल्या फ्लॅगस्टफ येथे 'लोवेल वेधशाळा' स्थापन केली. त्यामागचा उद्देश मंगळाचा अभ्यास करण्याचा होता. पण त्या आत्यंतिक अभ्यासापायी या शास्त्रज्ञाला पुढे चक्क वेऽड लागलं वेड! कशाचं वेड? कालव्यांचं वेड!! बिचाऱ्याला 'कालवे-कालवे जिकडे तिकडे' दिसू लागले. लवकरच बुध, शुक्र आणि आपल्या चंद्रावरदेखील प्रचंड कालवे असल्याचा ग्रेट शोध त्यांनी लावला. मंगळाच्या बाबतीत तर विचारूच नका. मंगळ हा आपला साधासुधा ग्रह आहे की नुसताच कालव्यांचा गुंतावळा हे कळायलाच मुळी त्यांनी काही मार्ग ठेवला नाही. एकट्या मंगळावर एक नव्हे, दोन नव्हे, तर तब्बल सातशे कालवे असल्याचं त्यांनी 'मोजून' सांगितलं. यापैकी काही कालवे ४००–४५० किलोमीटर्स रुंदीचे आहेत हे इथं लक्षात ठेवण्यासारखं आहे.

म्हणे मंगळावर पाणी कमी असल्याने 'बुद्धिवान' मंगळवासीयांनी ध्रुवप्रदेशातून साऱ्या मंगळभर पसरणारे कालवे बांधून काढले आहेत. आता मंगळावर पाणी कती आहे, ठाऊक आहे? पृथ्वीवरल्या एका, गोड्या पाण्याच्या, मोठ्या सरोवरातील पाण्याहून कमीच – निदान जास्ती नक्कीच नाही. आता हे एवढं मोठं (!) पाणी इकडून तिकडे वाहून नेण्यासाठी मंगळवासीयांनी प्रचंड रुंदीचे सातशे कालवे जर खरोखरीच बांधून काढले असतील, तर त्यांना 'बुद्धिवान' कशासाठी म्हणायचं?

गप्पा हो, साऱ्या गप्पाच! दुसरं काय! हे कालवे कृत्रिम म्हणजे मुद्दामहून

बांधून काढलेले असे मुळीच नाही. ते नैसर्गिकच आहेत. मुख्य म्हणजे ते कालवे नाहीच आहेत. ते मंगळावरील भू-कवचाला पडलेले तडे आहेत.

कालव्याच गडद होण वनस्पतीच्या अस्तित्वाच द्योतक मानण्यात येत, पण ते सर्वस्वी चूक आहे. हा होणारा रंगबदल म्हणजे दुसर तिसरं काही नसून निर्जीव खडक आणि वाळवंट याच्यावर चाललेला छायाप्रकाशाचा खेळ होय.

सुलट मत ' मगळावरचे ' कालवे ' आणि ' समुद्र ' प्रकाशकिरण शोषून घेतात. काही किरणाचे परावर्तनही करतात – पण ते वनस्पतीप्रमाणे. खनिजाप्रमाणे अजिबात नाही. शिवाय हे नक्कीच की, कालवे आणि समुद्राच्या परिसरातील रंग विशिष्ट ऋतूतच बदलत जातो – गडद होत जातो. या विशिष्ट प्रदेशाखेरीज उरलेल्या वाळवटी प्रदेशात मात्र अशाप्रकारचा रगवदल मुळीच घडून येत नाही.

मगळावरील कालव्याची एकूण रचनाच नैसर्गिक वाटत नाही काही ठरविलेल्या योजनावरहुकूम ते बाधून काढण्यात आले असावेत असच त्याच्या स्वरूपावरून वाटत. हे कालवे म्हणजे काही तज्ज्ञ म्हणतात त्याप्रमाणे साधे भू-कवचाला पडलेले तडेच असते तर त्याच्यात अशी सुसगती, त्याच्या रचनेत असे साम्य दिसून आले नसते

विशेष अभ्यासासाठी म्हणून पृथ्वीवर प्रयोगशाळातून मंगळावरच वातावरण निर्माण करण्यात आल. तपमान, वातावरणाचा दाव, हवेतील घटकाचे प्रमाण या सान्या बावतीत हे कृत्रिमरित्या घडवण्यात आलेलं वातावरण मंगळाच्या वातावरणाशी अचूकपणे मिळतं-जुळत होतं. गंमत म्हणजे प्रयोगाअन्ती असं आढळून आलं की, श्रेष्ठ प्रतीच्या वनस्पती–विशेषत: भाजीपाला–त्या वातावरणात वाळून, जळून, खुरटून जाण्याऐवजी चक्क झकासपणे फोफावतोय.

□

या सान्या उलट-सुलट मतप्रवाहाचं सार शेवटी सांगायलाच हवं. कितीही झालं तरी, पृथ्वी सोडल्यास जिथं सजीवाची वसती असू शकेल असा हा एकमेव ग्रह आहे. श्रेष्ठ वनस्पती वा प्राणी याची निर्मिती तेथे झाली असो वा नसो, पण तो निश्चितपणे निर्जीव नाही.

पृथ्वीप्रमाणेच मंगळाचाही बराचसा भाग ' समुद्रां 'नी व्यापलेला आहे. अर्थातच ते हिमानी झाकलेले आहेत. आणि हे हिम खडकाच्या चुन्यात झाकून गेलेले आहे. ज्याना आपण लाल वाळवंटे म्हणतो ती प्रत्यक्षात वाळूची वाळवंटं नसून हिमकण आणि धूलिकण याच्या मिश्रणातून बनलेली असावीत. पैकी धूलिकण लिमोनाइट अन् फेल्सिटिक न्हायोलाइट प्रकारच्या खडकाच्या चुन्यातून निर्माण झालेले असावेत. आपल्या पृथ्वीवरील पर्वतमय प्रदेश नेमके याच प्रकारच्या खडकांच्या चुन्यातून निर्माण झालेले आहेत, ध्रुवीय प्रदेशात धूलिकणावर मात करून बर्फाने जमीन व्यापून टाकली आहे.



**मंगळावरील हे कालवे म्हणजे बर्फाला पडलेले तडेच आहेत**

' कालवे ' म्हणजे बर्फात पडलेले तडे आहेत. हे तडे अशनीपाताने पडले असावेत. असं नसेल तर मग ते वनस्पती–जीवनाचेच द्योतक असतील. पाण्यावर गोठलेल्या बर्फावर पडलेल्या मातीच्या थरांतून या वनस्पती फोफावत असतील. सजीवांच्या पाळण्याची दोरी पाण्याच्याच हातात असते. तेव्हा या ' भूमिगत ' पाण्याच्या आधाराने मंगळावर उत्क्रान्ती होऊन श्रेष्ठ प्रकारचे सजीव निर्माण झाले असतीलही आणि या भूमिगत पाण्याच्या संरक्षक ढालीआड उत्तमपणे वाढतही असतील. मंगळाच्या वातावरणातही टिकाव धरून असतील.

या साऱ्या कल्पना आणि सिद्धान्त सिद्ध करणे जितके अवघड आहे, तितकेच त्या नाकारणेही ! पण पृथ्वीवर बसून मंगळाबद्दल विचार करायचे दिवस आता संपत आले आहेत. एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर आपण पृथ्वीवासीय आहोत. या तेजस्वी युगाचा उषःकाल होईल, पहिलं अवकाशयान मंगळावर सुखरूप उतरेल तेव्हा. या दृष्टीनं पहिलं पाऊलही उचललं गेलं आहे. सोविएट रशियानं काही वर्षापूर्वीच मार्स १ नावाचं अंतराळयान त्या लाल ग्रहाच्या दिशेने सोडून या कार्य-क्रमाची फीत कापली आहे. दुर्दैवाने हा कृत्रिम उपग्रह मंगळापासून १०६ दशलक्ष किलोमीटर्स दूर असतानाच त्याच्या रेडिओ ट्रान्स्मिटरमध्ये बिघाड निर्माण होऊन तो बन्द पडला. वस्तुस्थिती अशी असली तरी हे विसरून चालणार नाही की ते अवकाशयान मार्स 1 होतं. या दिशेने केला गेलेला तो पहिलाच प्रयत्न होता.

मंगळाच्या दिशेने प्रवास करणे यापुढे चालूच राहणार आहे. अमेरिकेने नुकत्याच पाठविलेल्या मरिनर – ४ ने मंगळाचे अनेक ' क्लोज अप्स ' यशस्वीपणे मिळविले आहेत. ही छायाचित्रे भावी अवकाशयानांना आणि अवकाशयात्रिकांनाही बरीच उपयुक्त ठरणार आहेत.

पृथ्वी आणि मंगळाचे परस्परसंबंध विलक्षण गुंतागुंतीचे आहेत. मंगळ आपली सूर्यप्रदक्षिणा अति मंद वेगाने करतो. त्याच्या लांबलचक, लंबवर्तुळाकार कक्षेतून

एक फेरी करायला त्याला तब्बल दोन वर्ष लागतात. पृथ्वीची कक्षा मात्र बरीच वर्तुळाकार असून ती त्या कक्षेतून अधिक वेगाने फिरते.

बहुतेक दर दोन वर्षांनी हे दोन ग्रह परस्परांजवळ येतात. त्याला इंग्रजीत ' opposition ' म्हणतात. आपण त्याला ' मंगळसमीप काळ ' म्हणूया. या काळात या दोन ग्रहांमधलं अंतर ७० दशलक्ष किलोमीटर्सहून कमीच असतं. दर १५ ते १७ वर्षांनी मंगळ याहूनही पृथ्वीच्या अधिक जवळ येतो. त्याला इंग्रजीत ' Favourable opposition ' म्हणतात. मराठीत त्याचं भाषान्तर ' सुयोग्य मंगळसमीप काळ ' असं करता येईल. या काळात मंगळ आपल्यापासून फक्त ५६ ते ५९ दशलक्ष किलोमीटर्सवर असतो.

मंगळाबद्दल लागलेल्या अनेक शोधांचे जनकत्व १८७७, १९३९ आणि १९६५च्या सुयोग्य मंगळसमीप काळात मिळालेल्या महत्त्वाच्या माहितीकडे जाते. त्यातल्या त्यात १९५६ चा सुयोग्य मंगळसमीप काळ बराचसा वाया गेला असेच म्हणावे लागेल. त्या वर्षीच्या शिशिरात हा काळ आला होता. पण मंगळावरच्या खराब वातावरणाने आणि धूलिवादळांनी त्याच्यासंबंधी माहिती मिळविण्याच्या कामात अनंत अडथळे निर्माण केले.

आता भावी ' सुयोग्य मंगळसमीप काळ ' येतो आहे पुढच्याच वर्षी १९७१मध्ये ! ही संधी अमेरिका आणि रशिया ही बडी राष्ट्रे वाया दवडवणार नाहीत. मानवरहीत अवकाशयाने मंगळाकडे झेपावतील. ह्याचे अनेक सुंदर ' क्लोज अप्स ' मिळविण्यात येईल. साऱ्या शक्तिशाली दुर्बिणी सतत मंगळावर रोखण्यात येतील. आणि गेल्या १५–१७ वर्षातील पुढारलेल्या तंत्रविज्ञानाच्या सहाय्याने खगोलशास्त्रज्ञ मंडळी पुन्हा एकदा, ' मंगळावर जीवन कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे ? ', ' ध्रुवीय हिम–टोपण किती जाड आहेत ? ', ' कालवे म्हणजे निश्चित स्वरूपात काय आहेत ? ', ' उपग्रह कृत्रिमच आहेत की नैसर्गिक ? '... वगैरे वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधण्यात गढून जातील.

अन् कुणास ठाऊक, ' पाणी वाहून नेण्यासाठी ' बांधून काढलेले कालवे म्हणजे जिवंत ज्वालामुखींच्या रांगाही असतील. रंगपटलाचं रहस्य भूभीवर त्वरेनं पसरलेल्या लाव्हारसातही दडलेलं असेल. अन् मग काय सांगावं; सळसळत्या, लालबुंद लाव्हारसाच्या तुषारांच्या फुलांचा मनोरम गुच्छ हाती घेऊन, लाल प्रकाश ओंजळीनं उधळत उधळतच मंगळ आपल्या भेटीला येईल पुढच्या वर्षी ! !



पृष्ठ १५ वरून

वाटत होतं. भाऊ फाटक याचेजवळ मॅकमोहन या मद्य तयार करणाऱ्या कंपनीची डायरी होती त्यात उर्दू शेर होते. सर्जे ते वाचून दाखवित व त्याचा शाब्दिक अर्थ सांगत. मग त्यावर कॉमेंट करून त्याचा लाक्षणिक अर्थ मी सांगितला. दीड दोन तास मेहफील मस्त रंगली होती. रात्रीचे जेवण आटोपून ट्रकने भडगावला आलो. मी थोडासा अप्सेटच होतो.

१२ मे १९७० : सकाळी बरोबर ६ ला कामाला सुरुवात झाली. कामाचा उठाव चांगला झाला. पण एकूण व्यवस्थेबद्दल मला फारसे समाधान वाटत नव्हते. मुंबई, नांदेड, व उमरेड येथील शिक्षक आल्याने वेगळे वातावरण होते. यातून शेतीच्या कामाचा उठाव झाला. सकाळी वर्दे गावची प्रायमरी शाळा कामाला आली होती. शिक्षक संघटना व युवक कार्य याबद्दल माझा व भाऊचा खूप वाद झाला. शिक्षक संघटना ही केवळ शिक्षकांची सुबत्ता वाढविण्याच्या कामाकरिता लढते आहे पण त्यातून तात्विक बैठक तयार होत नाही व यामुळे जो दोन पैसे मिळवून देईल तो पुढारी या पलीकडे कोणतेही शिक्षण होत नाही. ही गोष्ट लाजिरवाणी वाटते.

१३ मे १९७० : आजही नेहमीप्रमाणे काम झाले. कामाची गती वाढते आहे. आज कडावलच्या प्रायमरीची मुले आली होती. त्यांनी कामाचा चांगला उठाव केला एम् डी. ने ट्रॅक्टर कुण्या रईसाकडे पाठविला. त्यामुळे मी अप्सेट झालो. आज सरनाईक थोडा वेळ प्रोजेक्टवर येऊन गेला. पोहण्यात व करवंदे खाण्यात मुले सर्व विसरून जातात. भाऊ व सर्जे जाणार असं म्हणाले. शरद पाटील आज गेला. हरिभाऊ बारपुते धडपड करीत आले त्यामुळे मनाला खूप प्रसन्न वाटले.

१४ मे १९७० : भाऊ फाटक व सर्जे गुरुजी सकाळी गेले. काम चांगले चालले आहे. सकाळी नाश्त्यावरून शशी व गर्गे यांचे खटकले तेव्हा काय होते अशी शंका वाटत होती. पण शेवटी दोघांनी माझे ऐकले.

१५ मे १९७० : आज देवताळे उपमंत्री दुपारी येणार तेव्हा सकाळीच सर्व काम आटोपून टाकण्याचा मुलांनी निश्चय केला. आज फार मोठ्या संकटातून कॅम्प बचावला. अगदी वरच्या पालकाचा तीर तुटला. फळीवर ओ. टी. व नाटेकर चिरा हातात घेऊन उभे होते. एक गवंडी होता. शिवाय खाली दगड देणाऱ्यांची एक रांग होती. सुदैवाने तुटलेला तीर सोनूनेच्या खांद्यावर टेकला. मुलांनी प्रसंगावधान राखून चटकन दगड भिंतीवर टेकवला. अन्यथा १५ फुटावरून दगडासकट मुले कोसळली असती व भयंकर अनर्थ झाला असता. गेले दोन दिवस भडगावची मुले आत्मविश्वासाने चिरे वहायला पण येऊ लागली. काम संपविण्याची जिद्द आम्ही

बाळगली, पण चिरे तासणारे गवडी १०॥ लाच न सागता निघून गेले. त्यामुळे फजितीची वेळ आली. त्यांच्याकडे माणूस पाठविला. भराभर चिरे तासून दिले. १२ वाजता मला जावे लागले. पण मुलानी सतत २॥ वाजेपर्यंत काम करून इमारत पुरी केली. देवताळे येणार नाहीत असे कळले. तरी पण टॅक्सी केली असल्यामुळे मी, जयसिंगराव व सरनाईक काजू लागवडीसाठी जागा शोधायला गेलो व तसेच कसाळला जाऊन आलो. आज पाय जास्त दुखत होता. संध्याकाळी मासाहारी पार्टी झाली. त्यानंतर दशावतारी नाटक झाले पण नाटक १२ ला सुरू झाले. यामुळे बहुतेक लोक झोपले होते सकाळी चारला नाटक सपले. रात्री उप-सभापतींनी प्रमाणपत्रे दिली. त्यानी शिबिरार्थींचा चागलाच गौरव केला.

**१६ मे १९७०** सकाळी ८॥ वाजता स्पेशल बस मिळाली. मुले थकलेली वाटत होती. बस निघेपर्यंत करवदे तोडणे चालू होते. पानासकट असणाऱ्या करवदाच्या लहान लहान फांद्या सुदर दिसतात. वाटेत रुमाल मोटारबाहेर फेकले. त्याकरता वाणीशी खूप दंगा केला. दुपारी लेव्हलिंगचे काम जोरात सुरू झाले. परतु फार लाब माती नेऊन टाकावी लागत होती. त्यामुळे कामाचा उठाव दिसत नव्हता. काही शिबिरार्थी तर दोन किंवा तीन टोपल्या एकदम घेऊन जात होते ग्रामपचायती-कडून आणलेल्या एकचाकी गाडीचा प्रयोग करण्याची खटपट काहींनी केली. पण एक–दोघांनाच ते जमले. त्या गाडीवर दारा व शेळके याचे अनेक विनोद चालले होते. कॅम्पचा सोळावा दिवस आहे रोज आठ आठ तास व गेले दोन दिवस तर दहा तासाचे वर काम चालले आहे, व त्याचा काही थकवा आला आहे असे कुठेही वाटत नव्हते. दुपारी मुलानी जाभळावर धाड घातली. ओ. टी. झाडावरून पडला. पण अपघात झाला नाही त्यामुळे सरनाईकनी काही सूचना दिल्या. रात्री जेवणाच्या वेळी आग्रहपूर्वक त्या मुलाच्यापुढे माडल्या. दरडीत हात घालून मुलानी मोठा मासा पकडला. मला हे धोकादायक वाटते आज सकाळी स्नान करून मुले फारच उशीरा परत आली त्यामुळे जेवणाची व्यवस्था थोडी डिस्टर्ब झाली. माझा पाय पुन्हा सुजू लागला आहे. मी ए. टी. एस घेतले नाही म्हणून शशी रागावली आहे. काजू लागवडीचा कार्यक्रम घ्यावयाचा नाही, असे सरनाईकचे ठाम मत दिसते. मी कार्यक्रम नक्की घेणार असे म्हटले. त्यामुळे सरनाईक थोडा अप्सेट झाला आहे कसाळच्या ग्रूपमधील शिक्षक रोज दोन दोन करून श्रमदानासाठी येत आहेत. पाटील तर भडगावपासून बरोबर आहेत त्याच्या पत्नी बाळत होऊनही पाटील घरी जाण्याचा दिवस पुढे पुढे लोटून श्रमदानात अधिक अधिक गुंतत आहेत. कसाळ शाळेचा चपराशी माधव व मकदूम सर कॅम्पमध्ये पूर्ण रगले आहेत. बबन चापले व श्रीनिवास येमले हे दोन गवडी आज माती वहायला आलेले पाहून खूप आनंद झाला. कारण टोपली वाहणे गवडी कमी दर्जाचे मानतात.

**१७ मे १९७० :** नेहमीप्रमाणे काम वेगाने झाले. आज कामाचा उठावही

चांगला झाला. दुपारी दिवटे आले. त्यांच्याबरोबर सरनाईक गेले. त्यांनी काजू लागवडीची जागा पक्की केली. बिववण्याला रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होत नाही. कुणी त्यात पुढाकार घेत नाही. स्थानिक मंडळीपैकी विशेष कुणी आले नाहीत. सरनाईकाने जेवणाची व्यवस्था उत्तम केली आहे. परंतु त्याने घेतलेला अतिशय उत्तम गहू चक्कीवर लबाडीने बदलून दिला गेला असला पाहिजे. कालचा आचारी स्वतः काहीच करीत नव्हता. मुलींना खूप पोळ्या करावयास लावल्या. त्यातल्या आजही काही पुरल्या. काका राऊळकर दोन-तीन वेळेला भेटून गेले, घरी चलण्याचा आग्रह करीत होते. सरनाईक काही सांगतच नाही असे ते दोन-तीन वेळेला म्हणाले. परंतु सरनाईकच्या योजनेला हेच लोक अडथळा आणीत आहेत असे मी ऐकले. मुले मात्र येथे खूष आहेत. तरी त्यांना भडगावचे डोह, तिथली करवंदे आणि त्यानी अत्यंत वेगाने केलेले श्रमदान याची सारखी आठवण होते. आज पाटील परत गेले.

१८ मे १९७० : आज बबन व श्रीनिवास परत गेले. शिबिर संपत आले अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली. दिवसभर काम चालले होते. कामाला गतीही चागली होती. पण लोकाची मनं मात्र कुठेतरी भरकटत असावीत. ते जाणवत होतं. सध्याकाळी शाळेच्या सचालकानी खाऊ दिला, चहा दिला, आणि कामाचं कौतुक केले. त्यामुळे कामात मात्र थोडा खड पडला. एक सुदर अबोलीचा हार संचालकांनी मला दिला. पण मुलाचा प्रतिनिधी म्हणून मी तो दाराला दिला. तसा सुपडाला द्यावा असं वाटत होतं. पण तो समोर नव्हता. कारण काम सर्वांनीच उत्तम केले. त्यात कमी जास्त ठरविणे कठीण, पण तरीही सुपडा मला सरस वाटतोय. सध्याकाळी ६ ला १० लोकाच्या टोळीने काम थांबवले. सामान आवरले व सर्वांचा निरोप घेऊन निघालो. ७॥ ची बस मिळाली. ८॥ ला कुडाळ सोडले व सामान टिकाव, फावडी हे सारे खांद्यावर टाकून डोंगर तुडवित ४॥ मैल सोनवड्याला गेलो. पाय चांगला सुजत होता. दुखत होता. चालणे जिवावर आले होते. पण प्रोजेक्टचा हा एक महत्त्वाचा भाग टाळणे शक्य नव्हते. सरनाईक बरोबर होता. त्याने सुदर गाणी म्हटली. विशेषतः ' आज इथं तर उद्या तिथं ' हे मला आवडणारं गाणं त्या चादण्यामध्ये फार परिणामकारक वाटले. सोनवड्याला १० ला पोचलो व एका अंगणात पथारी टाकून झोपलो. आपण कुठेतरी दूर चाललो आहोत असं मनाला सतत वाटत होतं.

१९ मे १९७० : सकाळी पाचला सर्वांना उठविले. प्रातर्विधी आटोपून कामासाठी डोगरावर गेलो. ६। ला काम सुरू केले. काम झपाट्याने झाले. यातही सुपडा आघाडीवर होता. दर तासाला किती खड्डे होतात व कमाईचा दर कसा पडतो याचा ग्राफ तयार करायचा होता. तशी आज नोंद घेतली. सूर्य वर आला तसा त्रास होऊ लागला. पाण्याची कळशी बरोबर घेतली होती. ती सपली. आठ

वाजता सॉईल कॉन्झरवेशनचे शिटे आले. त्यानी कामासंबंधी सूचना दिल्या. सकाळी सूचना नसल्यामुळे आमच्या थोड्याफार चुका झाल्या होत्या. या दुरुस्त करण्यासाठी दुपारी एक मनुष्य द्यावा लागला. काल बरोबर आणलेला नाश्ता ८। ला केला. जेवण आणावयास सरनाईक सायकल घेऊन बिबवण्यास सात मैल गेले होते. ११। ला काम थांबले. जेवणाची वाट पहात थांबलो. दुपारी १ ला सरनाईक आले. त्यानी जेवण आणले होते. आल्यासारखे दोन दिवस काम करावे असे त्याचे मत होते. मुले कामाला तयार होती. मी मात्र थकलो होतो मुलेही थकली आहेत असे मला वाटत होते. त्यामुळे एक दिवसच काम करून हवी असलेली माहिती गोळा करावी असं मला वाटत होत. मुलेही परवानगी मिळाली तर परतायला उत्सुक होती. सरनाईक जेवण घेऊन आले होते. मुलानी उद्यापर्यंत राहवे असे त्यानी सागितले. मी मात्र राहावयास तयार नव्हतो. पायाला ठणकाही लागला. सरनाईकची सायकल व माझे सामान घेऊन मी ९। ला निघालो. रस्ता भकास होता. कुठे जातो याची माहिती नव्हती. खूप कंटाळवाणे वाटले. १०। ला बिबवण्याला पोचलो. तिथे थोडेसे जेवलो. गर्गेची बॅच दुपारी गेल्याचे कळले.

**२० मे १९७० :** सकाळी जळगावचे लोक व नंदा गोव्याला गेले. शेषराव खरेची बॅच सामान घेऊन आली. सामान मी उतरवून घेतले. त्यांच्यासाठी पोळचा बांधून दिल्या. ते त्याच गाडीने गोव्याला गेले. सरनाईक त्याच गाडीने आले. अतिशय डिस्टर्ब्ड होते. रात्री मुले पायी कुडाळला परत आली. सरनाईकानाही यावे लागले. त्याच्या मनाविरुद्ध वागण्याचा असा पहिलाच प्रसग असावा. शिवाय रात्रभर सुदाम खरेची बॅच व शेषराव खरेची बॅच झोपलीच नाही. कुणी स्नान केले. कुणी इतर काही. यामुळे सरनाईक चिडले होते. माझ्याशी बोलले नाहीत. शशीला फार ऑकवर्ड वाटत होते. तिला वेंगुर्ल्याला नेण्यासबधी ते काल बोलले, पण आज काही करायला तयार नव्हते. दुपारी तासभर गावकऱ्याच्याकडे कुडाळला त्याच्या जीपने जाऊन आलो. कसाळला सापडलेला दगड लाकडात बसवून एक स्मृतिचिन्ह कसाळच्या शाळेला द्यावे असे ठरले होते. सरनाईक पेंट करणार होते, पण सरनाईकनी तो दगड बुलढाण्याला घेऊन जा व तिथे पेंट करून कसाळला पाठवा असे म्हटले. कुडाळहून रंग व ब्रश आणून द्या असे म्हटले, तर त्यालाही त्यानी नकार दिला. माझा पाय चागलाच सुजला होता व जाणे कठीण होते. तरी मी सायकल घेऊन निघालो, पण गावकर आल्याने त्याच्या जीपमधून जाऊन येता आले. शशीपण गावकराच्या पत्नीला भेटून आली. मला चित्रकला येत नाही. पण दुपारी दगडावर काही रेघोट्या मारल्या. शशीला लेटरींगची सवय नाही. पण तिने ते केले. सध्याकाळी काका राऊळकराकडे जाऊन आलो. मग सरनाईक थोडा मोकळा झाला. २० ला रात्री मी, शशी, हर्षवर्धन व राजू एवढेच लोक उरलो होतो. सर्व भकास वाटत होते. कॅम्पच्या सुरुवातीला मी एकटाच आलो आणि जातानाही तसाच होतो.

◻ ◻ ◻

दैनंदिन जीवनामध्ये लोकांना किती प्रत्यय येत आहे हा खरा प्रश्न आहे तसे पाहिले तर नियोजनबद्ध अर्थव्यवस्था हा भारताच्या आर्थिक धोरणाचा स्वातंत्र्य प्राप्तीपासूनचा पाया मानला जातो. पं. नेहरू समाजवादीच होते. शास्त्रीजीही समाजवादाचाच जयघोष करीत होते आणि विद्यमान प्रधानमंत्री इंदिरा गांधी तर समाजवादाशिवाय काहीही बोलायला तयार नाहीत. असे असूनही आधीच धनवान असलेले उद्योगपती आणखी किती धनसंपन्न झाले आणि ठराविक उत्पन्नावर गुजराण करणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गाचे आणि श्रमिकाचे जीवन किती निकृष्ट झाले आहे याची आकडेवारी पाहिली की आपण उच्चारलेल्या शब्दांना कृतीचा आशय देण्याची आपल्यावर जबाबदारी आहे याचे सत्ताकेंद्र ताब्यात राखणाऱ्यांना भान आहे किंवा नाही असा प्रश्न स्वाभाविकच उभा राहतो.

समाजवादाच्या पुरस्कर्त्यांनीच समाजवादाची केवढी विटंबना केली आहे हे पाहिले की खरोखरच विस्मय वाटतो. शेकडो एकर जमिनीचा मालक असलेला आणि भूमिहीन शेतकऱ्याना साधे निर्वाहवेतन नाकारणारा बडा बागायतदारही समाजवादाचे अगडे-टोपडे चढवून जिल्हापरिषदेपासून मंत्रिपदापर्यंत जी मिळेल ती जागा अडवीत असतो. आपल्या बुद्धीचा सोयिस्कर वापर करून वकिलीच्या व्यवसायामधून दर महिन्याला हजारो रुपये गोळा करणारा आणि संस्थानिकाच्या ऐषआरामामध्ये वावरणारा ‘ बुद्धिमंत’ही ‘ इंदिरावादी कॉंग्रेस हीच खरी समाजवादाची संरक्षणकर्ती आहे ’ असा साक्षात्कार घडल्याचा दावा करतो. शिक्षणाचा गंध नसलेले आणि मोठमोठ्या ग्रंथांची नावे साध्या बोलण्यातही आवर्जून आणणारे अशा भिन्न भिन्न स्तरावरील लोकाचा हा समाजवादाचा उद्घोष ऐकला की ‘ समाजवाद म्हणजे अनेक रंगांचा सदरा आहे ’ हे लुई फिशरचे उद्‌गार आठवतात. डाव्या कम्युनिस्टापासून ‘ सिंडिकेट कॉंग्रेसपर्यंत अनेक राजकीय पक्ष हाच टिळा लावून राजकारणात वावरत आहेत. परंतु यापैकी कोणीही समाजवादाची व्याख्याही केलेली नाही किंवा त्याबद्दल तशी आस्थाही दाखविलेली नाही. दिल्लीतल्या केंद्रीय मंत्र्याची काय किंवा निरनिराळ्या लहानमोठ्या राज्यातील मंत्र्याची काय निवासस्थाने पाहिली, तेथला थाटमाट पाहिला की जिथली बहुसंख्य जनता दारिद्र्याच्या खाईमध्ये खितपत पडली आहे अशा देशाचे हे राज्यकर्ते आहेत याची जाणीव होणे सर्वस्वी अशक्य आहे. असे म्हणतात की बहुतेक मंत्र्याच्या घरी टूथपेस्टपासूनच्या साऱ्या वस्तू परदेशी असतात. परंतु हेच मंत्री ‘ स्वदेशी-सप्ताहा’चे उद्‌घाटन करायला व्यासपीठावर चढले की लोकमान्य टिळकापासून महात्मा गांधीपर्यंत स्वदेशीच्या पुरस्कर्त्यांची नावे अशी काही घोळून घोळून घेत असतात की स्वदेशीचा खराखुरा पुरस्कर्ता हाच अशी जमलेल्या लोकाची भावना व्हावी.

आणि म्हणूनच, 'अज्ञान आणि दारिद्रय याच्याविरुद्ध आपल्याला आता निकराने लढाई खेळायची आहे' या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रधानमंत्र्यानी केलेल्या घोषणेतून देशाला कोणतीही प्रेरणा मिळत नाही. शब्दाचे अर्थ घालविण्याची वृत्ती सत्ताधाऱ्याच्या हाडीमासी खिळलेली आहे असा का एकदा लोकांचा ग्रह झाला कीं ते वैफल्यवादाने ग्रासले जातात आणि मग 'प्रस्थापित' उलटून टाकण्याची भाषा त्यांना आकर्षित करू लागते. नक्षलवाद हा काही बाहेरून आयात होत नाही. फार तर त्याला परदेशातून आर्थिक मदत मिळत असेल. परंतु सत्ताधाऱ्यांच्या प्रामाणिकपणावरील अविश्वासातून तो खरा मूळ धरू लागतो. एखादा जादूगार दृष्टिभ्रमाचा फायदा घेऊन लोकांना नजरबंद करतो हे खरे. परंतु आपल्या या खेळाला मर्यादा आहे हे त्यास ठाऊक असते. राजकारणातल्या जादुगारांना ते भान नसते. नवनव्या घोषणांनी आपण लोकांची फसवणूक करीत आहोत हे त्याना माहीत नसते असे नाही; परतु टाळ्यांचा कडकडाट ऐकला की ते स्वतःचीच फसवणूक करू लागतात. आपण आणि जनता याच्यामध्ये अंतर पडत चालले आहे, लोकाच्या आपल्यावरील विश्वासाला तडे जाऊ लागले आहेत याचे त्याना विस्मरण पडते.

गेल्या ९ ऑगस्टपासून सुरू झालेल्या 'भूमि-संपादन' आदोलनावरची इंदिरा गाधी याची प्रतिक्रिया वाचली म्हणजे या विस्मरणाचे प्रत्यंतर येते. भूमिहीनाना शेतीसाठी जमीन उपलब्ध व्हावी यासाठी हे आंदोलन हाती घेण्यात आलेले आहे. असे आंदोलन करणे बेकायदेशीर आहे असे इंदिरा गांधी यांनी म्हटलेले आहे केवळ कायद्याच्या पुस्तकावरून बोलायचे असेल तर हेच काय पण कोणतेही आंदोलन बेकायदेशीरच असते. परंतु जमीन धारणेसंबंधीच्या तत्त्वाचा वीस वर्षे उद्घोष होऊन जमीनदाराचे वर्चस्व रेसभरही कमी न झाल्याचे दिसत असताना, कायद्याच्या पुस्तकामध्ये नमूद केलेल्या कार्यवाही करण्याबाबत सरकारला जागे करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याबद्दल राज्यकर्त्यांनी चिडण्यासारखे काय आहे? केंद्रीय मत्र्यापासून जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत कोणाकडे किती जमीन आहे हे ध्यानात घेतले म्हणजे 'कसणाऱ्याची जमीन' या तत्त्वाचा पुकारा करणाऱ्यांच्या खोट्या वर्तनाची चीड आल्यावाचून रहात नाही.

हा धादान्त खोटेपणाच भारतीय राजकारणाचा स्थायीभाव झालेला आहे. जातीयवादाशी मुकाबला करण्याची भाषा बोलत असतानाच मल्लापूरमसारखे पाकिस्तान जन्माला घालायचे, समाजवादाचा उद्घोष करीत असतानाच करचुकव्या मत्र्याला पक्षाध्यक्षपदाची बढती द्यायची, आणि निस्पृहतेचा डागोरा पिटत असतानाच भ्रष्टाचाराची प्रकरणे दफ्तरी दाखल करायची असा सध्याचा खाक्या आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रधानमत्री श्रीमती इदिरा गाधी यानी केलेले भाषण म्हणजे एक औपचारिक विधी होता, त्यापेक्षा त्याची जास्त मातब्बरी मानण्याचे कारण नाही असे मी जे म्हटले ते याचसाठी.

**— सदाशिव पेठकर**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Bi-Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




" लई कटकटीचं ! त्या परीस धान्य बळकवा चळवळ काडा की हो ! "

२६ ऑगस्ट १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : बारावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार...

८ ऑगस्टच्या अंकात श्री. यशवंत पटवर्धन व श्री. विलास पतकी यांनी भंडारदरा विषयी अभ्यासपूर्ण व रसाळ माहिती दिल्याबद्दल अभिनंदन. अशाचप्रकारे माहिती जर निरनिराळ्या वृत्तपत्रातून दिली तर निश्चितच सर्वसामान्य लोकात आपल्या तंत्रज्ञांविषयी आपुलकी व विश्वास निर्माण होऊन आम्हीही याबाबतीत स्वयंपूर्ण आहोत याची जाणीव होईल.

१२ ऑगस्ट १९७० — रमेश गट्टाणी, मुंबई

दिनांक ८ व १५ ऑगस्टचे विशेषांक वाचून फारच समाधान वाटले. विशेषत: १५ ऑगस्टचे अंकातील सु. ल. सोमण यांचा 'मांडवी वाहू दे पुन्हा खळाळून' हा आमच्या गोव्याच्या राजकारणावरील सद्य:स्थितीतील लेख वाचताना तर असे वाटत होते की जणू काही प्रत्यक्षतःच सर्व घडामोडी डोळ्यासमोर घडत आहेत. इतका हा लेख ज्वलंत असा झाला आहे. सु. ल. सोमणांची लिखाणाची शैली काही औरच. लेखाच्या सुरुवातीपासून शेवट येईपर्यंत माणूसचा अंक बाजूला ठेवण्याची इच्छाच झाली नाही. लेख वाचताना आजूबाजूला जणु गोव्यातून तर आपण प्रवास करत नाहीना असे वाटत होते.

१५ ऑगस्ट १९७० — सुभाष दांडेकर, मुंबई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# आद्य भूमिक्रांतिकारक

अप्रिय परंतु सत्य सुंदरपणे सांगणे अवघड असते. पण विनोबांनी जमीन कबजा आंदोलनाबाबत हे अवघड काम नुकतेच केलेले आहे. आपल्या नेहमीच्या अहिंसक पद्धतीने. एका मुलाखतीद्वारा त्यांनी आंदोलनाला आपला नैतिक पाठिंबा दिला. एक मेखही मारून ठेवली. त्यामुळे पाठिंबा काढून घेतला असेही वाटावे.

मेख ही : आंदोलन करणाऱ्यांनी जमिनी खरोखरच बळकावून दाखवाव्यात. घेतलेल्या जमिनीचा कबजा कायम राहिला पाहिजे.

हे घडणे शक्यच नाही. आंदोलनाची आखणी ज्या पद्धतीने झाली त्यातून असे काही भरीव, कायम स्वरूपाचे यश पदरात पडण्याचा संभव नाही. प्रश्नाकडे लक्ष मात्र वेधले जाईल. जे काम विनोबा आज दहा-पंधरा वर्षे करूनच राहिला आहे. शासन काही सुधारणा घोषित करेल. पण भूमीचा भूमिहीनांकडे मोठ्या प्रमाणावर ताबा जाणे ? अशक्य.

ही मेख विनोबांनी का ठोकली असावी ? त्यांना आलेला वाईट अनुभव.

भूदान चळवळीची या सर्व डाव्या पक्षांनी आजवर मनमुराद हेटाळणी केली. तिच्यात अनंत दोष आहेत. मान्य आहे. तरीही ती उचलणे, पुढे नेणे, आपली ताकद तिच्यामागे उभी करणे, समाजकारणाचा आणि राजकारणाचा सांधा जमवून घेणे योग्य ठरले असते. स्वतःला क्रांतिकारक समजणाऱ्या डाव्या पक्षांची तर ही विशेष जबाबदारी होती. ही जबाबदारी त्यांनी पार पाडली नाहीच, वर उपेक्षेचा गुन्हा केला. आज वस्तुस्थिती मात्र अशी आहे, की या उपेक्षित चळवळीने, थोडे का का होईना, प्रत्यक्षात जमीनवाटप करून दाखविलेले आहे. सर्वोदयवादी म्हणत आहेत जवळजवळ बारा लाख एकर भूमी त्यांनी आजवर वाटली. मिळाली पन्नास लाख एकर. आपण लाखाचे हजार धरू. काही हजार एकर जमीन तरी या चळवळीमुळे भूमिहीनांच्या प्रत्यक्ष ताब्यात मिळाली, हे नाकारण्यात अर्थ नाही. केवळ

ठाणे जिल्ह्यात सहज, वरवर चक्कर मारली, तरी भूदानात मिळालेली जमीन कसणारे, तिच्यावर मालकी सांगणारे आदिवासी भेटतात. नवीन वाटपाचे रीतसर कागदपत्र पाहायला मिळतात. किमान काही हजार एकर जमीन श्रीमंतांकडून गरीबांकडे जिच्यामुळे गेली ती चळवळ स्वप्नाळू, भोळसट, भोंगळ आणि एक एकरही जमीन जिच्यामुळे प्रत्यक्षात अशी हस्तांतरित होणार नाही ते आंदोलन पुरोगामी, वास्तव आणि क्रांतिकारक ! दुनिया झुकती है, दुसरे काय ?

दोन चार महिन्यापूर्वी पेणहून पुण्याला येत होतो. वाटेत हेमडी हे गाव लागले. गावची सगळीच जमीन पूर्वी एका सावकाराकडे होती. अत्यंत खराब जमीन. ती त्याने भूदानात देऊन पुण्य मिळविले. ही खराब जमीन गावकऱ्यांनी हळूहळू लागवडीखाली आणली. गाव सारा कातकरी. उत्पादनाचे एकही साधन हाताशी नसलेला. आज खराब प्रतीची का असेना, जमीन कसून त्यावर गुजराण करीत आहे कशीबशी. हे साधन हाताशी आले नसते तर होतेच मुंबईचे फुटपाथ आणि झोपडपट्ट्या यांच्यासाठी रिकाम्या !

विनोबा हे ओळखून आहे. आजचे कायदे, वाटपातील अडचणी आणि पळवाटा, वाटप करणाऱ्या यंत्रणेचे दोष—या सगळ्यातून हा माणूस गेलेला आहे. तरीही याने काही किमान भरीव यश मिळवून दाखविले. गावकऱ्यांना एकत्रित आणून, त्यांच्या नैतिकतेला आवाहन करून. दोन पाय आणि चिंतनात गढलेले डोके एवढेच स्वतःजवळचे भांडवल. काही प्रामाणिक कार्यकर्त्यांची साथ.

या उलट कबजेवाल्यांची स्थिती. प्रचंड प्रसिद्धी, पक्षसंघटना, हजारो कार्यकर्ते, अनुकूल लोकमत, सत्ताधाऱ्यांपैकीच एका गटाचे आतून प्रोत्साहन, निवडणुकीचे प्रलोभन—तरीही फलनिष्पत्ती काय ? मुठी जरूर उगारलेल्या. पण मुठीत काय ? रिकामी रिकामी.

म्हणून विनोबा म्हणतो : बेटे हो ! करून दाखवा, तर पाठिंबा. मी अहिंसेने थोडेफार केले. एकाकी होतो. तुम्ही सगळे मिळून, हिंसेने का होईना, काहीतरी करा तर खरे ! जे मजबूत असेल, टिकावू असेल.

भूमिक्रांतीच्या या आद्य प्रवर्तकाची या गदारोळात कुणालाही आठवण होऊ नये ?

— श्री. ग. मा.

# राज्यांविषयी बोलायचे झाले तर....

ब्रिटीश भारतातल्या साडे-सहाशे संस्थानांमुळे जेवढा ताप ब्रिटीशांच्या होम सेक्रेटरीला होत नसेल तेवढा मनस्ताप आजच्या दिल्लीश्वरांना स्वतंत्र भारतातल्या एकोणीस राज्यांमुळे होत असला पाहिजे. विशेषत: १९६७ च्या निवडणुकीनंतर सर्व राज्यांचे मिळून जे चित्र उभे राहिले ते विचित्र होते. जवळ जवळ अर्धी राज्ये काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांच्या हाती गेली होती आणि केंद्रस्थानी मात्र काँग्रेस पक्ष अशी स्थिती झाली. मध्यावधी निवडणुकीनंतर या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. पण १९६९ च्या काँग्रेसच्या दुफळीनंतर तर सत्ताधारी काँग्रेसची स्थिती अधिकच केविलवाणी झाली. कारण काँग्रेसचे दोन बालेकिल्ले गुजरात आणि म्हैसूर संघटना काँग्रेसकडे झुकले.

शिवाय १९६७ नंतरचे पाडापाडीचे राजकारण. 'आयाराम-गयाराम' यांचा सुकाळ. त्यामुळे १९५२ पासून १९६७ पर्यंतचा काळ राज्यसरकारांच्या दृष्टीने जेवढा स्थैर्याचा गेला त्यामानाने १९६७ नंतरची अस्थिरता भयास्पद आहे. अस्थिरतेचा शाप मुख्यत: पंजाब, हरयाना, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल आणि केरळ या राज्यांना लाभला आहे. १९६७ नंतर भारताचे राजकारण वेगाने वाहू लागले. घटना द्रुतगतीनें घडू लागल्या. राज्यांची मंत्रिमंडळे क्षणाक्षणाला पडू लागली.

म्हणून राज्याराज्यांतील धावत्या राजकारणाचा सम्यक आढावा मोजकेपणे घेण्याचा या स्तंभाचा प्रयत्न. देशातील बदलत्या राजकारणाचे प्रतिबिंब इथे न्याहाळायला मिळावे असा इरादा. प्रत्येक राज्याचा उल्लेख आलाच पाहिजे असा आग्रह नाही. चित्र काढताना ज्या ज्या राज्यांना स्पर्श करणे आवश्यक असेल त्याच राज्यांना हात लावू. एखादे वेळी एखादेच राज्य उठून दिसेल. कधी सर्वत्रच थंडा मामला. पण असे क्वचितच घडण्याचा संभव.

आजच्या घडीला हिमाचल हे नवे राज्य धरून एकूण एकोणीस राज्यांपैकी नऊ राज्ये सत्ताधारी काँग्रेसच्या ताब्यात आहेत. ती म्हणजे जम्मू-काश्मीर, हरयाना, हिमाचल प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, आंध्र, आसाम, मध्य-प्रदेश आणि बिहार. पैकी बिहार मंत्रिमंडळ अगदी कोसळण्याच्या टोकावर आहे.

उरलेल्या राज्यांपैकी उत्तर प्रदेशात भारतीय क्रांतिदलाच्या चरणसिंगांचे मंत्रिमंडळ सत्ता-काँग्रेसच्या पाठिंब्यावर आहे. गेले चार महिने सत्ता-काँग्रेसचे कमलापती त्रिपाठी, चरणसिंग भाक्रांदची माळ आपल्या गळयात घालतील या वेडया आशेने मान खाली वाकवून उभे आहेत. भाक्रांदने नव-काँग्रेसमध्ये विसर्जित

व्हावे असे कितीतरी प्रयत्न झाले. पण चरणसिंगांनी अद्याप दाद दिली नाही. ते भलतेच धूर्त निघाले. निघाले म्हणजे होतेच. या निमित्ताने नवकाँग्रेसला पुन्हा ते कळले. उत्तर प्रदेश म्हणजे भारताची छोटी प्रतिमा. देशाचे तिन्ही पंतप्रधान उत्तर प्रदेशातले. उत्तर प्रदेशात कुणाचे सरकार आहे यावर केंद्राचे भवितव्य. त्यामुळे १९७२ पर्यंत चरणसिंगांचे पाय ओढण्याचे अनेक प्रयत्न होतील.

पंजाबात अकाली दलाचे सरकार आहे. गेल्याच आठवडयात बादल सरकारला आडवे पाडण्याचे दोन प्रयत्न झाले. त्यातून ते जिवानिशी वाचले. त्यामुळे हा मजकूर छापला जाईपर्यंत ते खुर्चीवर असतीलच की नाही याची शाश्वती नाही.

गुजरातेतल्या हितेन्द्र देसाईंच्या जुन्या काँग्रेसच्या सरकारला सुरुंग लावण्याचे स्वतंत्र पक्षाचे प्रयत्न वाया गेले. उलट या प्रकरणामुळे स्वतंत्र पक्षालाच तडे गेले. म्हैसूरचे जुन्या काँग्रेसचे सरकार सॉलीड आहे.

बंगाल आणि केरळात राष्ट्रपतींची राजवट चालू आहे. केरळात मध्यावधी निवडणुकांसाठी अच्युत मेनन यांच्या उजव्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाने राजीनामा दिलेला आहे. स्वातंत्र्यानंतर केरळात तेरा मंत्रिमंडळे आली! सर्व पक्षांची मध्यावधी निवडणुकांसाठी जोरात तयारी चालू आहे. पण उजव्या कम्युनिस्टांना आत्मविश्वास आहे. निवडणुकांचे घोडामैदान दूर नाही. १७ सप्टेंबरचा दिवस ठरला आहे. लढत आहे उजवे आणि डावे कम्युनिस्ट यांच्यात.

बंगालच्या नक्षलवाद्यांनी हातबाँब फोडून आणि राष्ट्रध्वज जाळून परवाचा स्वातंत्र्य-दिन साजरा केला. बंगाल विधानसभा अखेर तीस जुलैला बरखास्त झाली. तिथेही आता मध्यावधी निवडणुका होतील. तेव्हा काय होईल हे काही सांगता येत नाही. कारण बंगाल हे सध्या अतिशय असुरक्षित राज्य होऊन बसले आहे. मार्क्सिस्ट कम्युनिटांनी अधिकारावर असताना नक्षलवाद्यांकडे दुर्लक्ष केले होते. आता तेच नक्षलवादी मार्क्सिस्टांची डोकी कापू लागले आहेत.

जुन्या काँग्रेसची दोन राज्ये सोडून दिली तर विरोधी पक्षीयांचे सर्वांत स्थिर सरकार म्हणजे तामीळनाडू मधील द्रविड मुन्नेत्र कळहम्‌चे. ओरिसाचे स्वतंत्रप्रणीत सरकारही तसे स्थिरच आहे. आंध्रमधील नवकाँग्रेस सरकारला तेलंगणवाद्यांची आणि नलक्षवाद्यांचीही कीड लागली आहे. पण सरकारला सध्या धोका नाही. मेघालयाला पोटात घेणारे नवकाँग्रेसचे आसाम राजकीय दृष्टया अद्याप स्थिर असले तरी १९७२ चे भविष्य नीट दिसत नाही. नागालँडचे सरकार नवकाँग्रेसशी जुळवून घेणारे. इंग्रजी ही सरकारी भाषा म्हणून स्वीकारणारे नागालँड हे एकमेव राज्य.

राज्यांचे हे चित्र कदाचित पुढच्या आठवडयापर्यंत कायमही राहील. पण कुणी सांगावे, दोन-तीन मंत्रिमंडळे दरम्यानच्या काळात गडगडतीलही (आजच्या राजकारणात असेच गोलमाल बोलण्याची पद्धती आहे. राजकीय भविष्य वर्तविणे धोक्याचे झाले आहे.)

— अरुण गोसावी

# कात्रणे । कात्रणे

## जोकर

स्वतंत्र पक्षाचे एक 'बहु सरस' पुढारी श्री. पिलू मोदी यानी मद्रास येथे बोलताना एक नवीन पिलू सोडले. त्यांचे म्हणणे—

"मध्यवर्ती सरकार हा एक चोपन पानी पत्त्यांचा जोड आहे. यात दोन 'जोकर' आहेत. इंदिरा गांधी हवी ती पाने टाकून डाव करतात त्याचे हे कारण आहे."

आज इतके दिवस झाले तरी विरोधी पक्षाची रमी लागत नाही. निजलिंगप्पा काँग्रेस,-स्वतंत्र-जनसंघ, जनसंघ-संसोपा-गप्पा काँग्रेस, संसोपा-डांगी कम्युनिस्ट-प्रसोपा, गप्पा काँग्रेस-संसोपा-नंबुद्रि कम्युनिस्ट, यातले काहीच जमत नाही. याचा अर्थ विरोधी पक्षात जोकर नाहीत असा नाही. हवे तेवढे आहेत. मिस्टर पिलू—'इंदिराबाईंचे जोकर देखील तुमच्या जोकर लोकांपेक्षा जरा बरे आहेत!' ◻

## एक सूचना

लोकसभेत हरिजन उद्धाराची नेहमी घनघोर चर्चा चालू असते. एका चर्चेत त्यागी यांनी समाजकल्याण उपमंत्री सौ. फुलरेणू गुहा यांना अशी सूचना केली—

"केंद्र सरकार आपल्या मंत्र्यांना घरात हरिजन स्वैंपाकी नेमावे असा आदेश देईल काय?"

काय हो हा प्रश्न! सौ. फुलरेणू संतापाने लाल झाल्या. त्यांच्या तोंडातून शब्द फुटेना म्हणून त्यांनी लेखी जबाब दिला—

"असले काही करण्याचा आमचा विचार नाही."

काही गोष्टी 'शिजवण्याकरता' इंदिराबाईंनी हरिजनमंडळी नेमलेली आहेतच. मुस्लीम लीगच्या लुंगीत शिरून जगजीवनराम हे नुकतेच घामाघूम होऊन–बाहेर आले. त्यांनी लगेच जाहीर केले–"मुस्लीम लीग ही 'जनसंघापेक्षा खूपच, म्हणजे खूपच चांगली आहे!" जनसंघ बदनामीचा कट शिजवण्याकरताच हा हरिजन स्वैंपाकी बाईंनी नेमलेला आहे, हे कसे श्री. त्यागी यांना समजत नाही! असली भलती सलती सूचना करून श्री. त्यागी हे हरिजन बंधूंची टिंगल तर करीत नाहीत? जगूबाबूंचे सोडा, बहुसंख्य हरिजन बंधूंच्या अंगावर आज पुरेसे वस्त्र नाही, आणि पोटात पुरेसे अन्न नाही, त्यांना बोलावून केंद्र सरकारने असे का विचारायचे–

"तुम्हाला पुरणपोळी करता येते का? पुलाव बिर्याणी जमते की नाही?"

मिस्टर त्यागी–"तुम्हाला पुनः मंत्री व्हायचे आहे की नाही? मग असले मंत्र्यांना पेचात टाकणारे प्रश्न एकदम बंद करा बुवा!" ◻

## सर्व्हे

सुशिक्षित स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या. संख्या दिवसेदिवस वाढत चालली. अर्थात त्यांचा 'सर्व्हे' करण्याचा उद्योग कुणीतरी केलाच पाहिजे. 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस' आणि 'दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्क' या संस्थांनी नुकताच या स्त्रियांचा 'सर्व्हे' केला. काही गंमतीदार निष्कर्ष यातून निघाले आहेत.

१: विवाहीत स्त्रिया, या अर्धवेळेच्या–पार्ट टाईम–नोकऱ्या पसंत करतात, हा गैरसमज आहे. त्या पूर्ण वेळ बाहेर राहणेच पसंत करतात!

२: ७० टक्के आजोबा-आजी, या सुनांना व मुलींना नोकरी करायला मदत करतात.

३: नोकरी करणाऱ्या स्त्रिया या मुलांची आबाळ करतात असा जो समज होता तो पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. (नवऱ्याची आबाळ करतात किंवा नाही हे मुळी तपासण्यातच आले नाही!)

सर्वात आश्चर्यजनक माहिती बाहेर आली ती म्हणजे नोकरी करणाऱ्या स्त्रियांपैकी फक्त ५ टक्के स्त्रियांनी 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज'मार्फत नोकरी मिळवल्याचे आढळून आले. ९५ टक्के या केवळ स्त्रीदाक्षिण्यामुळे नोकरीत शिरल्या आहेत. समस्त पुरुष वर्गाचा यापेक्षा मोठा गौरव तो कोणता?

नोकरी करणाऱ्या स्त्रियांत ६५% हिंदू, व उरलेल्या पस्तीस टक्क्यांपैकी २०% कॅथालिक, ५% शीख,...असले तरी मुसलमान स्त्रिया मात्र जवळ जवळ नाहीत! मुसलमान भगिनींना या क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी मुसलमान बंधू का आग्रह धरीत नाहीत बुवा? मुस्लीम लीगचे महंमद कोया, फक्रुमियाँ, रझाकार युनूस सलीम यांनी ही गोष्ट मनावर घ्यावी. सोयिस्करपणे डोक्यावर 'बुरखा' घेणे काही चांगले नाही.

– सेना महाराज



# येथे नांदतात श्रमर्षी

दिवाकर आगाशे

३१ मे १९६९ : सरनाईकचे पत्र आले. एम्. डी. नें शाळेसाठी केलेला अर्ज नामंजूर केला गेला. त्यासंबंधी प्रयत्न करावा.

२० जुलै १९६९ : जयसिंगराव यांनी खटपट करून परवानगी मिळविली. अपील यशस्वी झाले. परंतु भडगाव बुद्रुक ऐवजी खुर्दसाठी परवानगी मिळाली.

१९ नोव्हेंबर १९६९ : सरनाईक यांची पुणे कॅम्पमध्ये भेट झाली. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत भडगाव येथे श्रमशिबिर घेऊन शाळेची इमारत बांधावी असे ठरले. सर्व व्यवस्था नीट होईल अशी खात्री सरनाईकांनी दिली.

२३ डिसेंबर १९६९ : लीना व गुनवर यांना कोल्हापूरला घ्यावयास येतो असे सरनाईकांचे पत्र आले. या परदेशी पाहुण्यांच्या हस्ते कोनशीला समारंभ करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. याशिवाय कुडाळ येथे या परदेशी पाहुण्यांचा सत्कार समारंभ निश्चित केला आहे व त्याच्या आमंत्रण पत्रिकाही रवाना केल्या आहेत.

२ जानेवारी १९७० : राधानगरीकडील रस्ता अतिशय खराब आहे. त्या रस्त्याची जाणीव सरनाईकांनी द्यावयास हवी होती. परंतु त्यांना काय दोष देणार ? मोटारची माहिती असणाराच हे समजू शकतो. मोठ्या मुश्कीलीने प्रवास झाला. चॅनेल पत्र्याची असल्याने सडून गेली होती. रतलामला केलेले वेल्डिंग ठीक असले तरी त्या वेल्डिंगच्या बाजूला दीड, पावणेदोन फूट पत्रा चिरला गेला. डावे समोरचे चाक वर लोटले गेले. वाईट रस्ता सुरक्षित पार पडला. परंतु फोंड्यानंतर चेंबरला दगड लागले. नशीबाने ऑईल गळू लागताच लक्षात आले. डोक्यावर भयंकर ताण होता. गुनवरचा मऊ साबण व कपड्याची चिंधी एकत्र कुटून पडलेल्या चिरेवर दाबून बसविली व जाड चिंधीने लेप पक्का बांधून ठेवला. ऑईल गळणे बंद झाले पण मोटार विववण्याला पोचेपर्यंत जिवात जीव नव्हता. तीन वाजता कुडाळला सभा आहे असे मला वाटत होते. पण सरनाईक ३॥ म्हणत बसला व शेवटी अर्धा

दिवाकर आगाशे हे नाव ' माणूस 'च्या वाचकांना अपरिचित नाही. सोमनाथच्या जंगलातून प्रथम ते ऐकू आले.
गेली कित्येक वर्षे बुलढाण्याला राहून युवकांमध्ये विधायक वृत्तीची जोपासना करण्याचे कार्य आपल्या शिक्षणसंस्थेच्या आवारात राहून ते करीत होते.
हे कार्यक्षेत्र पुढे त्यांना अपुरे वाटू लागले व अलीकडेच त्यातून ते मोकळे झालेले आहेत. सध्या महाराष्ट्रात सर्वत्र त्यांचा दौरा सुरू आहे. या वर्षाच्या मे महिन्यात दक्षिण कोकणात कसाळ येथे त्यांच्या प्रेरणेने एक श्रमशिबिर आयोजित झालेले होते. या शिबिराची एक दैनंदिनीही त्यांनी ठेवली होती. महाराष्ट्रभर विखुरलेल्या विधायक कार्यकर्त्यांना त्यातून घेण्यासारखे पुष्कळ सापडेल या विश्वासाने ती येथे एका हप्त्यातच दिली आहे.

---

तास उशीरा सभेला पोचलो. सभा चांगली रंगली. पाश्चिमात्य राष्ट्रातील युवकांच्या घोर समस्या गुनवरने मांडल्या. याला पायबंद घालण्यासाठी आपण काय करू शकतो व त्यासाठी प्रायोगिक प्रकल्प कुडाळला कसा घेता येईल याचे चित्र मी रंगविले. परिणाम फार चांगला झाला. रात्री वेंगुर्ल्याला पोचावयास उशीर झाला. पण वेल्डिंगची सोय आहे असे कळले. तेव्हा हायसे वाटले. दिवसभर जेवण नव्हते. तेव्हा रात्री पाहुण्यांना लवकर रेस्टहाऊसवर पोचवावे व जेवणाची व्यवस्था करावी असे म्हणताच सरनाईक चिडला व स्वतःही दिवसभर जेवलेलो नाही असे त्याने म्हटले. मी गप्प बसलो.

**३ जानेवारी १९७० :** सकाळी वेंगुर्ल्याच्या कॉलेजमध्ये मुलांनी गडबड करण्याचा प्रयत्न केला. माझ्या भाषणात भारतीय तरुण स्वाभिमान विसरून भीक घेण्याला कसे प्रवृत्त झाले आहेत व पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करण्यात कसे भूषण मानतात, यावर बेरहम हल्ला चढवला. त्याचा परिणाम चांगला झाला. कार्यक्रमानंतर गडबड करणाऱ्या युवकांचा गट मुद्दाम येऊन भेटला व योग्य मार्गदर्शनाचा अभाव कसा आहे यासंबंधी चर्चा करू लागला. विधायक काम करण्याची या गटाची इच्छा दिसली. दुपारी कसाळला जाऊन मग भडगावला गेलो. कसाळला मातीच्या भिंती न बांधता चिऱ्याच्या भिंती घ्याव्या. मूत्रापासून हिराखत करावे व भाजीपाल्याची

लागवड करावी असा कार्यक्रम विचारात घेतला गेला. मुलांनी मदत करावी असे त्यांनाही आवाहन केले. पण फारसे काही घडेल असे वाटले नाही. भडगावला कार्यक्रमास दीड तास उशीर झाला. पण लोक वाट पहात होते. ढोल, तुतारी, ताशा, आपटबार यांची धमाल होती. गुनवरने विद्यानगर पाटीचे अनावरण केले. सभापती दीड तास वाट पहात असलेले पाहून मला आश्चर्य वाटले. स्थानिक कार्यक्रम पत्रिका पाहिली. त्यात सभापतींना संपूर्णपणे वगळण्यात आलेले दिसले. मी कायदा हाती घेऊन कार्यक्रमपत्रिकाच बदलली व सभापतींना आशीर्वादपर भाषण देण्यास सांगितले. त्याचा इष्ट परिणाम झाला. सभापतींनी भाषणात सांगितले की, ते या कार्यक्रमाला विरोध करणार होते. कारण कार्यक्रम घेणारे त्यांच्या पक्षाचे नाहीत. 'परंतु आता या प्रयोगामागे असलेली कल्पना मला अतिशय आवडली आहे. कालच्या सभेतील विचार ऐकल्यावर हे काम देवाचे काम आहे असे मला वाटले. म्हणून आज पूर्वनियोजित अशा महत्त्वाच्या सभेला न जाता मी येथे दीड तास वाट पहात राहिलो.'

राजकीय पुढारी विधायक कामाकडे दुर्लक्ष करतात, राजकारण अगदी हीन दर्जाचे आहे, असा एक सूर सभेमध्ये उमटला. त्यावर बोलत असताना, राजकारण हे समाजजीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. राजकीय पुढारी काम करीत नाहीत याला आपणच जबाबदार आहोत. आपणच तशी परिस्थिती निर्माण करतो. तेव्हा राजकीय पुढाऱ्यांना दोष न देता आपल्याबरोबर घेतले पाहिजे, असा विचार मी मांडला. त्याचा परिणाम वातावरणातील ताण कमी होण्यामध्ये झाला.

**३ एप्रिल १९७० :** कोल्हापूरला मी पोचलो. परंतु सरनाईक पोचलेच नव्हते. सरनाईकांच्या वडिलांनी खूप प्रेमाने स्वागत केले. दुपारी सरनाईक आले. आम्ही शहांकडे गेलो. त्यांना घेऊन आंतरभारती विद्यालय व तेथून देशभूषण विद्यालय. बरीच चर्चा झाली. अनाथ मुलांना पालक मिळविण्याची योजना नक्की करून निवेदन काढले. अनेक लोकांच्या भेटी झाल्या. कसाळचे पाटील हेडमास्तर पण आले होते. संध्याकाळी कोल्हापूरहून कसाळला जावयास निघालो. गाडी लेट झाली. त्यामुळे सरळ कुडाळला गेलो.

**५ व ६ एप्रिल १९७० :** सकाळी बिबवण्याला गेलो. तेथे सर्व लोक कामात दंग होते. शिबिराच्या खर्चासाठी सरनाईकने नाटक बसविले होते. बसण्याच्या सोयीसाठी श्रमदान चालले होते. फ्लॅट्स् रंगविले जात होते. परंतु एन्. डी. एस्. इन्स्ट्रक्टर कडक इस्त्रीचे कपडे घालून उभा होता. नॅरोकटची पॅंट व निमुळत्या टोकाचे बूट घालून हातातील काठी फिरवीत इन्स्ट्रक्शन देत होता. माझे डोके भयंकर भडकले. कारण श्रमदान सोडून त्याने एका मुलाला खुर्ची आणावयास सांगितले व तिच्यावर तो स्टाइलमध्ये बसून राहिला. दुपारी भडगावला गेलो. भडगावची मुले उन्हात लांबून पाणी आणीत होती. खूप काम करीत होती. एम्. डी. शी चर्चा

केली. केवळ इमारत बांधकाम हे आपले ध्येय नसून इथे एक नवीन प्रयोग करावयाचा आहे, असे त्याला म्हणालो. माध्यमिक शाळेपलीकडे त्याची दृष्टी नसावी असे वाटले. केवळ मी येणार या धाकाने जानेवारीत खोदलेला पाया गेल्या दोन दिवसात भरला गेला, असे सरनाईक म्हणाले. एम. डी. काही करू शकणार नाही. व त्यामुळे आपल्याला फार त्रास होत आहे असे सरनाईक म्हणाला. मग कसाळला गेलो. तेथे उत्साह दांडगा होता. पाया खोदून झाला होता. प्लिथ बांधावी असा पाटलांचा विचार होता. परंतु बांधकाम नंतर करता येईल. प्रथम चिरे तासून घ्या. व सर्व फोर्स त्यावर लावावा, असे मी सुचविले. फर्नांडिस नावाचा खूप म्हातारा गवंडी बरा वाटला. त्याला फर्नांडिस काका म्हणून जवळ घेतले. मोठेपणा दिला. तो फार खूष दिसला. रात्री पाटलांच्या खानावळीत फक्कड जेवण मिळाले. रात्रीच्या वेळी गाडीने मुंबईस निघालो. शहा उद्या परत जाईन म्हणाले.

**२५ एप्रिल १९७० :** सरनाईकचे पत्र आले. भडगावचे लोक कामास तयार नाहीत. पैशाची व्यवस्था होत नाही. म्हणून भडगावला प्रोजेक्ट व परिसंवाद रद्द केल्याचे त्याने कळविले. संस्थेत खळबळ उडाली व एक प्रकारचा नर्व्हसनेस आला. पैशासाठी सहकाऱ्यांना म्हटले. गफार, ताई, शशी यांनी एक एक हजार रुपये दिले. ऐनवेळी वाहनाची व्यवस्था व्हावी म्हणून खूप खटपट केली. पण यश आले नाही. संध्याकाळी स्कूटरने निघण्याचा प्रयत्न केला. पण स्कूटरनेही धोका दिला.

**२७ एप्रिल १९७० :** सकाळी पावणेसातच्या गाडीने बुलढाणा सोडले. प्रवास कंटाळवाणा झाला. ८॥ ला कुर्डुवाडीला आलो. उजव्या पायाला त्रास होत होता. रात्री शाळेवर जाऊन टॉर्चच्या सहाय्याने शाळेची जुनी इमारत पाहिली. रात्रीची गाडी पकडून मिरजेकडे निघालो. जाण्यापूर्वी बाबुराव व शेंडे यांच्याशी शाळेतील एकूण वातावरण कसे असावे याची स्टेशनवर चर्चा झाली.

**२८ एप्रिल १९७० :** गाडी उशिरा पोचली. बस पकडून सांगलीला गेलो. एका सायकल दुकानवर सामान ठेवून माधवनगरला गेलो. शांतिनिकेतन संस्था पाहिली. १५ लाख रुपये या संस्थेला मिळाले आहेत. कार्यकर्त्यांची भाषा डौलदार होती. परंतु फॅसीलीटीजच्या मानाने कामाला पल्ला नव्हता. दात व चणे याचा न्याय शेवटी खरा. परत आलो. कॅन्टीनमध्ये जेवलो. कोल्हापूरची गाडी पकडली. कोल्हापूरला लगेच सायकल घेऊन मुडबिद्रीकरांना शोधले. मातृसेवासंघाने ऐनवेळी पाय मागे घेतल्यामुळे तेथील कार्यकर्ते फार नाराज दिसले. मुडबिद्रीकरांची भेट झाली नाही. शहाला मागे ठेवून कसाळची गाडी पकडली. गाडीला उशीर झाला. सरनाईक नुकताच कुडाळला गेला होता. रात्री १०॥ ला शाळेवर व तेथून भरमगोंडा सरांकडे पोचलो. पाटील हेडमास्तरांची भेट झाली. त्या लोकांचा उत्साह दांडगा व तयारी जोरात होती.

**२९ एप्रिल १९७० :** सकाळी कुडाळला जावयास निघालो. बस मिळेना. एका

टॅक्सीत जाण्याचा प्रयत्न केला. तर ड्रायव्हरने कुडाळला जाणाऱ्या एका बसमध्ये बसवून देऊन स्वत: पोबारा केला. शेवटी ११ वाजता कुडाळला पोचलो. सरनाईक बिबवण्यात आहेत असे कळल्यावरून बिबवण्याला गेलो. पण ते शाळेत नव्हते. ते कुडाळला गेल्याचे कळले. म्हणून स्टँडवर परत आलो. एकूण चिन्हे ठीक दिसत नव्हती. तेवढ्यात सरनाईकांची एक विद्यार्थिनी आली. तिने मला पूर्वी शाळेत पाहिले होते. तिने सरनाईक गावात जेवायला गेल्याचे सांगितले व एक मनुष्य बरोबर दिला. अर्धा मैल चालल्यावर त्या घरी पोचलो व आमंत्रण लावून जेवायलाही बसलो. जेवण झाल्यावर सरनाईकला घेऊन बाहेर पडलो. शिबिर बंद करता येणार नाही, ते योग्य नाही असे सांगितले. आपण स्वत: काही करू शकत नाही असे सरनाईकने सांगितले. मग कुडाळला आलो. जयसिंगांची भेट झाली. चिरेवाल्या कॉन्ट्रॅक्टरला भेटलो, त्याने चिरे टाकण्याचे कबूल केले. मग जयसिंगरावांना घेऊन भडगावला गेलो. तेथील लोकांना भेटून तयारीला लागण्यासंबंधी सांगितले. एम. डी. ची भेट झाली नाही. त्याला निरोप ठेवला. त्याला बोलावून काहीही उपयोग होणार नाही असे सरनाईक म्हणाले. संध्याकाळी कसाबसा मुक्कामावर गेलो.

**३० एप्रिल १९७० :** दृक्श्राव्य विभागाची गाडी आली. त्यातील लोकांना घेऊन भडगावला जाऊन आलो. अबोलीच्या फुलांचा सुंदर हार पाहिला, कुरेशीला आवडला. त्याला साइट फार आवडली. पण कॅमेरा नादुरुस्त झाला. त्यामुळे विशेष काही करता आले नाही. जयसिंगरावांना कोल्हापूरला जावे लागले. व सरनाईक भडगावला यायला तयार नव्हता. त्यामुळे काळजी थोडी वाढली होती. परंतु संध्याकाळी कसाळला शिबिरार्थी यावयास सुरुवात झाली आणि मन उल्हसित झाले. रात्री जेवावयास गावात गेलो. दृक्श्राव्य विभागातील लोकांशी सख्य वाढले. रात्री झोपायला १२ वाजून गेले.

**१ मे १९७० :** सकाळी ४ ला उठलो. ५ ला शिबिरार्थींना उठविले. ६ ला प्रार्थना घेतली व ६॥ ला प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. वातावरण उत्साहाचे होते. पण कामाची खात्री नव्हती. बांधकाम, टेरेसींग, खोलीत भरती घालणे ही सारी कामे एकदम सुरू केली. थोडा गोंधळ होत होता. पण हलके हलके पकड जमू लागली. ८॥ वाजता नास्ता दिला. ९ वाजता काम सुरू केले. १० वाजता सभापतींच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. ७ वर्षाचा हर्षवर्धन व ८ वर्षाचा राजू हे ज्या जोशात काम करीत होते ते पाहून सभापतींच्या मनावर फार परिणाम झाला. ११ ते १२॥ पुन्हा काम झाले. स्थानिक गवंडी सहा होते. दिवसभरात त्यांनी ३७५ चिरे लावले. आमच्याबरोबरचे दोघेजण होते. त्यांनी ४५० चिरे लावले. आमच्या गवंड्यांच्या कामात दोष आहे, इमारत कच्ची बनेल, सिमेंट जास्त खर्च होते अशा प्रकारच्या अनेक वार्ता स्थानिक गवंड्यांनी व्यवस्थापक मंडळापर्यंत पोचविल्या. पण पहिला दिवस तरी विचार करायला फुरसत नव्हती.

दुपारी ४ ते ७ मे काम झाले. काम बरेच उठले आहे. विश्वास वाढत आहे. रात्री शिबिरार्थींची व नंतर शिक्षकांची सभा झाली. एकूण कामाची चर्चा झाली. दिशा ठरली. रात्री झोपायला १२ वाजले.

२ मे १९७० : सकाळी ६। ला प्रार्थना झाली. ६।। ला काम सुरू झाले. ८।। ला नाश्ता. ९ ला काम सुरू झाले. १२।। ला संपले. स्थानिक गवंडी विशेष सहकार्य देत नाहीत. व्यवस्थापक मंडळाचे सदस्य आले. ४०० चिऱ्यांना १२-१२।। पोती सिमेंट लागते असे ते म्हणाले. आम्हाला १३ पोती लागली होती. तेव्हा सिमेंट जास्त लागते. हे म्हणणे खोटे ठरले. शिवाय स्थानिक गवंड्यांना ४०० चिरे बसवायला ४८ रु. लागले असते. याऐवजी १६ रुपयात हे काम झाले. यामुळे सिमेंट थोडे जास्त लागले तरी नुकसान नाही. दुपारी ४ ते ६।। काम झाले. रात्री करमणुकीचा कार्यक्रम झाला. शिबिरार्थींचा विश्वास वाढतो आहे.

३ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम झाले. स्थानिक गवंडी कामावरून दूर झाले. ते केवळ चिरे तासण्याचे काम करीत आहेत. दोन गवंड्यांच्या भरंवशावर काम झपाट्याने उठत आहे. चिऱ्याची सवय नसल्यामुळे मुलांच्या हाताला कापले जात आहे. त्रास होतो आहे. परंतु हाताला फडके बांधून मुले जोरात काम करीत आहेत. दुपारच्या काळात विश्रांती न घेता काजूची बोंडे, करवंदे व जांभळे यावर धाड घातली जात आहे. कुर्डुवाडीच्या मुली फारसे काम करू शकत नाहीत, त्यांच्या जेवणावर खर्च मात्र होतो, अशी तक्रार स्थानिक व्यवस्थापकांनी केली. पैसे आम्ही भरू, परंतु मुलींना या विचाराचा स्पर्श होऊ दे हे आर्ग्युमेंट उपयोगी ठरले नाही. त्या मुलींना अपमानास्पद वागविले जात आहे. पण एकूण कार्यक्रम पार पाडावयाचा असल्यास सबुरीने घेतले पाहिजे असे ठरवून मी व शहा गप्पा बसतो आहोत. पण हलके हलके शहावरही टीकेचा रोख वळत आहे. मुलींच्या कामात मात्र सुधारणा होत आहे. बुलढाण्याच्या शिबिरार्थींची इतरांशी तुलना करून दर्जा ठरविला जात आहे. पण बुलढाण्याच्या लोकांची तयारी पूर्वनियोजित आहे.

४ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम झाले. परंतु क्युरेशी कॅमेरा दुरुस्त करून परत आला. त्याला घेऊन ओरस आणि मी भडगावला जाऊन आलो. त्यात दुपारचा सारा वेळ गेला व जेवणही मिळाले नाही. ओरसचा वाडा प्रचंड आहे. १८०'×१५०' एवढ्या अवाढव्य इमारतीचा फारसा उपयोग नाही. भिंती ३।।' ते ४' रुंद आहेत. भोवताली हिरवेगार आहे. तेथे अमृत कोकम मिळाले. त्याचा रंग खूप बहारदार होता. तिथे कोकणच्या प्रचंड संपत्तीचे व सौंदर्याचे दर्शन झाले. वेगवेगळे शॉट्स घेतले. रात्री अचलपूरची १४ मुले व २ शिक्षक आले. त्यामुळे शिबिरार्थींची संख्या ९० झाली. खारेपाटणची मुले चांगले काम करतात. तेथील शिक्षक काळे पत्नींची तब्येत ठीक नसल्याने परत जाणार होते. परंतु त्यांचा पाय निघत नव्हता. खारेपाटणचा नारायण तर आमच्यातलाच झाला आहे. कुर्डुवाडीच्या मुलींविरुद्ध टीका

तीव्र होत आहे. पण त्यांच्या कामात झपाट्याने सुधारणा होत आहे.

**५ मे १९७० :** नेहमीप्रमाणे काम चालले आहे. जसजशी भीतीची उंची वाढते आहे, तसतसा वेग कमी होईल असे वाटत होते. परंतु कालच्यापेक्षा आजचे काम अधिक होत आहे. मुले थकण्याऐवजी त्यांचा उत्साह वाढतो आहे. अचलपूरचे शिक्षक काम टाळून कुडाळला भटकत होते. त्यांची मुलेपण कामाची टाळाटाळ करीत होती. मी त्यांच्यावर खूप तापलो.

**६ मे १९७० :** काम पूर्ण करण्याकरिता शिकस्त केली. पण चिरेच संपले. आज मुलांनी जिद्दीने १० तास काम केले. दुपारी गाणी म्हणत काम झाले. भिंत खूपच उंच होती. शेवटी चांदईचे (गेबल) काम होऊ शकले नाही. रात्री भडगावला जावयाचे होते. मुले तयार होऊन बसली. खारेपाटणचा नारायणही येतो म्हणाला. रात्री ११ नंतर ट्रक आला. टिकाव, फावड्यापासून सामान घेतले व १२॥ ला भडगावला पोचलो. रात्री झोपायला १॥ वाजला. ट्रकमध्ये मुले गात होती. जयसिंगराव व क्युरेशी बरोबर आले आहेत. क्युरेशी आमच्यापैकीच एक झाला आहे.

**७ मे १९७० :** मुलांना सकाळी ४॥ ला उठविले. चहा बनवायला उशीर झाला. सामान घेऊन साइटवर आलो. बरोबर सहा वाजले होते. परंतु स्थानिक कुणीच आले नव्हते. रात्री सामान जमविण्यात त्यांना उशीर झाला होता. ते लोक सकाळी चारला झोपले होते. पाण्याला बादल्याही नव्हत्या. आम्ही लेव्हल पाहिली. त्यात एक फुटापेक्षा जास्त फरक होता. नऊला ओव्हरसियर आले व काम होणार नाही म्हणाले. वातावरण तंग होते. मीही नर्व्हस झालो. इमारत पडेल असे त्यांचे मत. त्यांच्या शंकेला उत्तर देणे कठीण होते. पाया बरोबर ठोकलेला नाही हेही खरे आहे. पण इमारत झाली नाही तर यंदा शाळा भरणार नाही व ती कायम बंद पडेल असे वाटते. इमारत बांधायचा निर्णय घेतला. लेव्हल केली. ११॥ ला काम सुरू झाले. मुलांनी जिद्द बाळगली आहे. चिऱ्यांच्या बांधकामाचा थोडा अनुभव आलेला आहे. त्यामुळे कामाला गती चांगली आली आहे. रात्री पेट्रोमॅक्स लावून काम झाले. आज ९६० च्यावर चिरे बसले.

**८ मे १९७० :** आज कामाची धमाल झाली. दिवसभरात ८१० चिरे बसले.

आजही १० तास काम झाले. खिडक्या व दरवाजे बसवून एवढे काम हा एक विक्रमच म्हटला पाहिजे. रात्री जेवण झाल्याबरोबर आवराआवर करून ट्रकने कसाळला परत आलो. येताना मुलांची मने खूप उल्हसित होती. परत आल्यावर कळले की सरनाईक आणि इतर मंडळींनी गेबलचे काम पूर्ण केले होते. एक चिरा वरून पडला. तो सरनाईकपासून ६" अंतरावर पडला. थोडक्यात बचावले. अन्यथा सर्व प्रयोगावर पाणी फिरले असते. मुलांना काम जमणार नाही, या स्थानिक मताला पुष्टी मिळाली असती. पण दैव बलवत्तर. कुर्डुवाडीच्या मुलींच्याबाबत

मात्र प्रकरण अगदीच ठिगळले. त्यावरून बोलाचाली पण झाली. यामुळे सर्व कार्यक्रमावर एक प्रकारची सावली पडत असे. पण त्याला उपाय नव्हता.

**९ मे १९७० :** सकाळी एक तास श्रमदान व नंतर चर्चा घ्यावयाचे ठरले. परंतु साईट साफ करण्यातच खूप काम पडले. मुंबईची मंडळी आली. सावंत यांना भेटण्यासाठी कुडाळला गेलो. भडगावला तयारी नव्हती. इमारतीऐवजी इतर कार्यक्रम आयोजित करावयास हवा होता. टॅक्सी घेतली. मी व जयसिंगराव भडगावला गेलो. नारळाच्या खड्ड्यांची जागा निश्चित करून दिली. ट्रॅक्टरला कामाला लावले आणि परत कुडाळला गेलो. सावंतांना घेऊन भडगावला आलो. सर्व योजनेत त्यांनी रस घेतला. जवळजवळ दोन ते अडीच तास कार्यक्रम चालला. कोकणचा विकास व त्यातील शेतकीचे महत्त्व यावर ना. बाळासाहेब सावंत अप्रतीम बोलले. तेथून कसाळला आलो. कसाळचा कार्यक्रमही छान झाला. या परिसंवादातून शाळा समाजकेंद्र कशा बनवाव्या याची योजना आखण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिबिरार्थींना वैयक्तिकरित्या भेटले. दिल्लीच्या प्रभातशोभा पंडित परिसंवादाकरता आल्या. परंतु त्यांची योग्य व्यवस्था स्थानिक लोकांना करता आली नाही.

**१० मे १९७० :** सर्व दिवस युवक कार्यकर्त्यांच्या परस्पर सहकार्याची आवश्यकता कशी आहे, व युवक कार्यक्रमासाठी नवे तंत्र वापरणे कसे आवश्यक आहे याची सविस्तर चर्चा झाली. प्रभातशोभा पंडित फार चांगल्या बोलल्या. राष्ट्र उत्थानाच्या एकूण कार्यक्रमात शिक्षकांचे अनन्य साधारण स्थान कसे आहे हे त्यांनी सांगितले. प्रत्येक कार्यक्रमाला निश्चित उद्देश व तात्विक बैठक अतिशय आवश्यक आहे हे त्यांनी आध्यात्मिक पार्श्वभूमीवर मांडले. वेगवेगळ्या संस्थांना काय कार्यक्रम घेता येईल याची चर्चा झाली. युवकांचा गट वेगळा बसला. आपल्याला काय हवे आहे यावर त्यांनी चर्चा केली. दुपारी युवक प्रगती सहयोगाच्या कार्यक्रमाची चर्चा झाली. गोव्याचे र. वि. पंडित व प्रभातशोभा पंडित यांना भडगावचा साइट दाखविला. तेथील प्रचंड सुप्त शक्ती पाहून त्या अतिशय हरखून गेल्या. दुपारच्या वेळात विविध संस्थांनी कार्यक्रमासंबंधी आपापल्या कल्पना मांडल्या. प्रभातशोभा पंडित रात्री गेल्या. कमलताईपण त्यांचेबरोबर गेल्या.

**११ मे १९७० :** आज मे. साळवी येणार होते. पण आले नाहीत. त्यामुळे सर्वांचा विरस झाला. सकाळी युवक प्रगती सहयोगाच्या नवीन कार्यकारीणीची निवड झाली. शहाच्या रागावर सरनाईकने आपले नाव मागे घेतले. दुपारी समारोपाच्या कार्यक्रमाला सभापती येऊन गेले. पण कशातच राग नव्हता. शिक्षणाधिकारी चर्चेत भाग घेऊन गेले. त्यांनी अशा उपक्रमांना मनःपूर्वक सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. कोल्हापूर व सोलापूरची मंडळी परत गेली. संध्याकाळी उदास

**पृष्ठ ६० वर**

रविंद्र पिंगे

# गोदाराणीच्या स्मृतिलहरींचे प्रकाशन

परवा मुंबईत एक देखणा प्रकाशनसोहोळा झाला. साहित्यसंघाचं पुरंदरे सभागृह श्रोत्यांनी तुडुंब भरलं होतं. खरं म्हणजे अलीकडे संघमंदिरातला प्रत्येक सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कार्यक्रम अतिशय यशस्वी होतो. तशात, 'मौज' प्रकाशनासारखी प्रथम श्रेणीची संस्था यजमानपद भूषविती झाली की गर्दीला सुमारच रहात नाही. कारण मराठी साहित्यात 'मौजे'ची म्हणून एक अलग व्यक्तित्वसंपन्न अशी मुद्रा आहे. उच्चभ्रू म्हणून कुणीही कितीही कुजवूज केली, तरी तिच्या गुणवत्तेकडे डोळेझाक करता येण्यासारखी नाही. त्यांचे म्हणून काही आग्रह आहेत. प्रसंगी तत्कालीक आर्थिक धोका पत्करूनही इभ्रत वाढवणारं लेखन शानदार थाटात प्रसिद्ध करणं, हा त्यापैकी एक आग्रह. अशा 'मौज' प्रकाशनाने श्रीमती गोदावरीबाई परुळेकर ह्यांनी लिहिलेल्या ठाणे जिल्ह्यातल्या वारल्यांच्या बंडाच्या हकीकतीचा प्रकाशन समारंभ म. म. दत्तोपंत पोतदारांच्या शुभहस्ते पार पाडला. आत्मचरित्रात्मक असलेल्या ह्या ग्रंथाचे नाव आहे, 'जेव्हा माणूस जागा होतो.' मूल्य रुपये पंधरा.

गोदावरीबाई ह्या भाई शामराव परुळेकरांच्या सहचारिणी. कै. शामराव हे नामदार गोखल्यांच्या भारत सेवक समाजाचे सर्ववेळ कार्यकर्ते. वैचारिक बैठकीने ते कट्टर मार्क्सवादी. कम्युनिस्टांचे सहप्रवासी. दलितांच्या सेवेचं त्यांनी जणू असिधारा व्रतच घेतलं होतं. त्यांच्या अर्पित ध्येयवादी जीवनाशी पुण्याच्या गर्भश्रीमंत गोखले वकिलांच्या घराण्यातल्या गोदावरीबाई एकरूप झाल्या. शामरावांबरोबर त्यांनीही दलितांच्या सेवेचं व्रत स्वीकारलं. बेचाळीस सालच्या कारावासानंतर ह्या दांपत्याने शेतकऱ्यांमध्ये काम करायचं ठरवलं. भूमी कसणारा खेडूत शेतकरी हा राजकीय दृष्ट्या जागृत झाला पाहिजे आणि अशा जागृत शेतकऱ्यांची स्वतःचे हितसंबंध धसाला लावण्यासाठी लढाऊ संघटना असायला हवी अशी त्यांची श्रद्धा होती. महात्मा गांधींनी शेतकऱ्यांना जागृत केलं स्वातंत्र्यकारणासाठी. प्रत्यक्षात मात्र भारतीय खेडूत शेतकरी हा स्वकीयांच्या हातीच गुलामीचं जिणं

जगत होता. स्वतःच्या दास्यविमोचनासाठी त्याला राजकीय पातळीवर संघटित करण्यासाठी पंचेचाळीस सालापर्यंत परुळेकर मंडळींनी शेतकऱ्यांमध्ये पायाभरणीचं काम केलं. पंचेचाळीस साली त्यांनीच पुढाकार घेऊन 'महाराष्ट्र प्रांतिक किसान सभे'चं पहिलं अधिवेशन भरवलं. त्यानिमित्ताने प्रचारकार्यासाठी ठाणे जिल्ह्यातल्या तळासरी, डहाणू, जव्हार वगैरे आदिवासी रहात असलेल्या जंगली मुलूखात फिरत असताना मग्रूर जमीनदार, क्रूर बागाईतदार आणि बेमुर्वत जंगलमक्तेदार ह्यांच्या तिहेरी पिळवणुकीमुळे अमानुष जीवन जगणं भाग पडलेला वारली हा आदिवासी समाज त्यांच्या दृष्टीस पडला. मग परुळेकर पतिपत्नींनी त्याची दास्यविमुक्ती हेच आपले कार्यक्षेत्र मानले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली वारल्यांनी सशस्त्र गनिमी लढा दिला. त्या लढ्यातल्या काही रोमहर्षक हकीगती गोदाबाईंनी पुस्तक प्रकाशनाच्या वेळी सांगितल्या. वारल्यांजवळ माणुसकी कशी उच्चकोटीची आहे, रानातले कंद खाऊन ते कसे नाइलाजाने नशेत रहातात, अन्नाला त्यांना कसे पद्धतशीरपणे महाग केले जाते, हे बाईंनी स्वानुभवाने सांगितले. वारल्यांच्या बंडाच्या वेळी सरकारने चहूबाजूंनी सशस्त्र सैन्य पाठवले. पण जंगलवाटांची अचूक माहिती असलेल्या वारल्यांनी पंधरा पंधरा दिवस त्यांना निबिड रानात कसा आश्रय दिला आणि हिकमतीनी त्यांचे संरक्षण कसे केलें तेही त्यांनी विषद केले. वारली समाजाला गनिमीकाव्याची जणू उपजच आहे. शस्त्रसज्ज फौजेलाही त्यांच्याशी मुकाबला करता आला नाही. नवलाईची गोष्ट म्हणजे पाठीला पोट लागलेलं असूनही एकाही वारल्याने फंदफितुरी केली नाही. एकही निमकहराम झाला नाही.

बासष्ट साली कॉमरेड शामराव आणि गोदावरीबाई कारावासात होते. त्यावेळी शामरावांनी बाईंना लढ्याची हकीगत लिहून काढण्यास सांगितलं. पण बाईंना लेखणीचा मनस्वी कंटाळा. त्यांनी आळंटळं केली. मग आणखी दोन वर्षांनी शामरावांना हृदरोग जडला. त्यावेळी पतीची इच्छा पुरी न केल्याची अपराधी जाणीव बाईंना अस्वस्थ करू लागली. मग त्यांनी 'कडेकपारीतील वारल्यांचे जीवनदर्शन' आणि 'आमची निवासस्थाने' असे दोन लेख पुरे केले. पतिवियोगानंतर नोव्हेंबर पासष्ट ते एप्रिल सहासष्ट ह्या सहा महिन्यात त्यांनी बंडाच्या ह्या हकीगती लिहून काढल्या. आणखी चार महिने संदर्भग्रंथ चाळले आणि सहासष्टच्या ऑगस्ट महिन्यात हा ग्रंथ तयार झाला. त्या म्हणतात 'आमचा आधार मिळाल्यामुळे आदिवासींतील माणुसकी जागी झाली आणि माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला हक्क आहे हे उमजून तो प्रतिकाराला कसा सज्ज झाला, किती बदलला.' हे ह्या ग्रंथावरून कळेल.

अशारीतीने ग्रंथ तर सिद्ध झाला. पण तो प्रकाशात कसा यावा ? आपण सराईत लेखिका नाही ह्या न्यूनगंडामुळे ग्रंथ दोन वर्षं बासनात पडून राहिला. योगायोगाने तो श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या वाचनात आला. त्यांनी भागवत बंधूंकडे शिफारस

केली. 'मौजे'ने ग्रंथ स्वीकारला. त्याप्रीत्यर्थ हा प्रकाशन सोहोळा. पोतदारांनी अध्यक्ष-पदावरून मर्मस्पर्शी भाषण केले. वेठबिगार करणाऱ्या ह्या आदिवासींची पावला-पावलाला कशी क्रूर पिळवणूक केली जाते ते त्यांनी सांगितले. शंभर वर्षांपूर्वी ठाणे जिल्ह्यातल्या सर्व जमिनी वारल्यांच्या मालकीच्या होत्या. नंतर उपऱ्या आणि बव्हंशी परधर्मी व्यापारी जमीनदारांनी व्याजबट्टा करून त्या जमिनी स्वतःच्या घशात घालावयास सुरुवात केली. केवळ आठ आण्यांना एक एकर जमीन बळका-विल्याची उदाहरणं कागदोपत्री सिद्ध झालेली आहेत. दिवस उजाडल्यापासून रात्र-पडेपर्यंत फक्त मूठभर तांदळांच्या बदल्यात ह्या सावकारांनी वारल्यांना गुलामा-सारखे वागवलेले आहे. हे जंगल, ह्या अरण्यातल्या आदिवासींच्या चोरवाटा, त्यांचे गनिमीकाव्यातले चातुर्य हे दत्तोपंतांनी जवळून पाहिले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ते एकदिलाने सामील झाले होते. त्या सर्वांचा आलेख त्यांनी आपल्या भाषणात काढला आणि सांगितलं की, 'ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाने आज मराठी भाषा धन्य झाली आहे! हा ग्रंथ म्हणजे वीर वारल्यांच्या महाभारताचे एक गौरव-शाली पर्वच होय!' ह्या भाषणात दत्तोपंत इतस्ततः रेंगाळले. बोलता बोलता ते असेही म्हणाले की जगातली सगळी गरिबी कधी काळी दूर होईल असे त्यांना अजिबात वाटत नाही आणि शिवाजीमहाराज सुरतेवर चालून गेले ते ह्याच आदि-वासींच्या चोरवाटांमधून आणि ह्या आदिवासींनीच त्यांची सुखरूप ने–आण केली! ◻

# कृतज्ञता कलावंतांच्या दुनियेतली

गुरुजनांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूंनी जमवून आणलेल्या मैफिलींनी मुंबईतला गेला पंधरवडा गजबजून गेला होता. जवळजवळ गेले अर्ध शतक आग्रेवाले गायक मुंबईत घरंदाज गायकीचं वळण शिष्यांसोबत घोटवीत आले आहेत. फैयाझखांसाहेबांनी आग्रेवाल्यांची शान वाढवली. जणू त्यांच्या जागत्या छायेतच इथे आग्रेवाल्यांनी थोरामोठ्यांच्या घरी आग्रेवाल्या गायकीचे रतीब घालणे सुरू केले. त्याच घराण्याच्या उस्ताद खादीम हुसेनखांसाहेबांनी ओळीने गेली चाळीस वर्षं मुंबईत विद्यादान केले. तीन तपं शेकडो शागिर्दांचे पाय खांसाहेबांच्या बाबुलनाथाच्या टेकडीपासच्या मठीकडे वळले. आपले गुरु पै. कल्लनखांसाहेब (फैय्याझखांसाहेबांचे आजोबा) ह्यांच्याकडून सख्त एक तप उग्र तपश्चर्या करून त्यांनी जे आग्रा गायकीतले धन मिळवले, ते मुंबईत त्यांनी गुणी शागिर्दांना मुक्त हस्ताने वाटले. ख्याल, ठुमरी, लावणी आणि भजन ह्या चारही अंगात तरबेज

दाखवणाऱ्या कै. वत्सलाबाई कुमठेकर ह्या त्यांच्याच शिष्या. सरस्वतीबाई फातरफेकर, सगुणाबाई कल्याणपूर, कृष्णा उद्यावर, नाटचसंगीतात स्वतःचा ठसा उमटविलेल्या मिनाक्षीबाई आणि ज्योत्स्नाबाई भोळे, ह्या सगळयांनीं खादिम हुसेनांजवळ विद्या मिळवली. पं. गोविंदराव अग्नि, मोहन चिक्करमाने, श्रीपादराव नेवरेकर, हळदणकर बंधु, उद्योगपती जयानंद खिरा असा त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा आणि लौकीकवान आहे.

ह्या शिष्यांनी परवाच्या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने लक्ष्मीबागेत एक आखिव जलसा सादर केला. आग्रा घराण्याची एक एक असली चीज एकएका शिष्याने अगदी शिस्तबद्ध आटोपशीरपणाने पेश केली. समोर जाणकार रसिक आणि खुद्द गुरुवर्यांची देखरेख. त्यामुळे घराण्याच्या शिस्तीबाहेर कोण रतिभरसुद्धा वावरला नाही. नीला गडकरींनी गौड मल्हार शुद्ध स्वरुपात पेश केला. अनिता रावांचा मलुहा तालासुराला चोख होता. मोहन चिक्करमान्यांनी फैय्याझखासाहेबांच्या बंधुंनी रचलेली एका अनवट रागातली खास बंदिषी दमदारपणे गायिली. मुकुंद दामले ह्या बालकलावंताने मेंडोलीनवर वाजवलेला मालकंस आटोपशीर आणि सफाईदार होता. वाढते वय गायनविद्येच्या आड येत नाही हे खुद्द खांसाहेबांनी दाखवून दिले.

पं. गोविंदराव अग्नि ह्या गोमंतकातल्या कसबी गायकाच्या शिष्यांनीही गुरुवर्यांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संघमंदिरात एक सुंदर मैफिल जमवली होती. साठीकडे कूच करीत असलेले गोविंदराव हे खादिम हुसेनखांसाहेबांचे गंडाबंद शिष्य. गेली तीन तपे ते आग्रा घराण्याची गायकी स्वतः घोटवीत आहेत नि तरबेज शिष्य तयार करीत आहेत. पं. अनवर हुसेनांकडेही त्यांनी विद्या केली आहे. गोव्यातल्या कै. रघुवीर सावरकरांनी (संगीतनट प्रसाद सावकारांचे वडील) स्थापन केलेल्या "रंगबोधेच्छु" नाटकमंडळीत त्यांनी लहान वयात पदार्पण केलं. तिथे चिखलीकरबुवांकडे त्यांनी ख्यालगायकीचे प्रारंभिक पलटे घोटवले. 'संशयकल्लोळ', 'मानापमान', वगैरे कंपनीच्या हातखंडा प्रयोगात ते चांगलेच चमकले. मात्र आवाज फुटल्यापासून आणि संगीत नाटकांचं वैभव अस्तंगत झाल्यापासून, ते मुंबईत आग्रा घराण्याची गायकी शिकवीत आले आहेत. अंजनीबाई लोलयेकर, प्रसाद सावकार, निर्मला गोगटे, रामदास कामत, असा त्यांचा किर्तीमंडीत शिष्यवर्ग. गेली अनेक वर्षे अग्निबुवा नाट्यसंगीताचे दिग्दर्शनही करीत आहेत. 'विषकन्या'पासून 'चमकला ध्रुवाचा तारा'पर्यंत त्यांनी नाटकांना खानदानी चालींचा वेष चढवला आहे. परवाच्या जलशामध्ये जयमाला शिलेदारांनी गुणीकंस हा अनवट राग अतिशय रंजकदारपणे पेश केला. त्यांच्या दोन मुलींनी नाटचसंगीताची जुगलबंदी सादर केली. त्यांतल्या त्यात किर्ती शिलेदारांनी गायनातली तडफ आणि तानबाजी छान दाखवली. तसच, अंजनीबाईंच्या कन्येनेही नाटचसंगीत रसानुकूल पेश केले.

स्वत: गोविंदरावांनी 'परज' आणि 'भंकार' ह्या दोन अप्रचलीत रागातल्या बंदिषी त्यांच्या मूळ शुद्ध स्वरुपात सादर करून श्रोतृवृंदाची तब्वेत खुष केली. आग्रा घराण्याच्या अभिजात गायकीची तीन तपं एकटक साधना करणाऱ्या ह्या गोमंतकीय कलावंताची मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात शिक्षक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल मैफिलीत सत्कारही करण्यात आला.


दादरच्या नारायणराव इंदोरकरांच्या क्लासमध्येही गुरूपौर्णिमेचा उत्सव करण्यात आला. नारायणरावांच्या शिष्यवर्गाने मैफिलीत आपली सलामी लावली. सुरेश हळदणकर ह्यांनी गायलेले 'शूरा मी वंदिले' हे नाट्यगीत आणि एक भजन हे त्यातले उल्लेखनीय कार्यक्रम.

कै. रामुभैय्या दाते हे हाडाचे रसिकाग्रणी. संगीत हा जणू त्यांचा प्राण होता. त्यांचे दोन कलावंत चिरंजीव अरूण आणि रवी हे गेली दोन वर्षे आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ गायकवादकांचे जलसे मोठ्या प्रमाणावर घडवून आणतात. यंदाच्या बड्या पाहुण्या गजलसम्राज्ञी बेगम अख्तर होत्या. त्यांनी एक ठुमरी आणि तीन गजल पेश केले. त्यांना महमद अहमदनी तबल्यावर डौलदार साथ केली. तारशहनाईवर होते मधुकर गोळवलकर. ह्या जलशाचे अपयश म्हणजे पं. चिमोटे ह्यांच्या हार्मोनियमवादनाच्या वेळी श्रोत्यांनी त्यांची केलेली अनपेक्षित हुर्यो! पं. बाबूराव चिमोटे हे मोठे कसबी पेटीवादक आहेत. त्यांचे वादन सतारीच्या अंगाने असते आणि सोलो कार्यक्रमात त्यांचा अगदी हातखंडा आहे. तासंतास ते श्रोत्यांना जागच्या जागी खिळवून ठेऊ शकतात. गेल्या गणेशोत्सवात ब्राह्मणसभेतला त्यांचा पेटीवादनाचा कार्यक्रम असाच रंगला होता. पण ह्या जलशात त्यांनी दाक्षिणात्य राग सरस्वती फारच ताणून वाजवला आणि सहनशक्ती संपलेल्या श्रोत्यांनी तिथल्या तिथे टाळ्या वाजवून आपली नापसंती व्यक्त केली. ह्याच जलशात अजय पोहनकर ह्या नवोदित तरुण गायकाने शुभकल्याणचा ख्याल पेश केला. अरूण दाते स्वत: एक ढंगदार गझल गायले.

कुमार गंधर्वांच्या मुंबईतल्या मैफिली म्हणजे त्यांच्या स्वरविलासावर लुब्ध असणाऱ्या रसिकांना खास मेजवानीच असते. त्यांची बालगंधर्व संगीत सभेने गेल्या महिन्यात आयोजिलेली पार्ल्यातील मैफिल म्हणजे अत्यंत यशस्वी कार्यक्रमाचा एक नमुनाच म्हणावा लागेल. श्रोत्यांनी केलेल्या तीव्र गर्दीमुळे गायनाला सुरुवात होतानाच दारे बंद करून घ्यावी लागली. कुमार अतिशय उत्साहाने गायले. पुढे पुढे दमत गेले. भीमपलासी आणि पुरिया धनश्री ह्या दोन भारदस्त रागाचे ख्याल श्रोत्यांना ऐकायला मिळाले. पण ह्या बैठकीचे खरे वैभव म्हणजे त्यांनी पेश केलेली बालगंधर्वांची नाट्यपदे. 'स्वयंवरा'तली 'नाथ हा माझा', आणि 'रूप बली तो नर शार्दूल साचा', 'मेनका'मधलं 'सत्य सत्य नच फोल पाला', 'अमृतसिद्धी' मधलं 'ही समज तव' आणि 'एकच प्याला'मधली कुमारांची पेटंट भैरवी

'प्रभु अजि गमला', ही सगळीच पदे बहारीची झाली. तानेतानेला कुमार रसिकांची दाद घेत पुढे पुढे सरकत होते. 'नाथ हा माझा' हे पद तर कुमार अपूर्व रंगतीने गायले. कुमारांना उमजलेल्या गंधर्वगायकीचा हा बहारदार साज कान तृप्त करीत असताना श्रोत्यांच्या मनात परत परत विचार येत होता की रूप, अभिनय आणि सूर ह्या तिन्ही अंगांची ईश्वरदत्त देणगी लाभलेल्या बालगंधर्वांनी ही पदे गाऊन पूर्वीच्या काळात आनंदाचे केवढे अफलातून साम्राज्य रंगभूमीवर नांदविले असेल ! कुमारांची ही बैठक म्हणजे एका समर्थ कलावंताने तशाच एका सामर्थ्यप्रभू नृपतीच्या गर्भश्रीमंत गायकीला कृतज्ञतेने केलेली वंदनाच होती.

पं. सी. आर. व्यासांनी राजारामबुवा पराडकरांकडून गानविद्या घेतली. त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी दादरला त्यांनी मैफिल घडवून आणली. उतारवयाला लागलेले स्वतः राजारामबुवा, खुद्द सी. आर. व्यास, माणिक वर्मा, सुशिला नांजुंदिया, कुंदा वेलींग, बाळकराम, सविता कुळकर्णी वगैरे तयार कलावंतांनी मैफिलीत आपली हजेरी लावली. सलग दहा तास ही मैफिल चालली होती, आणि प्रत्येक कार्यक्रम हा स्वतंत्रपणे यशस्वी होत होता. बाळकरामांनी 'जोग' थाटात पेश केला. माणिकबाईंनी 'अहिर भैरव' आणि 'नाही मी बोलत नाथा' हे बालगंधर्वांचे पद सादर केले, कुंदा वेलींगांनी 'चंद्रकौस' गायिला. सी. आर. व्यास जोगियाचा एक अनवट प्रकार गायिले. ह्या बैठकीचा सर्वात यशस्वी भाग म्हणजे राजारामबुवा पराडकरांनी ग्वाल्हेर घराण्याच्या पेश केलेल्या 'देवगिरी बिलावल' आणि 'भैरवी' रागातल्या दोन निर्भेळ बंदिषी. ग्वाल्हेरी गायकीत तानांचे पलटे फार जोरकस असतात. उदाहरण म्हणून ओंकारनाथ ठाकूर किंवा कुमार गंधर्वांच्या ख्यालांकडे बोट दाखविता येईल. सत्तरी ओलांडलेल्या राजारामबुवांनी जोरकस तानांचे कसब म्हणजे काय त्याचे श्रोत्यांना रोकडे प्रत्यंतर आणून दिले. घरंदाज गायकीच्या मुंबईकर श्रोत्यांना गुरूपूजनाच्या ह्या सर्वत्र साजऱ्या झालेल्या मैफिली म्हणजे योगायोगाने जमून आलेली मेजवानीच वाटली. ◻





# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता

**अनिल बर्वे**

**एक**

रोमच्या इतिहासात गुलाम म्हणून जगलेला, इजिप्तच्या इतिहासात पिरॅमिडस् बांधायला वेठबिगारीवर राबलेला, भारतामध्ये अस्पृश्य म्हणून विटंबलेला मानवी इतिहासात सदैव गुलाम आणि हीन म्हणून जगलेल्या मानवी समाजाच्या खऱ्या उद्धारकर्त्या वर्गाला–प्रोलेटारीयन क्लासाला–सर्वहारा वर्गाला एकोणिसाव्या शतकात मार्क्सनें प्रतिष्ठा दिली. विसाव्या शतकात माओने त्याच्या हातात शस्त्र दिलें. क्रांतीचे ज्वलंत तत्वज्ञान दिले. आज तो सर्वहारा वर्ग आग्नेय आशियापासून अमेरिकेपर्यंत क्रांतीच्या ज्वालेत वर्गीय समाजाची आहुती घेत निघाला आहे.

माओ–त्से–तुंग प्रणीत क्रांतीचे पहिले पाऊल क्रांतिकारकांनी नक्षलवादीमध्ये

महाराष्ट्रात नक्षलवाद्यांची धरपकड सुरू होती, त्यावेळी माणूसतर्फे अनिल बर्वे दक्षिणेकडे, आंध्रतील नक्षलवाद्यांचा मुख्य तळ समजल्या जाणाऱ्या श्रीकाकुलमकडे, निघाले होते. वरंगळहून त्यांनी एका पत्रात लिहिले -

' गेल्या सहा महिन्यात नक्षलवादी चळवळ फोफावत चालली असून घाटावरून पठारावर पसरत आहे. फार प्रचंड संख्येने C. P. M. चे कार्यकर्ते सशस्त्र लढ्यात उतरले आहेत. वरंगळ शहरात जागोजागी क्रांति वचने लिहिलेली दिसतात. मेडिकल कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज ही येथील महत्त्वाची केंद्रे. '

आणखी एका नंतरच्या पत्रात बर्वे यांनी कळविले.

' पोलिसांच्या अमानुष दडपशाहीने इथे लोक तोंड उघडायला तयार होत नाहीत. या सर्व भागास लष्करी छावणीचे स्वरूप आज आले आहे. केवळ मुलुग तालुक्यात २ C. R. P. च्या कंपन्या, २ आंध्र रिझर्व्ह कंपन्या. या व्यतिरिक्त स्थानिक पोलिस व सी. आय्. डी. आहेतच.

' वरंगळ -खम्मम या जिल्ह्यातून फक्त नक्षलवाद्यांची फाइटींग स्क्वाड्स असतात. परंतु श्रीकाकुलम्मध्ये नक्षलवाद्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष आदिवासी व शेतकरी लढतात. '

पोलिसी दहशत, वेगळी भाषा, अपरिचित मुलुख यातून कसाबसा मार्ग काढीत बर्वे यांनी आपली शोधयात्रा तरीही पुरी केली.

या शोधयात्रेचा हा वृत्तांत.

दर बुधवारच्या अंकात ही लेखमाला क्रमशः प्रसिद्ध होईल.

अर्थातच वादग्रस्त ठरणार. कारण लेखक तरुण, विषय ज्वलंत....

---

सदुसष्टच्या मेमध्ये टाकले. त्यानंतर गेले तीन वर्ष क्रांतीच्या ज्वाला सर्व प्रांतात कमी अधिक प्रमाणात भडकू लागल्या आहेत.

आंध्रच्या शेकडों चौरस मैल विभागात नक्षलवादी क्रांतिकारकांनी सशस्त्र बंडाचा झेंडा फडकावला आहे. श्रीकाकुलम–वरंगळ आणि खम्मम ही त्यांची मुख्य रणक्षेत्रे. या व्यतिरिक्त गेले दोन तीन महिने नेल्लोर–गुंतुर व कृष्णा याचबरोबर इस्ट आणि वेस्ट गोदावरी जिल्ह्यातही तुरळक चकमकी झडू लागल्या आहेत. वर्षापूर्वीपर्यंत केवळ डोंगराळ भागात चालू असलेला हा लढा आता पठारावर

पसरू लागला आहे. सोबत दिलेल्या नकाशावरून नक्षलवादी क्रांतीने आंध्रचे किती मोठे क्षेत्रफळ व्यापले आहे याची व त्या प्रदेशाच्या महत्वाची कल्पना येईल. महाराष्ट्र मध्यप्रदेश–ओरिसा व आंध्र यामध्ये गोदावरीचे खोरे–जंगले आणि डोंगराळ प्रदेशांनी व्यापलेला हा प्रदेश गनिमी लढ्यास अनुकूल असून हा विभाग भारताचा ' येनान ' करण्याचा नक्षलवाद्यांचा विचार दिसून येत आहे.

नक्षलवाद्यांनी व्यापलेला आणि त्यांचे मुख्य तळ असलेला श्रीकाकुलम जिल्हा हा पूर्वघाटाच्या दोन रांगा, मंडासा, सालुर यांनी वेढलेला आहे. श्रीकाकुलमचा समुद्रसपाटीचा प्रदेश व पठारी प्रदेश वगळता इतर सहा तालुक्यात जवळजवळ लालराज्यच अस्तित्वात आहे. श्रीकाकुलमला लागूनच ओरिसाची सरहद्द असून ' कोरापूट ' येथे आंध्रची सरहद्द ओलांडून ओरिसात जाता येते. हा प्रदेश सुमारे आठशे चौरस मैल असून या प्रदेशात गिरिजनांच्या दोन टोळ्या ' सावरस ' व ' जातवस ' या राहतात. या आदिवासींची संख्या सुमारे ऐंशी हजार असून हे सर्व लोक एकदिलाने नक्षलवाद्यांच्या पाठीमागे उभे आहेत. हा सर्व प्रदेश घनदाट जंगलांचा असून रस्ते जवळजवळ नाहीत. तसेच वरच्या बाजूला मध्यप्रदेश असून मध्यप्रदेशातील बस्तर व जगदाळपुर येथील गिरिजनही लाल झेंड्याखाली जमविण्याचे कार्य यशस्वी होत आहे.

श्रीकाकुलम सोडून गोदीवरीच्या खोऱ्यातही नक्षलवादी क्रांतिकारकांचे फारमोठे प्रभावी क्षेत्र आहे. मुगुर वेंकटापुरम हा चिचोळ्यापट्टीचा तालुका शंभर मैल लांब व पंधरा मैल रुंद असून, एका बाजूला गोदावरी व दुसऱ्या बाजूला मध्यप्रदेशचे घनदाट जंगल व डोंगरी प्रदेश याने गनिमी लढ्यास सुरक्षित झाला आहे. या तालुक्यात भद्राचलम ते कोडायकल ही एकच अर्धवट कच्ची सडक असून ती दहा ठिकाणी मोठमोठ्या नाल्यांनी तुटली आहे. एकाही नाल्यावर कायमचा पूल नसल्याने पावसाळ्यात येथील दळणवळण पार तुटते. भद्राचलमपासून चेरळापर्यंतचा तीस मैलाचा भाग हा दाट लोकवस्तीचा असून पुढे अत्यंत तुरळक वस्ती आहे. जंगलामधील लहान लहान वाड्यातूनच ही माणसे राहतात. ही उत्तरपूर्व गोदावरीची भौगोलिक स्थिती. या भागाला अप्पर गोदावरी म्हणतात. यामध्ये भद्राचलमही समाविष्ट आहे.

पूर्वी केंद्रशासित असलेले अल्बाका संस्थान आणि इस्ट गोदावरीचे चेरळा–अल्बाका, वेंकटापुरम असे तीन भाग पाडून ते खम्मम जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. आदिलाबादच्या वर महाराष्ट्रातील चांदा जंगल असून तेथील आदिवासींमध्येही नक्षलवादी कार्यकर्ते संघटना करीत आहेत. अशा रीतीने गोदावरीने तोडलेल्या आंध्रच्या उत्तर भागात व महाराष्ट्र-मध्यप्रदेश-ओरिसा यांच्या सरहद्दीवर नक्षलवाद्यांनी चांगलेच मूळ धरले आहे.

गोदावरीच्या दक्षिणेला वंरगळच्या मुलुग तालुक्यात व खम्ममच्या बोरगमपाद




तालुक्यात नक्षलवादी प्रभावी आहेत. वरंगळ ते एटूर नागारामपर्यंत डांबरी रस्ता आहे व एटूर नागाराम येथे नदीकिनारी दाट लोकवस्ती आहे परंतु ही सर्व वस्ती वाड्यांमध्ये असून दरम्यान दळणवळणाची साधने उपलब्ध नाहीत. वरंगळ व खम्मम या जिल्ह्यातून वरील प्रदेशात कोया-रेस्टा-वाडा-आरे इत्यादी टोळ्यांचे व मागासलेल्या जमातींचे लोक रहात असून सुमारे दोन लाख वस्तीच्या या प्रदेशात नक्षलवाद्यांना जनतेचा भक्कम पाठिंबा लाभला आहे. गनिमी लढ्यास अनुकूल तसेच भीषण सामाजिक विषमता व अन्याय याने राजकीय क्रांतीस परिपक्व असा हा प्रदेश नक्षलवाद्यांचा बोलकिल्ला आहे.

श्रीकाकुलम येथील आदिवासींनी या शतकाच्या सुरुवातीस विविध कारणांनी तीन बंडे केली. परंतु ब्रिटीश सरकारने ती दडपली. तेलंगणातील शेतमजुर व किसानांनी सत्तेचाळीस व अठ्ठेचाळीस या सालात क्रांतिकारक उठाव केले, परंतु पंधरा ऑगस्टच्या सत्तांतरानंतर भारतीय सत्ताधाऱ्यांनी हे उठाव अत्यंत अमानुषपणे चिरडले. परिणामी गेले अर्ध शतकभर सतत अशांत असलेला हा प्रदेश धुमसतच राहिला. आणि आज तेथे नक्षलवादी क्रांतीने चांगलाच पेट घेतला आहे. केवळ गेल्या एका वर्षात नक्षलवाद्यांनी—

श्रीकाकुलमध्ये चाळीस छापे घातले व तेवीस जमीनदार सावकार आदींचे बळी घेतले. वरंगळमध्ये अठ्ठावीस छापे व सहा बळी आणि खम्ममध्ये तीन बळी व वीस छापे; करीमनगरमध्ये तीन छापे व एक बळी नलगोंडा जिल्ह्यात दोन छापे तर गुंतूर जिल्ह्यात तीन छापे व दोन बळी. विशाखापट्टणमध्ये एक छापा व एक बळी घेतला. अशा रीतीने एक वर्षाच्या अवधीत सत्त्याण्णव डाके व छत्तीस बळी घेतले गेले. सरकारी रिपोर्टप्रमाणे ऐंशी वेळा पोलीसांशी सशस्त्र चकमकी झडून

नक्षलवाद्यांकडून सुमारे ३५० शस्त्रे जप्त करण्यात आली. आतापर्यंत सहालाख रुपये व शंभर तोळे सोने व चांदी, आणि बंदुका नक्षलवाद्यांच्या 'पीपल्स आर्मी'ने पळवून नेल्या आहेत. स्थानिक जनतेच्या सहकार्याने व सहानुभूतीमुळेच हे शक्य झाले. तेव्हा नक्षलवादी क्रांतिचे स्वरूप ध्यानात येण्यासाठी इथल्या जनतेचे प्रश्न व त्यांच्यावर झालेले अन्याय हे समजावून घेतले पाहिजेत. नक्षलवाद्यांना केवळ देशद्रोही, हिंसक, परधार्जिणे अशा सवंग शिव्या देण्यात आता फारसे स्वारस्य शिल्लक राहिलेले नाही. पोलीसांचा ससेमिरा चुकवत रानोमाळ धावणारे कनु सन्याल व चारु मुझुमदार हे देशद्रोही व संसदेत भाषणे ठोकणारे, गलेलठ्ठ मानधन घेणारे व मोटारी उडविणारे पुढारी मात्र देशभक्त या भोंगळ मुक्तीवादाने अर्ध पोटी जनता व जागृत तरुण यापुढे फसणार नाही. तीन वर्षापूर्वी एका खेड्यात पेटलेली ही चळवळ आज साऱ्या देशभर पसरते यातच त्या चळवळीमागे असलेली तपश्चर्या, निष्ठा व जनतेस वाटणारी त्या चळवळी विषयीची सहानभूती स्पष्ट होते.

नक्षलवादी क्रांतिचा मार्ग हा चुक का बरोबर ते या देशातील जनता व या देशाचा इतिहास ठरवेल. या समाजाविषयी, इथल्या जनतेविषयी प्रेम असलेल्या बुद्धिवाद्यांनी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की शेकडो ठराव–दुरुस्त्या–सभा-परिषदा-संमेलने यापेक्षा प्रत्यक्ष कृती ही जास्त महत्त्वाची असते. फसलेली व अपयशी चळवळ ही सुद्धा यशस्वी चळवळीचा मुळाधार बनते.

सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न म्हणजे अविचारी आततायीपणा होईल अशी धोक्याची सूचना मार्क्सने पॅरीसच्या कामगारांना कम्युन्सच्या थोडे दिवस आधी म्हणजे १८७० च्या शरद ऋतुतच दिलेली होती. परंतु जेव्हा १८७१ च्या मार्च-मध्ये पॅरीसच्या कामगारांवर लढा लादला गेला, तेव्हा कामगारांनी त्याचा धैर्याने स्वीकार केला. प्रत्यक्ष लढ्याला तोंड लागले त्या वेळेला चिन्हे प्रतिकुल दिसत असतानाही मार्क्सने या कामगार क्रांतिचे उत्साहाने स्वागत केले. एखाद्या पढीक विद्वानाप्रमाणे 'हा उठाव अकाली केलेला आहे' म्हणून निषेध न करता या अपयशी क्रांतीतून मिळालेल्या अनुभवांचे विश्लेषण करून त्यावरून आपल्या पुढील धोरणांचे आडाखे बांधले. आपले सिद्धान्त पडताळून पाहिले.

लोकहीतवादी, चिपळूणकर, रानडे, परांजपे, केळकर, आगरकर यांच्या तालमीत वाढलेला आमचा महाराष्ट्रीय बुद्धीवादी वर्ग आज खोटी प्रतिष्ठा, मानसन्मान व पैसा यांना लालचावला असल्याने कोणत्याच चळवळीचे योग्य विश्लेषण करून समाजामध्ये मुलभूत फरक घडवून आणू शकला नाही. आमच्यातले मार्क्सवादी विचारवंत हेही या 'पेशवाई बुद्धीवाद्यां'च्या जातकुळीपैकीच असल्याने बोटे मोडणे-सवंग शिव्या वहाणे यापलीकडे ते नक्षलवादी चळवळ अभ्यासू शकले नाहीत.

मोझेसपासून माओपर्यंत प्रत्येक क्रांतिकारक हा जनतेपासून स्फूर्ति मिळालेला जनतेचा नेता आहे. ज्या उंचावलेल्या अपेक्षांनी जनता या नेत्यांकडे पाहते त्या

अपेक्षांनी प्रेरीत होऊन हे क्रांतिकारक वाटेल ते दिव्य करावयास पुढे येतात. जनता चळवळ ही वर्तमानाच्या तिटकाऱ्यातून व भविष्यावरच्या विश्वासातून जन्माला येते, त्यातच तिचे सामर्थ्य असते व याच सामर्थ्याच्या जोरावर साम्राज्य सेनासागर व बलशाली वर्तमान ती पालथी घालते. नक्षलवादी चळवळ ही सुद्धा एक जनता चळवळ आहे. हे गेल्या तीन वर्षात सिद्ध झाले आहे. या चळवळीला जवळून पाहण्याची, प्रत्यक्ष पेटलेल्या क्षेत्रात जाऊन तेथील जनतेत मिसळण्याची इच्छा होती आणि 'माणूस'च्या सौजन्याने ती पूर्ण झाली. आणि मग,

अशाच एका कातरवेळेला—

दख्खनच्या पठारावरून गाडी धावू लागली. या ऐंशी कोटी एकराच्या विशाल खंडप्राय देशात चाळीस कोटी माणसे अर्धपोटी कशी राहतात हा प्रश्न मनाला भेडसावू लागला. प्रतिष्ठितांना या देशाचे दारिद्र्य दोनदा पहायला मिळते. एकदा बंगाली साहित्यात, दुसऱ्यांदा रेल्वे प्रवासात. प्रत्येक रेल्वे स्टेशनवर लहान लहान अर्धपोटी पोरे हात पसरून अन्नासाठी भिक मागताना दिसतात—

अठरापगड जातीच्या कोशिंबीऱ्या, रायती, चटण्या, भरिते, डांगरे — पेशवाईने संस्कृतिनिष्ठांना दिलेली ही देणगी आणि कुणी कुठल्याशा दारी उष्टया महाग अन्नाला—

'पापण्यांच्या सावलीला दुःख जमतात !'

¤

हैद्राबाद स्टेशनवरचा सायकल रिक्षावाला आपल्या रिक्षेला 'गांधीजींचा चरखा' म्हणतो. स्वतःच्या दारिद्र्याला हसणारी ही माणसं म्हणजे प्रस्थापित सत्ताधारी वर्गाला मिळालेला दिलासाच होय.

इथल्या जनता जनार्दनाशी मी खूप खूप बोलतो. मीच बोलतो, कारण त्याला बोलताच येत नाही. त्याला राजकीय जाणीवाच नाहीत. पाच वर्षातून एकदा मुखिया सांगेल त्याला किंवा पैसे देईल त्याला मतदान आणि नंतर दिवस रात्र अन्नासाठी असहाय्य तडफड !

मुसलमानाच्या हॉटेलात चहा पितो !

माझ्या परंपरागत ब्राह्मणी मनाला चहा पिताना आपण 'मुसलमानाचा' चहा प्यायल्याची 'पुरोगामी' जाणीव होणे. सर्व भारतीय पुरोगामी हे असेच दिखाउ आणि बेगडी पुरोगामी.

मला इंग्रजी येते 'द डेक्कन क्रॉनिकल वाचतो. आंध्रच्या राजधानीतून प्रसिद्ध होणारे सर्वाधिक खपाचे इंग्रजी दैनिक—त्यात ठळक बातमी—

वरंगळ डिस्ट्रीक्ट कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्री. वेंकटरेड्डी यांचे भाऊ व्ही.

श्रीराम रेड्डी आणि व्ही. राघवरेड्डी यांना तर्कल तालुक्यातील पर्दामपुला या खेड्यात चवदा जुलैला पहाटे तीन वाजता नक्षलवाद्यांनी ठार केले.

चारच दिवसापूर्वी आंध्रचे गृहमंत्री जे. वेंगलराव यांनी केलेल्या 'नक्षलवाद्यांचा खातमा' या घोषणेचा श्राद्धविधी चार दिवसात नक्षलवाद्यांनी पार पाडला. आज आंध्रच्या विविध विभागातून नक्षलवादी चळवळ हात पाय पसरवत आहे. जनतेची मोठी सहानुभूति व मदत नक्षलवाद्यांना मिळालेली आहे. या सहानुभूतीची कारण मीमांसा करायला आपल्याला इथल्या जनतेत मिसळायला पाहिजे. या विभागात फार मोठी संख्या आदिवासी–गिरीजनांची असून बाकी शेतमजूर–गरीब शेतकऱ्यांची आहे.

नक्षलवादी क्रांतिच्या क्षेत्रात ४ ते ५ लाखाहून अधिक वस्ती गिरीजन व आदिवासींची आहे. डोंगराळ व जंगलमय प्रदेशात राहणारे हे आदिवासी अत्यंत प्राथमिक अर्थव्यवस्थेतील जिणे जगत आहेत. सुसंस्कृत जगापासून शेकडोमैल दूर असलेले हे आदिवासी जंगल जमीन पिकवून व कंदमुळे–फळे–गवत–चिंच आदि जंगल संपत्ति विकून कसेबसे उदरभरण करीत. परंतु काही दशकांपूर्वी पठारावरून या विभागात येऊन स्थायिक झालेल्या व्यापारी–सावकारांनी मध्ययुगीन कालातील अमानुष्य पद्धतींचा वापर करून लवकरच आदिवासींच्या जमिनींचा ताबा घेतला. या 'सुसंस्कृतांनी' कर्ज वाटप करून गिरिजनांना 'कर्ज गुलाम' म्हणून राबवले. दमदाट्या व धमक्या देऊन आदिवासींना 'वेट्टी'वर राबवणे–म्हणजेच 'वेठबिगार' ही एक सर्वसामान्य गोष्ट होऊन बसली.

व्यापाऱ्यांनी आपल्या मक्तेदारीचा फायदा घेऊन अत्यंत मातीमोल भावाने 'जंगल संपत्ति' खरेदी करावयास सुरुवात केली व तांदुळ–तेल–मीठ–मिरची-कापड या जीवनावश्यक गरजांचे भाव दामदुपटीने वाढवून आदिवासींचे दुहेरी शोषण सुरू केले. आदिवासींच्या जमिनींचा कब्जा घेण्यासाठी त्यांच्या गरजेच्या काळात त्यांना कागदोपत्री गुंतवून, जबर चक्रवाढ व्याजाने त्यांना कर्ज देऊन, लवकरच त्या कर्जाच्या रकमा चौपट पाचपट वाढवून कर्जापोटी जमिनींचा कब्जा आरंभला व व्याजापोटी आदिवासींना वेठबिगारविट राबवायला सुरुवात केली.

ब्रिटिश सरकारने १९१७ साली केलेल्या कायद्याप्रमाणे टोळीवाल्यांच्या जमिनी बिगर टोळीवाल्यांना खास सरकारी हुकूमाशिवाय विकत घेता येत नाही. हा कायदा ब्रिटिशांनी २–३ आदिवासी बंडे झाल्यावर केला. तेव्हा सावकारांनी जमिनी 'नजर गहाण' ठेवून घेऊन पुन्हा व्याज वसुली चालूच ठेवली व कायदा धाब्यावर बसल्याने हे जंगलचे राजे–गुलाम व भूमिहीन शेत मजुर बनले.

दरम्यान भारत सरकारने जंगलविभाग 'काँट्रक्ट' पद्धतीने घ्यावयास सुरुवात केली व आदिवासींचा हा तोंडचा घास 'जंगल ठेकेदारांनी' काढून घेतला. सिअनमध्ये 'बिडी लव्हिडा'च्या तोडणीला चार आणे दिवसावर आदिवासी राबू लागले.

धनुष्यबाण घेऊन हिंडणाऱ्या या लढाऊ आदिवासींमध्ये कम्युनिस्टांनी जागृती घडवून संघटन सुरू केले. आदिवासींच्या प्रचंड बळकट संघटना उभ्या राहिल्या. त्यांचे मजुरीचे दर वाढवून मिळण्यासाठी व त्यांचे शोषण थांबण्यासाठी त्यांनी चळवळ आरंभली. भडकलेल्या जमिनदारांनी–व्यापाऱ्यांनी–सावकारांनी गुंडांचे सहाय्याने कार्यकर्त्यांचे खून पाडावयास सुरुवात केले. ५४–६४ या दहा वर्षात ४० प्रमुख कार्य-कर्त्यांचे खून पडले. सभा उधळणे, गुडेम्स, वाडया जाळणे–खोटया केसेसमध्ये आदिवासींना गुंतवणे–स्त्रियांवर बलात्कार करणे असे रानटी प्रकार सुरू झाले. आंध्र सरकारचे पोलीस, जमिनदार–सावकार–व्यापारी यांच्या या 'पवित्रकार्यात' यथाशक्ती सहभागी होऊ लागले. या सर्व हीन व माणुसकीला लाजवणाऱ्या घटनां-विरुद्ध डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलीटब्युरोने आवाज उठवण्यास सुरुवात केली. ३ मे ६८ व २५ जुलै ६८ ला महामंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात सर्व घटनांच्या तारीखवार व नावनिशावार माहित्या देण्यात आल्या. परंतु त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष कर-ण्यात आले–परिणामी हा सर्व विभाग सशस्त्र बंडाने पेटून उठला.

राज्याच्या प्रचंड विभागात हा गोंधळ चालला असताना आंध्र सरकार डोळ्या-वर कातडे पांघरुन का बसले ? अर्थात याचे कारण त्याचे वर्गीय स्वरूप होय. आंध्र सरकारच्या २९ मंत्र्यांपैकी कुणाचीही १००० एकराखाली जमीन नाही. जमीन-दारांचे हे मंत्रीमंडळ सर्व कायदे व्यवस्थित धाब्यावर बसवते. या बेशरम मंत्रीमंड-ळात 'हरिजनांना' जिवंत जाळण्यात आले याचे जाहीररीत्या आनंदाने स्वागत करणारे–तिम्मा रेड्डीसारखे मंत्री व त्यांना पांघरुण घालणारे ब्रह्मानंद रेड्डीसारखे मुख्यमंत्री आहेत. या महाभागांना नक्षलवाद्यांवर गोळी झाडण्याचा काडीमात्र अधि-कार पोचतो काय ?

जमीनदारांच्या अमानुष जुलुमांविरुद्ध तेलंगणात ४७–४८ साली कुळांनी व शेतकऱ्यांनी लाल झेंड्याखाली उठाव केला. परंतु भारतीय सत्ताधाऱ्यांचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी जमीनदारांना अभयदान देऊन अन्न माग-णाऱ्या शेतकऱ्यांचे क्रूर मुडदे पाडले. साम्ययोगी विनोबांनी भूदान सुरू केले. शेवटी लोकलज्जेस्तव १९५३ मध्ये 'टेनेन्सी अॅक्ट' संमत करण्यात आला.

या कायद्याप्रमाणे भुस्वामलुला म्हणजे जमिनदाराला रक्षित खौलदाराने म्हणजे कुळाने खंडापोटी उत्पन्नाचा चौथा भाग किंवा साऱ्याची चौपट रक्कम द्यावी असे बंधन घालण्यात आले आणि या कायद्याच्या ३ (३) कलमाप्रमाणे सरकार केव्हाही खौलदारांना जमिन मालक बनवू शकण्यास समर्थ झाले. नुकसान भरपाईपोटी खंडाच्या आठपट रक्कम खौलदारानें सहा वर्षात बारा हप्त्यात घ्यावी अशी तरतूद होती. परंतु मुळातच हा कायदा केवळ तेलंगणा पुरता मर्यादित आणि ३८ (३) कलम फक्त खम्मम जिल्ह्याला लागू होते–तरीपण त्याची अंमलबजावणी कधीच झाली नाही. हा कायदा सर्व आंध्र प्रदेशाकरता लागू करावा म्हणून किसानसभा

लवकरच उग्र आंदोलन सुरू करणार आहे.

६७ मध्ये ब्रह्मानंद रेड्डी सरकार गादीवर आले व सत्ता प्राप्त होताच कुळकायद्याचे ३८ (३) कलम सर्व तेलंगणला १५ ऑगस्ट ६८ ला लागू करण्याची गोड घोषणा त्यांनी केली. परंतु आधीच्या वीस वर्षात व नवीन मिळालेल्या वर्षाच्या अवधित जमिनदारांनी गुंडगिरी—दमदाटया—मारहाण आदि सर्व मार्ग हाताळून ६०% कुळांना जमिनीवरून हुसकावून लावले. राहता राहिली ३०% कुळे. त्यांना तरी या कायद्याचा फायदा मिळावा—परंतु जमिनदारांनी ३८ (३) कलमाविरुद्ध हायकोर्टात अपील केले आणि सहा महिन्यांपुर्वी ३८ (३) कलम रद्द ठरवले गेले. कारण या कलमान्वये घटनेतील संपत्तीच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते.

आता सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश असलेले श्री. पिंगळ जगल मोहन रेड्डी हे त्या वेळी आंध्र हायकोर्टचे प्रमुख न्यायाधिश होते व त्यांनीच ३८३ कलम रद्द ठरवले. इथे जाता जाता नमुद करणे आवश्यक आहे की प्रमुख न्यायाधीश हे स्वतः बडे जमिनदार असून त्यांची स्वतःची पाच हजार एकर जमीन आहे.

हायकोर्टाच्या या निकालाविरुद्ध सुप्रीम कोर्टात जायचे आंध्र सरकारने ठरवले परंतु किसानसभेची अशी मागणी आहे की सुप्रिम कोर्टात जाऊन दोन-तीन वर्षे काढण्या ऐवजी विधान सभेत दुरुस्ती बील मंजुर करावे. परंतु आंध्र सरकार 'सनदशीर' मार्ग म्हणून सुप्रिम कोर्टात अपिल करणार हे निश्चीत आहे. अशा प्रकारे कुळ कायद्याचे खोबरे केल्यानंतर राहता राहिला 'सिलींग ॲक्ट.' सिलींग कायद्याप्रमाणे एका कुटुंबाला २०० एकरावर कोरडवाहू वा २७ एकरावर तांदुळ जमिन ठेवता येत नाही. पण या कायद्यात 'कुटूंबाची' व्याख्या करण्याचे


# मुजऱ्याचे मानकरी

**ब. मो. पुरंदरे**

**तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

'नजर चुकीने' राहून गेल्याने गेल्या आठ-दहा वर्षात सरकारने एक एकर जमिन-सुद्धा ताब्यात घेऊन भूमिहीनांना वाटली नाही.

अर्थात या सर्व खेळखंडोब्यात जमिनदार आपली सत्ता गाजवतच आहेत. गोविंद पेठ येथे 'तुंगतुर्कशास्त्री' या जमिनदाराची साठ हजार एकर जमिन आहे. त्याच्या या विस्तीर्ण जमिनदारीत २३ गावे मोडतात. या व्यतिरीक्त दहा-पंधरा हजार एकरवाले जमिनदार आहेतच. हजार दोन हजार एकरवाले 'गरीब' जमिनदारही बरेच आहेत.

सरकारी जमिनीपैकी ९०% जमिन पट्ट्याने कसावयास देत परंतु आजपर्यंत ही जमिन केवळ सरकारी मंत्री-आमदार-जमीनदार व त्यांच्या होमबांनाच मिळत असे. नलगोंडा जिल्ह्यात 'ऑड्डागुडू' या गावात महसूल मंत्री पुरुषोत्तम रेड्डी जे स्वत: हजार एकरवाले जमिनदार आहेत त्यांच्याकडे ५८० एकर व त्यांच्या 'होमबा'कडे ५०० एकर जमीन गेले सात वर्ष होती. गतवर्षी किसान सभेने ती जमीन ताब्यात घेतली.

कम्युनिस्ट नेतृत्वाखालील किसान सभेचे आंध्रमध्ये १,७५००० सभासद असून त्यांचे 'रइत लोकम'या नावाचे मासिकही निघते. खेद मजदूर सभेचेही २ लाख सभासद आहेत. पडीक जमिनी व जादा जमिनी ताब्यात घेण्याची मोठी मोहीम या संघटनांनी हाती घेतली आहे.

उद्योग सम्राट बिर्ला महाशयांची मद्रासमध्ये २०,००० एकर व बिहार मध्ये ३०,००० एकर जमिन असून हैद्राबाद येथे ५०० एकर जमिनीत त्यांनी द्राक्षे लावली आहेत. विश्रामचा मुलगा 'मुकर्रमप्रा' याचे ताब्यातही शहरलगतची २००० एकर जमिन आहे. या सर्वांविरुद्ध किसान सभा उग्र आंदोलन सुर करणार आहे.

अशा निराशाजनक व अन्याय आणि विषमतेने भरलेल्या भागात नक्षवाद्यांना पाठिंबा मिळाला नसता तरच नवल. यावर राजकीय पक्ष सरकारने काय मार्ग काढला तो पाहिल्यास त्यांचे फसवे स्वरूप आणखी उघडे होईल.

(क्रमश:)

---

**पुढील लेखांक : बुधवार दिनांक २ सप्टेंबर अंकात**

---



समीर

## ◻ आंतरराष्ट्रीय समाजसेवा

ऑपरेशन क्रॉसरोडस् आफ्रिका नावाची एक पाश्चिमात्य संस्था अमेरिकन व कॅनडियन विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुटीत आफ्रिकेला पाठवीत असते. आफ्रिकन विद्यार्थ्यांचे जीवन त्यांना जवळून पाहता यावे हा या योजनेमागचा हेतु असतो. आता या संस्थेत कार्य करणाऱ्या कॅनडियन मंडळींनी कॅनडियन क्रॉस-रोडस् इंटरनॅशनल नावाची दुसरी संस्था काढली आहे. या संस्थेतर्फे कॅनडियन विद्यार्थी स्वयंसेवक आफ्रिकेला तर जातीलच, पण ते भारतातही पाठविता येतील की काय हे पाहण्यासाठी संस्थेची एक तरुण कार्यकर्ती कु. एलिझाबेथ पॅटरसन नुकतीच भारतात येऊन गेली, तेव्हा तिने या आंतरराष्ट्रीय समाजसेवी संस्थेची माहिती दिली.

क्रॉसरोडस्चे स्वयंसेवक कोठल्या प्रकारचे काम करतात ? ते ज्या देशात जातात तेथल्या विद्यार्थ्यांच्या बरोबर श्रम-शिबिरात भाग घेतात आणि शाळा, समाजकेंद्रे वगैरे बांधायला मदत करतात. ते वैद्यकीय योजना व शारीरिक शिक्षणाच्या शाळाही चालवतात. क्रॉसरोडस् सबंध आफ्रिकेत पसरत आहे. 'फक्त दक्षिण आफ्रिकेला आम्ही शिवत नाही, आणि टांझानियात श्री. नामरेरे यांना आम्ही नको आहोत.' फ्रेंच-भाषी देशात या संस्थेचे खूप स्वयंसेवक कार्य करीत असून ते सर्व फ्रेंच-भाषी कॅनडियन आहेत.

विद्यार्थी स्वयंसेवकांनी परदेशी जाण्याच्या आधी आपल्याच देशात समाजसेवेचे कार्य करू नये काय ? उत्तर : 'बहुतेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या देशात स्वयंसेवक म्हणून काम करण्यात स्वारस्य वाटत नाही. क्रॉसरोडस्च्या कार्यक्रमात ते स्वयं-सेवक म्हणून भाग घ्यायला तयार होतात याचे प्रमुख कारण म्हणजे परदेशी जाण्याची मौज त्यांना अनुभवायला मिळते.' पण असेही दिसून आले आहे की हे विद्यार्थी परत आल्यावर त्यांना स्वतःच्या देशातील सामाजिक समस्यात पूर्वीपेक्षा खूपच अधिक स्वारस्य वाटते व ते सामाजिक कार्यात अधिक भाग घेतात. त्याच-प्रमाणे क्रॉसरोडस्मुळे उत्तर अमेरिका व आफ्रिका यांच्या दरम्यान एक प्रकारचा दुवा जोडला जात आहे. उन्हाळ्यात जे स्वयंसेवक दीड महिन्यासाठी आफ्रिकेला

जातात ते नंतर पुन: तिकडे जाऊन अधिक दिवस राहतात. उलट त्यांचा ज्या विद्यार्थ्यांशी संबंध येतो अशा बऱ्याच आफ्रिकन विद्यार्थ्यांना कॅनडियन व अमेरिकन विश्वविद्यालयात प्रवेश मिळतो.

कॅनडियन क्रॉसरोडस् इंटर्नॅशनलचे तीन स्वयंसेवक सध्या भारतात आले असून ते गुंटूर विभागात पुरात नष्ट झालेली खेडी पुन: बांधायला मदत करीत आहेत. या कार्यात ते भारतीय विश्वविद्यालयातल्या विद्यार्थ्यांच्या बरोबर काम करीत आहेत.

क्रॉसरोडस् स्वयंसेवकात कोठले गुण असावे लागतात ? उत्तर : जगातल्या इतर प्रदेशाबद्दल जिज्ञासा, सामाजिक जागरूकता, परकीय संस्कृतीचे रसग्रहण करण्याची क्षमता, व स्थैर्य.

## ◘ 'डॉक्युमेंटेशन'चे तंत्र

पश्चिम जर्मनीच्या कोलोन विश्वविद्यालयात गेली तीस वर्षे संस्कृत शिकवीत असलेले जर्मन पंडित प्रा. हेल्मुर आर्न्झ काही दिवसांपूर्वी दिल्लीला येऊन गेले. संस्कृतप्रमाणेच 'डॉक्युमेंटेशन' या विषयाचे ते तज्ज्ञ असून त्यांनी आपल्या वास्तव्यात या दोन्ही विषयांची चर्चा केली.

ते म्हणाले काही वर्षांपूर्वी जर्मनीत संस्कृतचे अध्ययन फारच लोकप्रिय होते, पण आता इतर भारतीय भाषांबद्दलही – विशेषत: हिंदीबद्दल – जर्मन जनतेला रुची वाटू लागली आहे. 'विज्ञान व तंत्रज्ञानावरील माहितीच्या प्रसरणासाठी एखादी आंतरराष्ट्रीय यंत्रणा तयार करण्याच्या कल्पनेचा आम्ही सध्या विचार करीत आहोत. सर्व राष्ट्रीय डॉक्युमेंटेशन केंद्राच्या मदतीने स्थापन होणारे हे आंतर-राष्ट्रीय केंद्र १९८० मध्ये सुरू होईल.' ही योजना पक्की करण्यासाठी पुढील वर्षी दिल्लीला एक आंतरराष्ट्रीय बैठक होईल. 'अशा बैठकीसाठी भारतापेक्षा अधिक योग्य स्थान मिळणे शक्य नाही. डॉक्युमेंटेशनच्या क्षेत्रात भारताने चांगली प्रगती केली आहे. डॉक्युमेंटेशनचे तंत्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुरू करण्याचे श्रेय भारताला आहे. त्याचप्रमाणे डॉ. रंगनाथन् या भारतीय तज्ज्ञाने शोधून काढलेली रंगावर आधारलेली वर्गीकरण पद्धती सगळ्या जगाने स्वीकारली आहे.'

जर्मनी या क्षेत्रात नवीन आहे. पण आता जर्मनीला डॉक्युमेंटेशनचे महत्त्व पटले आहे. कारण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शास्त्रीय तपशील इतका वाढला आहे की संशोधन करू पाहणाऱ्याला सर्व माहिती चटकन गोळा करणे अशक्य झाले आहे. पश्चिम जर्मनीत सर्व मोठ्या उद्योग-धंद्यांची स्वत:ची डॉक्युमेंटेशन व्यवस्था असते.

दर वर्षी नुसत्या रसायनशास्त्रावर सुमारे दीड लाख प्रकाशने आणि अणुशास्त्रावर ५५ भाषात ८०,००० प्रबंध छापले जातात. कार्यक्षम डॉक्युमेंटेशनसाठी सर्व देशांनी व उद्योग-धंद्यांनी परस्परांशी सहकार्य करणे आवश्यक आहे.

◘ ◘ ◘

# आनंद फुले



रघुवीर जहांगीर आर्ट गॅलरीच्या बाहेर पडला तो एका धुंदीतच. कुणा नटवर मिस्त्रीच्या चित्रांचं प्रदर्शन एका दालनात भरलेलं होतं. विषय होता– 'आकाश.' प्रदर्शनातली सर्व चित्रं आकाशाच्या नानाविध भावसंगतीची होती. प्रत्येक चित्रातनं एक वेगळच भावविश्व प्रतीत होत होतं. आकाशाचे वेगवेगळे भावाविष्कार चित्रकाराच्या तरल निरीक्षण शक्तीनं टिपले होते. अगदी अशीच कल्पना रघुवीर आपल्या चित्रकलेच्या क्षेत्रात त्यावेळी उमेदवारी करणाऱ्या वर्गमित्राजवळ बोलून गेला होता. किती तरी वर्षांपूर्वी. कल्पना अशी की समुद्र, आकाश, पाऊस किंवा ऊन ह्यांच्या नानविध छटांच्या अविष्काराच्या माध्यमानं नवरसांपैकी जितक्या शक्य होतील तेवढ्या रसांची प्रतिकात्मक चित्रं रंगवायची. चित्रकारमित्र हळूहळू नवचित्रकलेच्या प्रकृतीचा होत गेला. त्याचं क्षेत्रच वेगळं झालं. सध्या स्वारीचं पॅरिसला उच्च शिक्षण चालू आहे. रघुवीर व्यवसायानं डॉक्टर झाला. सध्या नेत्र चिकित्साशास्त्रात विशेषत्व संपादन चालू होतं. फावल्या वेळात अगदी क्रमानं पंडोल–चेतना –रॅम्पार्ट–जहांगीर व शेवटी ताजला जाऊन प्रदर्शनं पाहणं मात्र सोबतीस राह्यलं. नेहमीप्रमाणं चेतना–रॅम्पार्ट आटोपल्यावर रघुवीर जहांगीरला आला. अगदी ठरल्यागत सर्वात पहिल्यांदा टेरेस गॅलरीची चेतनची नवी निसर्गचित्रे, मग केमोल्डला नंतर खालची दालनं पाहणं झालं. नटवर मिस्त्रींची आकाशचित्रे पाहिल्यावर रघुवीरला अगदी स्वतःचीच कल्पना साकार झाल्यांचा आनंद झाला होता. त्या धुंदीतच तो

भीक तर मिळालीच पाहिजे
मूल तर रडत ठेवलच पाहिजे...

# 'आता नंतूं वैरिणी!'

गॅलरीबाहेर पडला होता. आता ताजला जाणं तेवढं राह्यलं होतं. आकाशचित्रे पाह्यल्यावर रघुवीरच्या मनात चित्रकाराची गाठ घेण्याचा विचार आला होता. त्याला वाटलं की चित्रकाराला सांगावं– 'तुम्ही समुद्र, पाऊस किंवा ऊन ह्यांचीही अशीच नाना रंग छटा, नाना भाव व्यक्त करणारी चित्रे जरूर काढा.' पण दालनात संयोजकांपैकी कुणीच दिसलं नव्हतं. मनातला विचार मनातच राहचला. त्याला थांबायला वेळ नव्हता. म्हणून शेवटी रघुवीर तसाच पण एका धुंदीतच गॅलरीबाहेर पडला. त्याची पावलं अगदी नकळत त्याला ताजला नेत होती. ताजचं प्रदर्शन पाहणं संपलं की कॅफे रीगलला येऊन कोल्ड कॉफी घेणंही ठरलेलंच. आज कॅफे रीगलला महेंद्र कपूरच्या सॅली व योगी ह्या इंग्रजी ध्वनिमुद्रिका ऐकायचा विचार केव्हाच निश्चित झाला होता.

अचानक–

अचानक रघुवीरची पावलं थबकली. एका लहान मुलाच्या अगदी काळजाला जाऊन भिडणाऱ्या आवाजानं तो भानावर आला. गेट वे ऑफ इंडियाजवळच्या शिवाजीच्या पुतळ्याच्या फूटपाथवर तो होता. कोपऱ्यावर एक भिकारीण बसली होती. पुढ्यात एक लहान मूल अगदी जीवाच्या आकांतानं रडत होतं. त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली होती. रघुवीरला ते मूल रडताना पाहवत नव्हतं. रडणं ऐकवत नव्हतं. ताजला जाण्यासाठी पाऊलही उचलवत नव्हतं. जहांगीरची धुंदी

आता काही वेळापूर्वी होती का नव्हती इतपत पार ओसरली होती. त्याच्यातला नेत्रशास्त्र जाणारा डॉक्टर जागा झाला होता. मुलाच्या डोळयावरच्या पट्टीनं त्याची कर्तव्यभावना जागृत झाली होती.

रघुवीर तिथंच थांबला. ते मूल तसंच रडत होतं. येणारे जाणारे यत्किंचितही विचलित न होता आपली मार्गक्रमणा करीत होते. पैकी कुणा एकाला दखल घ्यावीशी वाटत नव्हती. जो तो स्वतःपुरतं बघत होता. रघुवीरला स्वतःचंच आश्चर्य वाटलं. त्याचीच तेवढी पावलं तिथं का खिळली होती ? तो एकटाच तेवढा का अस्वस्थ झाला होता ? बेचैन झाला होता ? क्षणभर विचार केल्यावर त्याचं त्यालाच उमजलं. त्या भिकारणीच्या मुलाच्या रडण्यानं त्याला विचलित केलं नव्हतं ! डोळयांवर बांधलेल्या पट्टीनं त्याची व्यवसायनिष्ठ उत्सुकता जागविली होती. रडण्यानं लक्ष वेधलं गेलं होतं एवढंच. एरवी लक्ष वेधलं गेलंच असतं असं नाही. कदाचित मघाच्या चढलेल्या कलानंदाच्या धुंदीत लक्ष गेलंही नसतं. एव्हाना त्या धुंदीतच रघुवीर ताजला असता ?

" क्या हुआ इस बच्चे को ?"

भिकारणीला पैशाची अपेक्षा होती. प्रश्नाची नव्हती. तिनं लक्षच दिलं नाही. कदाचित तिला प्रश्नही समजला नसेल अशी संभाव्यता होती.

रघुवीरनं पुन्हा विचारलं—

" इस बच्चेको क्या हुआ ?"

भिकारणीनं मान वर करून नवलाईनं त्याच्याकडं पाहूचलं. तसं रघुवीर म्हणाला—

" बच्चेको क्या हुआ ? आँखो के उपर पट्टी क्यो ?"

" कुछ नही । कुछ नही हुआ ।" कसंबसं भिकारणीनं उत्तर दिलं.

" मुझे जानकारी है इसकी । मुझे बताओ. शायद इसिलिये वह रोता होगा ।"

" नही । नही ।" असं म्हणत ती त्या मुलाला थोपटून गप्प करण्याचा प्रयत्न करू लागली. ते मूल काही केल्या रडायचं थांबत नव्हतं.

" बाई, मै डॉक्टर हूँ । इस बच्चेके आखोंकी जाच करना चाहता हूँ । एक पैसाभी नही लूंगा ।"

रघुवीर आता जिद्दीस पेटला होता. एव्हाना चालू असलेला तमाशा पाहूचला चार सहा बघेही जमले होते. पैकी कुणाला एकाला कंठ फुटला—

" फुकटके इलाज हो रहा है तो करवा क्यू नही लेती ?"

" तेरा कुछ नुकसान थोडा होगा ।"

ती भिकारीण काही केल्या रघुवीरला व बघ्यांना दाद देत नव्हती. मूल जीवाच्या आकांतानं रडतच होतं. त्याला गप्प करण्याचे तिचे प्रयत्न वांझोटे ठरत होते. ती भिकारीण स्वतःदेखील भांबावल्यासारखी दिसत होती. रघुवीरच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. हे लोक कुठल्याश्या जंगली वनस्पतीच्या पाल्याचा रस टाकून

तात्पुरते आंधळेपण आणण्याचे अघोरी प्रयत्न करीत असतात हे केव्हातरी रघुवीरच्या वाचनात आलं होतं. त्याला शंका आली की असला तर काही प्रकार इथं नसेल ना ? त्याशिवाय ही भिकारीण अशी टाळाटाळ करणार नाही.

रघुवीरनं आजूबाजूला पाह्यलं. अपोलो रूमच्या फूटपाथवर सखाराम उभा होता. तसा त्याला उत्साह आला.

एका बघ्याला तो म्हणाला– "प्लीज, कॉल दॅट पुलीस !"

तो उत्साही बघ्या सखारामच्या दिशेने धावला.

पोलीस म्हटल्यावर ती भिकारीण हादरली. तिनं पटकन् मुलाच्या डोळ्यावरच्या बांधलेल्या पट्टीच्या गाठेला हात घातला. एका क्षणात गाठ सोडून पट्टी खसकन् ओढली. तसं एकदम ते मूल रडायचं थांबलं.

रघुवीरचे डोळे विस्फारले. क्षणभर तर आपण काय पाहयलं ह्याचाच बोध होईना. जाणीव झाली तर स्वतःच्या डोळ्यांवर–त्याहून जास्त स्वतःच्या कल्पनाशक्तीवर–विश्वासच बसेना...क्षणार्धात त्याचं सारं अंग शहारून आलं....

तेवढ्यात 'काय झालं ?' म्हणत सखाराम आला.

'काय झालं ?'

त्यानं रघुवीरलाच विचारलं. 'पहिल्यांदा ह्या सर्वांना विचारा–काय पाहयलं ते ! मी आहेच इथं. कुठं पळून जात नाही.'

'काय झालं ?'

सखारामनं सर्वांना उद्देशून प्रश्न केला. प्रत्येक जण आपल्या परीनं सांगू लागला. सांगणं झालं. त्यानं सहेतुकपणं रघुवीरकडं पाहयलं.

'मी तुमच्याबरोबर पोलीस चौकीला येतो.'

'बाई, चलो ठानेको !' सखारामनं फर्मान जारी केलं. भिकारीण गयावया करू लागली. बघ्यांपैकी कुणाचीच सहानुभूती तिच्याकडं नसल्यामुळं सखारामला चौकीवर नेण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नव्हता.

'बाई, चलो हमारे साथ । जो कुछ बोलनेका वह साहाबको बोलो ।'

शेवटी सखाराम, त्याच्याबरोबर रघुवीर, मागून ती भिकारीण व एक दोन बघे अशी धिंडका पोलीस चोकीच्या दिशेने निघाली.

अशीच एक धिंडका एका निष्पाप दुर्दैवी जीवाची निघाली होती.

एक जीव जन्माला आला. आईबाच्या प्रेमाच्या व परिस्थितीच्या सावलीत वाढला. मोठा झाला. आईबापानं आपल्या परिस्थितीप्रमाणं चांगल्यातलं चांगलं स्थळ शोधून त्या जीवाला त्याच्या नियत घरी पाठविलं. नव्या घरात व नव्या माणसात जीव सुखावला. पहिलं वर्ष उलटलं. दुसरंही उलटलं. पण घरात नव्या जीवाची चाहूल काही जाणवत नव्हती. ह्या एकाच गोष्टीनं घराचं–म्हणजे घरांतल्या माणसांचं–अंतरंग पालटलं. त्या निष्पाप जीवाला घरातली माणसं

वेगळ्याच तऱ्हेनं वागवू लागली. तिला मूल होत नव्हतं हा जणू तिचाच गुन्हा होता. फक्त तिचाच. घरांतल्या माणसांनी ह्याच समजुतीनं तिला वागवायला सुरुवात केली. जे घडत नव्हतं त्याला तो जीव जबाबदार नव्हता. त्याच्या हाती करुणा भाकण्या पलिकडं काहीच नव्हतं.

सासरहून माहेरी रवानगी झाली. कायमची. सबब मूल होत नाही म्हणून. तिच्या नवऱ्यानं दुसरी बायको केली. नवा संसार मांडला. पहिली टाकली. ती मेली आहे का जिवंत आहे ह्याचं त्याला काहीही सोयरं-सुतक उरलं नव्हतं.

तिच्या घरी दोन चार जुनी पितळी–तांबी भांडी होती. त्यांत एक पानाचं तस्त (पिकदाणी) होतं. आजोबाचं का पणजोबाचं होतं म्हणे ते.

नवऱ्यानं टाकलेली म्हणून तिची अवस्था त्या तस्तासारखीच होऊ पाहत होती की कुणीही पिक टाकायला धजावं. एखाद्या वेसवेहून गयीबिती. वेसवेपण परवडलं. तिच्या मनात असलं व व्यवहार पटला तर पुढची पायरी. एरवी नाही. तिला जाब विचारायची कुणाची हिंमत नाही.

दिवसाकाठी सरळ सुरवाडं जीणं अधिकाधिक कठीण होऊ लागलं. नुसतं पाळतीवर राहणं कालच्यात जमा झालं. आपल्या परीनं प्रयत्नांना सुरुवात झाली. पैकी एकजात साऱ्यांना हवं होतं फक्त तिचं शरीर. त्याचा भोग. कुणीही मायेचा पूत लग्न करायची बात करीत नव्हता.

अर्ध्या गोवऱ्या स्मशानांत गेलेले आईवडील तिच्या विटंबनेच्या बाबतींत असमर्थ होते. परिस्थितीनं लाचार होते. त्यांना आपल्या लेकीची ही परवड पाहवत नव्हती. पण पाहण्याचा भोग जिथं ललाटीच लिहला होता तिथं त्यांचा काय पाड ? आई-वडीलांची अशी असहाय्यता तिला पाहवत नव्हती. तिला स्वतःच्या हलाखीपेक्षा त्याचंच जास्त दुःख होत होतं. तशात पाठची बहिण न्हातीधुती झालेली. तिच्या लग्नाचा प्रश्न. तिच्यामुळं बहीणीच्या लग्नाची परवड होणं अटळ होतं.

तिच्याच वयाच्या एका शेजारणीची मावशी मुंबईला होती. कोण्या गिरणीत कामाला होती. तिनं आपल्या भाचीला मुंबईला बोलावलं होतं. नोकरी मिळण्याची शक्यता होती. झालंच तर लग्नही जमू शकत होतं. लवकरच ती शेजारीण मुंबईला जाणार होती. तिच्या मनानंही विचार केला की मुंबईला जायला काय हरकत आहे ? गावात राहून राहून किती दिवस राहणार ? अन् असं लाजिरवाणं जिणं जगणार ? त्यापेक्षा मुंबईला नोकरीचं जमलं तर पाच-दहा रुपये गावाकडं तरी पाठविता येतील. नशिबात सुख असलंच तर लग्नही होऊन जाईल. घरसंसार होईल. एवीतेवी इथं खायला काळ आणि भुईला भार होऊन राहण्यापेक्षा ते परवडलं. शिवाय लहानीचं लग्न खोळंबून राहणार नाही.

तिनं सखी शेजारणीला विश्वासात घेतलं. शेजारणीनं मावशीला घेतलं. मुंबईचं जाणं निश्चित झालं. तिच्या घरच्यांची केवळ अफाट मायेपोटी परवानगी मिळणं

शक्यच नव्हतं. केवळ तेवढ्यासाठी इथं गावी घरी राहण्यातनं काहीच भलं होणं शक्य नव्हतं. मन कठीण करायला हवं हे तिनं जाणलं. मुंबईला जाणं निश्चित केलं. संशयाला जागा राहू नये म्हणून व शेजारणीमार्फत कळून मुंबईला गेल्यावर कुणी गावी परत घेऊन जाण्यासाठी येऊ नये म्हणून पहिल्यांदा शेजारीण जाणार होती. नंतर महिनाभरानं ती जाणार होती. सारं सुखाडं झाल्यावर ती स्वतःच कळविणार होती.

जसं ठरलं तसं घडलं. मुंबईला येणं झालं. मावशीकडं राहण्याची सोय झाली. गिरणीत नोकरीची.

तिनं सारं सुखाडं झाल्याच्या समाधानाचा निश्वास टाकला.

पण लवकरच तिला कळालं की आयुष्य वाटतं तेवढं सुतासारखं सरळ नाही.

गाव बदललं. पण माणसं मनांनी बदललेली नव्हती. ती तीच होती. जे गावात तेच इथं. टाकलेली बाई म्हणजे जणू ज्याला ज्याला म्हणून इच्छा होईल त्यानं त्यानं गळ टाकून बघण्याजोगी बाई. त्यात वावगं किंवा जगावेगळं असं काहीच नाही. गिरणीत-शेजारात तिला ह्याचाच प्रत्यय हरघडी येऊ लागला. तिचं एकटीचं अब्रूनिशी जीणं कठीण होऊ लागलं. गाव परवडलं पण शहर नको असं वाटू लागलं. गावातल्यांना नाही मनाची पण जनाची तरी थोडी लाज होती. वचक होता. इथं उघड उघड राजरोसपणं सौदे होत होते. इथं टाकलेली-बिनटाकलेली, लग्न झालेली, न झालेली असा भेदभावच मुळी नव्हता. इथल्या लग्न झालेल्या स्त्रीला स्वतःलाच स्वतःच्या अब्रूची तिच्या गावातल्या स्त्रियांना होती तशी तेवढी चाड नव्हती. मग इतरांना त्यांच्याविषयी नसल्यास नवल ते काय होतं ? घर-धन्याशीही वागताना शरम वाटावी अशा रीतीनं — मनमोकळेपणानं इथल्या कुंकू लावणाऱ्या बायकांना वागताना, खिदळताना पाहून ती अकाक् झाली होती. तिला वाटलं की आपण उगाच नसत्या मोहात पडलो. उगाच आगीतनं फुफाट्यात आलो. गिरणीतल्या व शेजारातल्या वखवखणाऱ्या नजरा टाळताना तिचा जीव हैराण होऊ लागला. एखाद्या क्षणी तिला वाटायचं की उगाच आपण हैराण होतोय. गिरणीत आजूबाजूला काम करणाऱ्यांपैकी काही हसून खिदळून स्वतःचा स्वार्थ बघत होत्या. त्यातल्या कितीतरी लग्न झालेल्या होत्या. काहीजणी तर मुकादमला लागू होत्या. त्याची त्यांना खंत नव्हती. करून सवरून त्या पतिव्रताच होत्या. त्या दिमाखानं मिजास करीत होत्या. तिचं असं वाटणं फार तर क्षणाचंच ठरायचं. पुनः येरे माझ्या मागल्या.

पण एवढ्यावरच तिचं नशीब सुख मानायला राजी नव्हतं. तिची अजून खूप खूप परवड होणंच जणू त्याला अभिप्रेत होत !

शेवटी तिलाही नासाविलं गेलंच. बापाच्या वयाच्या व स्वतःला न्हातीधुती लग्नाचो पोर असलेल्या मावश्यानं एके दिवशी कावा साधला. कार्यभाग उरकून

तो राजरोसपणं नामानिराळा झाला. पण ती फसली. तिच्यातला नवा बदल मावशीच्या लक्षात येता क्षणीच तिनं तिची उचलबांगडी केली. तिची धिंडक घराबाहेर काढली. तिचं ऐकल्याची किंवा शेण कुठं खाल्लं हे विचारण्याची तिल गरजच वाटली नाही. तिनं पापाला आपल्या घरांत थारा दिला नाही. ती रस्त्याव आली. रस्त्याची झाली. आला दिवस निभवायला शिकली. जसंजसं जग समजत गेलं तसतशी जगाशी वागायला शिकत गेली. ठोकरा खाल्ल्यात ठोकरा दिल्य पापपुण्य, बरंवाईट वगैरेंचा विचार केव्हाचाच विसरली होती. जमेल त्या रितीनं जगणं शिकली. त्यावेळी वखवखणारे इशारे अंगावर–खरं म्हणजे अब्रूवर–शहारे आणायचे. आता ती स्वतःच इशारे करू लागली. नवशिके गिऱ्हाईकं हेरू लागली. जगानं तिचं तस्त केलं अन् त्याचा सूड म्हणून तीही जगाला तस्त मानून पचापच थुंकू लागली.

त्याच निष्पाप दुर्दैवी जिवाची धिंडका आज पोलीस चौकीकडं निघाली होती.

'यू सी मिस्टर...काय बरं तुमचं नाव ?...'

सुरुवात इंग्रजीनं झाली पण शेवटी मातृभाषा सोईची ठरली. 'माझं नाव डॉ. रघुवीर दिक्षित...'

सात्विक संतापानं नुसता फुललेला रघुवीर बोलला.

पोलीस इन्स्पेक्टरनं त्याला जरा बाजूला बोलवून घेतलं–'हे बघा, मिस्टर दिक्षित ! मला तुमची कर्तव्य तत्परता पाहून खूप आनंद होतो आहे. आपल्या देशाला तुमच्यासारख्या तरुणांची नितान्त गरज आहे...'

रघुवीरच्या कपाळावरच्या आठ्या पाहून तो सूज्ञ इन्स्पेक्टर समजून जरा वचकला. त्यानं स्वतःला सावरलं. 'स्वतःचं पोट भरण्यासाठी कुणी इतका अघोरी उपाय करू शकतो हे सांगूनही कुणाचा विश्वास बसणार नाही. असं काही वाचनात आलं तर एक अतर्क्य कल्पना म्हणून फार तर त्या लेखकाचं कौतुक वाटेल. पण एक सत्य म्हणून कधीही पटणार नाही.

हे सारं खरं असलं तरी आमचे हात कायद्यानं बांधलेले आहेत. भावनेपेक्षा कायद्याच्या कसोटीवर आम्हाला गोष्टी सप्रमाण सिद्ध कराव्या लागतात. ही गोष्ट कायद्याच्या चौकटीत बसविणं शक्य नाही. कोर्टात जर केस सिद्ध करता आली नाही तर नसत्या कटकटी होतात. वरन डिपार्टमेंटल इन्क्वायरी होते ती वेगळीच. माझ्या मते ही केस काही रेकॉर्ड होऊ नये. तसा मी त्या भिकारणीला दम भरतो. मग पुनः ती असं काही करणार नाही.

तुम्हाला त्रास झाला खरा. पण...पण आमचीही बाजू तुम्ही लक्षात घ्या...

रघुवीर पोलीस चौकीच्या बाहेर पडला तेव्हा त्याचं डोकं नुसतं भणभणत होतं. विचारांनी तसच रागानं.

'म्हणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. कायदा माणसांसाठी आहे की माणूस

कायद्यासाठी आहे ? कोणासाठी कोण ?

रघुवीरला आता त्या भिकारणीची चीड येत नव्हती. त्या पोलीस इन्स्पेक्टरची येत होती. माणुसकी विसरलेल्या कायद्याची येत होती. अन् झक मारल्याबद्दल स्वतःचीही येत होती. कुठून त्याला दुर्बुद्धी झाली होती कोण जाणे ?

पण त्या भिकारणीचं ते अंगावर शहारे आणणारं अघोरी कर्म अजूनही त्या आठवणीसरशी शहारे आणत होतं.


त्याच्यानं कल्पनाच करवेना, अजूनही त्याचा स्वतःवर—स्वतःच्या डोळ्यांवर—काय पाहयलं त्याच्यावर—विश्वास बसत नव्हता. विश्वास ठेवायला मन राजीच होत नव्हतं. काही केल्या होत नव्हतं.


रडणाऱ्या मुलाला पाहून दया वाटावी व भीक देण्याची इच्छा प्रबळ व्हावी म्हणून ते मूल सारखं रडतच ठेवायला पाहिजे.

ह्यासाठी त्या भिकारणीनं एक लहानसं झुरळ त्या मुलाच्या डाव्या डोळ्याच्या साहजिकपणं मिटणाऱ्या पापणीवर ठेवून ते गुदमरून मरू नये म्हणून त्यावर पॉलीशच्या लहान डबीचं झाकण ठेवलं होतं व वरनं पट्टी बांधली होती. मिटल्या पापणीवर स्वतःच्या सुटकेसाठी धडपडणारं ते झुरळ त्या भिकारणीच्या हेतुपूर्तेने-साठी आपसुखच सहकार्य देत होतं. म्हणून ते मूल जीवाच्या आकांतानं रडत होतं.

अन् ह्या अघोरी कर्मासाठी माणसानं तयार केलेल्या कायद्यात काहीही प्रति-बंधक तरतूद नव्हती. माणुसकीची ध्वजा मिरविणारा कायदा माणुसकीला—महन्मंगलं मातृत्वाला—लांछन ठरणाऱ्या ह्या निर्दयी कर्माला प्रतिबंध करू शकत नव्हता. मग शिक्षा करण तर दूरच राहील.

म्हणून रघुवीरला आता स्वतःचीच चीड येत होती. फक्त स्वतःचीच.





# भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा

गेली दोन हजार वर्षे परकीयांशी झालेल्या लढायात हिंदूंचा सतत पराभवच का होत आला, या मन विषण्ण करणाऱ्या पण राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने सर्वोच्च महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार श्री. ज. द. जोगळेकर यांनी आपल्या ग्रंथात केला आहे. केवळ विषयावरून-देखील या ग्रंथाचे मोल समजण्यासारखे आहे.

लेखकाच्या मते हिंदूंनी केलेली युद्धशास्त्राची उपेक्षा हे या पराभव परंपरेचे कारण. आपला हा प्रबंध सिद्ध करण्यासाठी, अलेक्झँडर पोरसच्या झेलमच्या लढाईपासून आर्थर वेलस्ली व दौलतराव शिंदे यांच्यात १८०३ साली झालेल्या वसईच्या लढाईपर्यंतच्या, इतिहास बदलून टाकणाऱ्या ६ लढाया घेऊन, त्यांचे तपशीलवार विवेचन लेखकाने केले आहे.

या सर्व लढायांचा साचा (pattern) सामान्यतः सारखा आहे. हिंदू राजा व हिंदू सैनिक रणांगणाला वा मृत्यूला घाबरणारा नाही. ' हतो मा प्राप्स्यसी स्वर्गम्, जित्वा वा मोक्ष्यसे महीम ' ही गीतेची शिकवण त्याच्या रोमरोमात भिनलेली आहे. त्यामुळे घोड्यांच्या टापांनी व शस्त्रास्त्रांच्या खणखणाटाने त्याला कधी कापरे भरत नाही. अत्यंत उत्साहाने तो रणभूमीवर प्रवेश करतो. पण विशाल युद्धयोजना मनाशी निश्चित करून त्यानुसार सैन्यदलाच्या विविध हालचाली करणे, नवनव्या व्यूहरचना, नवनवी शस्त्रास्त्रे, वाटेतील मोठ्या नद्या पार करण्याचे कसब

दि. वि. गोखले

आदी गोष्टी या तरवार बहाद्दराला अज्ञात आहेत. त्याचबरोबर या स्वाऱ्या ज्या टोळ्या करतात, त्यांच्या देशात कोणत्या राजकीय, सामाजिक घडामोडी चालू आहेत, त्यांची बलस्थाने नि मर्मस्थाने कोणती, या गोष्टींबद्दलही हिंदू वीराला उत्सुकता नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून शौर्याची परिसीमा गाठूनही हिंदू महावीराच्या वाटचाला सदैव स्वर्गच आला! पृथ्वीचे राज्य करावयाची संधी अर्थातच त्याच्या ऐवजी सतत त्याच्या शत्रूला लाभली. परकीयांशी पहिल्या प्रथम गाठ पडली तेव्हा त्यांची शस्त्रास्त्रे, त्यांचे व्यूह या गोष्टी त्याला अज्ञात असाव्यात हे एक वेळ क्षम्य मानता येईल. पण एकाच शत्रूशी पुनः पुन्हा गाठ पडूनही हजार वर्षे तो आपल्या जुन्या चुका उगाळीत रहावा, नव्या गोष्टी त्याने समजावूनच घेऊ नयेत, याला उपेक्षावृत्तीखेरीज अन्य काय नाव देणार?

## अश्वदळाचे महत्व

श्री. जोगळेकरांनी अलेक्झँडर व पोरस यांच्यातील झेलमच्या लढाईचे विवेचन केले, ते २ हजार वर्षांपूर्वीच गजदळापेक्षा अश्वदळ कसे श्रेष्ठ ठरले होते, हे सांगण्यासाठी. पण याचबरोबर पोरसाला स्वतःची व शत्रूची बलस्थाने आणि मर्मस्थाने ओळखता आली नाहीत हेही खरे. कारण, तसे असते तर अलेक्झँडरने झेलम ओलांडण्याची वाट न पाहता, पोरसानेच आपले गजदळ नदीपार नेले असते व तो शत्रूवर कोसळून पडला असता. त्याचबरोबर आपल्या धनुर्धारींना पुरुषभर उंचीची, पण अतिप्रभावी धनुष्ये टेकविण्यासाठी कडक जमीन लागते हे लक्षात घेऊन त्याने स्वतःच योग्य दिवस निवडून शत्रूवर हल्ला केला असता. पण पोरस अलेक्झँडरच्या हल्ल्याची वाट पाहत थांबला व अलेक्झँडरच्या कसलेल्या अश्वदळाने पोरसाच्या गजदळाचा धुव्वा उडविला. अश्वदळ आपल्या चपलतेमुळे गजदळावर मात करू शकते, ही गोष्ट या लढाईत निर्विवाद सिद्ध झाली. तरीही लेखकाने म्हटल्याप्रमाणे याहीनंतर अनेक शतके भारतीय राजांच्या सेनादलात गजदळाचाच वरचष्मा होता. नवीन काही शिकावयाचे नाही हा जणू हिंदूंचा पणच दिसतो!

इसवी सन एक हजारापासून भारतावरील मुसलमानांच्या स्वाऱ्यांना प्रारंभ झाला. गझनीच्या महमुदाने पहिली स्वारी १००१ साली केली व त्यानंतर केलेल्या स्वाऱ्यात त्याने उत्तर व पश्चिम भारतातील सर्व हिंदू राजांना पराभूत केले. हे विजय मुसलमानांना मिळाले. याचे श्रेय त्यांच्या एकसंध, शिस्तबद्ध व व्यूहरचनेत पटाईत असलेल्या अश्वदळाकडे जाते. अश्वदळामुळे सैन्याच्या हालचाली जलद होत आणि मुसलमानी सैन्य एकसंध म्हणजे एकाच नेत्याचे हुकूम मानणारे व त्याची ततोतंत अंमलबजावणी करणारे असल्यामुळे, सेनापती त्याच्या विविध हालचाली करू शकत असे. याविरुद्ध हिंदूंच्या घोडदळाला अरबी व तुर्की घोडदळाचे चापल्य नव्हते. त्यांच्याबरोबरचे हत्तींचे ओझे कायम होते व हिंदू सैन्य विविध राजांच्या पथकांचे मिळून झालेले असल्यामुळे त्यांच्यात सुसूत्रता फारच थोडी

होती. विविध व्यूहरचना त्यांना जवळपास अज्ञातच होत्या. अशा व्यस्त स्थितीत अलेक्झँडरप्रमाणेच मुस्लिम हल्लेखोर विजयी व्हावेत हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

पण हिंदूंना आपल्या उणीवा उमगल्या नाहीत आणि म्हणून त्यांना त्या नाहीशाही करता आल्या नाहीत. अश्वदळाचे खरे महत्त्व त्यांना समजलेच नाही. अन्यथा त्यांनी अरबी व खोरासनी घोडे आणविले असते व मुसलमानांचे युद्धतंत्र त्यांनी आत्मसात केले असते. विविध व्यूहरचना हिंदूंनी पाहिल्या होत्या व त्यांचे परिणामही त्यांनी अनुभविले होते. पण नवी तंत्रे शिकण्याची त्यांची इच्छाच नव्हती. हिंदूंचा युद्धव्यूह ठरलेला असे. सर्व सेना एकत्र करून शत्रूवर कोसळावयाचे व संख्येच्या दाबाने त्याला लोळवायचे हाच एक व्यूह सहाशे वर्षे चालू होता. हिंदूंचा हा सेनासागर चाल करून आला की मुस्लिम घोडदळ मागे हटे व हिंदू सेनांच्या बगलांवर हल्ले चढवी. आणि हिंदूंचा दम उखडला की त्यांच्यावर सर्व बाजूंनी कोसळून पडून त्यांचा धुव्वा उडवी. मुसलमान सेनापती राखीव सैन्य ठेवत आणि अंतिम विजय मिळविण्यासाठी क्षणिक माघार घेण्यात त्यांना कमीपणा वाटत नसे. मध्य आशियातील मुसलमान जमातींचा, युरोपातील सुधारणाशील समाजांशी संबंध आला. मुसलमानांनी धर्मवेडापायी आपल्या मनाची कवाडे बंद करून घेतलेली असल्यामुळे युरोपच्या सामाजिक व राजकीय मन्वंतराचे, तेथील संस्कृतीचे वारे त्यांना लागू शकले नसले, तरी नवनवी शस्त्रास्त्रे व युद्धशास्त्र यांच्याबाबत मात्र मुसलमान अत्यंत जागरूक होते. युरोपात बंदुका नि तोफा आल्या व मुसलमानांनी ती शस्त्रविद्या आत्मसात केली.

याविरुद्ध, हिंदू मात्र मुसलमानांचा शतकानुशतके संबंध येऊनही काही शिकले नाहीत. हिंदूंपाशी ना विविध व्यूहरचना होत्या, ना त्यांच्यापाशी पराभव झाल्यास माघारीच्या योजना तयार असत. तरोरी (पृथ्वीराज व घोरी), कनवा (राणासंग बाबर) नि राक्षस तागडी (विजयनगरचा रामराया व दक्षिणेतील सुलतान) या तिन्ही लढायांची सुरुवात नि शेवट, त्यांच्यात सुमारे ३५० वर्षांचा काल जाऊनही सारखाच आहे. कारण सतत विकसित होणारे शास्त्र म्हणून हिंदूंनी युद्धाकडे कधी पाहिलेच नाही. शत्रूची नवनवी तंत्रे नि शस्त्रे कधी अभ्यासिली नाहीत. स्वतःच्या मागास युद्धतंत्रात सुधारणा केल्या नाहीत व जगात इतरत्र काय चालले आहे, याची चौकशीही केली नाही.

## न शोभणारा महापुरुष

शिवाजी हा स्थितिप्रिय हिंदू परंपरेला न शोभणारा महापुरुष. त्याने जसे गनिमी काव्याचे तंत्र बसविले, तसे आरमाराचे महत्त्वही ओळखले. अश्वदळाची महती ओळखणारा पहिला हिंदू तोच. म्हणून मराठी राज्य डोंगरी किल्ल्यांच्या आधाराने उभे असतानाही, त्याने उत्तमोत्तम अरबी घोडी आणून आपली पागा सिद्ध केली. माघार ही त्याने कधीच प्रतिष्ठेची बाब मानली नाही आणि एका लढाईवरच त्याने

आपले सर्व सैन्य व राज्य पणाला लावले नाही. शिवाजी महाराजांची ही शिकवण व मराठी अश्वदळ यांच्या जोरावरच मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावले. मात्र, अवघा हिंदुस्थान आपल्या घोड्यांच्या टापाखाली आणणाऱ्या मराठ्यांनाही, रजपूत व विजयानगरच्या राजांप्रमाणेच बंदुका व तोफखाना यांचे महत्त्व उमगलें नाही. तसेच, नद्यांवर सेतू बांधण्याचे कसब साध्य करून घेण्याचा प्रयत्नही त्यांनी केला नाही.

पानिपतच्या लढाईत याचे परिणाम मराठ्यांना भोगावे लागले. मराठे सेतू बांधू शकत असते, तर अब्दाली दिल्लीस पोहोचायच्या आधीच दत्ताजी शिंद्यांनी अंतर्वेध निर्यवन केली असती. लेखकाने म्हटल्याप्रमाणे सदाशिवराव भाऊने तोफखान्याचे महत्त्व ओळखून इब्राहिमखान गारद्यास नोकरीस ठेवले हे खरे आहे. पण अवजड तोफखाना सैन्यात आल्यावर, त्याच्याशी आपल्या हालचाली जमवून घेण्यासाठी इतर सर्व सेनापथकांना जी नवी तंत्रे शिकावी लागतात, ती गनिमी काव्याने लढण्याची सवय असलेल्या आपल्या सेनापथकांना शिकविण्याचा प्रयत्न भाऊने केल्याचे आढळत नाही. अलेक्झँडरने सिथियन टोळ्यांचे लढण्याचे अभिनव तंत्र पाहिल्यावर लगेच आपल्या सेनेला त्याचे पाठ दिले. पण भाऊला, पडतूरपासून दिल्लीपर्यंतचा पल्ला गाठीपर्यंतच्या प्रदीर्घ कालातही हे काही सुचले नाही. लढाईच्या आदल्या दिवशी त्याने आपल्या सेनेला ते समजावून देण्याचा निष्फळ प्रयत्न केला. मराठ्यांची मर्मस्थाने अब्दालीने अचूक हेरली नि त्यांचे पानिपत केले.

## वसई–सर्वार्थाने विषम सामना

पानिपतच्या धक्क्यातून मराठी सैन्य सावरलेच नाही. त्यामुळे जगातल्या पंचखंडात लढाया खेळणाऱ्या व आधिभौतिक सुधारणात अग्रभागी असणाऱ्या इंग्रजांशी ते यशस्वी सामना देऊ शकतील हे शक्यच नव्हते. म्हणून वसईची लढाई हा सर्वार्थाने विषम सामना होता. या लढाईत मराठे जिंकले असते तर ते एक आश्चर्य मानले गेले असते. तरीही, लेखकाने या ग्रंथात या लढाईचा अंतर्भाव केला, तो आपण आपल्या पडत्या काळातही आपल्या पारंपारिक चुकांना कसे घट्ट बिलगून होतो हे दाखविण्यासाठीच.

या ग्रंथातले एकही विधान आधाररहित नाही. प्रत्येक लढाईचा तपशील लेखकाने श्रमपूर्वक गोळा करून येथे सादर केला आहे. या सहाही लढायात जे सेनापती परस्परांशी भिडले त्यांची अल्प पण मनोज्ञ व्यक्तिचित्रे लेखकाने रंगविली आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी हिंदूंनी केलेल्या चुकांची यादी दिली आहे. सर्व ग्रंथ वाचून झाल्यावर पुन्हा या याद्या वाचल्या की, लेखकाने आपला प्रबंध केवढ्या भक्कम पायावर आधारला आहे याची जाणीव होते. लढायांचे आलेख वेधक आहेत. त्यामुळे वाचकाला लढायांची योग्य कल्पना येईल. लेखकाची भाषा ओघवती आहे.

२६ ऑगस्ट १९७०

श्री. जोगळेकरांना दोन सूचना कराव्याशा वाटतात. ग्रंथ काहीसा लहान झाला (१२० पाने). लढायांच्या विवेचनाच्या जोडीला त्यांनी दोन लढायांदरम्यानचा भारताचा इतिहास काहीशा विस्ताराने दिला असता, तर ग्रंथ मोठा होऊनही निवेदनाची रंजकता कायम राहिली असती. लेखक मधून मधून 'आता आपण पारसच्या सैन्याचे चित्र पाहू', 'आता तुर्कांच्या सैन्याकडे वळू' असे वाक्यप्रयोग करतो. ही पद्धत आता जुनी झाली नि त्यामुळे निवेदनाच्या ओघात खंड येतो.

ग्रंथाला श्री. नानासाहेब गोरे यांची मर्मग्राही प्रस्तावना लाभली आहे. लेखकाच्या प्रबंधाचा त्यांनी ठासून पाठपुरावा केला आहे. ते म्हणतात की, भारतीय मन गिरविणारे किंवा नकलणारे बनले होते; त्यात सृजनशीलता राहिली नव्हती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारताच्या इतिहासातले 'सहा सोनेरी पाने' लिहिले. श्री. जोगळेकर हे सावरकरांच्याच शिष्यवर्गातले. पण त्यांनी सहा कृष्ण पृष्ठे सादर केली आहेत. मात्र यात परस्परविरोध कुठेच नाही. आपल्या हजार वर्षांच्या इतिहासात सहाच सोनेरी पाने असावीत आणि बाकी सर्व अंधार असावा, याची खंत श्री. जोगळेकरांना वाटते, म्हणून त्यांनी हा खटाटोप केला. ज्यांचे स्वदेशाविषयीचे प्रेम डोळस आहे, त्यांना लेखकाचे विवेचन अधिक डोळस बनवील, या श्री. गोरे यांच्या अभिप्रायाशी मी सहमत आहे.

तरुण पिढीच्या हाती हा ग्रंथ सतत दिसला पाहिजे, एवढे त्याचे मोल आहे, हे माझे मत.

**भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा : ज. द. जोगळेकर**
**सोमैय्या पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई १४ : मूल्य साडेदहा रुपये**

□ □ □

---


# शिलंगणाचं सोनं


## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**


---




श्रीकांत आंबेकर

"... पृथ्वीवर सजीव सृष्टी अस्तित्वात असावी असा आमच्या शास्त्रज्ञांचा कयास आहे. अनेकांना कदाचित आश्चर्य वाटेल या मताबद्दल ! अन् साहजिकच आहे ते. कारण हीच शास्त्रज्ञ मंडळी गेल्या कैक वर्षांपासून, 'पृथ्वीवर सजीवांना पोषक अशी नैसर्गिक परिस्थिती जवळजवळ नाहीच' असं सांगत आली आहेत.

अन् त्यांचं हे मत तरी खोटं कुठं आहे ? साधं वातावरणाचंच पाहा ना–पृथ्वीवर ते आधीच कितीतरी दाट आहे. शिवाय त्यातही त्या सर्वभक्षी प्राणवायूचं प्रमाण अधिक ! नशीब आमचं चांगलं म्हणून तो नतद्रष्ट वायु आमच्या इथे दुर्मिळ आहे.

दुसरं, वातावरणाचा दाब. तो तर इतका प्रचंड आहे की, आम्ही जेव्हा पृथ्वीवर जाऊ तेव्हा पुरेशा संरक्षणाअभावी तिच्या पृष्ठभागावर उतरणे मुळी शक्यच होणार नाही. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १५–१७ किलोमीटर्स उंचीवर मात्र आम्हाला आरामात वावरता येईल. गंमत म्हणजे पृथ्वीवर ३० किलोमीटर्स उंचीवरील वातावरण आमच्या मंगळाहूनही विरळ आहे. असं व्हायचं मुख्य कारण म्हणजे तिचं जबरदस्त गुरुत्वाकर्षण. जबरदस्त म्हणजे केवढं आहे ? अहो, आमच्या इथला ४० पौण्डी मंगळवासी तिथं चक्क १२० पौण्डाचा राक्षसच बनून जाईल.

वातावरणाचा दाब आणि गुरुत्वाकर्षणाची ओढ लक्षात घेतली की, पृथ्वीवरील

सजीव चांगले मजबूत हाडापेराचे असलेच पाहिजेत या निष्कर्षाप्रत यावेच लागते.

तिकडे अवकाश यानांसाठी 'मुक्ती-वेग' Escape-velocity आहे ११ कि. मी. प्रति सेकंद. इथे मात्र प्रति सेकंदास फक्त ६ किलोमीटर्स एवढाच प्रवेग अवकाशयानाला मंगळाच्या गुरुत्वाकर्षणातून मुक्त करायला पुरेसा आहे.

आमचा मंगळ तसा काही फारसा मोठा ग्रह नाहीय्. त्याचा व्यास पृथ्वीच्या व्यासाच्या निम्मा आहे. आकारमान पृथ्वीच्या एक षष्ठमांशाएवढे आहे तर वस्तुमान केवळ एक नवमांश एवढेच ! असं असलं तरी, पृथ्वीचा तीन चतुर्थांश भाग पाण्याने व्यापलेला असल्याने पृथ्वीवासीयांच्या (अर्थात ते अस्तित्वात असतील तर ! ) वाटचाला आमच्याहून कमी जमीन आलेली आहे.

पृथ्वी म्हणजे मंगळाचीच मोठी केलेली प्रतिकृती आहे असं आमचे शास्त्रज्ञ सातत्याने सांगत आले आहेत. पृथ्वीवरचा दिवस आमच्याहून फक्त अर्ध्या तासाने लहान आहे अन् पृथ्वीच्या अक्षानें तिच्या कक्षेशी केलेला कोन जवळजवळ मंगळाएवढाच असल्याने तिला सहाही ऋतू मजेत उपभोगता येतात. फरक एवढाच की, प्रत्येक ऋतुचा काळ मंगळाच्या निम्मा असतो. कारण पृथ्वीचे वर्ष आहे फक्त ३६५ दिवसांचे आणि मंगळाचे आहे ६८७ दिवसांचे !

आता पृथ्वीवरचं हवामान ! पृथ्वीवासीयांना त्याचा आता सराव झाला असेल म्हणा; पण एकूणच तिथली भयंकर, जाळती उष्णता (पृथ्वी सूर्यापासून मंगळाच्या फक्त दोन तृतीयांशाएवढ्याच अंतरावर असल्याने मंगळाहून अडीच पट अधिक उष्णता तिला सूर्यापासून मिळते), भरपूर आर्द्रता, आणि दिवसा–रात्रीच्या तपमानातील क्षुल्लक अंतर लक्षात घेता ते हवामान कसं त्यांना सहन होत देव जाणे !

पृथ्वीवर रात्रीच तपमान दिवसाच्या फारतर निम्म्याएवढ असत. तेच आमच्याकडे पहा, कसा मस्त चढउतार असतो त्याच्यात तो ! पहाटे–पहाटे, जेव्हा आमच्याकडे सारेजण मऊमऊ दुलईत पडून छान घोरासुराचं आख्यान लावून बसलेले असतात तेव्हा तपमान असतं जेमतेम ५° सें. हळूहळू चढत दुपारपर्यंत ते चांगलं २०° सें. होत. संध्याकाळी शून्य अंशापर्यंत उतरून मध्यरात्रीपर्यंत चक्क उणे पंचेचाळीस अंश (–४५°) सें. होत. आहे की नाही आमची चांगली चंगळ ? अर्थात या बदलत्या तपमानामुळे कस छान छान वाटत ते पृथ्वीवासीयांना कोठून कळणार ? दुर्दैवी बिचारे !

दिवसा-रात्रीचे जाऊ देत म्हटल तरी निदान दोन गोलार्धात तरी तपमानातील फरक जास्त असावा की नाही ? पण तोसुद्धा नाही. झालंय काय, आपल्या कक्षेतून फिरताना पृथ्वी सूर्यापासून किमान १४७,०००,००० किलोमीटर्स अन् कमाल १५२,०००,००० किलोमीटर्स अंतरावरून जाते. म्हणजे त्यामधला फरक आहे फक्त ५,०००,००० कि. मी.चा ! त्यामुळे तिच्या दक्षिण आणि उत्तर गोलार्धातील तपमानात विशेषसा फरक पडत नाही. आमच्या मंगळावर मात्र उत्तर

गोलार्धाच्या मानाने दक्षिण गोलार्ध चांगलाच उष्ण असतो. कारण मंगळाच्या बाबतीत सूर्यापासूनच्या कमाल आणि किमान अंतरातील फरक आहे तब्बल ५०,०००,००० किलोमीटर्सचा! आता जर पृथ्वीवासीयांकडे शक्तिशाली दुर्बिणी असतील तर त्यांना हे जरूर दिसत असेल की, आमच्या उत्तर ध्रुव प्रदेशातील हिम कधीच पूर्णपणे वितळून जात नाही. मात्र दक्षिण ध्रुवीय हिम-टोपण (ice-cap) नियमितपणे अदृश्य होत असते. इथून पृथ्वीचं निरीक्षण करीत असताना तिच्या दक्षिण ध्रुवीय हिम-टोपणाच्या आकारात अशा प्रकारचा बदल झाल्याचं कधीच आढळून येत नाही.

आमच्याकडील, दूरवर पसरलेली लाल-तपकिरी मैदाने आम्हाला फार प्रिय आहेत. अगदी (Sandstorms) अन् चक्रीवादळेसुद्धा आम्हाला आवडतात. पृथ्वीवरच्या बुद्धिमान प्राण्यांनी ती पाहिली असतील देखील, कदाचित, हां, बरी आठवण झाली. सांगायची गोष्ट म्हणजे २३ ऑगस्ट १९५९ ला जो एक विलक्षण तेजस्वी पट्टा आमच्या ग्रहावरून गेला त्यासंबंधी पृथ्वीवासीयांच्या काय कल्पना आहेत, त्यांच्या शास्त्रज्ञांनी कोणते निष्कर्ष काढले आहेत ते जाणून घ्यायला आम्ही फार फार उत्सुक आहोत.

पृथ्वीवासीयांच्या डोळ्यांना पृथ्वीवरच्या हिरव्या, निळ्या, पिवळ्या छटांची संवय झालेली असणार. त्यामुळे साहजिकच आमचा ग्रह त्यांना भडक, गडद रंगाचा भासेल, दिसेल. म्हणून त्यांनी आमच्या ग्रहाला कुठलंतरी दुष्ट, राक्षसी नाव दिलेलं असलं तरी आम्ही समजू शकतो.

गेल्या फार वर्षांपासून आमचे शास्त्रज्ञ, 'पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व' या विषयाचा अभ्यास करीत आहेत. पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या आसपास बऱ्याच मोठ्या आकाराचे, हिरव्या रंगाचे ठिपके दिसून येतात. ते वनस्पतींच्या अस्तित्वांचे द्योतक असावेत हे सुस्पष्टच आहे. विशेष म्हणजे, पृथ्वीवरील वनस्पती, वर्णपटातील (Spectrum) 'हिरवा भाग' शोषून घेण्याऐवजी परावर्तित करीत असतात. उंचं पर्वतावरील व अतिशीत प्रदेशातील वनस्पती मात्र 'हिरव्या उष्णते'चा वापर करून घेतात आणि मंगळावरील वनस्पतींप्रमाणे निळे प्रकाशकिरण परावर्तित करतात.

पृथ्वीवर प्राणी किंवा बुद्धिमान सजीवांचे अस्तित्व दर्शविणारा कोणताही प्रत्यक्ष आणि निश्चित पुरावा आमच्या हाती आलेला नाही.

पृथ्वीच्या वातावरणातून अधूनमधून तीव्र प्रकाशाचे झोत अचानकपणे उंच अवकाशात फेकले जाताना दिसून येतात. अर्थातच आमच्या शास्त्रज्ञांच्या आणि विज्ञान-कथालेखकांच्या चर्चेचा हा एक आवडता विषय बनून गेला आहे. त्यासंबंधानं कित्येक कल्पना आमच्याकडे मांडल्या गेल्या आहेत. काहींच्या मते तो क्षणिक चकचकाट विजांचा असावा. कारण पृथ्वीवरही वादळे होत असणारच. आणि आमच्याहून पृथ्वी सूर्याच्या अधिक जवळ असल्याने त्या वादळांचं स्वरूप जास्त तीव्र, भयानक असणार हे नक्कीच! दुसरीही शक्यता आहे. कुणी सांगावं,

पृथ्वीवरील बुद्धिमान प्राण्यांच्या उपद्व्यापापासूनही ते झोत निर्माण होत असतील. त्याचप्रमाणे, आमच्याही वातावरणातून जे असेच प्रकाशाचे झोत फेकले जातात त्यामुळे पृथ्वीवरील बुद्धिमान प्राण्यांचे कुतुहल वरचेवर चाळवले जात असणार हे स्पष्टच आहे.

थोडक्यात पृथ्वीवासीय अस्तित्वात असलेच तर त्यांच्यापाशीही 'मंगळावरील जीवनाच्या शक्याशक्यते'च्या विपुल कल्पना आणि अनेक सिद्धांत असतीलच असतील......

—तर हा झाला मंगळवासीयांचा दृष्टिकोन. 'मंगळावर जीवन असेल का?' याचं उत्तर शोधताना आपल्या दृष्टिकोनातून कोणकोणती उलटसुलट मतं मांडली गेली आहेत बरं?...

एक मत : मंगळाचं विश्व जुनं आहे. फार फार पुरातन आहे. पृथ्वीच्याही अगोदर मंगळावर सजीव सृष्टी साकार झाली. त्यामुळे मंगळावर पृथ्वीपेक्षा अगोदर उत्क्रांती सुरू झाली. सध्या तिथले सजीव पृथ्वीवरील सजीवांच्याहून कितीतरी अधिक प्रगत पावलेले आहेत.

पृथ्वीहून लहान आणि सूर्यापासून अधिक दूर असल्यानं मंगळ त्यामानाने लवकर थंड झाला. मंगळावर जेव्हा भूकवचाची जडणघडण होत होती, तेव्हा तिथली नैसर्गिक परिस्थिती पृथ्वीसारखीच होती. ज्वालामुखींचे निरंतर उद्रेक, भीषण भूकंप, भयानक वादळे या सर्वांतून मंगळालाही एकदा जावं लागलं आहे. पण ते फार पूर्वी. आज जो मंगळाचा लाल रंग दिसतो आहे तो त्याच्या विस्तीर्ण, सपाट वाळवंटाचा रंग आहे.

जगण्याच्या धडपडीतून मंगळावरही झपाट्याने उत्क्रांती होत गेली आणि त्यातूनच अधिकाधिक प्रगत पावलेले प्राणी जन्मास आले. निळ्या वनस्पतींपासून हां हां म्हणता बुद्धिवान प्राण्यापर्यंत मंगळाने मजल मारलीन्. ह्या बुद्धिवान प्राण्यांनी सर्वच दृष्टींनी पृथ्वीवासीयांना मागे टाकले आहे. हे त्यांना शक्य झाले ते गेल्या शतकात वा त्यापूर्वी घडवून आणलेल्या प्रचंड प्रगतीमुळे!

मंगळाला दोन उपग्रह आहेत. डेमॉस (Horror) आणि फोबॉस (Feor) या नावाचे. आपल्याकडे त्यांचं नामकरण भीम आणि भैरव असं केलेलं असलं तरी इंग्लिश अर्थाशी जास्त जवळीक करणारी 'भीषण' आणि 'भय' ही नावे मी वापरणार आहे.

हो, तर मंगळाला 'भय' आणि 'भीषण' नावाचे दोन उपग्रह आहेत. दोघांचाही शोध लागला तो १८७७ च्या सुयोग्य मंगळसमीप काळात! तसं पहायला गेलं तर त्यापूर्वीच्या मंगळसमीप काळातही, जास्त शक्तीच्या दुर्बिणीतून अनेकांनी मंगळाचे वेध घेतले होते. पण मंगळाच्या या दोन बच्छड्यांपैकी कोणीच कधी कुणाला दिसले नाहीत. १८७७ नंतर मात्र अनेकांना त्यांचं दर्शन त्यामानाने कमी शक्तीच्या



मंगळाचे दोन उपग्रह
भीम व भैरव

दुर्बिणीतूनही घेता आले आहे. याचा अर्थ असा करावा का, की १८७७ पूर्वी मंगळाला मुळी भय आणि भीषण नावाचे उपग्रहच नव्हते ? असाच काहीसा अर्थ घेऊन त्यानंतर सूचित करण्यात आलं की, मंगळाचे हे दोन्ही उपग्रह नैसर्गिक नसून चक्क कृत्रिम आहेत.

या विधानाला पुष्टी देणारे कितीतरी पुरावे आणि तर्क शास्त्रज्ञांच्या हातात आहेत. आपल्या ग्रहमालिकेचा नुसता वरवर जरी अभ्यास केला तरी एक गोष्ट प्रकर्षाने नजरेत भरण्यासारखी आहे. ती म्हणजे, ग्रह जितका अधिक मोठा तितके त्याच्या वाट्याला अधिक नैसर्गिक उपग्रह आले आहेत. गुरू सर्वांचा दादा. त्याला सर्वात जास्त म्हणजे बारा उपग्रह आहेत. तर पृथ्वीहून किंचित लहान असणाऱ्या शुक्राला एकही उपग्रह नाही. या अलिखित नियमानुसार शुक्राहूनही लहान असणाऱ्या मंगळाला उपग्रह नसायलाच पाहिजेत. पण ते आहेत. एक सोडून दोन आहेत. अन् म्हणूनच ते नैसर्गिक असण्यापेक्षा कृत्रिम असण्याचा संभवच जास्त आहे.

भयच्या विचित्र ' चाली 'चा नीट अभ्यास केल्यानंतर शास्त्रज्ञांना असे वाटू लागले की, हा उपग्रह आतून पोकळ असावा. ही गोष्ट नैसर्गिक उपग्रहाच्या बाबतीत सर्वस्वी अशक्य आहे. कृत्रिम उपग्रह मात्र आतून पोकळच असणार की !

या व्यतिरिक्त, अंगभूत अशा तीन वैशिष्ट्यांमुळे मंगळाची ही उपग्रह-द्वयी साऱ्या उपग्रहांमध्ये अपवाद बनून राहिली आहे. एक म्हणजे, हे दोन्ही उपग्रह मंगळाच्या विषुववृत्तीय पातळीतून फिरतात. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, त्यांच्या कक्षा मंगळाच्या विषुववृत्ताला समांतर आहेत. आणि आपल्याला ठाऊक आहेच की, कृत्रिम उपग्रह फिरत ठेवण्यासाठी नेमकी विषुववृत्तीय पातळीच सर्वाधिक सोयीची असते. दुसरं म्हणजे, त्यांच्या कक्षा मंगळाच्या भलत्याच जवळ आहेत. भय मंगळा-

पासून फक्त ९,४०० किलोमीटर्स तर भीषण २३,५०० किलोमीटर्स अंतरावर आहे. तिसरी गोष्ट म्हणजे भयाची विलक्षण गती. मंगळाहून अधिक वेगाने हा मंगळा-भोवती प्रदक्षिणा करतो. मंगळाला स्वतःभोवती एक फेरी मारायला २४ तास ३७ मिनिटे लागतात आणि भय मात्र फक्त ७ तास ३९ मिनिटातच मंगळाभोवतीची एक प्रदक्षिणा संपवितो. त्याच्या या गतीने शास्त्रज्ञांना अनेक वर्षे कोडयात टाकलं. अखेरीस एका निश्चित निष्कर्षाप्रत येण्यात शास्त्रज्ञांना यश आलं.


त्यांच्या मते भय मंगळाच्या आकाशात 'अवतरला' तो मंगळाच्या एका दिवसात त्याच्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यासाठीच. आणि मग विषुववृत्ताच्या एका विशिष्ट बिंदूवर अनेक शतकांपर्यंत तो आरामात तरंगत राहिला. कालांतराने हा समतोल (equillibrium) ढळला आणि आपली मूळची कक्षा सोडून भय मंगळाच्या दिशेने हळूहळू खाली सरकू लागला. या काळात त्याचा प्रवेग वाढत होताच.

एवढया गोष्टी एकदा गृहीत धरल्यानंतर मग शास्त्रज्ञांनी मुळीच विलंब केला नाही. ते हिशेबास बसले. मूळच्या कक्षेतून सध्याच्या कक्षेत यायला भयला किती वर्षं लागली ते त्यांनी शोधून काढले. त्यावरून असं दिसून आलं की, भयचं वय ४०० ते ५०० दशलक्ष वर्षाहून नक्कीच जास्त नाही. हा काल मानवाच्या दृष्टीने भलताच प्रचंड असला तरी विश्वाच्या दृष्टीनं तो नगण्य मानावा इतका अल्प आहे. विशेष म्हणजे, मंगळाचं वय याहून दहा पटीनं अधिक आहे. असं असताना, मंगळाला स्वतःला उपग्रह मिळायला इतका लेट का झाला? विशेषतः पृथ्वी, गुरू-सारख्या शेजाऱ्यांनी उपग्रह पटकावलेले दिसत असूनही मंगळाने तिकडे इतके दुर्लक्ष का केले असावे?

छे, ही मंगळाची चूक नसावी. बहुधा मूळ कथाच काहीशी वेगळी असावी. हजारो लक्षावधी वर्षापूर्वी घडलेली. त्या काळात पृथ्वीवर चालू होतं पेलीओझोइक युग. कोडयातच बोलायच तर, मानवी युगाच्या मागे सरपटणाऱ्या प्राण्यांचे युग जितक्या वर्षांनी होते तितक्याच वर्षांनी पेलीओझोइक युग सरपटणाऱ्या प्राण्यांच्या युगाच्या मागे होते.

हो, तर ज्यावेळी पृथ्वीवर पेलीओझोइक युगाचा माध्यान्हकाल उलटून गेला होता त्यावेळी मंगळावर एक वेगळेच नाटय चालू होते. तो आता इतका शीत नव्हता. 'शांतही' नव्हता. होता तो चांगला उबदार होता. वातावरणात आर्द्रताही भरपूर होती. अन् सारा मंगळ अतिशय बुद्धिवान प्राण्यांनी गजबजलेला होता. या प्राण्यांनी विज्ञानात एवढी आघाडी मारली होती की, कृत्रिम उपग्रहांची निर्मिती, प्रचंड कालव्यांची बांधणी वगैरे गोष्टी त्यांच्या हातच्या मळ होऊन बसल्या होत्या.

आपल्या या उत्कर्षाच्या काळात त्यांनी पृथ्वी, गुरू, शुक्र वगैरे ग्रहांना निश्चित-पणे भेटी दिल्या असणारच. पैकी वसती करण्याच्या दृष्टीनी त्यांनी 'पृथ्वी' नामक ग्रहाला निरुपयोगी ठरवून टाकलें असणार. कारण 'तिथली' भयानक उष्णता



पृथ्वीवरील आद्य प्राण्यांकडून मंगळवासियाचे स्वागत

आणि जबर गुरुत्वाकर्षण हे सहन करण्याच्या पलीकडे असणार त्यांना. कुणास ठाऊक, कदाचित, पृथ्वीवर सिल्युरियन किंवा कॉम्ब्रियन युगात निर्माण झालेल्या भू–कवचात या मंगळवासीय पाहुण्यांच्या भेटीच्या खुणा कुठेतरी दडलेल्यासुद्धा असतील

तेव्हा लक्षावधी शतकांपूर्वी येऊन गेलेल्या पाहुण्यांच्या या कथा. त्यांचं स्वागत आपल्या प्राचीन पूर्वजांनी चांगलं केलं असेल ना ? छे, छे, म्हणजे काय प्रश्न आहे ? कल्ल्यांच्या फटाफटा आवाजात जाडजूड शेपट्यांच्या फटकाऱ्यांचा आवाज मिसळून तयार झालेल्या झकास वाद्यवृंदात आपले चित्रविचित्र आवाज मिसळून त्यांनी मंगळवासीयांसाठी स्वागत–गीत म्हटले असेलच की ! तेवढ्या मॅनर्स आणि एटीकेटस् त्यांच्यापाशी असणारच. मग प्रश्न फक्त एवढाच उरतो की, मंगळवासीय म्हणतात त्याप्रमाणं त्यांना पृथ्वीचं वातावरण मानवणारं नव्हतं की पृथ्वीवरचं 'हे' वातावरण ?

आता मंगळवासीय कितीही प्रगत पावलेले असोत; ४०० दशलक्ष वर्षांचा काळ त्यांचं काहीही बरं वाईट व्हायला पुरेसा आहे. नाही का ? तात्पर्य, सध्या मंगळ बराच 'वृद्ध' झालाय. आणि तो अजून पूर्णत: निर्जीव झालेला नसला तरी तिथलं जीवन सावकाशपणे अदृश्य होत चाललंय !

आपल्या उत्खननवाल्यांना मंगळावर बरंच काही करता येण्यासारखं आहे, मिळविता येण्यासारखं आहे.

मंगळवासीय ४०० दशलक्ष वर्षापूर्वी पृथ्वीवर येऊन गेले असावेत' असं जे काहींचं मत आहे ते मत नसून गृहीत धरलेली एक कल्पना आहे. कारण या मताला पाठिंबा देणारा पुरावाच मुळी उपलब्ध नाही. नेमका याचाच फायदा उठवून विरोधी मतवादी म्हणतात, 'एवढासुद्धा पुरावा हाती नसताना, लक्षावधी वर्षापूर्वी अमुक घडलं अन् तमुक घडलं अशा कल्पना करून ते सिद्धांत असल्याचं मोठ्या ठसक्यात सांगणं म्हणजे हास्यास्पदच आहे. बुद्धिवान प्राण्यांची थिअरी मान्य

केल्यानंतर मग त्यांना पृथ्वीवर येण्यास अडचण पडण्याचे कारण नाही हे शंभर टक्के कबूल. पण तसा पुरावा कुठाय ? वुई वॉण्ट पुरावा. त्याशिवाय आम्हाला या थिअरीतला शब्दसुद्धा पटायचा नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे भय आणि भीषण यांना उगाचच फासलेला रहस्याचा रंग. १८७७ साली ते प्रथम दिसले; पण त्यापूर्वी जास्त शक्तीच्या दुर्बिणीतूनही ते दिसले नव्हते एवढ्याच भांडवलावर, मग ते त्यापूर्वी म्हणजे १८७७ पूर्वी नसावेतच असे तारे तोडण्यात आले. पुढे ते उपग्रह ४००–४५० दशलक्ष वर्षांपासूनच मंगळाभोवती फिरताहेत हे मान्य करायला लागल्यानंतर पाठोपाठ 'ते उपग्रह नैसर्गिक नसून मंगळावरच्या बुद्धिमान प्राण्यांनी अवकाशात सोडलेले कृत्रिम उपग्रह होत' अशी टांग मारायला ही मंडळी विसरली नाहीच. म्हणजे गंमत आहे की नाही ?

आता भय, भीषण १८७७ पूर्वी दिसले नाहीत हा दोष कुणाचा ? साधी गोष्ट आहे. एकतर हे दोन्ही उपग्रह आकाराने भलतेच लहान आहेत. दुसरं म्हणजे ते मंगळाच्या फार जवळ आहेत. तिसरं म्हणजे मंगळावरनंही सूर्यप्रकाश काही अंशी परावर्तित होत असल्यानं मंगळाभोवती प्रकाशाचं तेजोवलय आहेच. तेव्हा या तेजोवलयाच्या पार्श्वभूमीवर ते दोन छोटे छोटे उपग्रह दिसू शकले नाहीत म्हणून भलभलत्या सिद्धांतांचा अट्टाहास करणे बरे आहे काय ? अन् एकदा त्यांना शोधून काढण्यात आल्यानंतर मागाहून ते कमी शक्तीच्या दुर्बिणीतूनही दिसू लागले तर त्यात आश्चर्य ते कसले ?

भयचा व्यास आहे सोळा किलोमीटर्स अन् भीषणचा आहे आठ किलोमीटर्सचा. तेव्हा नैसर्गिक उपग्रह म्हणून ते छोटे असले तरी कृत्रिम उपग्रह म्हणून भलतेच प्रचंड आहेत. सोळा सोळा आणि आठ आठ किलोमीटर्स व्यासाचे कृत्रिम उपग्रह तयार करणे म्हणजे चेष्टा वाटली की काय ? शिवाय यांना म्हणे असं 'वाटतं' की भय आतून पोकळ असावा. भले शाबास ! यांना म्हणे, बुधाच्या आणि सूर्याच्यामध्ये व्हल्कन नावाचा ग्रह असावा असंही 'वाटलं' होतंच की, आहे का बेट्याचा कुठे पत्ता ? त्यातलीच गत ही, झाले !

जाऊ द्यात, सिद्धांत म्हणून फेकलेल्या कल्पना बूमरँगप्रमाणे उलटून कल्पनाच असल्याचं सिद्ध होईल तेव्हा डोळे उलटतील. सध्या तर गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञसुद्धा आमच्या बाजूचे आहेत. कारण 'बुद्धिमान प्राण्यांच्या कल्पने'ला अजिबात उजाळा न देताही मंगळाच्या सर्व रहस्यांचा नीट उलगडा करता येईल, अशी त्यांना आशा वाटतेय; खात्री वाटतेय.

सुलट मत : कृत्रिम चरांच्या जाळ्यांनी सारा मंगळच मुळी व्यापून टाकलेला आहे. हा शोध लागला १८७७ मध्येच, अन् त्यानंतर ते ओळखले जात आहेत 'मंगळावरील कालवे' या नावांनी. हे कालवे म्हणजे मंगळावरील काही नद्या वगैरे नक्कीच नव्हेत. कारण तसे ते चांगले विस्तृत आहेत. इतके की त्यांना नद्या

म्हणणं हास्यास्पदच ठरावं. या कालव्यांची रुंदी आहे ४८ किलोमीटर्सएवढी म्हणजे पहा ! तेव्हा नद्यांऐवजी त्यांना छोटे समुद्रच म्हणायला काही हरकत नाही. मंगळाच्या ध्रुवीय प्रदेशातून निघून विषुववृत्ताकडे उतरणाऱ्या या प्रचंड कालव्यांच्या जाळ्यात मंगळ पार गुरफटून गेल्यासारखा दिसतो.

मंगळावर मुळात पाणी कमीच असल्याने त्याला तसं फार महत्त्व आहे. ध्रुवीय प्रदेशातला बर्फ वितळला की, त्यापासून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकतं. त्या पाण्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठीच मंगळवासीयांनी – बुद्धिवान मंगळवासीयांनी – आपल्या तंत्रविज्ञानाच्या जोरावर हे प्रचंड कालवे बांधून काढले आहेत.

जेव्हा ध्रुवीय प्रदेशातलं हिम वितळतं तेव्हा निर्माण होणारं बहुमूल्य पाणी हे कालवे दक्षतेने गोळा करतात – अजिबात वाया जाऊ न देता ! आणि मग ते मंगळावरील वैराण प्रदेशात वाहूनही नेतात. मंगळावरचे निर्जीव, वाळवंटी माळ जीवनाच्या त्या तुषारांनी खुलतात. बिया वेगाने अंकुरतात. नाजुक निळी पानं केव्हा बागडू लागतात ते तर मुळी कळतच नाही. हां हां म्हणता रोपं वाढतात. आपण जिथून हे सारं पाहू शकतो – नव्हे, अनेकांनी हे शक्तिशाली दुर्बिणीतून पाहिलेही आहे, की ज्या वेळी ध्रुवीय हिम वितळायला लागते, त्या वेळेपासून मंगळावरील काही विशिष्ट प्रदेश झपाट्याने गडद होत जातात. हे विशिष्ट प्रदेश म्हणजे कोणते माहीत आहे ? अहो, दुसरे तिसरे नव्हेत काही; ते 'कालवे' अन् 'समुद्र' यांनी व्यापलेले जे प्रदेश आहेत ना, तेच !

वळसे घेत घेत जाणाऱ्या कालव्यांना जिथं मोठाले फाटे फुटतात, तिथं, – त्या संगमावर काही बारीक ठिपके असल्याचं इथून दिसतं. ते ठिपके म्हणजे मंगळावरील 'प्रचंड शहरे आणि अवाढव्य औद्योगिक वसाहती' होत.

उलट मत : काय सुरेख गप्पा मारताय राव ? कालवे काय, नील-क्रांती काय, शहरं काय अन् अवाढव्य वसाहती काय – शाब्बास पठ्ठे ! पण काय हो, ही माणसं खगोल शास्त्रज्ञ कशासाठी होतात ? छानपैकी काल्पनिक – विज्ञान-कथा-लेखक तरी व्हायचं होतं? पुस्तकं खूप खपली असती की ? कसं ?

अहो, कसंच काय अन् कसंच काय ? मंगळ बिचारा मुळात तसा 'निर्जीवच.' श्रेष्ठ प्रतीचे प्राणी तर सोडाच पण वनस्पतीसुद्धा तिथं कधी निर्माण झाल्या नाहीत. जीवनानं जर काय थोडीफार प्रगती केली असेलच तर ती निकृष्ट प्रतीच्या मॉसेस आणि लिचेन्सपुरतीच ! त्यापलीकडे उत्क्रांती मुळीच झालेली नाही.

गंमत म्हणजे, मंगळाच्या वातावरणात प्राणवायूचं प्रमाण अत्यल्प आहे अन् कर्बद्वि-प्राणिल ($CO_2$) मात्र भरपूर उपलब्ध आहे. आता आमचे 'गप्पिष्ट' म्हणतात त्याप्रमाणे जर श्रेष्ठ दर्जाच्या वनस्पती मंगळावर असत्या तर असं झालं असतं का ? विचार करा अन् पहा, आमचंच म्हणणं पटणेबल आहे, नाही का ?




**लोवेल यांना मंगळावरील काजव्यांचे लागलेले वेड**

काही म्हणा पण ही खरी कमाल आहे 'कालवे' कल्पनेची! शू: जरा कान इकडे करा पाहू – थोडं सीक्रेट सांगायचंय जरा. हो, पण तुम्हाला लोवेल कोण माहीत आहे ना? नाही माहीत? बराय, मीच सांगतो. काय आहे, १८७७ मध्ये शियापरेली नावाच्या शास्त्रज्ञाने मंगळावरचे कालवे पहिल्यांदा शोधून काढले. लगोलग म्हणजे १८९४ मध्ये या पर्सिवेल लोवेलनी ॲरिझोना प्रांतातल्या फ्लॅगस्टफ येथे 'लोवेल वेधशाळा' स्थापन केली. त्यामागचा उद्देश मंगळाचा अभ्यास करण्याचा होता. पण त्या आत्यंतिक अभ्यासापायी या शास्त्रज्ञाला पुढे चक्क वेऽड लागलं वेड! कशाचं वेड? कालव्यांचं वेड!! बिचाऱ्याला 'कालवे-कालवे जिकडे तिकडे' दिसू लागले. लवकरच बुध, शुक्र आणि आपल्या चंद्रावरदेखील प्रचंड कालवे असल्याचा ग्रेट शोध त्यांनी लावला. मंगळाच्या बाबतीत तर विचारूच नका. मंगळ हा आपला साधासुधा ग्रह आहे की नुसताच कालव्यांचा गुंतावळा हे कळायलाच मुळी त्यांनी काही मार्ग ठेवला नाही. एकट्या मंगळावर एक नव्हे, दोन नव्हे, तर तब्बल सातशे कालवे असल्याचं त्यांनी 'मोजून' सांगितलं. यापैकी काही कालवे ४००–४५० किलोमीटर्स रुंदीचे आहेत हे इथं लक्षात ठेवण्यासारखं आहे.

म्हणे मंगळावर पाणी कमी असल्याने 'बुद्धिवान' मंगळवासीयांनी ध्रुवप्रदेशातून साऱ्या मंगळभर पसरणारे कालवे बांधून काढले आहेत. आता मंगळावर पाणी कती आहे, ठाऊक आहे? पृथ्वीवरल्या एका, गोड्या पाण्याच्या, मोठ्या सरोवरातील पाण्याहून कमीच – निदान जास्ती नक्कीच नाही. आता हे एवढं मोठं (!) पाणी इकडून तिकडे वाहून नेण्यासाठी मंगळवासीयांनी प्रचंड रुंदीचे सातशे कालवे जर खरोखरीच बांधून काढले असतील, तर त्यांना 'बुद्धिवान' कशासाठी म्हणायचं?

गप्पा हो, साऱ्या गप्पाच! दुसरं काय! हे कालवे कृत्रिम म्हणजे मुद्दामहून

बांधून काढलेले असे मुळीच नाही. ते नैसर्गिकच आहेत. मुख्य म्हणजे ते कालवे नाहीच आहेत. ते मंगळावरील भू-कवचाला पडलेले तडे आहेत.

कालव्यांचं गडद होणं वनस्पतींच्या अस्तित्वाचं द्योतक मानण्यात येतं, पण ते सर्वस्वी चूक आहे. हा होणारा रंगबदल म्हणजे दुसरं तिसरं काही नसून निर्जीव खडक आणि वाळवंट यांच्यावर चाललेला छायाप्रकाशांचा खेळ होय.

सुलट मत : मंगळावरचे 'कालवे' आणि 'समुद्र' प्रकाशकिरण शोषून घेतात. काही किरणांचे परावर्तनही करतात – पण ते वनस्पतींप्रमाणे. खनिजांप्रमाणे अजिबात नाही. शिवाय हे नक्कीच की, कालवे आणि समुद्रांच्या परिसरातील रंग विशिष्ट ऋतूतच बदलत जातो – गडद होत जातो. या विशिष्ट प्रदेशांखेरीज उरलेल्या वाळवंटी प्रदेशात मात्र अशाप्रकारचा रंगबदल मुळीच घडून येत नाही.

मंगळावरील कालव्यांची एकूण रचनाच नैसर्गिक वाटत नाही. काही ठरविलेल्या योजनांबरहुकूम ते बांधून काढण्यात आले असावेत असंच त्यांच्या स्वरूपावरून वाटतं. हे कालवे म्हणजे काही तज्ज्ञ म्हणतात त्याप्रमाणे साधे भू-कवचाला पडलेले तडेच असते तर त्यांच्यात अशी सुसंगती, त्याच्या रचनेत असे साम्य दिसून आले नसते.

विशेष अभ्यासासाठी म्हणून पृथ्वीवर प्रयोगशाळांतून मंगळावरचं वातावरण निर्माण करण्यात आलं. तपमान, वातावरणाचा दाब, हवेतील घटकाचे प्रमाण या साऱ्या बाबतीत हे कृत्रिमरित्या घडवण्यात आलेलं वातावरण मंगळाच्या वातावरणाशी अचूकपणे मिळतं-जुळतं होतं. गंमत म्हणजे प्रयोगाअन्ती असं आढळून आलं की, श्रेष्ठ प्रतीच्या वनस्पती–विशेषत: भाजीपाला–त्या वातावरणात वाळून, जळून, खुरटून जाण्याऐवजी चक्क झकासपणे फोफावतोय.

□

या साऱ्या उलट-सुलट मतप्रवाहांचं सार शेवटी सांगायलाच हवं. कितीही झालं तरी, पृथ्वी सोडल्यास जिथं सजीवांची वसती असू शकेल असा हा एकमेव ग्रह आहे. श्रेष्ठ वनस्पती वा प्राणी यांची निर्मिती तेथे झाली असो वा नसो, पण तो निश्चितपणे निर्जीव नाही.

पृथ्वीप्रमाणेच मंगळाचाही बराचसा भाग 'समुद्रां'नी व्यापलेला आहे. अर्थातच ते हिमांनी झाकलेले आहेत. आणि हे हिम खडकाच्या चुऱ्यात झाकून गेलेले आहे. ज्यांना आपण लाल वाळवंटे म्हणतो ती प्रत्यक्षात वाळूची वाळवंटं नसून हिमकण आणि धूलिकण यांच्या मिश्रणातून बनलेली असावीत. पैकी धूलिकण लिमोनाइट अन् फेल्सिटिक ऱ्हायोलाइट प्रकारच्या खडकांच्या चुऱ्यातून निर्माण झालेले असावेत. आपल्या पृथ्वीवरील पर्वतमय प्रदेश नेमके याच प्रकारच्या खडकांच्या चुऱ्यांतून निर्माण झालेले आहेत, ध्रुवीय प्रदेशात धूलिकणांवर मात करून बर्फाने जमीन व्यापून टाकली आहे.



**मंगळावरील हे कालवे म्हणजे बर्फाला पडलेले तडेच आहेत**

'कालवे' म्हणजे बर्फात पडलेले तडे आहेत. हे तडे अशनीपाताने पडले असावेत. असं नसेल तर मग ते वनस्पती–जीवनाचेच द्योतक असतील. पाण्यावर गोठलेल्या बर्फावर पडलेल्या मातीच्या थरांतून या वनस्पती फोफावत असतील. सजीवांच्या पाळण्याची दोरी पाण्याच्याच हातात असते. तेव्हा या 'भूमिगत' पाण्याच्या आधाराने मंगळावर उत्क्रान्ती होऊन श्रेष्ठ प्रकारचे सजीव निर्माण झाले असतीलही आणि या भूमिगत पाण्याच्या संरक्षक ढालीआड उत्तमपणे वाढतही असतील. मंगळाच्या वातावरणातही टिकाव धरून असतील.

या साऱ्या कल्पना आणि सिद्धान्त सिद्ध करणे जितके अवघड आहे, तितकेच त्या नाकारणेही ! पण पृथ्वीवर बसून मंगळाबद्दल विचार करायचे दिवस आता संपत आले आहेत. एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर आपण पृथ्वीवासीय आहोत. या तेजस्वी युगाचा उषःकाल होईल, पहिलं अवकाशयान मंगळावर सुखरूप उतरेल तेव्हा. या दृष्टीनं पहिलं पाऊलही उचललं गेलं आहे. सोविएट रशियानं काही वर्षांपूर्वीच मार्स १ नावाचं अंतराळयान त्या लाल ग्रहाच्या दिशेने सोडून या कार्य-क्रमाची फीत कापली आहे. दुर्दैवाने हा कृत्रिम उपग्रह मंगळापासून १०६ दशलक्ष किलोमीटर्स दूर असतानाच त्याच्या रेडिओ ट्रान्स्मिटरमध्ये बिघाड निर्माण होऊन तो बन्द पडला. वस्तुस्थिती अशी असली तरी हे विसरून चालणार नाही की तें अवकाशयान मार्स 1 होतं. या दिशेने केला गेलेला तो पहिलाच प्रयत्न होता.

मंगळाच्या दिशेने प्रवास करणे यापुढे चालूच राहणार आहे. अमेरिकेने नुकत्याच पाठविलेल्या मरिनर – ४ ने मंगळाचे अनेक 'क्लोज अप्स' यशस्वीपणे मिळविले आहेत. ही छायाचित्रे भावी अवकाशयानांना आणि अवकाशयात्रिकांनाही बरीच उपयुक्त ठरणार आहेत.

पृथ्वी आणि मंगळाचे परस्परसंबंध विलक्षण गुंतागुंतीचे आहेत. मंगळ आपली सूर्यप्रदक्षिणा अति मंद वेगाने करतो. त्याच्या लांबलचक, लंबवर्तुळाकार कक्षेतून


एक फेरी करायला त्याला तब्बल दोन वर्ष लागतात. पृथ्वीची कक्षा मात्र बरीच वर्तुळाकार असून ती त्या कक्षेतून अधिक वेगाने फिरते.

बहुतेक दर दोन वर्षांनी हे दोन ग्रह परस्परांजवळ येतात. त्याला इंग्रजीत 'opposition' म्हणतात. आपण त्याला 'मंगळसमीप काळ' म्हणूया. या काळात या दोन ग्रहांमधलं अंतर ७० दशलक्ष किलोमीटर्सहून कमीच असतं. दर १५ ते १७ वर्षांनी मंगळ याहूनही पृथ्वीच्या अधिक जवळ येतो. त्याला इंग्रजीत 'Favourable opposition' म्हणतात. मराठीत त्याचं भाषान्तर 'सुयोग्य मंगळसमीप काळ' असं करता येईल. या काळात मंगळ आपल्यापासून फक्त ५६ ते ५९ दशलक्ष किलोमीटर्सवर असतो.

मंगळाबद्दल लागलेल्या अनेक शोधांचे जनकत्व १८७७, १९३९ आणि १९६५च्या सुयोग्य मंगळसमीप काळात मिळालेल्या महत्त्वाच्या माहितीकडे जाते. त्यातल्या त्यात १९५६ चा सुयोग्य मंगळसमीप काळ बराचसा वाया गेला असेच म्हणावे लागेल. त्या वर्षीच्या शिशिरात हा काळ आला होता. पण मंगळावरच्या खराब वातावरणाने आणि धूलिवादळांनी त्याच्यासंबंधी माहिती मिळविण्याच्या कामात अनंत अडथळे निर्माण केले.

आता भावी 'सुयोग्य मंगळसमीप काळ' येतो आहे पुढच्याच वर्षी १९७१मध्ये ! ही संधी अमेरिका आणि रशिया ही बडी राष्ट्रे वाया दवडवणार नाहीत. मानव-रहीत अवकाशयाने मंगळाकडे झेपावतील. ह्याचे अनेक सुंदर 'क्लोज अप्स' मिळविण्यात येईल. साऱ्या शक्तिशाली दुर्बिणी सतत मंगळावर रोखण्यात येतील. आणि गेल्या १५–१७ वर्षातील पुढारलेल्या तंत्रविज्ञानाच्या सहाय्याने खगोलशास्त्रज्ञ मंडळी पुन्हा एकदा, 'मंगळावर जीवन कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे ?', 'ध्रुवीय हिम–टोपण किती जाड आहेत ?', 'कालवे म्हणजे निश्चित स्वरूपात काय आहेत ?', 'उपग्रह कृत्रिमच आहेत की नैसर्गिक ?'... वगैरे वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधण्यात गढून जातील.

अन् कुणास ठाऊक, 'पाणी वाहून नेण्यासाठी' बांधून काढलेले कालवे म्हणजे जिवंत ज्वालामुखींच्या रांगाही असतील. रंगपटलाचं रहस्य भूभीवर त्वरेनं पसर-लेल्या लाव्हारसातही दडलेलं असेल. अन् मग काय सांगावं; सळसळत्या, लालबुंद लाव्हारसाच्या तुषारांच्या फुलांचा मनोरम गुच्छ हाती घेऊन, लाल प्रकाश ओंजळीनं उधळत उधळतच मंगळ आपल्या भेटीला येईल पुढच्या वर्षी ! !



**२६ ऑगस्ट १९७०**

 पृष्ठ १५ वरून

वाटत होतं. भाऊ फाटक यांचेजवळ मॅकमोहन या मद्य तयार करणाऱ्या कंपनीची डायरी होती. त्यात उर्दू शेर होते. सर्जे ते वाचून दाखवित व त्याचा शाब्दिक अर्थ सांगत. मग त्यावर कॉमेंट करून त्याचा लाक्षणिक अर्थ मी सांगितला. दीड दोन तास मेहफील मस्त रंगली होती. रात्रीचे जेवण आटोपून ट्रकने भडगावला आलो. मी थोडासा अप्सेटच होतो.

**१२ मे १९७० :** सकाळी बरोबर ६ ला कामाला सुरुवात झाली. कामाचा उठाव चांगला झाला. पण एकूण व्यवस्थेबद्दल मला फारसे समाधान वाटत नव्हते. मुंबई, नांदेड, व उमरेड येथील शिक्षक आल्याने वेगळे वातावरण होते. यातून शेतीच्या कामाचा उठाव झाला. सकाळी वर्दे गावची प्रायमरी शाळा कामाला आली होती. शिक्षक संघटना व युवक कार्य याबद्दल माझा व भाऊंचा खूप वाद झाला. शिक्षक संघटना ही केवळ शिक्षकांची सुबत्ता वाढविण्याच्या कामाकरिता लढते आहे. पण त्यातून तात्विक बैठक तयार होत नाही व यामुळे जो दोन पैसे मिळवून देईल तो पुढारी या पलीकडे कोणतेही शिक्षण होत नाही. ही गोष्ट लाजिरवाणी वाटते.

**१३ मे १९७० :** आजही नेहमीप्रमाणे काम झाले. कामाची गती वाढते आहे. आज कडावलच्या प्रायमरीची मुले आली होती. त्यांनी कामाचा चांगला उठाव केला. एम्. डी. ने ट्रॅक्टर कुण्या रईसाकडे पाठविला. त्यामुळे मी अप्सेट झालो. आज सरनाईक थोडा वेळ प्रोजेक्टवर येऊन गेला. पोहण्यात व करवंदे खाण्यात मुले सर्व विसरून जातात. भाऊ व सर्जे जाणार असं म्हणाले. शरद पाटील आज गेला. हरिभाऊ बारपुते धडपड करीत आले. त्यामुळे मनाला खूप प्रसन्न वाटले.

**१४ मे १९७० :** भाऊ फाटक व सर्जे गुरुजी सकाळी गेले. काम चांगले चालले आहे. सकाळी नाश्त्यावरून शशी व गर्गे यांचे खटकले तेव्हा काय होते अशी शंका वाटत होती. पण शेवटी दोघांनी माझे ऐकले.

**१५ मे १९७० :** आज देवताळे उपमंत्री दुपारी येणार तेव्हा सकाळीच सर्व काम आटोपून टाकण्याचा मुलांनी निश्चय केला. आज फार मोठ्या संकटातून कॅम्प बचावला. अगदी वरच्या पालकाचा तीर तुटला. फळीवर ओ. टी. व नाटेकर चिरा हातात घेऊन उभे होते. एक गवंडी होता. शिवाय खाली दगड देणाऱ्यांची एक रांग होती. सुदैवाने तुटलेला तीर सोनूनेच्या खांद्यावर टेकला. मुलांनी प्रसंगावधान राखून चटकन दगड भिंतीवर टेकवला. अन्यथा १५ फुटावरून दगडासकट मुले कोसळली असती व भयंकर अनर्थ झाला असता. गेले दोन दिवस भडगावची मुले आत्मविश्वासाने चिरे वहायला पण येऊ लागली. काम संपविण्याची जिद्द आम्ही

बाळगली, पण चिरे तासणारे गवंडी १०॥ लाच न सांगता निघून गेले. त्यामुळे फजितीची वेळ आली. त्यांच्याकडे माणूस पाठविला. भराभर चिरे तासून दिले. १२ वाजता मला जावे लागले. पण मुलांनी सतत २॥ वाजेपर्यंत काम करून इमारत पुरी केली. देवताळे येणार नाहीत असे कळले. तरी पण टॅक्सी केली असल्यामुळे मी, जयसिंगराव व सरनाईक काजू लागवडीसाठी जागा शोधायला गेलो व तसेच कसाळला जाऊन आलो. आज पाय जास्त दुखत होता. संध्याकाळी मांसाहारी पार्टी झाली. त्यानंतर दशावतारी नाटक झाले. पण नाटक १२ ला सुरू झाले. यामुळे बहुतेक लोक झोपले होते. सकाळी चारला नाटक संपले. रात्री उपसभापतींनी प्रमाणपत्रे दिली. त्यांनी शिबिरार्थींचा चांगलाच गौरव केला.

१६ मे १९७० सकाळी ८॥ वाजता स्पेशल बस मिळाली. मुले थकलेली वाटत होती. बस निघेपर्यंत करवंदे तोडणे चालू होते. पानासकट असणाऱ्या करवंदाच्या लहान लहान फांद्या सुंदर दिसतात. वाटेत रुमाल मोटारबाहेर फेकले. त्याकरता वाणीशी खूप दंगा केला. दुपारी लेव्हलिंगचे काम जोरात सुरू झाले. परंतु फार लांब माती नेऊन टाकावी लागत होती. त्यामुळे कामाचा उठाव दिसत नव्हता. काही शिबिरार्थी तर दोन किंवा तीन टोपल्या एकदम घेऊन जात होते. ग्रामपंचायतीकडून आणलेल्या एकचाकी गाडीचा प्रयोग करण्याची खटपट काहींनी केली. पण एक–दोघांनाच ते जमले. त्या गाडीवर दारा व शेळके यांचे अनेक विनोद चालले होते. कॅम्पचा सोळावा दिवस आहे. रोज आठ आठ तास व गेले दोन दिवस तर दहा तासाचे वर काम चालले आहे, व त्याचा काही थकवा आला आहे असे कुटेही वाटत नव्हते. दुपारी मुलांनी जांभळावर धाड घातली. ओ. टी. झाडावरून पडला. पण अपघात झाला नाही. त्यामुळे सरनाईकनी काही सूचना दिल्या. रात्री जेवणाच्या वेळी आग्रहपूर्वक त्या मुलांच्यापुढे मांडल्या. दरडीत हात घालून मुलांनी मोठा मासा पकडला. मला हे धोकादायक वाटते. आज सकाळी स्नान करून मुले फारच उशीरा परत आली. त्यामुळे जेवणाची व्यवस्था थोडी डिस्टर्ब झाली. माझा पाय पुन्हा सुजू लागला आहे. मी ए. टी. एस्. घेतले नाही म्हणून शशी रागावली आहे. काजू लागवडीचा कार्यक्रम घ्यावयाचा नाही, असे सरनाईकचे ठाम मन दिसते. मी कार्यक्रम नक्की घेणार असे म्हटले. त्यामुळे सरनाईक थोडा अप्सेट झाला आहे. कसाळच्या ग्रूपमधील शिक्षक रोज दोन दोन करून श्रमदानासाठी येत आहेत. पाटील तर भडगावपासून बरोबर आहेत. त्यांच्या पत्नी बाळंत होऊनही पाटील घरी जाण्याचा दिवस पुढे पुढे लोटून श्रमदानात अधिक अधिक गुंतत आहेत. कसाळ शाळेचा चपराशी माधव व मकदूम सर कॅम्पमध्ये पूर्ण रंगले आहेत. बबन चापले व श्रीनिवास येमले हे दोन गवंडी आज माती वहायला आलेले पाहून खूप आनंद झाला. कारण टोपली वाहणे गवंडी कमी दर्जाचे मानतात.

१७ मे १९७० : नेहमीप्रमाणे काम वेगाने झाले. आज कामाचा उठावही

चांगला झाला. दुपारी दिवटे आले. त्यांच्याबरोबर सरनाईक गेले. त्यांनी काजू लागवडीची जागा पक्की केली. बिबवण्याला रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होत नाही. कुणी त्यात पुढाकार घेत नाही. स्थानिक मंडळीपैकी विशेष कुणी आले नाहीत. सरनाईकाने जेवणाची व्यवस्था उत्तम केली आहे. परंतु त्याने घेतलेला अतिशय उत्तम गहू चक्कीवर लबाडीने बदलून दिला गेला असला पाहिजे. कालचा आचारी स्वतः काहीच करीत नव्हता. मुलींना खूप पोळ्या करावयास लावल्या. त्यातल्या आजही काही पुरल्या. काका राऊळकर दोन-तीन वेळेला भेटून गेले, घरी चलण्याचा आग्रह करीत होते. सरनाईक काही सांगतच नाही असे ते दोन-तीन वेळेला म्हणाले. परंतु सरनाईकच्या योजनेला हेच लोक अडथळा आणीत आहेत असे मी ऐकले. मुले मात्र येथे खूष आहेत. तरी त्यांना भडगावचे डोह, तिथली करवंदे आणि त्यांनी अत्यंत वेगाने केलेले श्रमदान याची सारखी आठवण होते. आज पाटील परत गेले.

**१८ मे १९७० :** आज बबन व श्रीनिवास परत गेले. शिबिर संपत आले अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली. दिवसभर काम चालले होते. कामाला गतीही चांगली होती. पण लोकांची मनं मात्र कुठेतरी भरकटत असावीत. ते जाणवत होतं. संध्याकाळी शाळेच्या संचालकांनी खाऊ दिला, चहा दिला, आणि कामाचं कौतुक केले. त्यामुळे कामात मात्र थोडा खंड पडला. एक सुंदर अबोलीचा हार संचालकांनी मला दिला. पण मुलांचा प्रतिनिधी म्हणून मी तो दाराला दिला. तसा सुपडाला द्यावा असं वाटत होतं. पण तो समोर नव्हता. कारण काम सर्वांनीच उत्तम केले. त्यात कमी जास्त ठरविणे कठीण, पण तरीही सुपडा मला सरस वाटतोय. संध्याकाळी ६ ला १० लोकांच्या टोळीने काम थांबवले. सामान आवरले व सर्वांचा निरोप घेऊन निघालो. ७॥ ची बस मिळाली. ८॥ ला कुडाळ सोडले व सामान टिकाव, फावडी हे सारे खांद्यावर टाकून डोंगर तुडवित ४॥ मैल सोन-वड्याला गेलो. पाय चांगला सुजत होता. दुखत होता. चालणे जिवावर आले होते. पण प्रोजेक्टचा हा एक महत्त्वाचा भाग टाळणे शक्य नव्हते. सरनाईक बरोबर होता. त्याने सुंदर गाणी म्हटली. विशेषतः 'आज इथं तर उद्या तिथं' हे मला आवडणारे गाणं त्या चांदण्यामध्ये फार परिणामकारक वाटले. सोनवड्याला १० ला पोचलो व एका अंगणात पथारी टाकून झोपलो. आपण कुठेतरी दूर चाललो आहोत असं मनाला सतत वाटत होतं.

**१९ मे १९७० :** सकाळी पाचला सर्वांना उठविले. प्रातर्विधी आटोपून कामासाठी डोंगरावर गेलो. ६। ला काम सुरू केले. काम झपाट्याने झाले. यातही सुपडा आघाडीवर होता. दर तासाला किती खड्डे होतात व कमाईचा दर कसा पडतो याचा ग्राफ तयार करायचा होता. तशी आज नोंद घेतली. सूर्य वर आला तसा त्रास होऊ लागला. पाण्याची कळशी बरोबर घेतली होती. ती संपली. आठ

वाजता सॉईल कॉन्झरवेशनचे शिटे आले. त्यांनी कामासंबंधी सूचना दिल्या. सकाळी सूचना नसल्यामुळे आमच्या थोड्याफार चुका झाल्या होत्या. या दुरुस्त करण्यासाठी दुपारी एक मनुष्य द्यावा लागला. काल बरोबर आणलेला नाश्ता ८। ला केला. जेवण आणावयास सरनाईक सायकल घेऊन बिबवण्यास सात मैल गेले होते. ११। ला काम थांबले. जेवणाची वाट पहात थांबलो. दुपारी १ ला सरनाईक आले. त्यांनी जेवण आणले होते. आल्यासारखे दोन दिवस काम करावे असे त्यांचे मत होते. मुले कामाला तयार होती. मी मात्र थकलो होतो. मुलेही थकली आहेत असे मला वाटत होते. त्यामुळे एक दिवसच काम करून हवी असलेली माहिती गोळा करावी असं मला वाटत होतं. मुलेही परवानगी मिळाली तर परतायला उत्सुक होती. सरनाईक जेवण घेऊन आले होते. मुलांनी उद्यापर्यंत राहवे असे त्यांनी सांगितले. मी मात्र राहावयास तयार नव्हतो. पायाला ठणकाही लागला. सरनाईकची सायकल व माझे सामान घेऊन मी ९। ला निघालो. रस्ता भकास होता. कुठे जातो याची माहिती नव्हती. खूप कंटाळवाणे वाटले. १०। ला बिबवण्याला पोचलो. तिथे थोडेसे जेवलो. गर्गेची बॅच दुपारी गेल्याचे कळले.

२० मे १९७० : सकाळी जळगावचे लोक व नंदा गोव्याला गेले. शेषराव खरेची बॅच सामान घेऊन आली. सामान मी उतरवून घेतले. त्यांच्यासाठी पोळ्या बांधून दिल्या. ते त्याच गाडीने गोव्याला गेले. सरनाईक त्याच गाडीने आले. अतिशय डिस्टर्ब्ड होते. रात्री मुले पायी कुडाळला परत आली. सरनाईकांनाही यावे लागले. त्यांच्या मनाविरुद्ध वागण्याचा असा पहिलाच प्रसंग असावा. शिवाय रात्रभर सुदाम खरेची बॅच व शेषराव खरेची बॅच झोपलीच नाही. कुणी स्नान केले. कुणी इतर काही. यामुळे सरनाईक चिडले होते. माझ्याशी बोलले नाहीत. शशीला फार ऑकवर्ड वाटत होते. तिला वेंगुर्ल्याला नेण्यासंबंधी ते काल बोलले, पण आज काही करायला तयार नव्हते. दुपारी तासभर गावकऱ्यांच्याकडे कुडाळला त्याच्या जीपने जाऊन आलो. कसाळला सापडलेला दगड लाकडात बसवून एक स्मृतिचिन्ह कसाळच्या शाळेत द्यावे असे ठरले होते. सरनाईक पेंट करणार होते, पण सरनाईकनी तो दगड बुलढाण्याला घेऊन जा व तिथे पेंट करून कसाळला पाठवा असे म्हटले. कुडाळहून रंग व ब्रश आणून द्या असे म्हटले, तर त्यालाही त्यांनी नकार दिला. माझा पाय चांगलाच सुजला होता व जाणे कठीण होते. तरी मी सायकल घेऊन निघालो, पण गावकर आल्याने त्यांच्या जीपमधून जाऊन येता आले. शशीपण गावकरांच्या पत्नीला भेटून आली. मला चित्रकला येत नाही. पण दुपारी दगडावर काही रेघोट्या मारल्या. शशीला लेटरींगची सवय नाही. पण तिने ते केले. संध्याकाळी काका राऊळकरांकडे जाऊन आलो. मग सरनाईक थोडा मोकळा झाला. २० ला रात्री मी, शशी, हर्षवर्धन व राजू एवढेच लोक उरलो होतो. सर्व भकास वाटत होते. कॅम्पच्या सुरुवातीला मी एकटाच आलो आणि जातानाही तसाच होतो.

□ □ □

दैनंदिन जीवनामध्ये लोकांना किती प्रत्यय येत आहे हा खरा प्रश्न आहे. तसे पाहिले तर नियोजनबद्ध अर्थव्यवस्था हा भारताच्या आर्थिक धोरणाचा स्वातंत्र्य प्राप्तीपासूनचा पाया मानला जातो. पं. नेहरू समाजवादीच होते. शास्त्रीजीही समाजवादाचाच जयघोष करीत होते आणि विद्यमान प्रधानमंत्री इंदिरा गांधी तर समाजवादाशिवाय काहीही बोलायला तयार नाहीत. असे असूनही आधीच धनवान असलेले उद्योगपती आणखी किती धनसंपन्न झाले आणि ठराविक उत्पन्नावर गुजराण करणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गाचे आणि श्रमिकांचे जीवन किती निकृष्ट झाले आहे याची आकडेवारी पाहिली की आपण उच्चारलेल्या शब्दांना कृतीचा आशय देण्याची आपल्यावर जबाबदारी आहे याचे सत्ताकेंद्र ताब्यात राखणाऱ्यांना भान आहे किंवा नाही असा प्रश्न स्वाभाविकच उभा राहतो.

समाजवादाच्या पुरस्कर्त्यांनीच समाजवादाची केवढी विटंबना केली आहे हे पाहिले की खरोखरच विस्मय वाटतो. शेकडो एकर जमिनीचा मालक असलेला आणि भूमिहीन शेतकऱ्यांना साधे निर्वाहवेतन नाकारणारा बडा बागायतदारही समाजवादाचे अंगडे–टोपडे चढवून जिल्हापरिषदेपासून मंत्रिपदापर्यंत जी मिळेल ती जागा अडवीत असतो. आपल्या बुद्धीचा सोयिस्कर वापर करून वकिलीच्या व्यवसायामधून दर महिन्याला हजारो रुपये गोळा करणारा आणि संस्थानिकाच्या ऐषआरामामध्ये वावरणारा ' बुद्धिमंत'ही ' इंदिरावादी काँग्रेस हीच खरी समाजवादाची संरक्षणकर्ती आहे ' असा साक्षात्कार घडल्याचा दावा करतो. शिक्षणाचा गंध नसलेले आणि मोठमोठ्या ग्रंथांची नावे साध्या बोलण्यातही आवर्जून आणणारे अशा भिन्न भिन्न स्तरावरील लोकांचा हा समाजवादाचा उद्घोष ऐकला की ' समाजवाद म्हणजे अनेक रंगांचा सदरा आहे ' हे लुई फिशरचे उद्गार आठवतात. डाव्या कम्युनिस्टांपासून ' सिंडिकेट काँग्रेसपर्यंत अनेक राजकीय पक्ष हाच टिळा लावून राजकारणात वावरत आहेत. परंतु यापैकी कोणीही समाजवादाची व्याख्याही केलेली नाही किंवा त्याबद्दल तशी आस्थाही दाखविलेली नाही. दिल्लीतल्या केंद्रीय मंत्र्यांची काय किंवा निरनिराळ्या लहानमोठ्या राज्यातील मंत्र्यांची काय निवासस्थाने पाहिली, तेथला थाटमाट पाहिला की जिथली बहुसंख्य जनता दारिद्र्याच्या खाईमध्ये खितपत पडली आहे अशा देशाचे हे राज्यकर्ते आहेत याची जाणीव होणे सर्वस्वी अशक्य आहे. असे म्हणतात की बहुतेक मंत्र्यांच्या घरी टूथपेस्टपासूनच्या साऱ्या वस्तू परदेशी असतात. परंतु हेच मंत्री ' स्वदेशी–सप्ताहा'चे उद्घाटन करायला व्यासपीठावर चढले की लोकमान्य टिळकांपासून महात्मा गांधींपर्यंत स्वदेशीच्या पुरस्कर्त्यांची नावे अशी काही घोळून घोळून घेत असतात की स्वदेशीचा खराखुरा पुरस्कर्ता हाच अशी जमलेल्या लोकांची भावना व्हावी.

आणि म्हणूनच, 'अज्ञान आणि दारिद्र्य यांच्याविरुद्ध आपल्याला आता निकराने लढाई खेळायची आहे' या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रधानमंत्र्यांनी केलेल्या घोषणेतून देशाला कोणतीही प्रेरणा मिळत नाही. शब्दांचे अर्थ घालविण्याची वृत्ती सत्ताधाऱ्यांच्या हाडीमासी खिळलेली आहे असा का एकदा लोकांचा ग्रह झाला कीं ते वैफल्यवादाने ग्रासले जातात आणि मग 'प्रस्थापित' उलटून टाकण्याची भाषा त्यांना आकर्षित करू लागते. नक्षलवाद हा काही बाहेरून आयात होत नाही. फार तर त्याला परदेशातून आर्थिक मदत मिळत असेल. परंतु सत्ताधाऱ्यांच्या प्रामाणिकपणावरील अविश्वासातून तो खरा मूळ धरू लागतो. एखादा जादूगार दृष्टिभ्रमाचा फायदा घेऊन लोकांना नजरबंद करतो हे खरे. परंतु आपल्या या खेळाला मर्यादा आहे हे त्यास ठाऊक असते. राजकारणातल्या जादुगारांना ते भान नसते. नवनव्या घोषणांनी आपण लोकांची फसवणूक करीत आहोत हे त्यांना माहीत नसते असे नाही; परंतु टाळ्यांचा कडकडाट ऐकला की ते स्वतःचीच फसवणूक करू लागतात. आपण आणि जनता यांच्यामध्ये अंतर पडत चालले आहे, लोकांच्या आपल्यावरील विश्वासाला तडे जाऊ लागले आहेत याचे त्यांना विस्मरण पडते.

गेल्या ९ ऑगस्टपासून सुरू झालेल्या 'भूमि-संपादन' आंदोलनावरची इंदिरा गांधी यांची प्रतिक्रिया वाचली म्हणजे या विस्मरणाचे प्रत्यंतर येते. भूमिहीनांना शेतीसाठी जमीन उपलब्ध व्हावी यासाठी हे आंदोलन हाती घेण्यात आलेले आहे. असे आंदोलन करणे बेकायदेशीर आहे असे इंदिरा गांधी यांनी म्हटलेले आहे. केवळ कायद्याच्या पुस्तकावरून बोलायचे असेल तर हेच काय पण कोणतेही आंदोलन बेकायदेशीरच असते. परंतु जमीन धारणेसंबंधीच्या तत्त्वाचा वीस वर्षे उद्घोष होऊन जमीनदारांचे वर्चस्व रेसभरही कमी न झाल्याचे दिसत असताना, कायद्याच्या पुस्तकामध्ये नमूद केलेल्या कार्यवाही करण्याबाबत सरकारला जागे करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याबद्दल राज्यकर्त्यांनी चिडण्यासारखे काय आहे? केंद्रीय मंत्र्यांपासून जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत कोणाकडे किती जमीन आहे हे ध्यानात घेतले म्हणजे 'कसणाऱ्याची जमीन' या तत्त्वाचा पुकारा करणाऱ्यांच्या खोट्या वर्तनाची चीड आल्यावाचून रहात नाही.

हा धादान्त खोटेपणाच भारतीय राजकारणाचा स्थायीभाव झालेला आहे. जातीयवादाशी मुकाबला करण्याची भाषा बोलत असतानाच मल्लापूरमसारखे पाकिस्तान जन्माला घालायचे, समाजवादाचा उद्घोष करीत असतानाच करचुकव्या मंत्र्याला पक्षाध्यक्षपदाची बढती द्यायची, आणि निस्पृहतेचा डांगोरा पिटत असतानाच भ्रष्टाचाराची प्रकरणे दप्तरी दाखल करायची असा सध्याचा खाक्या आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी केलेले भाषण म्हणजे एक औपचारिक विधी होता, त्यापेक्षा त्याची जास्त मातब्बरी मानण्याचे कारण नाही असे मी जे म्हटले ते याचसाठी.

**– सदाशिव पेठकर**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**




" लई कटकटीचं ! त्या परीस धान्य बळकवा चळवळ काडा की हो ! "